# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ४२** **दि. ०७/१०/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०७/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत |
| नेरकर सरीता अनंत | चौधरी मनोज सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | भोईटे लताबाई रणजीत | महाजन सुनिल सुपडु |
| सोनवणे कांचन विकास | पाटील प्रतिभा सुधीर | शेख शबानाबी सादीक |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | कापसे मयुर चंद्रकांत | अत्तरदे रजनी प्रकाश |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| कोळी दत्तात्रय देवराम | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | बारी शोभा दिनकर | खडके सुनिल वामनराव |
| चौधरी चेतना किशोर | शेख हसीनाबी शरिफ | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णु रामदास | बरडे नितीन मनोहर | शेख सैईदा युसुफ |
| तायडे ज्योती शरद | बेंडाळे उज्वला मोहन | पटेल इब्राहिम मुसा |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | जोशी अनंत हरिश्चंद्र | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | तायडे सुरेखा नितीन | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे धीरज मुरलीधर | चव्हाण ज्योती बाळासाहेब | कैलास नारायण सोनवणे |
| भोळे सिमा सुरेश | मराठे जितेंद्र भगवान | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| काळे दिपमाला मनोज | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | राजेंद्र नारायण मराठे |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील रेखा चुडामण | महेश रतन चौधरी |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मा.अतिरीक्त आयुक्त श्री.एम.जी.गिरगावकर, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, श्री.पी.के.बागुल, सहा.संचालक, नगररचनाकार तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, वंदेमातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्य काळे अमित पांडुरंग २) कोल्हे ललीत विजय तसेच ३)सन्मा.सदस्या सोनवणे भारती कैलास ४) सोनवणे राखी शामकांत ५) कोल्हे सिंधु विजय ६) देशमुख सुन्नाबी राजु यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, ७ व्या वेतन आयोगाबद्दल माहिती द्यावी. कारण मी मागच्या महासभेत बोललो होतो. माझ्या माहितीनुसार ९४८ लोकांना ७ वा वेतन आयोग लागु झालेला आहे. परंतु काही लोकांचे बाकी आहे. त्याची माहिती द्यावी आणि ते कसे करणार आपण आणि किती टाईमात करणार आहे. त्याची सविस्तर माहिती मला द्यावी आणि सभागृहाला द्यावी. आणि किती लोकांना आणखी ज्यांच्यावरती आक्षेप नाही. म्हणजे काहीच नाही असे लिहलेले आहे. त्यांना देण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल. सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** सन्मा.व्यासपीठ सन्मा.सदस्य आप्पा साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे ७ व्या वेतन लागु करण्यासंदर्भामध्ये, तर आपल्या जळगांव महापालिकेमधुन जे १९९१ ते १९९७-९८ पर्यंत जे मुंबईचे लेखापरिक्षण १९३० अंतर्गत जे स्टॅटरी ऑडीट आहे. त्याच्या अनुषंगाने स्थानिक ऑडिट कार्यालयामार्फत आपल्या महापालिकेचे लेखापरिक्षण झालेले होते. त्याच्यामध्ये त्या ऑडिटच्या अहवालामध्ये एकुण ११८७ कर्मचाऱ्यांवरती आक्षेप नोंदविलेला होता. त्याच्यापैकी जे ७ वा वेतन आपल्याला लावायचा होता. त्याच्या अनुषंगाने जे कर्मचारी सद्या कार्यरत आहे. तर त्याच्यामध्ये ७ वा वेतन आयोग लावतांना जे कर्मचारी नव्याने लागलेले आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये कोणतेही प्रकारचे लेखापरिक्षण आक्षेप नाही. त्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची पडताडणी केल्यानंतर आपण जवळपास सर्व सेवा पुस्तक तपासणी झाल्यानंतर आपण ९४८ कर्मचाऱ्यांना मागच्या सभेत आप्पा साहेबांनी मागील केलेल्या चर्चेप्रमाणे आणि आपण प्रशासनाच्या वतीने जे काही आश्वासन दिले होते. त्याच्या अनुंषगाने ऑगस्ट पेड ईन सप्टेंबर ९४८ कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागु केलेला आहे. आणि यापुढे त्यांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणेच पेमेंट मिळणार आहे. आता आप्पा साहेबांनी जो प्रश्न विचारलेला आहे. किती कर्मचाऱ्यांना हे लेखापरिक्षण अहवाल येत आहे ज्यांना लावाण्यात आलेले नाही. तर त्याच्यापैकी जे आक्षेप आहे ११८७ कर्मचारी तर त्याच्यापैकी काही कर्मचारी आपले सेवानिवृत्त झालेले आहे. काही लोकांचे जे वारस आहे जिवंत पावलेले आहे. पंरतु आपल्याकडे सद्या जे ७७८ कर्मचारी आहे की, जे कर्मचारी सद्या कार्यरत आहे ज्यांना ७ वा वेतन आयोग लावण्यात आलेला नाही. तर त्याच्यावरती जे ११८७ कर्मचारी आहे की, ज्यांची लेखापरिक्षण अहवालाची आपल्याला अडचण आहे की, ज्यांना आपण ७ वा वेतन आयोग लावु शकलो नाही. तर त्याच्यापैकी विविध मार्गाने जी नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यात जवळपास २९२ कर्मचारी आहेत की, ज्यांच्यावर आक्षेप नोंदविलेला आहे. ज्यांची शैक्षणिक अर्हता त्या पदाला अनुषंगीक आवश्यक होती ती नाही. असे जवळ जवळ १६९ कर्मचारी आहे. ज्यांचा वयशमापन विविध वयामध्ये सेवाप्रवेश म्हणुन त्यांना व्हायला पाहिजे होता. तर त्याचा तो झालेला नाही. जवळ जवळ १५८ कर्मचाऱ्यांचे वय शमापीत करण्याचे संदर्भामध्ये हे अंमलात होत आहे. नंतर २३५ कर्मचाऱ्यांचे संदर्भामध्ये ज्यांनी जात प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तसेच ४३ कर्मचारी ज्यांचे सेवाप्रवेश होतांना आपल्याला वैद्यकीय तपासणी करावी लागते. आणि चारित्र पडताळणी करावी लागते असे जवळ जवळ ४४ कर्मचारी आहे.आणि ज्यांच्या नावासमोर आक्षेप नोंदविलेला नाही. मात्र कॉमन आक्षेप आहे. ज्याच्यामध्ये ५-६ प्रकारचे कॉमन आक्षेप नोंदविलेले आहे. असे ३४९ कर्मचारी आहे. असे जे काही कर्मचारी आहे ज्यांना आक्षेप नोंदविलेला आहे. अश्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये ७ वा वेतन आयोग लागु करण्याचे अनुषंगाने आणि ऑडिट पॅरांचे निर्धारण करण्याचे अनुषंगाने आपण शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्या अनुषंगाने शासनाकडचे जे काही मार्गदर्शन येईल. त्यात उदहारणार्थ वयशमापन आहे. त्याचाही प्रस्ताव आपण पाठविलेला आहे. आपला पाठपुरावा सुरु आहे. आणि इतर बाबतीत जे जातप्रमाणपत्र आहे ते आपण कर्मचाऱ्यांकडुन प्राप्त करुन घेत आहोत. आणि जे ३४९ कर्मचारी आहे ज्यांच्यावर आक्षेप नोंदविलेला नाही. परंतु कॉमन आक्षेप आहे. तर त्याचा सुध्दा अभ्यास करुन याच्यापैकी किती कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लावता येईल. जेणे करुन प्रशासनाला अडचण येणार नाही. परंतु कर्मचाऱ्याला जे काही न्याय मिळेल त्याच्या संदर्भात प्रशासनाकडुन पाठपुरावा सुरु आहे. आणि लेखापरिक्षणाच्या संदर्भामध्ये जे काही लेखा घेण्यात आलेला आहे त्याचा अहवाल प्रशासनाने तयार

केलेला आहे. तरी सुध्दा प्रशासनाकडुन शासनाकडे प्रस्ताव पाठवितांना त्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भामध्ये प्रशासनाने उत्तर दिलेले आहे तर त्याच्या संदर्भामध्ये प्रशासनाने काय केलेले आहे. नेमके त्या कर्मचाऱ्यांना देखील अवगत व्हावे. म्हणुन आम्ही संबंधीत कर्मचाऱ्यांना या ७ दिवसामध्ये संबंधीत कर्मचाऱ्यांना सांगितलेले आहे की, तुमच्याकडे जर एखादा डॉक्युमेंट असेल की जो प्रशासनाकडे नाही. तर ते सुध्दा जवळ जवळ सर्व कर्मचाऱ्यांच्या लेखापरिक्षणाच्या जबाबांची तपासणी करुन त्याचा अद्यावत अहवाल आम्ही शासनाला पाठविणार आहोत.आणि ती कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर आम्ही त्या कर्मचाऱ्यांच्या ७ व्या आयोगाबद्दल प्रयत्न करणार आहोत. याच्यामध्ये आता आपण ज्या कर्मचाऱ्यांपासुन कागदपत्र मागविलेली आहे. तर ती प्राप्त झाल्यानंतर ते स्क्रुटेनाईज केल्यानंतर आम्ही एक महिन्याच्या आत शासनाकडे तो अहवाल पाठवुन देऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता याच्यामध्ये पुर्वी जी बैठक झालेली आहे. हे ३४९ कर्मचाऱ्यांबद्दल काय झालेले आहे साहेब, अगोदर तर तुमचे आहे आस्थापना अधिक्षक लक्षमण सपकाळे यांचे अभिनंदन करतो की, यांनी ज्या लोकांना लावले आहे, ९४८ लोकांना,मी नगरसेवकांना विनंती करेल की, बाक वाजवुन स्वागत करा, एक चांगला काम, कर्मचाऱ्यांबद्दल एक चांगली भावना मॅडमच्या मार्गदर्शनाखाली महापौर मॅडमाच्या आदेशाने सगळे आनंदात आहे दिवाळी आनंदात जाईल आताची, आता बाकीचे दुसरे कर्मचारी आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जे बाकीचे अजुन जे राहिलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तेच सांगत आहे. आता दुसरे जे राहिलेले आहे. ज्यांची आपण चर्चा करतो आहे. त्या कर्मचाऱ्यांमध्ये दोन गट पडल्यासारखा विषय निर्माण होत आहे. तर त्याच्यासाठी आपण प्रयत्न करावे. आता एक महिन्याच्या आत. आता हे आपल्या हातातला विषय नाही. शासनाकडे तुम्हाला लवकर हे पाठवावे लागेल. मा.महापौरताई आणि सुनिलभाऊ महाजन,ताई पेक्षा तर सुनिलभाऊंचे जास्त कॉन्टॅक्ट मुंबईला आहे. आणि आपले सरकार आहे विशाल तर तुम्हीही राजुमामांना सांगा, लवकरात लवकर हे बाकीचे कर्मचाऱ्यांना लावण्यासाठी मामांना सांगुन हे प्रयत्न करावे. तत्पुर्वी हे जे कॉमन आक्षेप आहे ३४९ चे, त्यांना जर करता येईल तुम्हाला तर ते इमीजेट करुन टाका, ते आपल्या हातातले आहे की नाही ते. त्यांची तर काही अडचणी नाही ना साहेब. जो कॉमन आक्षेप असतो ते काय किरकोळ असतो. त्याच्याने त्यांच्या वेतनावरती फरक पडणार आहे का?

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** जेथे प्रशासनाला अडचण येणार नाही. हे जे ३४९ कर्मचारी आहे यांना कोणतेही प्रकारची बाधा पोहचणार नाही. या कर्मचाऱ्यांना नक्कीच लावण्याचे प्रयत्न करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** तो निपटुन टाका पहिले, आणखी दुसरा विषय. तुम्ही याच्यामध्ये काय बोलले, आता ४२ हे वैद्यकीय प्रमाणपत्र नाही त्यांच्याकडे. म्हणजे ते अनफिट आहे परंतु ते आज कामावर म्हणजे ते फिट आहे. त्यांना पण लवकर लावुन द्या. त्यात काय अडचण नाही, ते तर मान्य कराल तुम्ही.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** ते सुध्दा तपासणी करतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** तपासणी काय करता आता कामावर तर आहेच ना ते. तेव्हा लागले अनफिट होते किती दिवस झाले, ९० साली, १९९० पासुन सर्व्हिस करत आहे ते. १९८७-८८ पासुन ते १९९७-९८ किती वर्ष झाले. १९९८ जरी पकडले तर आज किती वर्ष झाले. २४ वर्ष झाले, आता २४ वर्षापासुन जर काम करीत आहे तर तुम्ही अनफिट कसे म्हणणार त्यांना. तुम्ही त्यांनाही लावा तात्काळ लावा. त्याच्यामध्ये काहीच अडचण नाही येणार तुम्हाला.

**श्री.सुनिल महाजन :-** त्यांना तर आठ दिवसात लावुन टाका.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई,

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि दुसरा विषय आहे. कर्मचाऱ्यांचाच विषय आहे. एक मिनींटात दोघी होते. एक मॅडम आहे. ७ व्यावर बोलत असाल तर बोला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ७ व्यावर बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ७ व्यावर बोलत आहे बोला.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, माझे प्रश्न आहे. एक मिनीट माझे प्रश्न आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ७ व्यावर बोलु द्या ना.

**श्री.नितीन बरडे :-** पहिले परवानगी मी मागीतली होती. जिल्हा वार्षिक योजने वरुन.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई मला ७ व्या वेतन आयोगावर बोलायचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** जिल्हा वार्षिक योजनेवरुन.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक एक विषय होऊ द्या ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई मला ७ व्या वेतनावर बोलायचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महानगरपालिकेला निधीसाठी परवानगी आलेली आहे. रस्त्यांचा निधी आलेला आहे.

**मा.महापौर :-** नितीन भाऊ, एक मिनीट फक्त ७ व्या वेतन अयोगाचे सुरु होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** परवानगी घ्या मग बोला.

**मा.महापौर :-** एक मिनीट, मी बोलत आहे ना त्रिपाठी भाऊ. हा विषय कमप्लीट होऊ द्या आणि याच्याशी वेगळे असेल तर मांडा ताई.

**श्री.कैलास सोनवणे :-** याच्यानंतर मी कर्मचारींच्या संदर्भात बोलणार आहे. एकच मिनीटात संपेल ते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आप्पांनी सविस्तर मांडलेलेच आहे. पण माझी जी शंका आहे ती हीच आहे की, ७ व्या वेतन आयोगात का अडचण येत आहे बाकीच्या कर्मचाऱ्यांना, ४ था, ५ वा आणि ६ वा हे वेतन आयोग सगळयांना सोबतच दिलेले आहे. ४ था, ५ वा आणि ६ वा म्हणजे जे काही कर्मचारी आहे, मला जी काही माहिती मिळालेली आहे. त्याप्रमाणे सगळयांचे जे राहिलेले कर्मचारी आहे त्यांना सोबतच मिळालेले आहे. आणि ७ व्या वेतन आयोगाच्या वेळेच हा प्रॉब्लम का आला? कर्मचारी तर तेच आहे ना, कर्मचारी बदलले किंवा त्यांच्यामध्ये काही अटीशर्ती बदलल्या असे काहीच नाही ना. आहे तेच आहे. आणि हे आयुक्तांचा अधिकार आहे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** ताईंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो बरोबरच आहे. परंतु ६ वा वेतन आयोग लागल्यानंतर ताई, हे लेखापरिक्षण झालेल आहे. आणि त्याच्यानंतर ६ वा वेतन आयोग झाल्यानंतर लेखापरिक्षण अहवाल आपल्याकडे निर्गमित झाल्यामुळे आपल्याला ही अडचण निर्माण झालेली आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि जे अनुकंपावर लागलेले आहे आणि काहींनी मेडीकलमुळे मुलांना लावलेले आहे त्यांच्यासाठी पण आहे का हे लागु.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** कसला,

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जे काही अनुकंपावर लागलेले आहे आणि काही ज्यांचा मेडीकल प्रॉब्लम आला त्यांनी त्यांच्या जागेवर त्यांच्या मुलांना लावलेले आहे. असे पण काही कर्मचारी आपल्या येथे आहे. त्यांना पण वेतन आयोग लागलेला नाही. त्यांना पण ह्या अटीशर्ती सगळया आहेत का ?

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** ज्यांचे लेखापरिक्षणामध्ये नाव नाही असे सर्व कर्मचाऱ्यांना आपण २४८ मध्ये कवर केलेले आहे. आपण जर एखादी केस अशी माझ्या निदर्शनास आणुन दिली तर नक्की मी त्याच्यावरती, आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणुन आम्ही करु शकतो. पण मला असे वाटते की, ज्यांचे लेखापरिक्षणामध्ये नाव नाही, जे नविन आलेले कर्मचारी आहे त्या सर्वांनाच आपण ७ वा वेतन आयोग लावलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ते पण लवकरात लवकर करावे कारण सगळयांची दिवाळी चांगली व्हायला पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब ज्याच्यामध्ये २३५ कर्मचारी असे पण आहे की, ज्यांच्याकडे जात प्रमाणपत्र नाही. जात प्रमाणपत्र मागुन त्यांचे संग २३५ ही होवुन जातील. जर कधी तुम्ही जे रिटायर झालेले आहे त्यांना पेन्शन

देत आहे. तर यांना लावायलाच पाहिजे. सादा मुद्दा आहे. जर रिटायर लोकांना पेन्शन चालु आहे. याच्यातलेच तर तुम्ही यांना, हे जे बाकीचे आहे ना. फक्त याच्यात अडचणीचे कोणते येऊ शकता तुमचे हे जे तुम्हाला शासनाकडुन पर्यायी मुदत मागावी लागेल ती विहित मुदतीत मार्गाने नियुक्ती नाही त्याची तुम्हाला शमापन करावे लागेल फक्त. शैक्षणिक अर्हतेची अडचण येऊ शकते. त्यांचेकडे असेल तर तुम्ही लावु शकतात आता. पेन्शन देतो आहे की नाही आपण रिटायर कर्मचाऱ्यांना, पेन्शन देणे म्हणजे काय ? मग ७ वा लावायलाच पाहिजे तुम्ही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई,

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** फक्त याच्याशी संबंधीत आहे की, दुसरे विषय आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्याशी संदर्भात आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे कर्मचाऱ्यांचे विषय आहे आता दुसरे असतील तर माहित नाही. ७ व्याच्या बाबतीत बोलत असतील कोणी तर बोलु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, अनुकंपाच्या मुलांना नियुक्ती देण्याच्या संदर्भातला विषय आहे. आता मला जी माहिती मिळाली की, उपायुक्त श्री.प्रशांत पाटीलांकडे त्यांचे काही अहवाल प्रलंबित आहे. आणि तो अहवाल वेळेमध्ये न दिल्यामुळे त्या नियुक्त्या लटकलेल्या आहे. ही बाब खरी आहे का ?

**मा.आयुक्त :-** सर, समिती तयार केलेली आहे. ज्याची समिती आहे, तो अहवाल द्यायचा राहिलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, परंतु दिरंगाई का होत आहे त्या अहवालाला.

**मा.आयुक्त :-** समितीपैकी एका सदस्यांनी सांगावे. वानखेडे साहेब.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, मुख्यलेखाधिकारी तथा उपायुक्त :-** सन्मा.सभागृह भाऊंनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्याच्या संदर्भामध्ये आयुक्त महोदयांनी जसे सांगितले,तश्या पध्दतीने आपली कमिटी नेमलेली आहे. समितीत आमची एक बैठक देखील झालेली आहे. परंतु आमच्या समितीचे जे एक सदस्य होते गोसावी साहेब अप्पर आयुक्त, त्यांची बदली झाल्यामुळे नव्याने चार्ज गिरगावकर साहेबांना दिलेला आहे. तर आम्ही परत पुन्हा बैठक घेऊ. समितीचे कामकाज चाललेले आहे. आणि विशेष म्हणजे मी जेव्हा मंत्रालयामध्ये गेलो होतो. याच्या संदर्भामध्ये मला ज्या काही त्रुट्या अडचणीच्या वाटल्या होत्या. मी त्याच्या संदर्भामध्ये ही तेथे चर्चा केलेली आहे. त्याच्या अनुषंगाने समितीचे काम चाललेले आहे. लवकरच समितीला आयुक्त महोदयांना तो अहवाल सादर करायचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय असते महापौरताई, अनिर्णीत ठेवायचे असेल, प्रलंबित ठेवायचे असेल, त्या वेळेला समिती गठीत करतो. आणि तीच परिस्थिती येथे प्रशासकीय पातळीवर सुध्दा असते. समिती कायद्याने नेमायला पाहिजे. परंतु समितीमध्ये एक सदस्याचे तोंड एका दिशेला असेल दुसऱ्या सदस्याचे तोंड दुसऱ्या दिशेला असेल मग अश्या पध्दतीने या निर्णय प्रक्रिया जे आहे या खुप लांब पर्यंत या विषयाला न्याय देऊ शकत नाही. तर मला वाटते याच्या संदर्भात अश्या पध्दतीचे जे काही विषय येत असतील. म्हणजे उदाहरण सांगतो आप्पा, निविदा संपल्याच्या तारखेत सुध्दा निविदा समितीची बैठक होत नाही. निविदा समितीची बैठक होत नाही. निविदा समितीच्या बैठकीमध्ये मुलेअचा एक विषय असतो, लेखापरिक्षणाचा एक विषय असतो. आणि त्याच्यामुळे त्याच्यावरती सह्या होत नाही. कामाचे कार्यादेश द्यायला ४-४, ६-६ महिने लागुन जाता. अश्या पध्दतीने या समित्यांचे कार्य हे विहित वेळेमध्ये पुर्ण होण्याचे दृष्टीकोणातुन काही तरी उपाययोजना होणे गरजेचे आहे. अन्यथा मला सांगा, जे कर्मचारी आता अनुकंपात आहे त्यांचे आता वय, ऐज बार होऊन गेलेली आहे. असल्या परिस्थितीवर येऊन गेलेले आहे. तर मला सांगा या समितीचा अहवाल, आपण याला बंधन घालुन द्याल का?

**मा.आयुक्त :-** हो सर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमचे म्हणणे काय आहे. आमच्या वतीने तुम्ही प्रशासन म्हणुन आपण या समितीचा कालावधी निश्चित केलेला होता. आणि दोन चार दिवस अगोदर त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. म्हणजे कुठेतरी आरसा त्याला राहील.

**मा.महापौर :-** याच्यापुर्वी ज्यांच्यावर लेखापरिक्षण आक्षेप नाही, ज्यांच्या जात प्रमाणपत्राचा विषय आहे आणि फिटनेस सर्टीफिकेटचे आहे. अश्या सगळयांची आपण शाहनिशा करावी, त्यांचे कागदपत्र आपण बोलवुन घ्यावे आणि त्यांच्या संदर्भातला निर्णय हा दिवाळीच्या आधी ७ व्या वेतन आयोगातुन करण्यात यावा. अनुकंपाच्या बाबतीत मागच्या वेळेस समिती गठीत झाली होती. मुदत संपली तरी त्याचा अहवाल प्राप्त झालेला नाही. नितीन भाऊ याची मुदत संपलेली आहे. म्हणजे नविन समिती कदाचित गठीत करावी लागेल. आणि १५ दिवसाच्या आत अनुकंपाच्या बाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. समितीचा अहवाल प्राप्त होऊन त्याबाबत आपल्याला ठोस निर्णय घ्यावा लागेल, कारण मला वाटते वानखेडे साहेब ज्या वेळेला मंत्रालयात गेलेले होते.त्यावेळेला बागवान साहेबांनी त्यांच्या सगळया शंकांचे निरसन केलेले आहे. म्हणजे आपण आपल्या स्तरावर आयुक्त लेव्हलवर त्यांना नियुक्ती देऊ शकतो. ज्यांना अडचणी नाही त्यांना. याबाबतचा १५ दिवसात अहवाल त्यांनी सादर करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय ७ व्याशी संबंधीत असेल तरच.

**श्री.चेतन सनकत :-** मॅडम, ज्या कर्मचाऱ्यांना ७ वा लागलेला नाही, असे कर्मचाऱ्यांमध्ये काही लोकांचे डॉक्युमेटस अवेलेबल आहे. तुमच्या रेकॉर्डला सर्व्हीसबुकला ऑलरेडी लागलेले आहे. आणि तीच अडचण तुम्ही त्यांना ऑडीट मध्ये दाखवलेली आहे. त्यांचे ऑलरेडी डॉक्युमेंटस तुमच्याकडे आहे. त्यांचे तरी क्लियर करा. जे सर्व्हीस बुकमध्ये आज रोजी आहे. तुम्हाला त्याचे पत्र देऊन मागवायची पण आवश्यकता नाही. असेही कर्मचारी आपल्याकडे आहे. असे ही नावे त्या यादी मध्ये आहे. ज्यांचे डॉक्युमेंटस मागविण्याची आवश्यकता नाही. तुमच्या रेकॉर्डला आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** जे असतील ते मागवुन घ्या ना.

**श्री.चेतन सनकत :-** नाही, जे ऑडिटमध्ये शक निघालेले आहे. ते ऑडिट डॉक्युमेंटस त्यांचे जमा आहे. मागवायची पण आवश्यकता नाही. ते क्लियर करा ना.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ७ व्या वेतन आयोगाबद्दल सगळयांनी मुद्दा मांडलेलाच आहे. फार काही मी याच्यावर बोलणार नाही. कर्मचाऱ्यांनी सगळेच सदस्य नगरसेवकांना या संदर्भात विनंती केली होती. आणि एक अशी महत्वाची माहिती मिळालेली आहे की, जे काही ऑडिट ऑब्जेक्शन निघालेले होते. ते सगळया प्रभाग समिती निहाय त्याची पुर्तता करण्याकामी प्रभाग अधिकाऱ्यांनी खुप चांगल्या पध्दतीने काम केलेले आहे. तर फक्त प्रशासनाकडुन आयुक्त महोदया आपल्याला विनंती आहे. जे काही प्रशासकीय लेव्हलवर विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न चालु आहे. ते तर कर्मचाऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे. त्यांच्यात हा विश्वास निर्माण झाला पाहिजे की, वरिष्ठ प्रशासन आमच्या पाठीशी आहे. आणि आम्हाला सुध्दा कारण आता हे जे दोन गट तयार झालेले आहे जे प्रशासनाकडुन जाणवत आहे. आम्हालाही ७ वा वेतन आयोग लवकरच आहे. यासाठी प्रशासकीय स्तरावर सुध्दा स्पीडली प्रयत्न सुरु आहे. ऐवढा विश्वास त्यांच्यापर्यंत पोहचवा. महापौरताई एक महत्वाचा विषय, ते आपण सगळेच म्हणत आहोत तसे की, कर्मचाऱ्यांची दिवाळी चांगली झाली पाहिजे. त्यासाठी ७व्या वेतन आयोगाचा विषय लवकर मार्गी लावा. तसेच माझी तुम्हाला एक विनंती आहे. आयुक्त महोदया तुम्हाला विशेष विनंती आहे. कर्मचाऱ्यांची आपण काळजी करत आहोत. निश्चितच करायची आहे. तसेच जळगांवकर नागरीकांची सुध्दा दिवाळी चांगली झाली पाहिजे. आणि खुप दुर्देवाने सांगाव लागत आहे की, या दोन दिवसांपुर्वी सगळयाच वृत्तपत्रात सगळयांनी वाचलेले आहे की, जळगांव शहराच्या स्वच्छतेचा मानांकन एकदा पुन्हा घसरलेला आहे. खरं तर मला लक्षवेधी म्हणुन हा विषय आज सभागृहात मांडायचा होता. नगरसचिव साहेबांशी माझी या विषयासंदर्भात चर्चाही झाली. आणि पुन्हा एकदा नगरसचिवांनी लक्षात आणुन दिले की, मुळात कायद्यामध्ये लक्षवेधीची प्रोव्हीजनच नाही आणि आपले उपविधी तयार नाही. महापौर महोदया दोन विषय मला बोलायचे

आहे, एक विषय हा कचऱ्याची समस्या जळगांवकरांची आणि त्या विषयाला अनुसरुन हा नगरसचिवांनी जो विषय मांडलेला आहे की, आपली उपविधी तयार नाही. नितीनभाऊंना, सुनिलभाऊंनाही आठवत असेल की, गोराणे साहेबांनीच विषय मांडलेला होता.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर महोदया, माझा विषय राहुन जाईन. महापौर महोदया, ७ वा वेतन संपला ना, माझा विषय घ्या. ७ वा वेतन संपला का?

**श्री.कैलास सोनवणे :-** कर्मचाऱ्यांचा विषय बाकी आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया,

**श्री.नितीन बरडे :-** तुम्हाला विषय घ्यायचा असेल तर घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ही काही पध्दत नाही, असे बोलणे योग्य नाही.

**श्री.नितीन बरडे :-** कैलास आप्पा ७ व्या वेतनवर बोलायचे ठरले होते ना, बसलो ना गुपचुप.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी एकदम हळु बोलत आहे. असे काय करतो आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, आपण जळगांवकरांच्या कचऱ्याच्या समस्याबद्दल बोलतो आहे. मी प्रशासनाला एकदा आठवण करुन देत आहे मी. ज्यावेळेला टेकाळे साहेब आयुक्त म्हणुन होते. त्या वेळेला उदय पाटील साहेबांकडे आरोग्यधिकारी या पदाचा कार्यभार होता. त्यावेळेला ललितभाऊ महापौर होते. आणि त्यावेळेला आपण एक राबविण्यात आलेली होती योजना. संपुर्ण शहराची स्वच्छता आपण त्यावेळेला केलेली होती. एक आपण चार्ट बनविलेला होता आणि प्रभाग निहाय प्रत्येक प्रभागाची स्वच्छता करण्यात आलेली होती. तीच स्वच्छता मोहिम पुन्हा एकदा राबविणे अत्यावश्यक झालेले आहे. जळगांवकरांना किमान हा दिलासा आपण दिला पाहिजे. त्यासाठी आपण एक प्रोग्रॅम बनविले होते. त्या प्रोग्रॅमची फाईल अजुनही प्रशासनाकडे आहे. डिटेल चार्ट होता की, कोणत्या प्रभागामध्ये कोणत्या तारखेला किती वाहने जाणार, किती कर्मचारी जाणार, कश्या पध्दतीने साफसफाई होणार आणि या प्रोग्रॅमला पुन्हा एकदा राबवा यासाठी मी मागेही फॉलोअप घेतला, पण तत्कालीन आपले जे आयुक्त होते त्यांना यामध्ये कोणताही स्वारस्य नव्हते आणि त्यामुळे या गोष्टीला विरोध झाला. पण जी गोष्ट आपण यापुर्वी केलेली आहे, जळगांवकरांना दिवाळीच्या तोंडावरच यापुर्वी दिलासा दिलेला आहे. तो दिलासा किमान आपण आता देणे अत्यावश्यक आहे. आणि तो आपण सहजपणे देऊ शकतो. या संदर्भातली सगळी माहिती उदय पाटील साहेबांना आहे. त्यांनी त्या वेळेला खुप चांगले काम केलेले होते. आणि हेच सभागृह त्यावेळेला सुध्दा होते. हेच नगरसेवक त्यावेळेला होते. तर ती मोहिम ती स्वच्छता मोहिम तातडीने दिवाळीपुर्वी प्रशासनाने राबवावी अशी माझी प्रशासनाला विनंती आहे. महापौरताई आपण सुध्दा स्वत: याच्यामध्ये लक्ष घाला. खरं तर हे खुप महत्वाचे आणि जळगावकरांच्या जिवाळयाचा प्रश्न आहे. आणि अत्यंत शर्मेची बाब आहे की, आपल मानांकन स्वच्छतेच घसरलेल आहे. अर्थात या विषयासंदर्भात बोलण्यासारखे खुप काही आहे. मानांकन घसरण्यामागचे खुप कारणे आहे. आपला घनकचरा प्रकल्प अजुन ही तयार नाही. सभागृहात अनेकांच्या भावना फार तिव्र आहे. एकतर सभा आपल्या फार मोठया कालावधीनंतर होतात. त्यावेळेला प्रत्येकाला बोलायचे असते. मी समजु शकते प्रत्येकाला बोलण्याची संधी सुध्दा मिळायला पाहिजे.फार काही मी या बद्दल बोलणार नाही. पण ही स्वच्छता मोहिम पुन्हा एकदा राबवली जावी अशी माझी आयुक्तांना सुध्दा आणि महापौरताईंना सुध्दा विनंती आहे. नम्र अवाहन आहे की, सेम राबविण्यात यावी. आणि एक विषय जो राहिलेला होता की, नगरसचिव साहेबांनी त्यावेळेला प्रस्ताव मांडलेला होता की, आपली उपविधी तयार व्हावी आणि मला वाटते संपुर्ण सभागृहाने त्याला एकमताने मान्यता दिली होती. आपली राजकारणात असलेली अगदी फ्लो मध्ये असलेली लढाई ती दुरदैवाने प्रशासकीय लेव्हलवर सुध्दा आली. नगरसचिवांनी खरं तर खुप चांगला प्रस्ताव त्यावेळेला दिलेला होता. पण नगरसचिवांना त्याचे क्रेडिट मिळेल म्हणुन वरिष्ठांनी तो प्रस्ताव हाणुन पाडला,तर मला वाटते नितीनभाऊ आपण तो प्रस्ताव इमप्लीमेंट केला पाहिजे. आपली उपविधी तयार होणे आवश्यक आहे कारण सभा कामकाज चालवायला आपल्याला नितीनभाऊ खुप अडचण येते. तुम्ही जेष्ठ सदस्य आहात तुम्हाला

चांगली माहिती आहे या बद्दलची. उपविधी नसल्यामुळे खुप अडचणींना आपल्याला सामोरे जावे लागतात आणि नगरसचिव साहेबांनी दिलेला प्रस्ताव खुप चांगला होता. पण त्यावेळेच्या तात्कालीन आयुक्तांनी आयुक्त महोदया तो होऊ दिला नाही. तर मला वाटते ते आपण पॉझिटीव्हली घ्याल. आणि श्रेय वादाची लढाईत प्रशासन अडकणार नाही. ती लढाई राजकारणींसाठीच असु द्या.मात्र हा विषय मार्गी लावा. एक स्वच्छता मोहिम दिवाळीपुर्वी आणि दुसरे आपले उपविधी तयार इमिजियेट तयार करणे कामी नगरसचिवांनी दिलेला प्रस्ताव.

**नगरसचिव :-** माजी महापौर सन्मा.सदस्या सौ.भारतीताई सोनवणे यांचे रजेचे अर्ज मा.महापौर यांच्याकडे आले आणि त्यांनी ते मंजुर केलेले आहे.

**मा.महापौर :-** बोला नितीनभाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा नियोजन कार्यालय, यांच्याकडुन आपल्याला जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.गुलाबभाऊ पाटील आणि जिल्हानियोजनचे सचिव जिल्हाधिकारी श्री.अभिजीत राऊत साहेब यांच्या सहीने जळगांव शहराला ६८ कोटीचा निधी मिळालेला आहे. ६१ नाही ६८ होता तो लक्षात ठेवा. आजही मी आकडे तुम्हाला देऊन दिल. आज तो निधी मार्च २०२१ प्रमा आपल्याकडे आहे.आपल्याला पत्र महानगरपालिकेला ४ थ्या आणि ५ व्या महिन्यात प्रमा आलेली आहे. यामध्ये मनिषा कॉलनी, गणपती नगर, मेहरुन भागातील रस्ते, जयनगर ओंकारेश्वर परिसरातील रस्ते, रामदास कॉलनी वर्धमान कॉलनी परिसरातील रस्ते, प्रभात कॉलनी समर्थ कॉलनी परिसरातील रस्ते, अनंत हाऊसींग सोसायटी मधील रस्ते, त्यानंतर शिवराम नगर, सुहयोग नगर, गुलमोहर कॉलनी, गुरुकुल कॉलनी येथील रस्ते, त्यानंतर आहे गजानन हाऊसींग सोसायटी किशोर ढाके यांच्या घरासमोरील रस्ते, धांडे क्लासेस माझ्या प्रभागातील हे रस्ते आहे. प्रभा २०२१ ४ थ्या महिन्याला आपल्याला पोहचलेली आहे. याचे टेंडर झालेले आहे. वर्कऑर्डर झालेल्या आहेत. कामांची वर्कऑर्डर प्रमा येऊन १६ महिने झालेले असुन अजुन सुध्दा रस्त्यांची कामे का सुरु झालेली नाही. याचा मला प्रशासनाने उत्तर द्यायचे आहे. महापौरताई कामे का चालु झाले नाही. वर्कऑर्डर तयार आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याचे उत्तर द्यावे.

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** जी सन २०२०-२१ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली म्हणत आहे. ज्या ज्या कॉलनींमध्ये, त्यांच्या प्रभागामध्ये, तर मी जी आता माहिती घेतलेली आहे. ज्या मध्ये जवळपास सर्वांचे कार्यादेश झालेले आहेत.फक्त एक किशोर ढाके यांच्या घराजवळ.

**श्री.नितीन बरडे :-** १६ महिने झालेली आहे, निधी अकाऊंटला आलेला आहे आणि यांचे टेंडर अजुन झालेले नाही.

**श्री.अनंत जोशी :-** एक मिनीट, तुम्ही कार्यादेशाबद्दल बोलु नका, आम्ही काय म्हणत आहोत. कामांची सुरुवात का झाली नाही.

**श्री.नितीन बरडे :-** कामे का सुरु झाली नाही याचे उत्तर द्या.

**श्री.अनंत जोशी :-** सन्मा.रहिवासी किशोर ढाके यांचे घरासमोरच्या रस्त्याचे कार्यादेश बाकी आहे असे आपले म्हणणे आहे. आम्ही कार्यादेशाबद्दल बोलत नाही. आम्ही काय म्हणत आहोत. ज्यांचे कार्यादेश झालेले आहे. ते कामे आजपर्यंत का सुरु केले नाही याचे उत्तर प्रशासनाने द्यावे.

**श्री.एम.जी.गिरगावकर,शहर अभियंता :-** तेच सांगतो की, आता पर्यंत सुरु होता पाऊसाळा, त्याच्यामुळे पाऊसाळयामध्ये डांबरीकरणचे कामे होत नाही. त्याच्यामुळे या सर्व कामांसाठी आम्ही मिटींग ठेवुन निर्णय घेतले की, प्रामुख्याने खड्डे तरी बुजवुन घ्या आणि पाऊसाळा झाल्यानंतर हे सर्व कामे हातात घ्या असे सांगितलेले आहे. आणि आता दसरा संपलेला आहे आणि पाऊसाळाही संपलेला आहे. तर आता आम्ही मिटींग बोलवली होती. ती आपण परवाच्या दिवशी मिटींग घेतली. तर अजुन ही काही कामे मुदतीचे असतील ते तात्काळ सुरु करण्याच्या सुचना दिलेल्या आहे.

**श्री.नितीन बरडे :-** पाऊसाळा सुरु झाला असे म्हणत आहे तुम्ही. गुरुकुल कॉलनी, ही आहे ३ ऱ्या महिन्यातली २०२२ शिवराम नगर, सुहयोग कॉलनी, गुरुकुल कॉलनी. मार्च महिन्यातली, हा मक्तेदार ३ वेळा तेथे त्याची यंत्रणा घेऊन आलेला आहे. तुम्ही काम का सुरु केलेला नाही. बोला तेव्हा पाऊसाळा होता का ? अनंत हाऊसींग सोसायटीमध्ये पाऊसाळा होता का? का सुरु केले नाही. अनंत हाऊसींग सोसायटी मध्ये चालु केलेले काम तुम्ही बंद केलेले आहे. का केले. प्रशासनाने उत्तर द्यायचे आहे. आप्पा, प्रमा कधीची आलेली आहे. ४ थ्या महिन्यात,

**श्री.कैलास सोनवणे :-** ५ महिने झाले ना.

**श्री.नितीन बरडे :-** वर्कऑर्डर ८ महिन्यानंतर झालेली आहे. वर्कऑर्डर मग ८ महिने कशात घालविले यांनी.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता तुम्हीच सत्तेमध्ये आहे, तुम्हीच सगळे आहे. आम्हाला कशाला विचारतात.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा, सत्तेत नाही, तुमचे आभार, धन्यवाद, हे ठराव तुम्हीच केलेले होते. तुमच्याकडे आम्ही आलेले होते विंनती करुन आमचे पत्र कोणी घेत नव्हते. वहिणी महापौर असतांना आमचे हे ठराव झाले आणि हा निधी आलेला आहे. बरोबर आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा याच्यात सत्ताधारी किंवा विरोधकाचा विषय नाही. प्रशासनाचा विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तर तुम्हीच सांगा आता

**श्री.नितीन बरडे :-** त्यांने सांगावे उत्तर.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला सांगा मार्च मध्ये जर वर्कऑर्डर झालेली आहे तर ते काम व्हायला पाहिजे होते. ठेकेदाराची चुकी अशीन तर ठेकेदारावर कार्यवाही करा.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा तिसऱ्यांदा येऊन गेला ठेकेदार तेथे काम करायला. का अडविले तुम्ही सांगा.

**श्री.सोनगिरे, कनिष्ठ अभियंता, सा.बां. :-** सन्मा.सभागृहाला मी नम्रपणे निवेदन करतो की, नितीनभाऊंनी जो विषय सांगितलेला आहे. त्या परिसरातील जरी वर्कऑर्डर झालेली होती परंतु त्या परिसरातील अमृत योजनेचे नळ कनेक्शन काही पाईप लाईन बाकी होती. त्यामुळे आपल्याला पाणीपुरवठयाकडील जी एन.ओ.सी. मिळायला पाहिजे ती मिळालेली नव्हती.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळेला बोलायला लागले म्हणुन या गोंधळात त्यांचे बोलणे ऐकु आले नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** अमृतचे कनेक्शन बाकी,अपार्टमेंटचा निर्णय लोकांना कनेक्शन द्यायचा. पाईप लाईन टाकली जात नाही. टेस्टींग होत नाही. व्हालचे कामे राहतात. याला जबाबदार कोण.हे कोण करणार आहे. ही जबाबदारी कोणाची होती.

**श्री.सोनगिरे, कनिष्ठ अभियंता, सा.बां. :-** प्रशासनाचीच आहे.

**श्री.अनंत जोशी :-** मग का केली गेली नाही. किती दिवस झाले अमृत योजनेला. आमचे कैलास आप्पांनी ठराव केल्यानंतर मा.गुलाबभाऊ , महापौरताई, सुनिलभाऊंमुळे नितीनभाऊंमुळे निधी मिळाला आहे. निधीसाठी काय कराव लागत नगरसेवकांना ते आम्हालाच माहित आहे. आम्ही काय करतो आम्ही काय सहन करतो तुम्हाला माहित नाही. त्याची कल्पना नाही तुम्हाला अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना तो निधी आणण्यासाठी, जळगांवचे रस्ते बघितले का तुम्ही, आमच्या प्रभागांचे रस्ते बघितले का तुम्ही. यासोबत फिरा, आम्हाला नागरीक काय म्हणतात. नागरीकांचे कुठले फोन आम्हाला ऐकावे लागतात. काय आम्हाला वागणुक मिळते नागरीकांकडुन काम करुन सुध्दा अशी अवस्था आहे या शहरामध्ये.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बरोबर आहे.

**श्री.अनंत जोशी :-** कोई बिचमे नही बोलेंगा ईबाभाई. गंमतीचा विषय नाही हा. कोणीच मध्ये बोलायचे नाही. काय वाटते तुम्हाला सगळयांना, काय वाटते तुम्हाला सगळयांना. हे बघा सोनगिरे साहेब तुम्ही एकटे जबाबदार नाही. मी तुम्हाला किंवा गिरगावकर साहेबांना व्यक्तीगत बोलत नाही. मी प्रशासन म्हणुन बोलत आहे. कधी सुरु झाली अमृत योजना, सगळ मक्तेदारावर सोडणार आहे का तुम्ही. तुमचे इंजिनिअर फिरत नाही.कनेक्शनला

आम्ही फिरतो आम्ही. तुमचे पाणी पुरवठाचे इंजिनिअर फिरत नाही. संजय पाटील साहेबांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना चार्ज दिल्यानंतर तेव्हापासुन त्या कामात सुधारणा झाली. त्या संजय पाटील साहेबांनी गेल्या दोन महिन्यामध्ये बऱ्याच स्पीडने काम केलेले आहे. त्याच्या आधी कनेक्शन टाकायचे, पाईप टाकायचे नितीन बरडे करीन, बंटी जोशी करीन, नगरसेवक करतील. तुमचे इंजिनिअर जागेवर जात नाही. त्यांना गल्ल्या माहित नाही. त्यांना कनेक्शन माहित नाही. कुठल्या कामांची पध्दत आहे ही. तुमच्या इंजिनिअरला १०० वेळा सांगुन पण काम होत नाही. शेवटी आम्ही जातो कनेक्शनसाठी, आम्ही लोकांकडे पावत्या जमा करतो. आम्ही लोकांना म्हणतो तुमचे कनेक्शन असेल तर कळवा म्हणुन, सगळी खापर त्या मक्तेदारावर फोडणार आहे का तुम्ही. प्रशासनाची कुठलीच जबाबदारी नाही का ? तुम्हाला जर दिसत आहे की, शिवसेनेची सत्ता आल्यानंतर महापौर शिवसेनेचे बसल्यानंतर मा.तत्कालीन पालकमंत्री गुलाबभाऊंनी, त्यावेळेस गुलाबभाऊंनी पैसा दिला, निधी दिला, महापालिकेची आर्थिक परिस्थिती नाही आपली. कामे होत नाही. छोटया छोटया सुविधा आपण शहर वासीयांना देऊ शकत नाही. आणि अश्या वेळेस जर राज्य शासनाकडुन कुठला हातभार आपल्याला निधीचा लागत असेल निधी मिळत असेल तर त्याची किंमत नाही आपल्याला. टेंडर प्रक्रियेला ७-७ ८-८ महिने लागुन जातात.वर्डऑर्डर द्यायला तुम्हाला ३-३ ४-४ महिने लागुन जातात. वर्कऑर्डर दिल्यानंतर ६-६ महिने काम सुरु होत नाही. काय भाऊ कोण आहे ते, एल.जी. पाटील कोण आहे ते, सुहयोग कॉलनीचे, एम.डी.पाटील त्यांना ४ कॉलन्यांचे काम दिलेले आहे काय अडचण होती तेथे. तुम्ही सांगणार की गिरगावकर साहेब सांगणार, तुम्ही बोलणार की, तुमच्या चुका आहे. तुम्ही बोलले आता. एक शब्द बोलले म्हणुन मला पुढे कन्टीनीव्ह करावे लागले. तुमच्या चुका आहे. अमृतच्या कनेक्शनवर राहिलेले कामे आहे. त्या अपार्टमेंटचे निर्णय दोन दोन वर्ष होत नाही. अपार्टमेंटला कनेक्शन किती द्यायचे कसे पध्दतीने द्यायचे. तुमचे काहीच नियोजन ठरत नाही. दोन दोन वर्ष लागतात त्याला. प्रशासनाचे काय आहे. काय करता काय तुम्ही. कर्मचारी या नात्याने तुम्ही काय करतात. पगाराच्या दिवसाची वाट बघतात फक्त.  ते काढण्याची वाट बघतात फक्त. सर्व जबाबदारी लोकप्रतिनिधींची आहे. नगरसेवकांची, शिव्यापण नगरसेवक खातील. कामांसाठी वनवन ते फिरतील. निधीसाठी ते फिरतील. तुमच्या मागे फिरायचे टेंडर करा, वर्कऑर्डर करा. टेंडर करा, वर्कऑर्डर करा. लवकर करा, कामे सुरु  करा. दिवसातुन १०० फॉलोअप तुमचा घ्यायचा. तुमची जबाबदारी काय ? पगाराच्या दिवसाची वाट बघतात का फक्त. जे रिटायरमेंटला आलेले लोकं आहे.  ते धरले जातील, त्यांना उबग आला असेल. त्याच्यात उमंग राहिली नसेल, उर्जा राहिली नसेल मान्य आहे. पण नविन लोकं पण आहेत ना.त्यांच्या आंगात पण काम नाही. आम्ही बघतो. आता ६.५ कोटीच एक प्रकरण नितीनभाऊ बरडे आणि आमच्या वार्डातल कलेक्टर ऑफिसला पडलेल आहे. हे जर सत्तांतर झाले नसते, हे जे राजकीय सत्तांतर झाले, गोंधळ झाला हे झाले नसते तर तो निधी ही आम्हाला मिळाला असता. ती फाईल कलेक्टर ऑफिसला पुरविण्यासाठी तुम्ही साक्षीदार आहात. तुमच्या ९ व्या मजल्यावर मी आणि नितीनभाऊ किती किती तास बसलेलो आहे. सकाळी १० -११ ला यायचे आणि ८-८ वाजता घरी गेलेलो आहे. तिन दिवस सतत घरी दुपारी जेवायला गेलेलो नाही आम्ही लोकं. त्याच्यानंतर ती फाईल कलेक्टर ऑफिसला पोहचली. जर आम्ही तेथे बसलो नसतो तर ३० दिवस पण ती फाईल हलली नसती. जर आम्ही तीन दिवस तेथे बसलो नसतो. ३० दिवस, ६० दिवस ती फाईल तेथुन हल्ली नसती. एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर जायला १५ दिवस लागले असते जर आम्ही फॉलोअप घेतला नसता तर.काय करत आहे प्रशासन. माहिती आहे का काय शिव्या देतात लोकं. आमच्या आई-बहिणी सुध्दा काढतात नागरीक. तुमच्या चुकांमुळे, शेवटी लोकप्रतिनिधी नगरसेवक हा लोकांमध्ये जात असतो. लोकांना जबाबदार तो असतो. तुमच्या पर्यंत कोण येतो हो, अधिकाऱ्यांपर्यंत कर्मचाऱ्यांपर्यंत कोण येतो, तुमची नावे पण माहित नसते कोणाला, आणि आले की, तुम्ही बाहेर उभे करतात त्यांना. फॅरमॅलिटी म्हणुन त्यांच्या तक्रार घ्याल, अर्ज घ्याल सोडुन द्याल. आम्हाला लोकांपर्यंत जावे लागते, मिसळावे लागते, शिव्या खाव्या लागतात. याची जाणीव आहे की नाही तुम्हाला. अहो, सभागृह म्हणुन, लोकप्रतिनिधी म्हणुन, पदाधिकारी म्हणुन, नगरसेवक म्हणुन आम्ही तुम्हाला सहकार्य करतो ना

प्रत्येक ठिकाणी. तुम्हाला कोणाचीच काही काळजी नाही. अनेक शहरामधील अमृत योजना संपलेल्या. कार्यान्वीत झाल्या. पाणीपुरवठा सुरु झाला. तुमची योजनाच होत नाही. अख्ख्या शहराचे वाटोळे करुन ठेवले आहे. ज्या रस्त्यांच्या कामांची तुम्ही एन.ओ.सी.देत आहे आता की, पाणी पुरवठा विभागाकडुन कुठलीच अडचण नाही. कनेक्शन झाले, टेस्टींग झाले. त्याच रस्त्यावर जेव्हा काम करायला सुरुवात होते. परत त्याठिकाणी खोदकाम केले जाते. आता गिरणा टाकी ते पॉलिटेक्निकचा रस्ता लावला, मी मॅडमला फोटो पाठविलेले आहे. ज्या वेळेस तुम्हाला माहिती आहे की, उद्या पासुन काम लावायचे आहे. ठेकेदाराने मटेरिअल टाकले, कॉन्ट्रॅक्टरने त्या ठिकाणी मटेरिअल टाकले. त्याच वेळी तुम्हाला कसे आठवते की, तेथे एक लाईन आपल्याला दुसरीकडे जोडायची आहे म्हणुन तुम्हाला माहिती नव्हते. बातमी होती ना की, गणेश कॉलनीचा रस्ता सुरु होणार आहे. पॉलिटेक्निकचा रस्ता सुरुहोणार आहे. चार रस्त्यांचे काम सुरु होणार आहे. ज्या दिवशी त्या ठेकेदाराने मटेरिअल टाकले त्या दिवशी कसे काय तुम्हाला आठवते की, पाईप लाईनचे काम करायचे आहे म्हणुन, मी मॅडमांना विनंती केली, गेल्या अनेक वर्ष त्या ठिकाणी गिरणा टाकीची भिंत रस्त्यामध्ये होती. त्या गिरणा टाकी पॉलिटेक्नीकच्या रस्त्यावर, ८ मिटर रस्ता आहे, मॅडम त्या ठिकाणी व्हिजीटला आले मी विंनती केली की, ही भिंत जर मागे घेतली तर रस्ता मोठा होईल. सगळया ठिकाणी १६ मिटरचा रस्ता आहे म्हणुन, मॅडमांनी फॉलोअप घेतला, निर्णय घेतला आणि कार्यवाही केली, अहो, त्या ठिकाणाहुन पाणी पुरवठा होतो अख्या शहराला, सेनसेटीव्ह विषय आहे तो. त्या ठिकाणी भिंत पाडली मॅडमांच्या आदेशाने. आज तेथे पत्रे देखील ठोकले गेलेले नाही. आर्ध्या शहराला पाणी पुरवठा होतो, उद्या जर काही कमी जास्त झाले तर याला जबाबदार कोण. ही आपली कार्यतत्परता आहे, हे आपले काम आहे हे आपले विभागाचे कर्मचारी आहे. ती भिंत पाडली त्या ठिकाणी तातडीने नव्याने बांधकाम व्हायला पाहिजे होते वीट काम व्हायला पाहिजे होते. ते जरी नाही झाले तर त्या ठिकाणी पत्रे ठोकले गेले पाहिजे होते. आज पंधरा दिवस झाले उघडी पडलेली आहे ती गिरणा टाकीची कंपाऊंड वॉल, तुमच्या मुळे तुमच्या दिरंगाईमुळे, तुमच्या कामचुकारपणा मुळे, तुमच्या दुर्लक्षामुळे आमचा आलेला निधी आम्ही खर्च करु शकत नाही. एक वर्ष निवडणुकीला राहिलेला आहे. पुढच्या वर्षी निवडणुकीसाठी आम्हाला लोकांसमोर जायचे आहे. महापौर आमच्या झाल्या जयश्रीताई महाजन त्याला आज जवळपास दिड दोन वर्ष झ ााले, तेव्हाचे निधी आहे. आज देखील कामे होऊ शकत नाही. पुढचे ६ ते ८ महिने आमच्याकडे आहे. आम्ही काम कसे करायचे. आणि लोकांसमोर मुद्दे कोणते मांडायचे, लोक सांगतील ना आम्हाला की, रस्ते मंजुर आहे.आज दुख: वाटत की, आमच्या प्रभाग १२ मध्ये, नितीन भाऊ आणि आमच्या प्रभागामध्ये १२ ते १४ कॉलनींचे, एखाद दुसरा रस्ता नाही, १२ ते १४ कॉलनींचे डांबरीकरणचे पैसे मंजुर आहे. आम्ही काम सुरु करु शकत नाही. आमच्या चुका आहेत या. आम्ही तुमच्याकडे पाठपुरावा करतो, आम्ही तुमच्या मागे लागु, आम्ही त्या ठिकाणी जाऊ, आम्ही तुमच्याकडे १०० वेळा येऊ. आम्ही तुम्हाला दिवसातुन १० वेळा फोन लाऊ. अहो एक साधी बोअरिंग करायची आहे. त्या रामदास कॉलनीच्या बगिच्यामध्ये उद्यानाचे काम सुरु आहे. तेथे बोरिंग करायची आहे. चार महिने झाले फिरतो आहे चार महिने. बोअरिंग करायची आहे नुस्ती. तेथे बगीच्याचे काम सुरु करायचे आहे पाणी लागेल. चार महिने झाले बोअरिंगसाठी फिरतो आहे तुमच्या सगळयांच्या मागे. पगाराच्या दिवसाची वाट पाहता फक्त, सकाळी आल्यानंतर १०.०० वाजता आले की, संध्याकाळी ६.०० वाजेची वाट बघायची. या शहराबद्दल आपुलकी नाही आपल्याला. आपण स्थानिक लोकं आहोत ना. तुमचे कुटुंब पण या शहरात राहते, तुमचे मुलं पण या शहरात राहतात. या कॉलन्या, या गल्ल्या, हे रस्ते तुमचे पण आहे. तुम्ही स्थानिक आहात, तुम्ही लोकल आहात, बाहेरचे लोकं येतील, वर्ष दोन वर्ष तीन वर्ष राहतील व जातील. त्यांना आपुलकी नाही या शहराबद्दल, ते त्यांची ड्युटी करुन निघुन जातील, त्यांचा कार्यकाळ संपुन निघुन जातील. तुम्ही येथे जन्माला आलेले आहे, तुमचे शहर आहे हे. आपल्या शहराबद्दल कोणालाच आपुलकी नाही. आत्मीयता नाही. आपल्याला कोणालाच वाटत नाही. मी दोन तास जास्त काम करेल, मनापासुन काम करेल, सगळे विषय

मार्गी लावेल म्हणुन, याचे उत्तर द्या की, आमच्याकडे असलेले निधी आम्ही का खर्च करु शकत नाही. आणि आता कधी खर्च करु शकतो आम्ही.

**श्री.सोनगिरे, कनिष्ठ अभियंता :-** नेमाडे साहेबांनी आता सर्व कामांचे आता जे वर्णन दिले,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे** :- त्यांना बोलवा, त्यांना समोर बोलवा.

**श्री.नितीन बरडे :-** एक मिनीट एक मिनीट, तांत्रिक अडचण येईल ना. हा जेव्हा निधी मंजुर झाला, तेव्हा तुम्हाला पत्र दिलेले आहे की, या कॉलन्यांमधील सर्व पाणी कनेक्शन वगैरे कामे पुर्ण करुन टाका. हा निधी खर्च करता येईल. तुम्ही कोणी केले का अधिकाऱ्यानी. एक एक फाईल दोन दोन महिने फिरते, पडलेली राहते टेबलावर.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही जे सांगत आहे ना त्याचे लेखी पत्र आयुक्तांच्या नावाने मी दिलेले आहे. माझ्याकडे तीन पत्र आहे. तेव्हा टेन्डर सुध्दा झालेले नव्हते. तेव्हा पासुन मी आयुक्तांच्या मागे लागलेलो आहे की, ह्या अडचणी येणार आहे.

**श्री.नितीन बरडे :-** कधी दिली एन.ओ.सी. ? परवा दिली एन.ओ.सी. या रस्त्यांची की, कामे पुर्ण झाले म्हणुन. परवा दिलेली आहे परवा. कोणतीही सुचना देऊन काय फायदा आहे. कामे करायचे नाही तर बोला.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही सांगा, येथे निर्णय झालेला आहे, आदेश दिलेले आहे. तेथे जागेवर काम करणारा कर्मचारी काय म्हणतो,आमच्याकडे लेखी काहीच नाही. मी प्रत्येकाला दोषी धरत नाही. सगळा स्टॉफ काम करत नाही असे नाही. संजय पाटीलांनी मागच्या महिन्यात चांगले काम केले मी त्यांचे कौतुक करेल. त्यांनी खुप लक्ष देऊन काम केलेले आहे म्हणुन आपण आता ७० ते ८० टक्क्यावर आलो. अजुन ही कामे पुर्ण झालेले नाही.

**श्री.नितीन बरडे :-** महापौरताई, आपण निधी आणुन दिलेला आहे. खर्च करण्याची जबाबदारी कोणाची आहे. तुम्ही देणार आहे की, काम तुम्ही करुन घेणार आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आता पुढचा विषय, १० ते ११ कोटी रुपये कमीत कमी, ११ पेक्षा ही जास्त असतील. ११ कोटीचा निधी आमच्या प्रभागामध्ये मंजुर आहे. त्यातील ३-४ कोटीचे कामे झालेले आहे. मग ते नाल्याची रिपेरिंग असेल,

**श्री.नितीन बरडे :-** रामदास कॉलनीच्या नाल्याची रिपेरिंग,

**श्री.अनंत जोशी :-** रामदास कॉलनीतील नाल्याचे रिपेरिंग वर्क असेल, गटारी असतील, काही कॉंक्रीटचे रस्ते काही वरच्या भागात झालेले आहे. स्टेट बॅंक कॉलनी, धांडे नगर मध्ये झालेली आहे. काही डांबरीकरणाचे काम झालेले आहे. म्हणजे जवळपास ३ ते ४ कोटीचे काम झालेले आहे. १०-११ कोटीपैकी ३ ते ४ कोटीचे काम झालेले आहे. त्याचे बिले काढत नाही तुम्ही. आहो या महापालिकेमध्ये मक्तेदार काम करायला तयार होत नाही. आम्हाला लोकांना पाया पडुन, कन्वीन्स करुन त्यांना तयार करावे लागते, अशी गत आपल्या महापालिकेची आहे. या महापालिकेवर विश्वास नाही कोणाचा कोणी काम करायला तयार होत नाही.आम्ही मक्तेदाराला ठेकेदाराला आम्ही तयार करतो. ३-३ ४-४ कोटीचे कामे केल्यानंतर त्यांच्या अकाऊंटला रु.३५०००/- तुम्ही पेमेंट टाकतात. म्हणजे जे काम १८ लाख रुपयाचे काम आहे. भाऊ माझ्या भागामध्ये कॉन्ट्रॅक्टरचा १८ लाख रुपयाचे एक काम होते. त्या कॉन्ट्रॅक्टरच्या अकाऊंटमध्ये किती पैसे आले भाऊ. रु.३५०००/-.त्या नाल्याला रिटेनिंग वॉलला ६० लाख रुपयांचा निधी मंजुर आहे. त्यामक्तेदाराने कमीत कमी ४० लाख रुपयांच्या वरचे काम करुन टाकले आहे. त्याचा एक रुपया तुम्ही दिलेला नाही. त्यानी काम बंद केलेला आहे. एकुन घ्या. तो उर्वरित रिटेनिंग वॉलचे काम करत नाही. म्हणजे नाला अपुर्ण पडला, प्रभागातील नागरीकांना आम्ही काय उत्तर द्यायचे. ज्या भागामध्ये, ज्या ठिकाणचे रिटेनिंग वॉल झाली. तेथील नागरीक आनंदी, खुश, झाले, बऱ्याच दिवसानंतर विषय निकाली निघाला, पण त्याच्या पुढचा जो कन्टीनिव्ह होत नाही नाल्याचे काम, ते लोकं आम्हाला शिव्या देत आहे की, तिकडचे केले आणि इकडचे राहु दिले. त्यांना काय सांगु की, येथे ठेकेदार काम करायला तयार नाही. कारण की, पैसे निघत

नाही. दुसरा विषय कम्पाऊंड वॉल केली, त्याचे पेमेंट निघत नाही. सव्वा कोटीच्या गटारी केल्या त्याचे पेमेंट निघत नाही. ३ ते ४ कोटीचे कामे करुन त्यांना जर पैसे मिळणार नाही. आम्हाला आयुक्त मॅडम सांगतात की, तुम्ही कामे सुरु करायला लावा तुमच्या ठेकेदाराला.इंजिनिअरही तेच सांगता काम सुरु करा म्हणुन रस्त्यांचे कामे लावा म्हणुन तुम्ही सांगत आहे कामे लावा म्हणुन. तुम्ही जर पेमेंटच काढणार नाही तर तो काम कसे करेल. बरं तुम्ही २५ लाखापर्यंत मर्यादा दिलेली आहे. तो २५ च्या वरती बिले टाकत आहे तरी सुध्दा तुम्ही काढत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बंटी, पेमेंट बद्दल सांगा ना फक्त,

**श्री.सोनगिरे, कनिष्ठ अभियंता :-** जर कलेक्टर ऑफिस मधुन त्यांचा निधी आपल्याला प्राप्त असेल नाही तर आपल्याला पेमेंट करता येत नाही.

**श्री.नितीन बरडे :-** निधी तुमच्याकडे जमा आहे. हे पहा माझ्या हाताने सर्व झालेले आहे. निधी तुमच्या अकाऊंटला जमा होता. पुढचे काय ते सांगा.

**मा.महापौर :-** तुमच्या सगळया प्रश्नांचे उत्तर प्रशासनाला देऊ द्या. तुम्ही शांत व्हा थोडा वेळ.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझी एक विनंती आहे माझी विनंती आहे, पाणी पुरवठा इंजिनिअरला ही येथे बोलवा.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, पाणी पुरवठयाचे आणि अमृत योजनेचे लोकांनी जे सन्मा.सदस्यांकडे प्रश्न उपस्थित केलेले आहे. विकास कामांना पाणी पुरवठयाचे अमृतच्या पाईप लाईनमुळे अडचणी कश्यामुळे येत आहे. सन्मा.सदस्यांचे प्रश्नांना उत्तर द्यायचे आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या समस्या जी आहे. ते कशामुळे होत नाही. प्रोजेक्ट ऑफिसर आहे, पाणीपुरवठयाचे इंजिनिअर आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्यांना समोर एकत्रित बोलवा मगच विषय करा.

**सौ.गायत्री शिंदे :**- महापौरताई, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** या विषयाचे उत्तर येऊ द्या ना ताई. एक मिनीट.

**सौ.गायत्री शिंदे :-** माझ्या प्रभागामध्ये रस्ते दुरूस्ती करण्यासाठी कितीदा अर्ज दिलेले आहेत त्यावेळेला प्रशासनाला

**मा.उपमहापौर :-** अमृतचा विषय आहे ताई हा

**सौ.गायत्री शिंदे :-** नाही अमृतचा विषय आहे पण ज्या अमृतच्या चाऱ्या झालेल्या आहेत प्रभागामध्ये त्या दुरूस्ती करण्यासाठी आम्हाला अडचणी येत आहेत.

**मा.उपमहापौर :-** बरोबर आहे ताई

**सौ.गायत्री शिंदे :-** त्याचा काहीतरी निर्णय लावावा.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आता अमृतची जी योजना आहे तर त्यांचे जे इंजिनियर होते. त्यांचे हातात हे काम होते. त्यांच्यावर नियंत्रण पाणीपुरवठा अभियंतांनी केले.

**श्री.अनंत जोशी** :- त्यांना पण बोलवा.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, एक मिनीट, नेमाडे साहेब.

**श्री.अनंत जोशी :-** अडचण हीच आहे, मुद्दा हा आहे. हेच आपण लक्षात घेतले पाहिजे. सोनगिरे साहेबांनी सागितले तिकडे, यांनी सांगितले इकडे, हे बोट दाखविणे, कॉर्डिनेशन नावाचा विषय नसतो का विभागांमध्ये. ताळमेळ नावाचा विषय नसतो का ? मिळुन मिसळुन काम करायचे धोरण नसते का ? आपण शहरासाठी करत आहोत की, वैयक्तीक करतो आहे. तुम्ही या महापालिकेचा पगार घेता तुम्ही या संस्थेचा पगार घेता, याच्यावर तुमचे घर चालते आहे. तुमची मिळुन मिसळुन काम करायची तयारी नाही. तुम्ही त्याच्याकडे बोट दाखवाल, तो त्याच्याकडे बोट दाखवेल, तो त्याच्याकडे बोट दाखवणार. तुमच्या या सगळया धोरणांमुळे मागच्या दोन तिन वर्षापासुन जळगांवकरांचे हाल होत आहे. फक्त मक्तेदाराला दोष देऊन उपयोग नाही.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, मॅडम, याच्यावरती आपण प्रशासन म्हणुन आयुक्त म्हणुन याची जबाबदारी स्विकारली पाहिजे कारण याच्याच प्रभागामध्ये नाही. ज्या ज्या प्रभागामध्ये, माझा वार्ड असेल, नितीनभाऊंचा

असेल, महापौरताईंचा असेल. जे कोणते वार्ड असतील. कैलास आप्पांचा असले, सगळया वार्डामध्ये निधी येऊन पडलेला आहे. परंतु अमृतच्या कामांमुळे त्यांच्या दिरंगाईमुळे आपण त्या निधीचा विहित मुदतीत वापर करु शकत नाही.मग आपल्याला तो निधी मिळवुन फायदा काय ? आणि अश्या वेळी आपण जर आपल्या प्रशासनाला ज्या पध्दतीने नियोजन करुन देत नसाल किंवा आपले कर्मचारी आपले अधिकारी, त्याच्यात कमतरता असेल किंवा कमी पडत असतील. त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे. आपण त्याच्यावर नियोजन केले पाहिजे. आणि आपण जर नियोजन करत नसाल मॅडम, तर हे खरंच या ठिकाणी जे समस्या सदस्य सांगत आहे किंवा रोष व्यक्त करत आहे. तो रोष हा खरा आहे.

**श्रीमती सरिता नेरकर :-** मी आता ८ दिवसापुर्वी बोरोले साहेबांना फोन केला.

**मा.उपमहापौर :-** आणि याच्यावर वारंवार सभागृहाने नियोजन करायचे, वारंवार सर्व पदाधिकाऱ्यांनी नियोजन करायचे, याच्यावर मिटींगा घ्यायच्या. याच्यामध्ये नियोजन करायचे, पुढील कामे कसे करायचे.पण आपण २-२, ४-४, ५-५ तास अधिकाऱ्यांना घेऊन बसतात मिटींगा करायला.मग याच्यातुन नियोजन काय होत आहे. ४-४ ५-५ तास अधिकाऱ्यांना घेऊन बसतात. आपण कधी कुठे अधिकाऱ्यांना बोलविले, कर्मचाऱ्यांना बोलविले, ते सांगत असतात की, मिटींग मध्ये आहे मिटींग मध्ये आहे. मॅडम इतक्या मिटींग होत असतात, ४-४, ५-५, ७-७ तास मिटींगा होतात.मग मॅडम कामाच नियोजन लागत का नाही. यांना विचारतात ते त्यांचे नांव सांगतात. त्यांना विचारले ते यांचे नाव सांगतात. मॅडम सारख हे आजपासुन नाही चालु आहे. सारखे गेल्या हे सहा आठ महिन्यापासुन हेच चाललेले आहे की, आपण अधिकारी कर्मचाऱ्यांना बांधकामचा असेल, पाणीपुरवठयाचा असेल स्वच्छतेचा असेल. कोणत्याही अधिकाऱ्याला विचारले की, तो दुसऱ्याचे नांव सांगतो दुसरा तिसऱ्याचे नांव सांगतो. मग त्यांच्याकडुन एक वेगळेच उत्तर येतात की, त्यावेळेस मी नव्हतो. मॅडम कुठपर्यंत चालणार हे. जे आता नितीनभाऊंनी बंटीभाऊंनी सांगितले, त्या सर्व गोष्टींमधुन लोकप्रतिनिधींना सफर व्हावे लागतात. लोकप्रतिनिधींना शिव्या खाव्या लागतात मॅडम. रोज त्या माध्यमातुन वृत्तपत्रातुन छापुन येते की, यांचे निधी आलेले आहे की, हे खरं आहे की, खोटे आहे. याचे उपयोग करता येत नाही. लोकप्रतिनिधी फक्त त्या ठिकाणी जाऊन बसत आहे का ? कामांचे नियोजन करता येत नाही का ? या सर्व गोष्टींना मला वाटते की, प्रत्येक नगरसेवकाला उत्तर द्यावे लागतात. आणि मॅडम जर याचे नियोजन होत नसेल, तर आमचे सर्वांचे म्हणणे आपल्याला असे आहे. आपल्याकडुन जर या पध्दतीने नियोजन होत नसेल तर आपण सर्व सभागृहाला या ठिकाणी सांगाव.

**श्री.अनंत जोशी :-** उपमहापौर साहेब, महापौरताई, मला एक आनखी प्रश्न विचारायचे आहे. ज्यांचे काम झालेले आहे त्यांचे बिलांना अडचण काय येते आहे. म्हणजे कशासाठी त्यांना फिराफिर करावी लागते. ते सगळे लोकं कटकट करत आहे की, सगळयांची परिस्थिती अशी नाही की, त्यांची होलडींग कॅपॅसिटी असते, अस नसत, इकडुन तिकडुन पैसे आणुन ते कामे करतात. त्यांना विनाकारण का त्रास घ्यावा लागतो. त्यांचे का बिले निघत नाही. काही वेगळा हेतु असतो का त्याच्यामध्ये. म्हणजे हे खुप मोठा धंदा आहे.

**मा.उपमहापौर :-** मॅडम चार चार महिने सह्या होत नाही. त्याचे कारणच समजत नाही. जो मक्तेदार २-२, ४-४ कोटीचे कामे करत असेल. त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याने बिल टाकल्यानंतर, त्याला २-२ महिने त्या कामाचे बिल भेटत नसेल. तर तो पुढे काम सुरु कसे करणार. जर एका मक्तेदाराने दोन प्रभागातील काम घेतले असेल त्याच शेड्युलचे, तर हे एक दोन कोटीची अमाऊंट आहे ती कमी अमाऊंट नाही. त्या बिलांच्या फाईलींवरती सह्या होण्यासाठी दोन दोन महिने लागतात. तरी आपण आता निविदा समितीमध्ये बिल नोंदविण्याचे प्रक्रियामध्ये बऱ्यापैकी सुधारणा केलेली आहे भाऊ. एका एका बिलाच्या फाईलीला दोन दोन महिने लागतात तर तो मक्तेदार कसे काय काम करेल भाऊ.

**श्री.अनंत जोशी :-** मी तेच म्हणतो की, मक्तेदाराची आर्थिक परिस्थिती चांगली असेल किंवा नसेल पण त्यानी जर काम केलेले आहे तर आपण त्याचे बिल द्यायला पाहिजे ना वेळेवर. तुम्ही त्याला फिरवितात. आणि बघा

सगळया गोष्टी काही मला येथे जाहिरपणे बोलण्याची आवश्यकता वाटत नाही. आणि माझा तो स्वभाव पण नाही. मी आधी पण सांगितलेले आहे वैयक्तीक मी कोणाला बोलत नाही. कारण सगळयांना सगळया गोष्टी लागु असतात. आणि मी ज्यांच्या बद्दल बोलत आहे. ज्या कारणासाठी बोलतो आहे. त्यांनाही कळत आहे मी काय बोलत आहे. त्या फाईली का थांबविल्या जातात. त्यांना का फिरवले जातात. त्यांना हरेसमेंट का केले जातात. हे सगळया जगाला माहिती आहे. मला त्या विषयात जायचे नाही. खोलात जायचे नाही. पण जे लोकं हे करत आहे ना त्यांनी सुधरावे. कारण त्यांनी सभागृहात सदस्यांचा सय्यम बघितलेला आहे, चांगलापणा बघितलेला आहे. गेलेले सदस्य खुप जुने पण आहे, जेष्ठ पण आहे, चांगले पण आहे आणि आमच्या सारखे वेळ देणारे पण आहे. मग आमच्याकडे वेळ खुप आहे. जेष्ठांचे मार्गदर्शन आम्हाला मिळेल आणि आम्ही वेळही देऊ. मग जी लोकं अशी वागणुक करुन त्रास देत आहे ना. त्यांच्या चुका आम्हाला कळत आहे ना. मग त्यांना कसे लाईनीवर आणायचे हे आम्हाला कळतं.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया,

**सौ.दिपमाला काळे :-** सगळयात पहिले सर्व प्रथम सन २०१६ साली, झेड.पी कॉलनी मध्ये अमृत योजनेचे काम सुरु झाले होते. ती सुध्दा पाईप लाईन अजुन पुर्ण झालेली नाही. इतक्या तक्रारी देऊन सुध्दा, योगेश बोरोले यांना त्या वेळेस फोन केले, ते म्हणतात की, जैन ईरिगेशनचे बऱ्हाटे सर आणि नेवे साहेब आहे. हे त्यांचे काम आहे. ते म्हणतात की, आमचे काम आहे पण आमच्याकडे माणसे कमी पडतात. इतके माझ्या वार्डातील प्रभागातील कामे पेंडींग आहे. वारंवार कॉन्टॅक्ट करुन ही ते आमचे कामे करत नाही. बोरोले साहेबांनी याचे उत्तर द्यावे की, किती वेळा आम्ही तुम्हाला कॉन्टॅक्ट करु.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो बरोबर आहे ना मॅडम, हे काम जे आहे आमच्याकडे नाही. जैन वाल्यांकडे आहे.

**सौ.दिपमाला काळे :-** आम्ही तुम्हाला लिस्ट दिलेली आहे. डायरेक्ट लिस्ट दिलेली आहे तरी सुध्दा तुम्ही करत नाही. प्रशासनाचे काम आहे हे त्यांनी करायला पाहिजे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो, पण आपण जी दिलेले पत्र आहे ना.

**सौ.दिपमाला काळे :-** मग का नाही होत आहे हे काम.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आपण जी दिलेले पत्र आहे ना ते नक्की पाणी पुरवठा विभागाकडे गेलेले असतील, आणि पाणी पुरवठा विभागाचे ते काम आहे.

**सौ.दिपमाला काळे :-** तुम्हाला ही यादी किती वेळा दिलेली आहे. छोटे छोटे कामे आम्ही तुमच्या लक्षात आणुन देतात.

**श्री.नितीन बरडे :-** अहो, बोरोले साहेब, तुम्ही म्हणतात त्यांची तक्रार पाणी पुरवठा विभागात आहे, ताई एक मिनीट, तुमच्याकडे मेन लाईनी आहे ना फक्त.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** फक्त मेन लाईनी.

**श्री.नितीन बरडे :-** मोठया लाईनी आहे ना.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** मेन लाईनी आहे.

**श्री.नितीन बरडे :-** त्या स्टेट बँक कॉलनीची मेन लाईन कधी टाकत आहे. चुकीची अडॅप्शन झालेली आहे ना तुमची.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** मेन लाईनची डिस्ट्रीब्युशन जी होती.

**श्री.नितीन बरडे :-** कधी टाकत आहे ती.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** जल वाहिण्याचे कामे हे पाणीपुरवठा विभागा अंतर्गत होत आहे.

**श्री.नितीन बरडे :-** दोन वर्ष झाले भांडतो आहे की, त्या टेकडयावर पाणी कसे चढविणार आहे तुम्ही. चुकीचे नियोजन केलेले आहे ना.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** जर चुकीचे असेल तर त्या भागातील माणसाने इनजिनिअरने येऊन ते करायला पाहिजे ना भाऊ.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही आले होते स्वत: थांबा. त्या भागातील इंजिनिअर आता आले, दोन वर्षापुर्वी तुम्ही आणि एम.जी.पी.चे लोकं सर्वे आले होते ना. हात जोडले एम.जी.पी. वाल्यांनी की, आम्हाला रिटायर होऊ द्या. का बोलायला लावता आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** तेव्हा पासुनच ती पाईप लाईन पाणी पुरवठा विभागाकडे आहे.

**श्री.दिपमाला काळे :-** कुठे कुठे काय काय कामे पेंडींग आहे ते डिटेल मध्ये मेन्शन केलेले आहे. तरी सुध्दा ते कामे होत नाही.

**मा.उपमहापौर :-** ते पाणी पुरवठयाचे काम कशामुळे थांबलेले आहे. काय प्रॉब्लेम काय आहे आता.

**मा.महापौर :-** पाणी पुरवठयाचे इंजिनिअर यांनी पुढे यायचे आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला दोन मिनीट बोलायचे आहे. महापौरताई, आयुक्त मॅडम, आता बंटीभाऊंनी ज्या त्यांच्या समस्या सगळया भावना पोटतिडकीने मांडल्या. त्या सर्व नगरसेवकांच्या आहे. आणि सगळे नगरसेवक नागरीकांच्या रोषाला जात आहे. आम्ही एक रूपयाचे लाभार्थी नाही. तरी सुध्दा सगळयांच्या शिव्या खातो आहे. आज यांच्या प्रभागात कामे मंजुर असतांना ऐवढया अडचणी आहे आणि ज्या प्रभागात कामेच नाही. त्या प्रभागातील नगरसेवकांना किती अडचणी येत असतील. त्याचा विचार आयुक्त मॅडम आपण करावा. आज आम्ही नुसते रस्त्याचे खड्डे बुजविण्यासाठी मागणी करतो आहे. प्रशासन ते सुध्दा पुर्ण करत नाही. आमच्या प्रभागातील नागरीक कोणताच कर भरत नाही का ? टॅक्स देत नाही का तुम्हाला. आम्हाला किती लोकं बोलत असतील याचा विचार केलेला आहे का तुम्ही कधी. आज आमच्या घरापुढील रस्ते, खडक वरती दगड आलेले आहे अक्षरशा. काय करायचे आम्ही. आणि आयुक्त मॅडम आज तुम्ही दिलेले आहे की, १५ दिवसात कनेक्शन घ्या. कसे काय १५ दिवसात कनेक्शन घ्या. आम्ही रोज सांगत आहोत त्यांना. आमच्या वार्डात १०८ अपार्टमेंट आहे. एकाही अपार्टमेंटला आजपर्यंत कनेक्शन दिलेले नाही.

**मा.महापौर :-** अडचणी काय आहे अमृतचे कनेक्शन द्यायला. नेमाडे साहेबांना बोलु द्या.

**मा.उपमहापौर :-** आता काय समस्या आहे, पाणीपुरवठयाचे इंजिनिअर आलेले आहे. त्यांना बोलवुन घेऊ या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** खड्डयांची समस्या कधी सोडविणार आहे तुम्ही. आमच्या प्रभागात कामे मंजुर नाही. का आमचे प्रभाग दुर्लक्षीत प्रभाग आहेत का ?

**मा.उपमहापौर :-** ताई तो मागचा विषय आहे. पाणी पुरवठयाचा विषय होऊन जाऊ द्या.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ एक मिनीट, आमच्याकडे तर फार विचित्र परिस्थिती आहे अजुन, अमृतचे पाईप लाईन टाकतात हे. आणि ती पाईप लाईन टाकल्यानंतर आम्हाला ८ दिवस पाणी पुरवठा भेटत नाही प्रभाग क्र.७ ला. आणि एकुण ९ ठिकाणी जे.सी.बी.ने खोदुन २४ तास खोदकाम करून ९ ठिकाणी खोदल्यानंतर दोन दोन टोपली इतके दगड पाईपांमधुन निघत आहे चोकअप निघुनही म्हणजे कुठल्या पध्दतीने, आम्ही नविन निधी मागत नाही, आम्हाला भेटणार नाही आम्ही वंचित आहे. आम्ही तसे भी आहे. बरोबर.

**श्री.कैलास सोनवणे :-** ऐवढा झाल्यानंतर ही वंचित म्हणतो.

**श्री.सचिन पाटील :-** ऐका ना आप्पा. तो वेगळा विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** वंचित हा शब्द वापरु शकत नाही. वंचित हा शब्द वापरु नका.

**श्री.सचिन पाटील :-** एक मिनीट, एक मिनीट, तर भाऊ पाईप लाईन टाकतांना जॉईंट करतांना नेमाडे साहेब, बोरोले साहेब प्रुफ आहे. मक्तेदार अश्या पध्दतीने पाईप लाईन टाकतात ते निष्काळजीपणाने, आठ आठ दिवस खालचे सप्लाय निघत नाही लोकं आमच्या दारापर्यंत येऊन अक्षरशा वादविवाद घालतात रात्री १२.०० वाजता नेमाडे साहेब हजर होते. कोल्हे हजर होते. प्रायव्हेट जे.सी.बी. २४ तास चालविले, प्रायव्हेट साहित्य खरेदी करुन दिले हे नेमाडे साहेबांना माहिती आहे. रात्री दुकाने उघडुन भाऊ. आणि त्यानंतरही पाईपांमधुन टोपली टोपली

दगड निघाले इतके इतके. म्हणजे कुठल्या पध्दतीने पाणी पुरवठयाचे कामकाज चालु आहे आम्हाला समजत नाही काही. म्हणजे नविन तर काहीच देऊ नका आम्हाला पण जे आहे ते तर सुरळीत येऊ द्या काही तरी. नविन रस्ते बनवतच नाही आमच्याकडे, निधी भेटणार नाही माहित आहे आम्हाला. पण जे शिल्लक रस्ते आहे ते तर येऊ द्या.

(एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना नेमके काय बोलले ते समजले नाही)

**मा.महापौर :-** एक मिनीट, अधिकाऱ्याला बोलु द्या.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, पाणी पुरवठा अधिकारी जे आहेत ना बोला बोला.

**श्रीमती सरिता नेरकर :-** बोरोले साहेबांना मी आठच दिवसापुर्वी फोन केलेला होता मी. आता गेंदालाल मिल मध्ये रस्ते पाईपलाईन साठी, लोकांना जायला आणि यायला जवळ जवळ तीथे वस्ती आहे ती. बिलकुल तेथेच त्रास होऊन राहिलेला आहे. साहेब म्हणे हो का तेथे पण असे झाले आहे का ? असे उत्तर दिले. मला माहितच नाही. हे सोपे उत्तर आहे हा. किंवा माझ्याकडे नाही, हे सोपे उत्तर आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** सोपे नाही मॅडम तुमच्या भागातील जो इंजिनिअर आहे त्या इंनिनिअर आहे. त्यानी ते पाईपलाईन चे काम केले पाहिजे. मी जर गेलो नाही तर मला कसे काय माहित राहणार आहे.

**श्री.मनोज चौधरी :-** हा करत नाही तो करत नाही. तर चुक तुमची आहे ना.

**श्रीमती सरिता नेरकर :-** फोन घेतला नाही त्यांनी म्हणुन तर तुम्हाला फोन केला ना मी.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ताई त्या व्यक्तीवरती

**श्रीमती सरिता नेरकर :-** तुमचे हे नेहमीचे उत्तर आहे. चार वर्षापासुन हे मी तुमचे उत्तर ऐकत आहे. हेच तुमचे उत्तर असते ज्यावेळेस तुम्हाला कॉल करते मी.

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, तुम्ही आता, कनेक्शन, चेकिंग, त्याच्यामध्ये जे काही बाकी आहे. त्या अडचणी काय आहे ते सांगा पहिले सभागृहाला.

**श्रीमती सरिता नेरकर :-** इतकी अडचण आहे की,

**मा.महापौर :-** ताई, बसुन घ्या, त्यांना उत्तर देऊ द्या आपल्याला ही कळायला पाहिजे. बोला.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** जे जे विकास कामांची बांधकाम विभागाकडुन आम्हाला यादी प्राप्त झालेली आहे. त्याच्यामध्ये...

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तोच विषय जे बंटीभाऊ बोलले, एकदम, हे प्रशासनाच्या विकासासाठी आम्ही सर्व एकत्र येतो. पण शहराची ऐवढी बोंब चालु आहे. पण प्रशासन काही कम्युनिकेशन ठेवायला तयार नाही. बांधकाम विभाग वाल्याकडुन यादी आली नाही. पाणी पुरवठा म्हणतो अमृत वाल्याकडुन आली नाही. अमृतवाला म्हणतो एम.ई.सी.बी. वाल्याकडुन आली नाही. अरे किती गंमत चालु आहे.

**श्री.अनंत जोशी :-** हे पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग हे विभाग नाही, ही यादी मिळत नाही, ती यादी मिळत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** उपमहापौर म्हणतात मी ५-५ ६-६ दा मिटींगा घेतो. काही होत नाही. हे सगळे आमचे बंडखोर लोकं म्हणतात की, आमचे कामे होत नाही. राजीनामा देऊन टाका, राजीनामा द्या, तुमची प्रशासनावर पकड नाही. तुम्ही राजीनामा देऊन टाका. तुम्ही बसवले आहे त्यांना त्या ठिकाणी.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, हे जेवढे आहे ना तेवढया जणांनी मांडलले विषय आहे की, या सगळयांनी महापौर आणि उपमहापौरांना बसविले आहे या ठिकाणी, पाच पाच सहा सहा महिने.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना गोंधळ झाला व कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** राजीनामा देऊन टाका तुम्ही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** राजीनामा देऊन टाका, राजीनामा द्या,

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना गोंधळ झाला व कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा वेगळे वळण देऊ नका.

**मा.महापौर :-** सगळया सदस्यांनी शांत बसुन घ्यायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** तुमच्या ऐकण्यामध्ये काही तरी गडबळ झालेली आहे. हे सांगण्याचे तुमचा अधिकार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट एक मिनीट.

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा साहेब एक मिनीट, आपण आता जे विषयांतर करतो आहे, प्रशासन याचा परत फायदा घेईन. तुम्ही विषयाला वेगळा वळन देऊ नका. प्रशासन परत फायदा घेईन.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषयांतर नाही करत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विषयांतर होत नाही. तुमचा विषय आहे आम्ही मांडतो आहे.

**मा.उपमहापौर :-** बोला, बोला, आप्पा .

**श्री.जितेंद्र मराठे :-** यांच्यावर

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई

**श्री.जितेंद्र मराठे :-** आप्पा एक मिनीट, यांच्यावर

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट, महापौरताई, या जळगांव शहरामध्ये कोरोना आला होता याच्यापेक्षा ही कठीण प्रसंग होता तो. ही तर काही अडचण नाही. तो सगळयात डेंजर विषय होता. तेव्हा मी कोणाची काही बढाई नाही मारत आहे. परंतु मी गॅरंटीने सांगतो.डॉक्टरांच्या हातातला विषय होता. डॉक्टरांना बोलवुन एक वेळी सांगीतले होते फक्त, एकाही डॉक्टरने जो पर्यंत त्याला कोरोना होऊन झाला नाही. तो पर्यंत तो सुट्टीवर गेला नाही. एकही डॉक्टर गेला नव्हता, ही पकड आम्ही प्रशासनावर ठेवलेली होती. तुम्ही त्याच्यामध्ये अपयशी झालेले आहे.तुमची पकड नाही यांच्यावरती. हे तुमचे ऐकत नाही. हे आम्ही नाही बोलत आहे. हेच बोलत आहे. नेहमी महासभेत हेच बोलतात ते. तुम्ही सक्षम नाही या पदावर राहण्यासाठी, राजीनामा द्यायला पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** आप्पा तुम्ही गेल्या २ वर्षात जर पाहिले असेल, त्यात जो पहिल्या एक वर्षाचा रहिवास झाला जळगांव शहराचा...

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना गोंधळ झालेला व कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** आमची मागणी आहे राजीनामा द्या.

**श्री.अनंत जोशी :-** अहो, आप्पा साहेब आता मी बोलु का ? आता विषय असा आहे. निधी आणणे, निधीसाठी पाठपुरावा करणे, कामांसाठी फॉलोअप घेणे, हे लोकप्रतिनिधींचे काम आहे. इमप्लीमेंट कोण करतो प्रशासन करतो. जबाबदारी कोणाची आहे प्रशासनाची आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तर तुमची पकड नाही ना.

**श्री.अनंत जोशी :-** नाही, असे म्हणु नका,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जो दोषी असेल सस्पेंड करा.

**श्री.अनंत जोशी :-** याच्यामुळे विषयाला वेगळे वळण लागेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** कार्यवाही करा.

**श्री.अनंत जोशी :-** करा ना कार्यवाही.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी कार्यवाही करा ही मागणी करत होते. )

**मा.उपमहापौर :-** एक मिनीट, सर्व सन्मा.सदस्यांनी शांत बसायचे आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आप्पा साहेब, आपला उद्देश काय आहे. शहराच्या कामांचा विषय आहे ना. तुम्ही आता जर असे केले तर त्याचा फायदा प्रशासन घेईल.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना गोंधळ झाला व कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई, आयुक्त मॅडम,

**श्री.कैलास सोनवणे :-** हे पहा जसे तुम्ही सांगत आहे ना तसे आजपर्यंत कोणी बोलले नाही.

**श्री.चेतन सनकत :-** राजीनामेही देऊन टाका वाटल्यास.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कार्यवाही पाहिजे आम्हाला, तुम्ही खड्डे खोदतात फक्त आमच्याकडे, कार्यवाही करा.

**श्री.प्रशांत नाईक :-** सभागृहाची मागणी आहे. जो कोणी या सर्व कामात दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही करा. जबाबदारी निश्चित करा आणि कार्यवाही करा. येथेच सभागृहासमोर कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री.अनंत जोशी :-** एक मिनीट, एक मिनीट, सर्व सन्मा.सदस्यांना माझी विनंती आहे, हे काय होईल प्रत्येक महासभेमध्ये जसे आपण चर्चा करतो, आरोप प्रति आरोप करतो. गोंधळ होतो, दुसऱ्या दिवशी पेपरला हेडलाईन येते, याच्या व्यतिरिक्त काहीच होत नाही. माझी विनंती आहे की, आज या सभागृहाचे कामकाज जो पर्यंत याच्यावर ठोस निर्णय होत नाही. ज्या ठिकाणी रस्त्यांचे कामे मंजुर आहे. ही सभा चालवु नये. माझी विनंती आहे, कारण काय होत, प्रत्येक मिटींग मध्ये आपण बोलतो, आरोप प्रतिआरोप होतो, दुसऱ्या दिवशी पेपरला बातमी येते याच्या शिवाय दुसरे काही होत नाही. प्रशासन गांभिर्याने दखल घेत नाही. म्हणुन माझी विनंती आहे आप्पासाहेब, तुम्ही जे बोलले ना तसे नाही. आपण, प्रशासनाने काय चुक केली किंवा प्रशासनाकडुन काय दिरंगाई झालेली आहे ते सांगता आहे. तुम्ही जर असे वेगळे वळन दिले तर प्रशासन परत मजेत होऊन जाईल. ते फायदा घेतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** वेगळे वळन नाही दिले आम्ही. आम्ही काय बोललो, तुम्ही जे भांडत आहे ते, यांच्या वेगळया तक्रारी आहे, प्रशासनाचे म्हणणे उलट आहे. त्यांचे म्हणणे काही, यांचे म्हणणे काही, ते सोनगिरेंचे म्हणणे काही. आमचे म्हणणे काय आहे की, याच लोकांनी बसविलेले आहे हेच तक्रारी करत आहे म्हणजे तुम्ही सक्षम नाही, तुमची पकड नाही प्रशासनावर, हे आमचे म्हणणे आहे. काही चुकीचे आहे का आमचे म्हणणे, आमचे म्हणणे चुकीचे आहे का हे सांगा पहिले.

**श्री.अनंत जोशी :-** या विषयावर जबाबदार व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करुन आदेश देण्यात यावे. आणि आज या ठिकाणी ठोस भुमिका घेतल्या शिवाय सभागृहाचे कामकाज चालवु नये. एक ठोस भुमिका घ्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** जबाबदारी निश्चित करा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी बोललो होतो मागच्या सभेत. मी मागच्या सभेत याच्यासाठीच बोललो होतो की, सर्व अधिकारी आणि त्या प्रभागातील नगरसेवक यांच्या समस्या घ्या, ते अधिकारी बसवा, आयुक्त, उपायुक्त सर्व एच.ओ.डी. बसवा रुबरु करुन घ्या.

**श्री.अनंत जोशी :-** १०० वेळा झालेले आहे भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** समोर बसवा तिथल्या तिथे करुन घ्या. नाही तर राजीनामा देऊन टाका.

**श्री.अनंत जोशी :-** प्रशासन जसे महासभेमध्ये या कानाने ऐकुन त्या कानाने काढतो ना तसेच त्या ठिकाणी होणार आहे. त्यांना काही फरक पडत नाही. आज या विषयावर ठोस भुमिका घेऊन काही तरी निर्णयापर्यंत आपण पोहचलो पाहिजे. फक्त हे आवाज गोंगाट नको, काही तरी निर्णय घ्यावा लागेल, याच्यातुन काही तरी निर्णय झाला पाहिजे, ठोस भुमिका घेतली पाहिजे.

**श्री.चेतन सनकत :-** आम्ही १० वेळा लेखी मागणी केली.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरांनी विंनती केलेली आहे की, आपण ठोस भुमिका घेतली पाहिजे आणि कुठल्यातरी निर्णयापर्यंत पोहचलो पाहिजे. तशीच दिरंगाई आपल्याकडुन ही झाली. नितीनभाऊ बरडे आणि माझ्या प्रभाग क्र.१२ मधील रस्त्यांचे कामे कधी सुरु होतील आणि किती महिन्यात पुर्ण होतील. हे आश्वासन आपण आज द्यायचे आहे सभागृहासमोर द्यायचे आहे. आमच्या प्रभागातील कामे कधी सुरु होतील.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना गोंधळ झाला व कोण काय बोलले ते स्पष्ट समजले नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** मी सभागृहाची माफी मागतो, विषय आमच्या प्रभागापासुन सुरुवात केली म्हणुन विषय असा झाला, शहरासाठी आपल्याला जो निधी उपलब्ध झालेला आहे मंजुर झालेला आहे. त्या सगळयांच्या कामांची सुरुवात कधी होईल. आणि तुम्ही किती महिन्याचा टारगेट ठरविता आहे सभागृहात जाहिर करा. आम्ही आमच्या प्रभागाचा विषय मांडतो म्हणुन सर्व शहराचा विषय आपण समोर ठेवा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** फक्त एकाच वार्डाचे विषय नाही बंटीभाऊ, तुम्हाला बुरा लागेल, ठिक आहे. परंतु हा संपुर्ण जळगांव शहराचा विषय आहे. संपुर्ण जळगांव शहराची या लोकांनी वाट लावलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणत्या कोणत्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमृतवाल्यांनी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सत्ताधाऱ्यांनी ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सत्ताधाऱ्यांनी नाही, अमृतवाल्यांनी, अधिकाऱ्यांनी.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणते अधिकारी.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अहो, पदाधिकारी नाही सांगत आहे मी,

**श्री.कैलास सोनवणे :-** पदाधिकाऱ्यांनी वाट लावली म्हणे,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अधिकाऱ्यांनी आप्पा, पदाधिकारी नाही. आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई, हिंदी मे बोलो ना हिंदी मे बोलो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मराठी पण चांगली आहे माझी.

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा, दोन मिनीट आप्पा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तुमचेही विषय तेच आहे आमचेही विषय तेच आहे. जळगांव शहराच्या आजच्या समस्या आहे. ते सुधरायला पाहिजे. आधी पण जे कर्मचारी आपले ७ व्या वेतन आयोगासाठी लढत आहे. मी सांगितले त्यांना की, ठिक आहे ते तुमचे अधिकार आहे. तुम्ही त्याच्यासाठी करा. परंतु आज जी जळगांव शहराची दुरदशा करुन ठेवलेली आहे. त्याचे जबाबदार पण तुम्हीच आहे. त्याची पण जबाबदारी तुम्ही स्विकारा. जळगांव शहराचे पहिले जसे नांव लौकीक होते तसे आम्हाला करुन द्या. आम्ही निधी आणतो, कसे ही करुन म्हणा, पालकमंत्र्यांकडुन म्हणा, खासदारांकडुन म्हणा, आमदारांकडुन म्हणा, परंतु तुम्हाला अडचण काय आहे काम करुन देण्यात. आम्ही रावण्याकरुन आता मागच्या ३ महिन्यापुर्वी अमृत बद्दलच बोलतो आहे. बोरोले साहेबांना फोन लावले. आम्हाला पाणी पुरवठा होत आहे. संपुर्ण मेहरुन वासियांसाठी, आठ दिवसात म्हणे ती पाईपलाईन येणार आहे. आता महिनाभर १५ दिवस म्हणा, माझे त्या रस्त्याचे काम सुरु होणार आहे. तिन महिने झाले आठ दिवसाने सांगितले होते. आता पर्यत पाईप आलेले नाही. पुढच्या आठवडयात काम चालु होणार आहे. परत हे तुरळक, अमृतचे काम बाकी आहे. पुर्ण वार्डात पुर्ण शहरात, रस्ते जसेचे तसेच आहे. दुसरो जो ठेकेदार काम करतो आहे. त्याच्याकडुन चांगले रस्ते करुन घ्या. हे पण जबाबदारी नगरसेवकांची नाही तुमची आहे. ४ महिने झाले सिंधी कॉलनीचा रस्ता तयार झालेला आहे. आज त्याच्यात खड्डे पडलेले आहे. दुसरा पण तसाच आहे टॉवरचा रस्ता, नेरीनाका वाला रस्ता, शनिमंदिरचा, तेथे पण खड्डे पडलेले आहे. काल तिकडुन आलो मी. म्हणजे जबाबदारी कोण घेणार. कच्चे रस्ते करुन परत वर्षी पुढच्या पाऊसाळयात तसेच होणार आहे. मग करुन उपयोग काय ? तर ठेकेदाराकडुन आपण चांगले गुणवत्तापुर्वक कामे करुन घेतले तर बरे होईल. जे नळ कनेक्शन बाकी आहे. परत तेच येईल. कारण तो ठेकेदार सांगतो आहे की, कामाला एन.ओ.सी.मिळत नाही. मग तुम्ही एन.ओ.सी. कधी देणार आहे. अपुर्ण रस्ते पडलेले आहे आमच्या. शहराची जबाबदारी निश्चित करा, आणि जी कार्यवाही करायची आहे ती करा.

**मा.महापौर :-** बसुन घ्या. ज्या प्रभागात प्रत्यक्ष काम सुरु झालेला नाही तेथे नेमकी काय अडचणी आहे. त्या तुम्ही पहिले स्पष्ट करा. फक्त अमृतचाच विषय आहे का ? अमृत कनेक्शन नाही आहे का ? ते जर नसेल तर ते आपण किती दिवसात कमप्लीट करुन द्याल हे सुध्दा आपण सांगा. आपण टाईम पिरियेड द्या. त्या टाईमानंतर या सगळयांवर आपण जबाबदारी निश्चित करु.

**श्री.चेतन सनकत :-** या महासभेमध्ये २-३ लोकांवर तरी कार्यवाही व्हायला पाहिजे. लेखी तक्रार करुन ही काही उपयोग नाही.

**मा.महापौर :-** अगोदर त्यांना प्रेमाने सांगा, काय अडचणी आहे अगोदर ते ऐकुन घेऊ त्यांच्याकडुन. नेमाडे साहेब सांगा काय अडचणी आहे.

**श्रीमती सरिता नेरकर :-** १ नंबर १ नंबर वार्ड.

**मा.महापौर :-** सगळयांना कॉमन राहणार आहे हा विषय.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई,

**मा.महापौर :-** एक मिनीट, त्यांना बोलु द्या ताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मागच्या महासभेत पण तुम्ही हेच सांगितले होते की, टाईम पिरियेड द्या. तर वारंवार तेच कसे करणार.

**मा.महापौर :-** दोन मिनीट ताई, बोला.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** त्याचे पुर्णच्या पुर्ण एन.ओ.सी. आपण त्याला देऊन दिल्या. अमृतच्या अपार्टमेंटच्या कनेक्शनचा प्रॉब्लम होता. अपार्टमेंटचा ६ व्या महिन्यात साहेब आल्यानंतर त्याच्यावरती आपण सोल्युशन काढले,कनेक्शन कसे द्यायचे. त्याच्या अनुषंगाने जिवन प्राधिकरणाकडुन मंजुरी झाली. त्याच्यानंतर मक्तेदाराने कनेक्शन देणे चालु केलेले आहे. वार्ड क्र.१२ मध्ये २० अपार्टमेंटचे कनेक्शन देऊन झालेले आहे. आणि जवळ जवळ पुढील २ महिन्यामध्ये बाकीच्या अपार्टमेंटची कनेक्शनची लाईन मक्तेदाराला, आपण त्याला पुर्ण यादी देऊन आदेश दिलेले आहे की, महिन्याभरामध्ये सर्व कनेक्शनचे काम पुर्ण करा.

**मा.महापौर :-** हे महिना महिनाभर जर कनेक्शनला लागत असतील.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** मॅडम, ३०० च्या वर अपार्टमेंट आहे.

**मा.महापौर :-** ६ महिने झाले साहेब आपण डिसीजन दिलेला आहे. आणि हा जो डिसीजन आहे तो काही वेगळा नव्हता, मला वाटते कुलकर्णी साहेब होते त्यांनी सुध्दा अपार्टमेंटचा निर्णय दिलेला होता.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** दिलेला नव्हता, मॅडम आल्यानंतर आणि साहेब आल्यानंतर तो निर्णय फायनल झाला. तो पर्यंत निर्णय फायनल होत नव्हता.तो निर्णय फायनल झाल्यानंतर आता एम.जी.पी. कडुन आपल्याला त्याची फायनल मंजुरी मिळालेली आहे. जी एक्सट्रा आईटम आहे त्याची मान्यता मिळाल्यानंतर.

**मा.महापौर :-** पण कामे लवकरात लवकर करुन घेणे तुमची जबाबदारी आहे ना.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** हो ना.

**मा.महापौर :-** हे निधी तुमचा कधी परत जाणार आहे त्याची तारीख डोळयासमोर ठेवल्या पाहिजे.

**श्री.संजय नेमाडे, अभियंता, पाणी पुरवठा :-** मी आता ६ व्या महिन्यात चार्ज घेतला, आल्याबरोबर पहिल काम वर्कऑर्डर द्यायच केल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हे एन.ओ.सी. देतात आणि रस्त्याचे नंतर खोदकाम करतात, तुम्ही यांना निलंबित करा, कार्यवाही करा, यांना वेळ देऊ नका. हा आलेला निधी परत चालला जाईन. हे निधी संपेपर्यंत करणार नाही. यांना निलंबित करा.

**श्री.नावनाथ दारकुंडे :-** तसाच ड्रेनेजचा प्रश्न आहे. त्याच्या सर्व पाईप लाईन अमृत वाल्यांनी फोडुन टाकल्या जळगांव शहरातल्या, वापस कोण हे रस्ते खोदणार आहे. कोण करीन हा विषय.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ते बांधकामचे इंजिनिअर आहे टेक्नीकल इंजिनिअर नाही.

**श्री.नितीन बरडे :-** नेमाडे साहेब, महापौर ताई, गुरुकुल कॉलनीतले भुमीपुजन तुम्ही आणि उपमहापौरांनी ६ महिन्यापुर्वी केले होते. त्याच्या ३ महिन्या आधी आपण यांना पत्र दिलेले आहे की, येथील पाणी कनेक्शन पुर्ण करा. आता झाले त्या गोष्टीला ९ महिने, हाडाताई मला तुम्हाला एक विचारायचे आहे. या सर्व प्रकरणात विलंब कायदा लागु होऊ शकतो का यांच्यावर, उद्या माझी तक्रार तुम्ही बनवायची आहे. विलंब कायद्याच्या अधिकारात माझी तक्रार तुम्ही बनवायची आहे. प्रत्येक वर्कऑर्डरनुसार. ओके.

**श्री.अनंत जोशी :-** नितीन भाऊंनी जो विषय आता मांडला,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या एका विषयामध्ये पाण्याचाही विषय आहे, रस्त्याचाही विषय आहे, निधीचा विषय आहे, ड्रेनेजचा विषय आहे, मनपा फंडाचा विषय आहे. या शहराच्या विकासाचा विषय आहे. थोडे तरी वाटु द्या. यांच्यावर कार्यवाही करा.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई, नितीनभाऊंनी जो विषय आता मांडला गुरुकुल कॉलनी त्या ठिकाणी भुमीपुजनसाठी तुम्हाला आमंत्रित केलेले होते. आम्ही तुम्हाला बोलविले, त्या ठिकाणी महापौर, उपमहापौरांनी भुमिपुजन केले, आता आम्ही त्या ठिकाणी जातो, आम्हाला किती वाईट वाटत असेल, महापौरताई नारळ फोडुन गेल्यानंतर काय करणार. या लोकांमुळे, म्हणजे वैयक्तीक नाही अधिकारी म्हणुन काय सांगायचे लोकांना, ६ महिने झाले तुम्ही लोकं येऊन गेल्यानंतर.

**श्री.नितीन बरडे :-** उत्तरे द्या की, हे कामे कधी सुरु करणार.

**मा.महापौर :-** माझा तोच प्रश्न आहे त्यांना की, हे कामे कधी सुरु होतील.

**श्री.नितीन बरडे :-** आणि निधी परत गेला तर ही जबाबदारी कोणाची. आणि ती अधिकाऱ्यांच्या पगारातुन वजा करायची का ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** निधी जर परत गेला तर त्याची जबाबदारी कोणाची ?

**श्री.नितीन बरडे :-** कोणाच्या खिश्यातुन.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** निधी परत जातो, निधी परत गेल्यानंतर परत विषय मनपा फंडावर येतो, मग मनपा फंडातुन ते कामे करावे लागतात. त्या मनपा फंडातुन ते कामे पण करायचे, मनपा फंडातुन त्यांचे पेमेंट पण द्यायचे, पेन्शन पण द्यायची. शहराचे कामे ही करायचे. मग निधी खर्च का होत नाही तेथे.

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त मॅडम हा निधी जर परत गेला तर हे कामे आपण कशातुन करुन देणार आम्हाला, हा निधी परत जर गेला, आम्ही कामे तर करुन घेऊ. कारण लोकांना आम्ही शब्द दिलेला आहे. आम्ही लोकांना सांगुन दिलेले आहे हा रस्ता बनवुन देऊ, तो रस्ता बनवुन देऊ, आम्ही तोंडावर पडणार नाही. आम्हाला लोकांसमोर यायचे आहे. लोकं आमची लाज काढतात लोकं. आता तुम्ही शब्द द्या की, तुमच्या चुकीमुळे तुमच्या म्हणजे प्रशासनाच्या चुकीमुळे जर हा निधी परत गेला तर ही कामे कुठल्या निधीतुन आपण करुन देणार.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** शोकांतीका आहे मला इतके वाटते.

**श्री.अनंत जोशी :-** आयुक्त मॅडम एक शब्द ही बोलत नाही. मॅडम आपण २-२.५ तासापासुन आपण फक्त हसत आहात आणि स्माईल करत आहात. आमचे बोलणे ऐकुन घेत आहात. मी तुम्हाला विनंती केली बोला आपण एक शब्दही बोलले नाही. दुर्देव आहे मॅडम आमचे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला वाईट वाटते, मागच्या महासभेत रस्त्यांच्या बाबतीत पुर्ण भारतीय जनता पार्टी महापौरांच्या बाजुने होती. महापौर त्याच्या मागच्या महासभेत रडल्या होत्या. तेव्हा हे सदस्य महापौरांच्या पाठीमागे उभे राहिले नाही. आम्ही होते, आम्ही बोललो होतो की, आम्ही तुमच्या पाठीमागे आहे शहराच्या विकासासाठी.

कोणीही सदस्य उठुन बोलला नाही महापौरांच्या मागे आहे असे. व्हिडीओ रिकॉर्डींग काढुन बघा, महापौरांना विचारा. कोणी बोलला नाही. फक्त भारतीय जनता पार्टी होती.

**श्री.अनंत जोशी :-** आपण महापौरांच्या पाठीमागे उभे राहिले त्याच्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे मनपुर्वक आभार. आमचे पक्षाचे महापौर आणि आम्ही त्यांच्या मागे नाही हे कोण तुम्ही ठरवणारे. कमाल करता.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कोणीच बोललेले नव्हते.

**श्री.अनंत जोशी :-** भारतीय जनता पक्षाचे जाहिर आभार. जाहिर आभार.

**श्री.कैलास सोनवणे :-** जबाबदार असेल तर कार्यवाही करा. जबाबदार नसेल तर कार्यवाही मुळीच करायची नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला सांगा, जर पाणी पुरवठ्याचा विषय आहे तर डॉक्टर, इंजिनिअर, वकील जबाबदार राहील का ? पाणी पुरवठाचे लोकंच जबाबदार राहतील. त्याच्यात बेजबाबदारीचा काय विषय आला. जो पगार घेतो आहे, ज्याच्याकडे चार्ज आहे तो जबाबदार आहे. आम्ही थोडीच म्हणता आहे डॉक्टर आहे की कोणी आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आता सभागृहाला विंनती आहे की, आपण आता बराच वेळ झाले बोलतो आहे. जवळपास १.५ तासापासुन आपण बोलत आहे. आता आपल्याला आयुक्त मॅडमांचे ऐकायचे आहे. सभागृहाला विनंती आहे की, फक्त आता आयुक्त मॅडमांना ऐकावे. १.५ तास आपण घसा कोरडा केलेला आहे. आता आयुक्त मॅडम बोलतील अशी माझी अपेक्षा आहे.

**मा.आयुक्त :-** सन्मा.सभागृह, विविध विषयांवर चर्चा सुरु आहे आणि यात काही दुमतच नाही की, शहरामध्ये जे काही रस्त्यांचे हाल झालेले आहे. पाणी पुरवठयाचे काम सुरु आहे.ड्रेनेजचे काम सुरु आहे. बरडे साहेब नेहमी नेहमी भांडतात. बंटीभाऊ आहे. सर्व जण येतात विषय सांगतात. बऱ्याच वेळी फोनवर बोलण होत चर्चा होते. त्या विषयांना व्यक्तीगत रित्या सॉल्व करण्याचे मी प्रयत्न करते. पुर्ण आमचे प्रशासन या सोबत काम करत असते. हे काम करत असतांना बऱ्याच अडचणी येतात पण त्या अडचणींचा मी पाहडा नाही वाचणार. परंतु ज्या ज्या अडचणी येत होत्या. टेक्नीकली कसे सॉल करता येईल आणि कायम स्वरुपी त्याचे सोल्युशन कसे काढता येईल. यावर मी भर दिलेला आहे किंवा त्या पध्दतीने आमचे काम सुरु आहे. त्याच पध्दतीने प्रॉब्लम मला सन्मा.सदस्य सांगतात. तो कसा सॉल करता येईल ते मी त्यांच्या पर्यंत पोहचवत असते.आता पहिला मुद्दा जर आपण घेतला की, पाणी पुरवठा अमृत लाईन्स, तर प्रत्येक झोनवाईज ॲक्टीवेट करण्यासाठी मे महिन्याच्या आधी पहिली जेव्हा मी मिटींग घेतली. तेव्हा पहिला मुद्दा आला होता समोर जी.आय.पाईपचा, म्हणजे इ.एस.आर. टु डिस्ट्रीब्युशन, हे कनेक्शन जी.आय.पाईप मुळे झालेले नव्हते.त्यानंतर हया जी.आय.पाईपचा सोल्युशन काय लागु शकतो तर भाव वाढ झालेली होती. अगोदर एम.जी.पी. ही स्वत: सप्लाय करत होती. स्वत: एम.जी.पी. सप्लाय करत असतांना त्यानी स्वत: भावात ढिल दिली. परंतु हे जेव्हा त्यांच्याकडे पाईप संपले. त्यांनी म्हटले, मनपाने भाववाढ द्यायची नाही. ज्यांना जी.आय.पाईपचा सप्लाय करायचे त्यांनी मार्केट मधुन करावा. मग आता हे अव्हेलेबल नव्हते. मग याचा काय सोल्युशन करायचे मग आपण एच.डी.पी. पाईपचे सोल्युशन त्याला शोधले. ते घेऊन मग आपण थ्रु जी हेरारकी असते. इंजिनिअरचे प्रस्ताव, एम.जी.पी.चे सँक्शन, मग पुन्हा डिव्हीजन कमिशनरला पाठविणे, आता १५ दिवसांच्या खाली त्याला सँक्शन मिळालेले आहे. तुम्हाला वाटत असेल की, मॅडम काय रट्टावार सांगत आहे म्हणुन परंतु हे सांगण्याचा उद्देश हे आहे की, जेव्हा डिस्ट्रीब्युशन लाईन पर्यंत पाणी येते. पाण्याच्या टाकीलाच जर कनेक्शन नसेल. डिस्ट्रीब्युशन लाईन आणि ठरलेल्या टेस्टींगच्या वेळी आपण रस्ता करतांना तो पाईप फुटतो, आपल्याला दिसते की, रस्ता केलेला आहे रस्त्याला खोदकाम करता आहे. म्हणुन हा जी.आय.पाईपचा प्रश्न सॉल होणे खुप आवश्यक होते. ज्यासाठी या कामाचे प्रयत्न केलेले आहे. एका महिन्यात पाण्याच्या टाक्या, डिस्ट्रीब्युशन लाईन,जर कनेक्शन पुर्ण झाले, तर आपल्याला त्यानंतर टेस्टींग घेता येईल. आजही आपण स्टीन वॉटर सप्लाय थांबवुन टेस्टींग घेतो.त्यासाठी आपल्याला स्टीन वॉटर सप्लाय एक

दिवस उशीरा करावा लागतो. त्या त्या झोनचा. बऱ्याच वेळी आपण त्याला अग्नीशमनच्या गाड्या लावुन त्याला सप्लाय देतो. कारण ते प्रेशर मेनटेन होत नाही. हे झाली टेक्नीकल गोष्ट, दुसरी महत्वाची गोष्टी की, ड्रेनेजचे जेव्हा आपण काम केले, त्याचे चाऱ्या खोदल्यानंतर भरावाचा त्याच्यामध्ये आईटम नसल्यामुळे त्या चाऱ्या आपल्याला मोकळया दिसतात. ते सुध्दा आपण पाणी पुरवठयाचे मक्तेदाराला रिक्वेस्ट करुन भरायला लावतो. जेथे जेथे शिल्लक क्वान्टीटी असते तेथे तेथे आपण त्यांना सी.सी.चे ओवर ड्रेनींग करायला सांगतो. अपार्टमेंटसाठी मे महिन्यामध्ये जेव्हा मी चार्ज घेतला, डिसीजन झालेले नव्हते. त्यामुळे गुलाबभाऊंना विनंती करुन सिटी इंजिनिअरची मागणी करावी लागली. स्पेशल एम.जी.पी.चा द्या. त्यामुळे पी.एम. जी.एम. जी आहे. जेथे जेथे डिसीजन पाहिजे होते आपल्याला एम.जी.पी.चे डिसीजन मिळत नव्हते. हे फॅक्ट आहे आपण सगळयांनी एक्सेप्ट केली पाहिजे. त्यानंतर गिरगांवकर साहेबांची नियुक्ती झाली. गिरगावकर साहेबांनी जेव्हा जेव्हा जेथे क्रॉस कनेक्शन द्यावे लागतात. स्ट्रोक मेनटेन करावा लागतो. हे कनेक्शन जेव्हा सांगितले, आपल्याला ते इमप्लीमेट करता येत नव्हते. त्याला सुध्दा आपल्याला एम.जी.पी.चा सँक्शन लागतो. कोणाला व्यक्तीगत बोलायचे नाही. पण एम.जी.पी.च्या इंजिनिअर्सचा रिस्पॅन्स मिळायचा नाही. तेथे दोन्ही एम.जी.पी.चे इंजिनिअर्स मी बदलुन घेतले. त्या ठिकाणी आज मी जाडेंची नियुक्ती केली, काल दुसरा एक आला तो इंजिनिअर, गुलाबभाऊंना विनंती करुन ते इंजिनिअर बदलल्यानंतर आपल्या अपार्टमेंटच्या रेटसला सँक्शन मिळाली, तो पर्यंत रेटसला सँक्शन मिळालेले नव्हते. या ज्याकाही टेक्नीकल गोष्टी आहे. त्या आपण सगळयांनी समजुन घेतल्या पाहिजे. आता कुठे अपार्टमेंटचा डिसीजन झाला. काल पुन्हा त्यांची बैठक घेतली. त्यांनी सांगितले, मॅडम अगोदर ज्या रोडच्या याद्या तुम्ही दिलेल्या आहेत. आधी ते अपार्टमेंट कनेक्शन आपण पुर्ण करु. मग आपण झोनवाईज जाऊ. ॲटेटाईम आपले आपले अपार्टमेंट कनेक्शनवर काम सुरु आहे. ॲटटाईम आपले एच.डी.पी. पाईपाने कनेक्शन कसे करता येतील हे सुरु आहे. आता तिसरा आला मुद्दा खड्डयांचा. खड्डे जेव्हा पडले पहिला पाऊस जेव्हा आला, सगळीकडे खड्डे, खड्डे, खड्डे, खड्डे, खड्डेच वातावरण सुरु होत. त्यानंतर आपण जुन्या मक्तेदारांना बोलवुन त्यांची जी कॉन्टेटी शिल्लक आहे. त्या कॉन्टेटी मधुन आपण खड्डे बुजविण्यासाठी आपण प्रयत्न केले. त्यांना वर्कऑर्डर दिल्या. खड्डे बुजवत असतांना फक्त मुरुम नका टाकु म्हटले, कारण मुरुम टाकला की, लगेच तो वाहुन जातो. आणि मक्तेदार जो पर्यंत माझ्यापर्यंत येतो तो वाहुन गेलेला असतो. मग आरोप प्रति आरोप सगळयांवरच सुरु होतात. सन्मा.सदस्य असतील, पत्रकार असतील किंवा आपले नागरीक असतील. त्यामुळे मी म्हणाली की, गिट्टी टाका याच्यामध्ये ४० एमएम, २० एमएम, मग त्याच्यावर मुरुम टाका ते सांगितले,तुम्ही जर बघितले असेल, विसर्जनापर्यंत खड्डे बुजले, विसर्जनाचा मोठा पाऊस झाला, हा सगळा मुरुम वाहुन गेला. हे सुध्दा पेपरला फोटो आलेले आहे की, गिट्टी उडाली तर डोळयांमध्ये जाईल म्हणुन. त्यानंतर आपण पुन्हा शिल्लक कॉन्टेटी मधुन खड्डे भरायला सांगितले प्लस साईड बाय साईड आपले डिपार्टमेंटल खड्डे बुजणे सुरु होते. काल परवा पर्यंत फक्त डांबर पाऊसामुळे मिळत नव्हते.नाही तर आपली इमलशनची गाडी देखील सुरु आहे. या पध्दतीने आपले कामे सुरु आहे. आता सगळयात महत्वाचा मुद्दा तुम्ही म्हणत आहात की, जबाबदारी निश्चित करा. प्रकरण निहाय मला जर एखादी गोष्ट तपासायला दिली किंवा प्रकरण म्हणुन सांगितले तर लगेच आपण जबाबदारी निश्चित करु. जो माणुस चुकला आहे त्याला माफी मिळणार नाही. हे माझ्याकडुन तुम्हाला शब्द आहे. आणि तुमच्या भावना त्यांच्यापर्यंत पोहचल्या जातील. परंतु पुन्हा सांगते, ज्या दिवशी आपण इंजिनिअर्स डे सेलिब्रेट केला तेव्हा त्या इंजिनिअर्स कडुन मला कळाले की, जेव्हा आपल्या शहराची लोकसंख्या २ ते ३ लाख होती तेव्हा आपल्याकडे ५० ते ६० इंजिनिअर्स होते. आज आपल्या शहराची लोकसंख्या ५ ते ६ लाखापर्यंत गेलेली आहे पण आज माझ्याकडे इंजिनिअर्सची संख्या २० आहे. तोच इंजिनिअर ३-३ ४-४ काम करत आहे. मी असे नाही

म्हणत आहे की, त्याच्यातुन कोणी चुकत नाही चुकत ही असेल. चुकीला आपण माफही करायचे नाही. परंतु त्यांच्याकडुन आपण प्रत्येक पध्दतीने काम करुन घेण्याचा आपण प्रयत्न करतो. ज्या ज्या माणसांकडुन चुका झाल्या त्यांना आपण शिक्षा पण केलेली. इथुन पुढे ही केली जाणार आहे. फक्त माझ्याकडुन राहिले काय ? जे मी कबुल करते की, कर्मचारी भरती. हा एकच विषय माझ्याकडे राहिलेला आहे. ७ वा वेतन आयोग पण सुरु केलेला आपण. पुन्हा सांगते की, आम्ही तुकडा तुकडा उरलेल्या कर्मचाऱ्यांसाठी का जात नाही. कारण शासनाने सप्टेंबर मध्ये ऑर्डर काढली होती की, यांच्यावर कार्यवाही करा. त्यानंतर जनरल बॉडीने ठराव दिला की, कार्यवाह्या करु नका. दोघात संभ्रम निर्माण झाला, आयुक्त पदाचा चार्ज घेतल्या बरोबर पहिले पत्र मी शासनाला दिलेले होते की, यांच्या चुका नाही तर यांना माफ करा एक टाईम म्हणुन. त्या पत्रावर त्रुटी आली. शासनाने पत्राचे उत्तर मागविले. आजही त्यांच्यावर लेखापरिक्षण आलेले आहे. तुकडे तुकडे याच्यामुळे करत नाही. एक गठ्ठा कर्मचारी राहिले तर त्याचा पॉझिटीव्ह निर्णय होईल.जेव्हा जेव्हा मी गुलाबभाऊंना भेटले तेव्हा तेव्हा, जेव्हा जेव्हा मी गिरीष भाऊंना भेटले, फक्त तीनच मुद्दे त्यांना सांगितले, जळगांवचे मला तीनच मुद्दे सॉल करुन द्या. आकृतीबंध, लेखापरिक्षण आणि गाळे, बाकी रोडसाठी आपले निधी आणण्याचे प्रयत्न सुरु आहे. ४२ कोटीचे सगळयांनाच माहित आहे काय सुरु आहे ते. मागे आपली महापौर मॅडमांकडे चर्चा झाली. बरडे साहेब होते तेव्हाही मी सर्व इंजिनिअर्सला ह्या सुचना दिल्या होत्या. आता पाऊसाळा संपण्याच्या नंतर आपण आपल्या झोन मध्ये एरिया मध्ये जितक्या वर्कऑर्डर दिलेल्या आहे. त्या त्या रोडचा सर्व्हे करा. फक्त २०% ३०% रोड राहिले असेल. तर त्याच्या कामांना सुरुवात करा. पाण्याच्या कारणामुळे आपण आता थांबायला नको. आता कालचेच ४२ कोटीच उदाहरण देते. देवेंद्र नगरच्या तेथे त्यांनी रस्ता करायला सुरुवात केली. लगेच एकाचा अर्ज आला आणि आपल्याला कनेक्शन द्यावे लागले. म्हणुन मला पेपरला अनाऊंस करावे लागले की, शेवटचे १५ दिवस आहे. कनेक्शनसाठी, कारण स्टीन आपले तीन ते चार राऊंड झालेले आहे. झोन वाईज की, कनेक्शन घ्या. पण जो माणुस गावाला गेलेला असतो, त्याच्याकडे डेथ झालेली असते. तो आता काल परवा अर्ज करतो आपल्याकडे, जेव्हा त्याला रस्ता सुरु होतांना दिसतो. आपण ही पण तरतुद केलेली आहे की, रस्ता झाला आणि त्यानंतर त्यानी कनेक्शनसाठी अर्ज केला तर आपण त्याच्याकडुन दंड घेऊ या म्हणुन तर ज्या पध्दतीने आम्हाला प्रशासनाला कार्यवाही करण्याची वेळ येत आहे मी माझ्या परीने ट्राय करते. नितीनभाऊ वेळोवेळी मार्गदर्शन करतात. सर्व सन्मा.सदस्यांशी मी व्यक्तीगत मी बोलत असते. साईटसवर येत असते. काही इश्यु असले तर त्यांच्याशी बोलत असते. प्रशासन आपल्याकडुन प्रयत्न करत आहे पण नक्कीच जर तुम्हाला वाटते की, व्यक्तीगत रित्या तुम्हाला त्रास दिला जातो. जाणुन बुजुन एखादी फाईल डिले केली जाते. तर ते माझ्या निदर्शनास आणुन द्या. ज्या चुका आहे त्याच्यावर नक्कीच कार्यवाही केली जाईल. आणि तुम्ही जे नितीनभाऊ म्हणत आहे की, माझ्याकडील रस्ते कधी सुरु होणार कधी सुरु होणार तर त्याचा एकदा अजुन मी पाणी पुरवठयाचा आढावा घेते. आणि पुन्हा सांगते, १०% १५% २०% चा रस्ता डिस्टर्ब होत असेल. आपण आपल्या सगळया जनरल बॉडीच्या एकवाक्यतेने आपण तो रस्ता सुरु करायला पाहिजे. एखादा रस्ता जर खोदला गेला. तर त्याच्याकडुन तो आपण बुजुन घ्यायला पाहिजे. तरच आपले ते सॉल होणार आहे. कारण आपल्याला परत ड्रेनेजचे कनेक्शन द्यायचे आहे. १/३ रस्त्यांपर्यंत ड्रेनेजची आपली लाईन आलेली आहे. तो कनेक्शन देतांना पुन्हा तो फोडावा लागणार आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा रस्ते का लगेच खराब होतात. जेव्हा आपण पी.डब्ल्यु.डी.मधुन इस्टीमेट करतो. तोच एक रस्ता करायला पी.डब्ल्यु.डी. ५० लाखाचे इस्टिमेट करतो. तोच रस्ता करायला आपला इंजिनिअर २५ लाखाचे इस्टिमेट करतो. का कारण आपल्याकडे निधी कमी असतो. आपण ट्रीटमेंट कमी घेतो. त्यामध्ये रस्त्यांची संख्या जास्त बसावी म्हणुन. मी या सुचना सुध्दा इंजिनिअर्सला दिलेल्या आहे की, ज्या रस्त्याला जेवढी ट्रीटमेंट लागते तेवढा इस्टीमेट घ्या. भलेही ते वाढु द्या. कमी रस्ते करु पण चांगले रस्ते करु. तर

त्या पध्दतीने आम्ही काम करत आहोत. नक्कीच प्रशासन कुठे ना कुठे चुकत असेल. आम्ही परफेक्ट नाही. पण आम्ही चांगले काम करण्याचा प्रयत्न करत आहोत. आणि सभागृह मला याला साथ देईल. अशी मला आशा वाटते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम, आधी एन.ओ.सी. दिली जात आहे. आणि ती एन.ओ.सी. दिल्यानंतर हे रस्ते खोदत आहे. पाईप लाईन टाकता आहे. तुम्ही तर कनेक्शनचे सांगता आहे. मी पाईप लाईनची गोष्ट करतो आहे. ती जबाबदारी निश्चित करा की, एन.ओ.सी. दिल्यानंतर रस्ते का खोदले जातात. याचे उत्तर द्या.

**मा.आयुक्त :-** स्पेसिफीक करुन सांगते, जेव्हा आपण डी.एस.आर. टु कनेक्टीव्हीटी केली. आता टेस्टींग करायला गेलो तेव्हा तो पाईप फुटला.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम तुम्ही म्हणत आहे की, आपण ती जोडली. आपण असे सांगत आहे की, आपल्याला माहित नाही, एन.ओ.सी.दिल्यानंतर सुध्दा रस्ते खोदले गेले. हे आपल्याला माहिती नाही.

**मा.आयुक्त :-** गिरगावकर साहेब आता,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नाही नाही, तुम्हाला माहिती नाही का ?

**मा.आयुक्त :-** एन.ओ.सी.दिल्याच्या नंतर रस्ता.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तुम्हाला माहित नाही का ?

**मा.आयुक्त :-** आहेत ना कमप्लेंट आहे माझ्याकडे,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तुमच्यापर्यंत एन.ओ.सी.दिल्यानंतर हा रस्ता खोदला जातो आहे.

**मा.आयुक्त :-** ४२ कोटीतला आहे का ?

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम, कुठलाही रस्ता असो. कोणत्याही रिजनने असो. रस्ता खोदला आहे ना तुम्ही.

**मा.आयुक्त :-** टेक्नीकल डिटेल्स आता तुम्ही सांगा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** रस्ता का खोदला.

**मा.आयुक्त :-** तेच सांगत आहे ना मी. रस्ता एन.ओ.सी.दिल्यानंतर का खोदला जातो. यांनी टेक्नीकल उत्तर द्यावे. गिरगावकर साहेब आणि त्यांच्या टीमने.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** एक मिनीट, ४२ कोटी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मग माझ्या वार्डात रस्ता खोदला जातो आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** नाही नाही. ४२ कोटी मध्ये तो रस्ता आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नेमाडे साहेब,मला सांगा फक्त माझ्या प्रभागातच रस्ता खोदला जातो का काम चालु झालेतर.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** बाकीचा ही होतो. आपण ही पाहिले ना.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** पुर्ण शहराचे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** आपण पाहिले ना आपण समजु शकता, म्हणुन आपल्याला सांगितले जाते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आता ते फेडरेशन रोड नाही झाला का ?

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** फेडरेशनचा आता इस्टीमेट तयार नाही. आता तयार होईल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** का केलेले नाही ते पण सांगा.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** आपल्या सिटी कॉलनीच्या रस्त्याचे मक्तेदाराने काम चालु केले, त्याच्या मशिनीमुळे दोन तीन कनेक्शन तुटले, नंतर तेथे एक अपार्टमेंट होते. एक अपार्टमेंट मोठे अपार्टमेंट होते. त्या अपार्टमेंटला भविष्यात कनेक्शन द्यावे लागतील म्हणुन रोड क्रॉस आपण फक्त पाईप टाकुन घेतला. हे काम सगळे खडीकरण करण्याच्या आधी करुन घेतले होते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** २० फुट खोदलेला आहे ते आता, त्या अपार्टमेंटला कनेक्शन द्यायला ते विसरुन गेले होते. हे कनेक्शनचे तुम्ही सांगत आहे.

**मा.आयुक्त :-** तुम्ही चुकीचे सांगत आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** पाईप लाईन नाही टाकली का, पाईप लाईन टाकली तुम्ही मोठी २०-३० फुटाचा रस्ता खोदुन.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** हो तेथे अपार्टमेंटचा बांधकाम चालु आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ते अपार्टमेंट ३ वर्षापासुन चालु आहे आणि अपार्टमेंट पुढे आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** त्या अपार्टमेंटचे बांधकाम पुर्ण होण्यात आलेले आहे. त्याला कनेक्शन लागणारच आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** जळगांव महानगरपालिकेचे केव्हा लक्षात आले की, तेथे अपार्टमेंट बनत आहे काल? केव्हा लक्षात आले. तुमच्या इंजिनिअरच्या केव्हा लक्षात आले. तुमचा जो इंजिनिअर आहे वार्डातला त्याच्या केव्हा लक्षात आले. येथे लोकं येणार आहे राहायला आणि यांना आपल्याला कनेक्शन द्यावे लागणार आहे. केव्हा लक्षात आले. रस्त्याचे काम चालु झाल्यानंतर.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** हे सगळे काम आपण खडीकरणाचे आधी करुन घेतलेले आहे.

**मा.आयुक्त :-** नेमाडे साहेब, गिरगावकर साहेब, चौकशी करुन मला संध्याकाळपर्यंत अहवाल द्या.

**श्री.नितीन बरडे :-** मॅडम आपण सांगितले, यांनी चार रस्त्यांची एन.ओ.सी. आठव्या महिन्यात दिली. आणि चार रस्त्यांची परवा दिलेली आहे की, रस्ते सुरु करायला हरकत नाही. आता तुम्ही सांगितले की, रस्ते सुरु करा. मी बघुन घेते. रस्त्यांचे काय कुठे ? २-५ कनेक्शन आम्ही समजु शकतो आम्ही सांगु शकतो नागरीकांना की, लवकर कनेक्शन घ्या. ते आम्ही ही समजु शकतो. प्रश्न आता हा आहे. पहिले कामे केलेले आहे मक्तेदाराने. रामदास कॉलनीचा नाला ६०% झालेला आहे ४०% बाकी आहे. ज्याचे बिल तुमच्यापाशी आलेले आहे. काही गटारीचे कामे केलेले आहे. याचे निधीतले. काही रस्ते कॉंक्रीटचे केलेले आहे स्टेट बॅंक कॉलनींतले. त्यांचे बिले आले तुम्ही मक्तेदाराला सांगता आहे. आम्ही पेमेंट देऊ शकत नाही. आता येथे तुम्ही सांगता आहे की, रस्ते सुरु करा. हे रस्ते सुरु कसे करणार आता मक्तेदाराला. पहिलेच पेमेंट भेटत नाही त्यांनी. रस्ते सुरु कसे करायचे. पेमेंट तुमच्या अकाऊंटला जमा आहे . त्याला जबाबदार कोण भाऊ. आमचे म्हणणे काय आहे रस्ते सुरु करणार कसे. जबाबदारी निश्चित कोणावर. जबाबदारी पैसे कोण देईल.

**श्री.अनंत जोशी :-** म्हणुनच मी मघाशी बोललो की, हा निधी जर परत गेला. तर आपण कुठल्या हेड खाली मला काम करुन देणार. याची जबाबदारी कोणाची मी तुम्हाला मघाशीच बोललो.

**मा.आयुक्त :-** जो आपण डी.पी.डी.सी.मध्ये दिलेल्या निधी विषयी बोलत असाल, त्यामध्ये आपली चर्चा झालेली आहे. प्रत्येक जो डी.पी.डी.सी.चा निधी येतो त्याला दोन आर्थिक वर्षाची तरतुद असते. प्रशासकीय मान्यता देतांना. इतर ज्या मार्च एन्डला पैसा शिल्लक राहतो. तो आपण उर्वरित मा.पालकमंत्री आपल्या सर्वांना वितरीत करतात. आणि त्यासाठी आपण सर्वांनी मेहनत घेतलेली आहे याच्यात काही दुमत नाही. परंतु मार्च एन्डला जो निधी जमा झाला, आपल्याला एप्रिल मध्ये प्रभागातला. एप्रिल २०२१ मध्ये त्या २०२१ मधल्याच प्रभागाच्या वर्कऑर्डर आपण जानेवारी फेब्रुवारीमध्ये दिल्या कारण की, मध्येच तुमचे सिटी इंजिनिअर चेंज झाले, मग त्या सिटी इंजिनिअरने टेन्डरचा फॉरमेट बदलला, वगैरे वगैरे वगैरे, आणि मग जवळपास फेब्रुवारी मार्च मध्ये वर्कऑर्डर झाल्या. काम पुर्णत्वास आले आणि माझ्या पर्यंत बिले जुन जुलै पर्यंत आले. त्या वेळेला जेव्हा आपण ॲबजर्व केले तर त्यामध्ये लाईन टाकलेली होती की, हा निधी आपल्याला मार्च २०२२ पर्यंतच खर्च करता येईल. त्यानंतर मिनव्हाईल, हे सगळा राज्य शासनाचे डिस्टर्ब झाले, आणि आपले पालकमंत्री कोण या विषयीच संभ्रम होता. आणि डी.पी.डी.सी.ची बैठक होणार होती म्हणुन शिल्लक निधी करायला परत जायचे का? कारण की,

तुम्ही सर्वांनी आता ही गोष्ट समजुन घेतली पाहिजे. तो निधी आपल्या खात्यात होता पण तो फायनांन्शीअल इनडिसीप्लीन होत. आहेच. फायनांन्शीअल इनडिसीप्लीन आहे. म्हणुन तो आपल्याला परत करावा लागला.त्यानंतर मी कलेक्टर साहेबांना प्रत्यक्ष भेटुन जो पर्यंत गॅरंटी होत नाही. निधी आपल्याला स्पील मध्ये परत मिळेल. तो पर्यंत मी तो परत केला नाही. कारण मला माहित होते की पालकमंत्री साहेबांची ऑर्डर झाल्याशिवाय त्याला सही लागेल आपल्याला. परंतु कलेक्टर साहेबांनी मला आश्वासीत केले. वर्कऑर्डर झालेल्या कामांना कलेक्टर त्यांच्या स्तरावर निधी मंजुर करु शकता. म्हणुन आपल्याला स्पील मध्ये घेऊ. मित्तल साहेब जेव्हा अपॉईंट झाले, त्यांना एकच प्रश्न सांगितले माझ्या शहराचा निधी मी परत करते तुम्हाला लागेल कारण तो स्पील मध्ये आहे. त्याचे वर्कऑर्डर झालेल्या आहे. त्यांच्या वर्कऑर्डर माझ्या टेबलवर आहे. कलेक्टर साहेबांनी पण तेच सांगितले, मला यादी द्या माझ्या पर्सनल व्हॉटसअॅपवर टाका मी इमिजेट तुम्हाला देतो. आपले चलन मला वाटते बँकेतच आहे कालपर्यंत मी आढावा घेत होते. बँकेतच आहे अजुन चलन जमा झालेले नव्हते. चलन जसे जमा होईल आपण यादी देऊ. एका आठवडयात आपल्याला ते पैसे मिळुन जातील.

**श्री.नितीन बरडे :-** नाही आले तर हे कामे कशातुन करणार तुम्ही.

**मा.आयुक्त :-** सर निधी येईल ही गॅरंटीने सांगते. नाही आले तर आपण एम.सी. फंडातुनच करु.

**श्री.नितीन बरडे :-** बरं, हा शब्द पाहिजे आम्हाला.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, थँक्यु, थँक्यु. आमच्या २ तासाच्या चर्चेचा जो सार होता ना हेच होता. आम्हाला फक्त इतकेच पाहिजे की, कामे झाले पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता हा विषय जर संपलेला असेल.

**मा.महापौर :-** तर आजच्या महासभेला सुरुवात करण्यात यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना. ऐका, मी थोडासा बसलो, तर त्यांनी २ घंटे खाऊन टाकले. माझा प्रश्न होता पहिला. तुमच्या पहिले माझा होता. कर्मचाऱ्यांचा एक विषय बाकी आहे. हा विषय संपलेला आहे ना आता.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** हो, दोन मिनीट फक्त,

**श्री.कैलास सोनवणे :-** आता बसा बसा, प्लीज यार खाली बसा ना काय आहे.

**अॅड.श्री.दिलीप पोकळे :-** आपण काय आदेश दिले ते तर सांगा.

**सौ.दिपमाला काळे :-** माझ्या प्रभागातले जे काही नळ कनेक्शन, पाईप लाईन होते. त्याचे काय झाले त्याचे उत्तर मला पाहिजे. एकच मिनीट उत्तर घेऊन घेऊ द्या आप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनीट थांबलो तर २ घंटे लागले. महापौरताई गिरगावकर साहेब. आपली चर्चा चालु असतांना मी एक विषय आपल्या लक्षात आणुन देतो की, एक वर्कऑर्डर बाकी आहे. किशोर ढाकेंच्या घराजवळची. त्यांचा एक पाय तुटला आपल्या मनपाच्या खड्डयांमुळे आता त्यांचा दुसरा पाय तुटण्याची वाट पाहु नका. त्याच्या अगोदर त्यांच्या घराजवळच्या रस्त्याचे काम करुन घ्या. आठवणीने लवकर करा. आता एक महिला कर्मचारी आहे. आयुक्त साहेब.

**सौ.दिपमाला काळे :-** माझ्या प्रभागातले अमृत कनेक्शनचे काय झाले, अक्षरशा नागरीक काय बोलतात माझ्या प्रभागातले, तुम्हाला त्रास द्यायला आम्हाला आवडत नाही पण सारखे सारखे फोन करावे लागतात नळ बद्दल. त्याचे काय ? आता आम्ही त्यांना तुमचे नंबर द्यायचे का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही नाही ताई, आपण फोन केला तेव्हा.

**सौ.दिपमाला काळे :-** हो पण किती फोन करावे. आम्ही किती फोन करतो तुम्हाला. किती फॉलोअप घेतो. सारखेच तुमच्या मागे असतो, चांगले नाही वाटत.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** परत विषय असा होता ताई. तुमच्या प्रभागात इंजिनिअर्स पाणी पुरवठयाचे दिलेले आहे. पाणी पुरवठयाचे पाईप लाईन टाकणे कनेक्शन देणे हे काम त्यांच्याकडे आहे.

**सौ.दिपमला काळे :-** साधे सोपे काम आहे त्यांना काही टेक्नीकल इशुज नाही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आता तुम्ही फोन केल्यानंतर मी नाही म्हणालो नाही. मी लगेच त्यांना फोन केले.

**सौ.दिपमाला काळे :-** फोन केल्यानंतर आम्हाला त्रास वाटतो तुम्हाला. आम्हाला फॉलोअप घ्याला त्रास वाटतो. आम्हाला जैन वाल्यांचा नंबर द्या. तुम्ही पेपर मध्ये जैन वाल्यांचे नंबर टाकुन द्या ते परस्पर त्यांना फोन करतील.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** पण त्या भागातले जे इंजिनिअर आहे ना त्याठिकाणी पाणी पुरवठयाचा त्यानी हे कामे करुन घेतले पाहिजे.

**सौ.दिपमाला काळे :-** नागरीक अक्षरशा कंटाळले आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ज्यांना कनेक्शन पाहिजे त्यांना देत आहेत ते.

**सौ.दिपमाला काळे :-** किती दिवसात हे सर्व कनेक्शन करणार मला सांगा. जी लिस्ट दिलेली आहे ती किती दिवसात होईल. किती दिवसात हे सगळे कामे होतील.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** १५ दिवसात करुन देतो.

**सौ.दिपमाला काळे :-** १५ दिवस इतके दिवस फक्त साधे नळ कनेक्शन आणि छोटे छोटे पाईप लाईन्स आहे. १५ दिवस मी शांत राहील नंतर मी पुन्हा बोलेल.

**श्रीमती सरिता नेरकर :-** बोरोले साहेब ते उत्तर नाही पाहिजे आम्हाला. तुम्ही नेहमीच असे उत्तरे देऊन आम्हाला थांबवतात. आम्ही इंजिनिअरचे नाव विचारतच नाही. त्या रस्त्याचे आपल्याला एन.ओ.सी. द्यायचे आहे तेथे.आपण त्या कामावर सही केली. दुध फेडरेशनच्या बाजुला महावीर नगर आहे ना. त्याला पाईप लाईन जोडण्याकरीता खोदकाम केलेले आहे.

**मा.महापौर :-** परस्पर बोलु नका. समोर येऊन बोला सर्व सदस्यांना ही कळाले पाहिजे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते ज्या टेबलवर आहे त्या ठिकाणी ते काम करतच नाही. त्या ठिकाणाहुन ते काम करत नाही म्हणुन परत तुम्ही एका ठिकाणी बदली केली. मला वाटते बांधकाम मध्ये. त्या ठिकाणी ही त्यांनी काम केलेले नाही. परत तुम्ही विवाह नोंदणी कार्यालयात त्यांची बदली केली. एका प्रकरणात रु.५००/- दंड केलेला आहे तुम्ही त्यांना आणि आणखी त्यांनी आपल्याकडे ज्या मदतनीस शिक्षिका असता २९ शिक्षिका आपल्याकडे आहे आणि मदतनीस आहे. त्यांचे पगार फार थोडे असतात. म्हणजे ७-८ महिन्याचे पगार त्यांनी, म्हणजे त्या बाईंनी त्या ठिकाणी कामच केलेले नाही. त्यामुळे त्या शिक्षिकांचे पगार, काही नाही फक्त रु.५०००/- पगार असतो त्यांना. तर त्यांच्यामुळे ते पण विलंब झालेले आहे. आणि ती बाई असण्याचा गैरफायदा घेतात. आणि ॲलीगेशन करतात वरिष्ठांवरती. तर ते तुम्ही तपासा, ती फाईल पण तुमच्याकडे आहे. माझ्या मत मला माहित असे ही पडले आहे की, राजकीय दबाव आणते ती बाई. म्हणजे हे सगळे प्रकार करते, म्हणजे तुम्ही तपास करा. आणि माझी मागणी आहे तिच्यावर कार्यवाही करा. तुम्ही बोलले आता की, चुकीला माफी नाही. असे काही तरी बोलले तुम्ही. तर माझी विनंती राहील तुम्हाला की, त्यांच्यावर कार्यवाही करा. आणखी एक आस्थापनाचा विषय आहे. तो काही डिटेल मी बोलत नाही. मी तुम्हाला सांगितलेले आहे. आणि वानखेडे साहेबांना ही सांगितलेले आहे. अर्जदार रविंद्र सुरेश जाधव यांनी काही तरी मागणी केलेली आहे की, दि.१३/०७/२०२२ पासुन आणि आपले आस्थापनाचे जे कर्मचारी आहे बाविस्कर त्यांनी अजुन पर्यंत त्याच्यावर काहीच लिहलेले नाही. काही डिफरंसचा विषय आहे. त्यामध्ये त्यांना पेन्शनला आणि पगार वाढीला फायदा होणार आहे शासनाकडुन त्यांचा निकाल लागलेला आहे तसा. तर त्या संदर्भात पण आपण त्याच्या अर्जानुसार कार्यवाही करावी. कर्मचाऱ्यावरती कार्यवाही करु नये. त्यांच्याकडुन काम करुन घ्यावे. तो कर्मचारी त्याच्यावरती कार्यवाही व्हावी त्याची बदली व्हावी म्हणुनच असे प्रकार करत आहे.

**श्री.महेश चौधरी :-** ७ व्या वेतन आयोगाबद्दल आपला विषय झाला त्याच्यावर चर्चा झाली. कर्मचारी जिवाची परवा ना करता रात्रंदिवस काम करतात. जसे फार्मसीस्ट असेल, ए.एन.एम, जी.एन.एम., असे क्षमता, आज

त्यांना दोन दोन तीन तीन महिन्यापासुन पगार नाही. आपण आपला दसरा साजरा केला. आपण दिवाळी साजरी करणार आहोत आणि त्यांच्याकडे किराणा भरायला पैसे नाही. इतकी दयनिय अवस्था त्यांची झालेली आहे. आता आपण त्यांना एप्रिल महिन्यापासुन पगार दिलेला नाही. पगार करत नाही. महापौरताई, आयुक्त मॅडम आपल्याला विनंती आहे की, लवकरात लवकर त्यांचे पेमेंट द्यावे. त्याच्यानंतर त्यांना अतिरिक्त काम दिले जाते.जसा कोविडचा त्यांना काम दिलेले होते. कोविड भत्ता प्रशासनाने त्यांचा मंजुर केलेला आहे. पण अजुन पर्यंत त्यांना कोविड भत्ता मिळालेला नाही. तर माझी तुम्हाला विनंती आहे की, दिवाळीच्या आत हे सर्व पैसे त्यांच्या खात्यात जमा व्हावे अशी विंनती आहे.

**सौ.चेतना चौधरी :-** रथचौक दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरातील चौकाला स्व.राजाबापु शिंदे चौक असे नामकरण करण्यात यावे. तसेच पांझरापोळ चौक ते रथचौक या रस्त्याला हिंगलाजमाता मार्ग असे नामकरण करण्यात यावे. तसेच रथचौकातील जवळील चौकाला कोणतेही नांव देण्यात आलेले नाही तरी रथचौक ते दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरात असलेल्या चौकास स्व.राजाबापु शिंदे असे नांव देण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** विषयपत्रिकेवर आहे ना तो विषय, विषयपत्रिकेत आहे.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करु या.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १**) दि.०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे व दि.०८/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं. ८९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०८/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे व दि.०८/०८/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २**) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह) मध्ये मौजे पिंप्राळा शिवार गट नं.१५२/३ या जमिनीवर आरक्षण क्र.१२२ व १२३ हायस्कुल व खेळाचे मैदान क्षेत्र ८५००.०० चौ.मी. चे भुसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना, आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ अन्वये संपादीत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ती जागा आपल्या ताब्यात आहे की नाही आहे. शाळा होऊ शकते नाही होऊ शकते. त्या ठिकाणी ती जी जागा दिलेली आहे. ती आपल्या मालकीची होऊ शकते का ?

**श्री.पी.के.बागुल, सहा.संचालक, नगररचनाकार :-** ते जे आपण परमिशन देत आहेत त्या नंतर आपल्याला ती जागा घेतल्यानंतर आपल्याला ती घेण्याची आपल्याला आवश्यकता आहे. अन्यथा आपल्याला त्या

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** गॅपचे विषय नाही.दिल्यानंतर १० कोटी ५ कोटी जे द्यायचे आहे ते दिल्यानंतर महानगरपालिकेचा काही फायदा होईल का ? त्याचा महापालिकेला काही फायदा होईल का ?

**श्री.पी.के.बागुल, सहा.संचालक, नगररचनाकार :-** या जागा घेतल्यानंतर मनपाचा फायदा होईल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कसा फायदा होईल सांगा.

**श्री.पी.के.बागुल, सहा.संचालक, नगररचनाकार :-** आता याला जे बेस लावेलेले आहेत या साठी आपण

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ही शाळा आपल्याला घेण्याची आवश्यकता आहे का ? जे आहे तेच आपण बंद करतो आहे. आज करोडो रुपये जे आहे त्यांची तुलना का करायची.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-**एकुण आपल्या शहरामध्ये प्लेग्राऊंड किती ते मला सांगा. पैसे देऊन ताबा घेतलेले प्लेग्राऊंड किती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, आरक्षणाच्या विषयाच्या संदर्भात, यापुर्वी ही या सभागृहात चर्चा झालेली आहे. शेवटी शहराचा विकास आराखडा बघतांना, त्या वेळेचे जे प्राधिकरण असेल, नगरपालिका असेल, महानगरपालिका असेल,शहराचा नियोजन विकास आराखडा तयार करतांना लोकसंख्याचे निकषानुसार ज्या ज्या शहराच्या नागरीकांच्या सुविधांसाठी गरज असलेल्या आरक्षणही प्रस्तावीत करत असते. आरक्षण प्रस्तावीत करत असतांना त्याच्यावरती सजेशन ऑब्जेक्शन होऊन ती अंतिम प्रक्रिया राज्य शासन अंतिम करत असतो. ज्याला आपण डेव्हलप्मेंट प्लॅन म्हणतो. आता या डेव्हलप्मेंट प्लॅन मध्ये ज्या पध्दतीने शहराची लोकसंख्या भविष्यात वाढेल. आणि त्या लोकसंखेला अनुसरुन ज्या ज्या नागरीकांच्या सोईसुविधा अपेक्षित असतील. त्याचे नियोजन म्हणजे डेव्हलप्मेंट प्लॅन, आता या जागेंवरती आरक्षण टाकल्यानंतर कायद्याने १० वर्षापर्यंत जमिनी मालकाला कुठलाही मोबदला मागण्याचा अधिकार कायदेशीर रित्या प्राप्त होत नाही. आणि महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचे कारण असुन प्रत्येक वेळेला या विषयाकडे दुर्लक्ष होत असते. म्हणुन कायद्याने त्याच्यामध्ये जमीन मालकाला सुध्दा प्रोटेक्शन देण्याच्या दृष्टीकोणातुन सेक्शन १२७ मध्ये तरतुद दिलेली आहे. आणि सेक्शन १२७ ची, एखाद्या जमिनीवर आरक्षण टाकल्यानंतर त्या जमीनचा मोबदला त्या शेतकऱ्याला किंवा त्या जमिन मालकाला मिळणे अपेक्षित असतो. परंतु कायद्याने त्याला १० वर्ष बांधुन ठेवल्या कारणाने १० वर्षापर्यंत कुठलाही मोबदला त्याला अदा होत नाही. आणि मग अश्या परिस्थिती मध्ये त्या जमिनीचे आरक्षणाचा विकास करण्याच्या दृष्टीकोणातुन महानगरपालिकेने जर कधी त्या शेतकऱ्याला मोबदला नाही दिला. तर जमिन मालकाला १० वर्षानंतर एक कायदेशीर अधिकार प्राप्त होतो की, तो खरेदीची सुचना महानगरपालिकेला बजवतो. सदरहु जमिनीवरती १० वर्षापर्वी माझे आरक्षण टाकलेले होते. आणि याचा मोबदला मला अद्यापपावेतो मिळालेला नाही. आपण या १२७ च्या नोटीसीच्या अनुषंगाने ही जमिनीचे भुसंपादन करावे आणि याचा जो काही मोबदला असेल ह्या जमिनी मालकाला मिळावा.मग १२७ ची नोटीस दिल्यानंतरही राज्य शासनाने त्या १२७ च्या नोटीसीला पुर्वी ६ महिन्याची वैधता होती. नंतर १ वर्षाची झाली आणि आता राज्य शासनाने ती २ वर्षाची केलेली आहे. म्हणजे एकंदरीत जमीन मालकाला त्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी तब्बल १२ वर्ष वाट पाहावी लागेल.आणि १२ वर्षानंतर तो प्रकरण भुसंपादन करावे किंवा कसे आवश्यकता आहे किंवा नाही. निधी आहे किंवा नाही. हे सर्व धोरण ठरविण्याचे काम महानगरपालिकेचे आहे. आणि अश्या पध्दतीने ती १२७ ची नोटीस प्राप्त झाल्यानंतर आपण ज्या वेळेला धोरण ठरवितो. या जागेच्या भुसंपादनाचा मोबदला शहराच्या विकासाच्या दृष्टीकोणातुन या जागेचे विकास करणे गरजेचे आहे. आणि त्याला आपण मान्यता दिल्यानंतर भुसंपादन अधिकाऱ्याकडे आपल्याला ती रक्कम जमा करावी लागते. हे झाले संपुर्ण प्रक्रियेचे भाग, परंतु याच्यामध्ये आज जरी रेडीरेकनर प्रमाणे जो मोबदला जमिन मालक आपल्याकडुन मागतो आहे. किंवा जो निर्धारीत केलेला आहे. तो जर १० कोटी रुपयाचा असेल. तरी त्या जमिनीचा मुल्य बाजार भावाप्रमाणे २५,३०,४०, ५० कोटी रुपयाचे जवळपास ते असु शकतो. मग अश्या परिस्थितीमध्ये आज आपण कुठलीही चर्चा न करता, हा निर्णय घेतला की, सदरहु महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता, सदरहु आरक्षण महानगरपालिका विकसीत करु शकणार नाही. म्हणुन हे आरक्षण वगळण्यात यावे किंवा सोडण्यात यावे. तर याच्यामध्ये काय होते वेगळया पध्दतीचे आरोप निर्णय घेणाऱ्या प्रक्रियेवरती होतात. या जमिनींना जमिन मालकांकडुन या जो कोणी सदस्य विषयाला धरुन डिफेन्ड करत असेल किंवा आपली बाजु सभागृहात मांडत असेल, तर याचा देखील स्वार्थ याच्यातुन प्रोटेक्ट करत आहे, अश्यातला सुध्दा एक गैरसमज निर्माण होतो. तो समजही असु शकतो किंवा गैरसमजही असु शकतो. तर अश्या पध्दतीने हा निर्णय घेतांना यापुर्वी सुध्दा तत्कालीन भारतीय जनता पार्टीचे शासन होते, त्या वेळेला सभागृहात अनेक वेळी या विषयांवर चर्चा व्हायची. आणि मोबदला देण्याची महानगरपालिकेची परिस्थिती नसतांना आपण प्रत्येक वेळी त्याच्यावर धोरणात्मक निर्णय हे घेत होतो की, सदरहु जमिन मालकाला टी.डी.आर. घेण्याच्या संदर्भात पत्र व्यवहार करावा. आपण दोन दोन वेळा टी.डी.आर.घेण्याचे संदर्भात पत्र व्यवहार केल्यावरही जमिन मालक टी.डी.आर. घेण्याच्या संदर्भात उत्सुक नसतात. कारण मोबदल्याच्या तुलनेमध्ये

टी.डी.आर. ची किमंत खुप अल्प असते. आणि पुन्हा पुन्हा ते प्रकरणे महासभेसमोर यायचे. मग शेवटी हा तिळा सोडविणेसाठी एक तर कुठेतरी अश्या आरक्षणांचा विकास करण्याचे दृष्टीकोणातुन, कारण शेवटी बघा आज आपण बघतो की, हा शहरातला मध्यवर्ती भाग आहे. आज महानगरपालिकेच्या जागेवरती पार्किंगचे आरक्षण आहे जुन्या नगरपालिकेच्या जागेवरती. अश्या पध्दतीने जर आरक्षणाच्या खालील जमिनी ज्या भविष्यात निधी अभावी आपण ताब्यात घेत नाही. घेऊ नाही शकतो. तर हे आरक्षण तसे ही व्यपगत कोर्टातुन होतील. परंतु याच्यामध्ये शहराचे नियोजन जे आहे. विकास आराखडा सुस्थिती मध्ये आपण योग्य पध्दतीने राबवु शकणार नाही. मग भविष्यात खेळाचे मैदान असतील, आज आपण म्हणतो की, मुलांना खेळाचे मैदान नाही, उद्याने नाही. महानगरपालिकेला लागणारे भाजी बाजाराला जागा नाही किंवा फायर स्टेशनची जागा नाही. अश्या पध्दतीच्या समस्या भविष्यात निर्माण होतील.येथे आपल्याकडे निधीची उपलब्धता नसेल, तर मला वाटते अश्या पध्दतीचे प्रस्ताव मान्य करावे. आणि राज्य शासनाला सुध्दा विनंती करावी की, आमच्या शहराचा विकास आराखडयाचे सुनियोजीत पध्दतीने विकास साद्य करण्याच्या दृष्टीकोणातुन आमच्याकडे भुसंपादनाचे साधारणता १००, २००, ३०० कोटीचे प्रस्ताव आहे. परंतु महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने आम्ही तो मोबदला देऊ शकत नसल्या कारणाने असे बरेच आरक्षणे व्यपगत होत असतात. आणि याचा संपुर्ण शहराच्या विकास आराखड्यावरती दुरगामी परिणाम जानवु शकतात. तर या अनुषंगाने सुध्दा राज्य शासनाकडे आपण काही मदतीची अपेक्षा करु शकतो. आणि मा.पालकमंत्री किंवा गिरीषभाऊ असतील यांच्या माध्यमातुन या शहर विकास आराखडयाच्या विकासासाठी सुध्दा निधीची मागणी करु शकतो आणि मला वाटते, तसे प्रयत्न केले तर निधी सुध्दा मिळेल आणि शहराचा एक सुनियोजीत विकास आराखडा जो आहे तो भविष्याच्या दृष्टीकोणातुन तो जसा आहे त्या पध्दतीने राबविणे खुप गरजेचे आहे. अन्यथा जी शहराची विकासाची दिशा असते ती अत्यंत बेशिस्तीने दिसते की, खुल्या जागा नसतील, बगिचे नसतील, शाळा नसतील, प्ले ग्राऊंड नसतील, तर हा अश्या पध्दतीने याच्या बाबतीतला विचार सभागृहाने करायला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मग आता हो सांगितले तरी लोकं शंका घेतात, नाही सांगितले तरी लोकं शंका घेतात. दोघी बाजुने लोकं विचार करतात. एखाद्या ठेकेदाराच्या ठेक्या विषयी बोलले तर लोक शंका घेतात, का म्हटले अशी शंका घेतात, माझे ऐवढेच म्हणणे आहे, दर १०-१५ वर्षाने शहराचे डी.पी.आर. तयार होते. आताही आपली डी.पी.आर.ची प्रोसेस चालु आहे. आज आपण शहराची १० कि.मी.ची हद्द ठरवली. १० कि.मी.च्या हद्दीमध्ये आपण खात्रीने सांगु शकतो का ? शहर याच बाजुने वाढेल, शहर याच बाजुने वाढेल, शहराची विशिष्ट बाजुने डेव्हलप होत असतो, ज्या ठिकाणी त्याला विकासाचे बाजु दिसतात. मला सांगा तुम्ही आरक्षण ठेवणे, शाळेसाठी आरक्षण, प्लेग्राऊंडसाठी आरक्षण, त्या विषयाला विचाराचे वेगवेगळया पातळीतील त्या गोष्टीला सभागृहातील सदस्याचे विरोध असले तर चालणार नाही. मुद्दा असा आहे की, आपण जी पैसे देऊन जागा घेतो आहे. ती जागा उपयोगाची आहे का ? ती जागा महानगरपालिकेच्या कामाची आहे का ? ती जागा आरक्षणात घेण्यात आल्यानंतर कोणाला फायदा होईल कोणाला तोटा होईल त्या भानगडीत पडायचे कामच नाही आपल्याला. मला एवढेच सांगायचे आहे फक्त तुम्ही अधिकारी म्हणुन असा प्रस्ताव सभागृहापुढे ठेवता येईल का तुम्हाला, ठेवला का तुम्ही, ठेवणार का ? ही जागा आपल्याला आवश्यक आहे आणि ही जागा आपल्याला घ्यायचीच आहे. मी मागच्या दोन तीन सभांमध्ये सांगितले होते, आपले जर ५०० आरक्षण असतील तर एकाच वेळेस त्याचे ऑडिट करा. त्याची चौकशी करा कोणते आवश्यक आहे कोणते अनावश्यक आहे. सभागृहापुढे असे विषय येतात. जेथे नाला आहे, जेथे डोंगर आहे, जेथे शक्यच नाही त्या गोष्टी होणे तेही सभागृहापुढे याचा फायदा घेऊन लोकं कोर्टात जातात. कोर्टात येतात कसे काम होते तेही आपल्या सर्वांना माहित आहे. तर आम्हाला तुम्ही करेक्शनसह अहवाल सभागृहापुढे द्या आम्हाला सभागृहाला याची खात्री करु द्या की, ही जागा किंवा आरक्षण आपल्याला उपयोगाचे आहे. तेव्हा त्या विषयाला मंजुरी द्या किंवा नामंजुरी द्या. अन्यथा आजचा विषय हा स्थगित ठेवा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल:-** टी.डी.आर. घेत असतील तर द्या नाही तर तहकुब ठेवा. जी शाळा आहे ती पण बंद आहे.

**श्री.पी.के.बागुल, सहा.संचालक, नगररचनाकार :-** या बद्दल सभागृहाला मी सांगतो, पहिल्यांदा आपला प्रयत्न असतो की, त्यानी टी.डी.आर. घ्यावा.आम्ही त्यांना तशी विचारणा पण केलेली आहे. जमिन मालकाने टी.डी.आर.घ्यायला स्पष्ट नकार दिलेला आहे. म्हणुन हा विषय महासभेपुढे ठेवलेला आहे. जसे आता आपण सांगितले त्या पध्दतीने एकदा जागे वगैरे तपासुन पुढच्या महासभेला हा विषय परत आणु. जागेची उपयोगिता चेक करून पुढच्या महासभेला हा विषय परत घेऊ या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदरहु विषयाबद्दल सन्मा.सदस्यांनी ज्या प्रमाणे सुचना मांडलेल्या आहे. प्रशासन या जागेची उपयुक्तता आहे का हे तपासुन हा प्रस्ताव पुन्हा नव्याने पुढील महासभेसमोर सादर करतील. आता तो विषय तहकुब करण्यात यावा. याच्यातुन तरी सुध्दा सार निघणार नाही. आज सभागृहातील सदस्यांची ईच्छा आहे ठिक आहे. त्याचाही आदर करु या त्या बद्दल काही वाद नाही. परंतु या गोष्टींमधुन काही साध्य होणार नाही. आपण टी.डी.आर. ही वारंवार ऑफर करतो, पण जमिन मालक टी.डी.आर. घेत नाही कारण टी.डी.आर.चे येथे ते दर नाही. त्याच्यातुन त्याचा पैसा किंवा त्याचा जो कायदेशीर हक्क आहे तो तेवढा समाधान करु शकत नाही. हे आहेच सगळे अडचणीचेच विषय, लाख सभागृहाची ईच्छा प्रामाणिकही असली की, ही जागा अनउपयुक्तता आहे. ती सोडुन देण्यात यावी. तरी सुध्दा त्याच्यावरती आरोप प्रतिआरोप होतील की, कुठेतरी सभागृहाने त्याच्यावरती एकमत करुन कुठेतरी याच्यामध्ये आर्थिक व्यवहार जमिन मालकासोबत बसुन करुन घेतलेला आहे. असे सुध्दा आरोप नाकारता येत नाही. पुढे जाऊन प्रशासनाने असा ही अभिप्राय दिला की, सदरहु जागेची उपयुक्तता दिसुन येत नाही. तरी प्रशासनाकडे बोट दाखवता येईल की, बागुल साहेबांना जाऊन जमिन मालक भेटला असेल, बागुल साहेबांना काही भेटले असेल, म्हणुन बागुल साहेबांनी असा शेरा दिला की, सदरहु जागेची उपयुक्तता दिसुन येत नाही. हा संपुर्ण विषय जो आहे जे काही विषय आहे. याच्या संदर्भात कुठेतरी दुरगामी विचार होणे गरजेचे आहे. कुठेतरी याच्याबाबतीत राज्य शासनाकडे सुध्दा या पध्दतीने शहर विकास आराखडा राबविण्याच्या संदर्भात ज्या काही अडचणी निर्माण होतात. याच्या संदर्भातही कुठेतरी डेडीकेशन किंवा आपल्या भावना ते शासनाकडे व्यक्त करायला पाहिजे. जो पर्यंत सहा.संचालक, नगररचना यांचा अहवाल येत नाही तो पर्यंत विषय तहकुब करण्यात यावा. विषय क्र.२ आणि ३.

**नगरसचिव :-** अनुमोदन ?

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ आणि ३ याची उपयुक्तता तपासुन पुढील महासभेपुढे हा विषय घेण्यात यावा आणि विषय क्र.२ आणि ३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** तहकुब,

**मा.महापौर :-** विषय क्र.२ आणि ३ पुढील महासभेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं. ८९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह) मध्ये मौजे पिंप्राळा शिवार गट नं.१५२/३ या जमिनीवर आरक्षण क्र.१२२ व १२३ हायस्कुल व खेळाचे मैदान क्षेत्र ८५००.०० चौ.मी. चे भुसंपादनाची महापालिकेस आवश्यकता आहे किंवा नाही हे सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाने तपासून पूढील महासभेत सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजूर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३**) जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह) मध्ये मौजे मेहरुण स.नं.१६४/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५१,डीस्पेन्सरी ॲन्ड मॅटर्निटी होम ने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव तहकुब

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वा.ह) मध्ये मौजे मेहरुण स.नं.१६४/२ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५१,डीस्पेन्सरी ॲन्ड मॅटर्निटी होम ने बाधीत जमिनीचे भुसंपादनाची महापालिकेस आवश्यकता आहे किंवा नाही हे सभागृहात झालेल्या चर्चेनूसार

प्रशासनाने तपासून पूढील महासभेत सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) मेहरुण स.नं.४५५/१ मधील ३०.०० मीटर रस्त्याच्या संरेखनात बदल करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही सुरु करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, हा जो विषय आहे. अर्जदाराची मागणी आहे हा जो रस्ता आहे. तो रस्ता बदलुन घेण्यात यावा अशी मागणी आहे. आणि तेथे लोकंही असे म्हणत आहे की, अर्जदाराच्या मागणीनुसार बदल केल्यास महापालिकेने सादर केलेल्या भाग नकाशा मध्ये नकाश्याप्रमाणे ३० मिटर रुंद रस्त्याची आखणी प्रस्तावीत केल्यास इनलेट व आऊटलेट फॉम नाही. त्यामुळे प्रचलित एकत्रीतुन विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम ३.१८ मध्ये तरतुदीची पुर्तता होत नाही. त्यामुळे एकत्रीत रूल विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मध्ये विनियम ३.१८ मध्ये तरतुदीनुसार ड वर्ग महापालिकेसाठी शिफ्टींग व अलाईनमेंट या अंतर्गत नगररचना विभागातील सह.संचालक, नगररचना यांचेकडेस पुर्व मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर केल्यास प्रश्न सुटणार नाही. महापालिकेला आवश्यकता असल्यास कलम ३७(१) ची कार्यवाही करून प्रस्ताव शासनास सादर करावा. जर ३७(१) चा प्रस्ताव आपण सादर करावा असे म्हणतो आहे. तर माझ्या माहिती प्रमाणे तो जो रस्त्याची मागणी करत आहे तीच्या दोन्ही बाजुंना ३० मिटर रस्त्याच्या दोन्ही बाजुंना रिजर्वेशन्स आहे. आता आपण या बदलाची कार्यवाहीला जर पाठविले तर त्या रिजर्वेशन्सला सुध्दा पर्यायाने इफेक्ट होणार आहे. रिर्जर्वेशनच्या सुध्दा जागा अफेक्ट होणार आहे. या संदर्भातला प्रशासनाने प्रॉपर प्रस्ताव सभागृहासमोर आणावा. त्याचा नकाशा द्यावा दाखवावे आम्हाला याच्यातुन काहीही समजत नाही. याच्यातुन काहीही लक्षात येत नाही. नेमके काय होणार आहे कोणत्या भागातुन हा रस्ता जातो आहे. रस्ता बदलुन तो कुठे जाणार आहे. याच्या डिटेल्स सभागृहासमोर आणाव्या. तो पर्यंत हा सुध्दा विषय तहकुब करावा. कारण दोन्ही बाजुंना रिजर्वेशन्स आहे. ते रिजर्वेशन्स अफेक्ट होणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब करण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मेहरुण स.नं.४५५/१ मधील ३०.०० मीटर रस्त्याच्या संरेखनात बदल करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही सुरु करणे बाबतच्या प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रशासनाने तपासून सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५**) मौजे मेहरुण शिवार स.नं.१८५/१/१अ मधील खुली जागा (ओपन स्पेस) विविध समाज उपयोगी कामासाठी शिरसगर मुस्लीम समाज फौन्डेशन जळगाव या संस्थेला मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र.५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं. ८९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मौजे मेहरुण शिवार स.नं.१८५/१/१अ या मंजुर अभिंन्यासातील खुला भुखंड (ओपन स्पेस) विकसीत करणेकामी शिरसगर मुस्लीम समाज फौन्डेशन,जळगांव यांना मिळणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावर मा.महापौर यांनी तत्काळ कार्यवाही करावी या प्रमाणे आदेशीत केलेले आहे.

शासनाने डिसेंबर २०२० मध्ये मंजुर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदी नुसार अभिंन्यासातील भुखंड धारक यांची सोसायटी/असोशिएशन, यांनाच खुली जागा (ओपन स्पेस) वितरीत करणे बाबत नमुद आहे.

प्राप्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता शिरसगर मुस्लीम समाज फौन्डेशन जळगाव ही संस्था मौजे मेहरुण स.नं.१८५/१/१अ या अभिंन्यासातील नागरिकांची संस्था असल्याबाबत कागदपत्रे उपलब्ध नाहीत तथापि, सदर अभिंन्यासात एकुण २६ भुखंड असुन सदर संस्थेस खुली जागा देण्यास संमतीपत्र सादर केलेले आहे, या प्रमाणे सदर अभिंन्यासातील एकुण २५ नागरिकांनी स्वाक्षरीसह संमती पत्र दिलेले आहे. उपरोक्त बाबी विचारात घेता मौजे मेहरुण शिवार स.नं.१८५/१/१अ मधील खुली जागा (ओपन स्पेस) विविध समाज उपयोगी कामासाठी शिरसगर मुस्लीम समाज फौन्डेशन जळगाव या संस्थेला मनपा अटी-शर्तीचे अधिन राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**
**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक** **:- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६**) महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदानातुन शिल्लक ५ कोटी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरात विविध ठिकाणी स्त्री पुरुषांकरीता शौचालय/ मुतारी बांधणे कामी मक्तेदार श्री.गजानन इंन्टरप्राईजेस यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेपेक्षा ७% जास्तीचे दरास मान्यता देणे व सदर कामी होणारा रक्कम रु.५३,४९,३०७/- मात्र खर्च हा मनपा निधीतुन खर्च करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.सुनिल महाजन:-** अनुमोदन आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, सद्या तर, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये तात्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस हे विद्यमान उपमुख्यमंत्री आहे. यांनी जो निधी दिला, त्याची आपण वेळोवेळी मुदतवाढ सुध्दा घेतलेली आहे. आणि या निधीतुन डी-मार्ट, मेहरुणची स्मशानभुमी ते आदित्य चौक हा रस्ता तयार करण्याचा आपण प्रस्ताव दिलेला होता.तो मंजुरही झाला, आणि त्या रोडच अर्ध कामही झालेले आहे आणि अर्ध काम अजुन बाकी आहे. सदर ठेकेदाराने कामाचे वर्णन त्याच्या बोर्डवर लावलेले आहे. त्यांचीही तारीख टाकलेली आहे आणि कामे पुर्ण झालेचे दाखविलेले आहे. आणि मी महापालिका अधिनियम ४४ च्या नियमाचे कलम ४४ च्या अंतर्गत प्रश्न सुध्दा मी आपल्याकडे पाठविलेले आहे. परंतु ते आपण पटलावर घेतलेले नाही. तरी मला संबंधीत इंजिनिअरच्या माध्यमातुन या रोडची माहिती देण्यात यावी.
**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** भाऊंनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. त्या संदर्भात मी सभागृहाला सांगु ईच्छितो की, भाऊचे म्हणणे होते की, डी-मार्ट ते आदित्य चौकापर्यंतचे इस्टीमेट संबंधीत इंजिनिअरने तयार

केलेले होते. आणि मी त्याबद्दल असे सांगतो की, त्यावेळेला जो निधी डिक्लेअर होता. त्यावेळेला महासभेमध्ये प्रत्येक कामाच्या अनुषंगाने एक रक्कम निश्चित करुन ठराव पास होतो. १० लाख असतील, २० लाख असतील, ५० लाख असतील. ते काम आणि त्या अनुषंगाने ती एक रक्कम, समजा ५० लाखाची रक्कम मंजुर झाली असेल महासभेत. तर त्या कामाचा प्रस्ताव ५० लाखा पेक्षा जास्तीचा करता येत नाही. कारण त्याला जर जास्तीचा प्रस्ताव केला तर पुन्हा महासभेची मंजुरी घेऊन कलेक्टर ऑफिसला प्रस्ताव पाठवायला विलंब होतो. म्हणुन ठराव पारित झाल्यानंतर आपण त्याच रकमेमध्ये त्या रस्त्याचे इस्टीमेट केलेले आहे. जेवढा एरिया त्या रक्कमेत बसत होता.ठरावानुसार नाव जरी तेच होते, बरोबर आहे की, डी-मार्ट पासुन ते आदित्य चौकापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे, हे हेडींग होती, महासभाच्या ठरावामध्ये पण तेच हेडींग होते म्हणुन इस्टीमेटचे हेडींगही तीच होती. आणि प्रत्येक्ष इस्टीमेट करतांना जी रक्कम मंजुर होती त्या मंजुर रक्कमेत जितका एरिया बसत होता. तेवढया एरियाचे इस्टीमेट संबंधीत इंजिनिअरने तयार करुन पाठविले, ते मंजुरही झालेत आणि त्यानुसार प्रत्येक्षात कामही तेवढयाच एरियाचे झालेले आहे. जर इस्टीमेट मध्ये ५११९ चौ.मी. ऐवढा जर काम असेल तर बिलामध्ये ५११८, ५११७ मिटर एवढे काम झालेले आहे याच्यामध्ये कुठलीही रक्कम शिल्लक नाही. म्हणुन त्या नावामध्ये आणि प्रत्येक्ष कामामध्ये तफावत दिसते. भाऊंचे म्हणणे होते की, आदित्य चौकापर्यंत नांव होते तर तीतपर्यंत रस्ता झाला पाहिजे होता. परंतु जो एरिया त्या इस्टीमेट मध्ये मंजुर आहे तेवढेच काम झालेले आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** साहेबं, प्रस्तावात काय मागणी केलेली होती. डी-मार्ट ते आदित्य चौक.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** बरोबर.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ते इस्टीमेट कुठपर्यंत द्यायला पाहिजे होते.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** तेवढी रक्कम मंजुर नव्हती ना भाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** इस्टीमेट केल्यानंतर रक्कम मंजुर होते की, रक्कम मंजुर झाल्यानंतर इस्टीमेट होते.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** आधी सभेमध्ये कोणकोणते कामे घ्यायचे, कामांचे नाव दिलेले असतात.परंतु शेवटी महासभा ठरविते की, प्रायरिटी कोणत्या कामांना द्यायची.

**श्री.राजेंद्र पाटील :-**इस्टीमेट कोण बनवतो नगरसेवक की इंजिनिअर

**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** नगरसेवक महासभेपुढे मांडतात की, आमच्या वार्डातील हे कामे घ्या. त्याच्या रक्कमा एक ढोबळ अंदाजाने संबंधीत इंजिनिअरला विचारुन किंवा प्रत्येक्ष नगरसेवकाला विचारुन ते महासभेत येतात. ते प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर डिटेल इस्टीमेटसाठी इंजिनिअरला ऑर्डर होतात की, हे प्रस्ताव मंजुर महासभेत मंजुर झालेले आहे, या कामांचे प्रस्ताव कलेक्टर ऑफिसला ताबडतोब पाठवायचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-**ढोबळ मानाने समजा आपण इस्टीमेट जरी बनविले, तर त्याला १० मिटरची अमाऊंट कमी पडेल, २० मिटरची अमाऊंट कमी पडेल. डायरेक्ट ५०० मिटरची अमाऊंट कमी पडते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय झाले की, ही स्थिती वेगळी होती. म्हणजे रस्ता त्या वेळेला थोडा सुस्थिती मध्ये होता.परंतु कालंतराने त्यावर

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ५ वर्षापासुन त्या रस्त्याची अवस्था दयनिय आहे. आणि त्या रोड वरुन डि-मार्टपासुन ते आदित्य चौक पुर्ण एम.आय.डी.सी.मध्ये जाणारे वर्कर, उद्योजक, व्यापारी, कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये जाणारे शेतकरी, मोहाडीच्या लोकांचा वापर त्या रोडावर मोठया प्रमाणात आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला तेथे फक्त तांत्रिक अडचण काय निर्माण झाली. ते मी सांगत आहे की, प्रत्येक्षात रस्त्याचे काम सुरु करतांना त्याच्यामध्ये त्यावेळेला डब्ल्यु.बी.एम.ची प्रोव्हीजन नव्हती. त्यावेळेला काय झालेले होते की, इस्टीमेट मध्ये कारपेट सिलकोट वगैरे घेतलेले असेल. आणि प्रत्येक्षात काम करतांना परिस्थिती बघितली की, येथे जे डब्ल्यु.बी.एम. आहे ते ही अस्तीत्वात शिल्लक नाही. आणि जर कधी तेथे डब्ल्यु.बी.एम.शिल्लक नसेल. आणि फक्त कारपेट आणि सिलकोट केले तर त्या रस्त्यावरती केलेला खर्च १००% पाण्यात जाईल. म्हणुन तो रस्ता व्यवस्थीत रित्या टिकावा. म्हणुन ज्या ज्या काही गरजेच्या गोष्टी होत्या. डब्ल्यु.बी.एम.करणे गरजेचे होते. त्या गोष्टींचा समावेश करुन त्या किमतीमध्ये किती मिटरचा रस्ता तयार होऊ शकतो. त्याच्यावरती लांबी कमी झालेली आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ ऐका ना, तुम्ही डब्ल्यु.बी.एम. करायचे, त्या प्रभागातील जे संबंधीत इंजिनिअर आहे. त्यांनी काळी माती टाकुन टाकुन तो रस्ता बनविलेला आहे पावसाळयामध्ये दोन वर्षापासुन आणि डब्ल्यु.बी.एम.ची आवश्यकता नव्हती कसे म्हणत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जे.ई.कोण आहे, जे.ई. कोण आहे.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** आता सद्या आर.डी.पाटील आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-**त्यांनी स्वत: काळी माती टाकलेली आहे. आणि काळी माती टाकल्यावर पावसाळयामध्ये त्याच्यासाठी वेगळा खर्च करावा लागलेला आहे.

**श्री.सोनगिरे, क.अभियंता, सा.बां.:-** नेमाडे साहेब पुर्वी होते आणि आता आर.डी.पाटील आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नेमाडे साहेब यांची काय चुकी झालेली आहे कळवा सभागृहाला.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तसे आम्ही दोन तास घ्यायला पाहिजे का ? त्या भाषेत आम्ही बोलले पाहिजे का ? आम्ही सगळे शांततेत मांडतो विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय भाषेचा नाही. जेथे शंका असेल तेथे त्याचे निराकरण होणे गरजेचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महिन्याभरात दोन महिन्यात तयार होईल. आता त्या गोष्टीला दिड वर्ष झाले, आणि बोर्ड लावलेला आहे ठेकेदाराने डी-मार्ट ते आदित्य चौक आणि झालेल्याची तारीख पण टाकलेली आहे तेथे. नागरीक म्हणतात हे रस्ता गेला कुठे, फक्त कागदावर केला का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नगरसेवकाने खावुन घेतला का? द्या उत्तर आता सभागृहात काय परिस्थिती आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तेवढाच जर बसत होता तर हा पाच कोटी अजुन ही फिरत आहे. तुम्ही यातुन रक्कम का नाही वाढवली. अजुनही पाच कोटी फिरतो आहे. त्याची परत तुम्हाला मुदतवाढ घ्यायची आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** उर्वरित जो विषय आहे ना, उर्वरित रस्ता जो आहे

**श्री.प्रशांत नाईक :-** मनपा फंडातुन करण्याचा प्रस्ताव आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** मी फंड वाढवायचे म्हणत आहे या फंडासाठी संस्था कामे करत नाही. आपण निधीतुन करत नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** उर्वरित रस्ता जो आहे ना मुलभुत सुखसुविधा मध्ये घेतलेला आहे. आदित्य चौकापर्यंत, महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** कधी चालु होणार आहे सांगा मला पण आता टाईम लिमिट देऊन टका.

**श्री.सुनिल महाजन :-** आता महिन्याभरात.

**श्री.राजेंद्र पाटील :-** नक्की होईल.

**मा.महापौर :-** तो रस्ता घेतलेला आहे आपण राजुभाऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ठिक आहे बघतो पुढच्या महासभेत.

**मा.महापौर :-** विषय क्र.६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदानातुन शिल्लक ५ कोटी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरात विविध ठिकाणी स्त्री पुरुषांकरीता शौचालय/ मुतारी बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं. पालीका/२/ईटपाल/२०२१/४/५३/२५६ दि.०८/०९/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.१२/१०/२०२१ च्या मान्यते अन्वये ई निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे परंतु सदर ई निविदा फॉर्म मधील अटी शर्ती दुरुस्त करणे नव्याने अटी शर्तीचा समावेश या कारणामुळे ई निविदा फॉर्म नविन तयार करण्यास विलंब झाल्यामुळे सदर कामांची ई निविदा प्रसिध्द करण्यास विलंब झालेला आहे. तसेच सन्मा.नगरसेवक यांनी एकत्रित निविदा करण्याची मागणी केली असता आयुक्त यांनी दि.०२/१२/२०२१ अन्वये स्वतंत्र निविदा मागविण्याबाबत आदेशीत केले त्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.११४/०४/ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/९४० दि.०८/१२/२०२१ चे पत्रान्वये दै.सकाळ राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०९/१२/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच

निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता मक्तेदार निखील कृष्णराज पाटील यांचे बिड कॅपसीटी नसल्याने त्यांना मनपा निविदा समितीने अपात्र ठरविण्यात आले असल्याने एकच निविदा पात्र असल्याने त्याच्याशी तुलना करता येत नसल्याने सदर कामाची फेर ई निविदा आयुक्त यांनी दि.१४/०१/२०२२ अन्वये मान्यता दिली त्यानुसार उक्त कामाची फेर ई निविदा सुचना क्रं.११९/०३ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/११९७ दि.१४/०१/२०२२ चे पत्रान्वये दै.सकाळ राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.१५/०१/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०० (एकही नाही) ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या नाही. उक्त निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने तिसऱ्या वेळेस फेर ई निविदा करण्यास शहर अभियंता यांनी दि.१६/०२/२०२२ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची तिसऱ्या फेर ई निविदा सुचना क्रं.१२७ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१४८० दि.१६/०२/२०२२ चे पत्रान्वये दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.१७/०२/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. मक्तेदार यांचे सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार श्री.गजानन इंन्टरप्राईजेस यांचे निविदा रक्कमेवर ८.८८% जास्तीचे दर सर्वात कमी आले. सदर दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटी साठी पत्र क्र.साबा/१७७२ दि.१०/०३/२०२२ अन्वये दि.१४/०३/२०२२ रोजी निविदा समिती यांचे समक्ष बोलविले असता मक्तेदार यांनी सदरचे काम वाटाघाटी अंती ७% जास्तीच्या दराने करण्यास लेखी संमती दिली त्या दरास महासभा ठराव क्रं.८३१ दि.३०/०५/२०२२ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

परंतु मुलभुत सोयी सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत शासनाने वितरीत केलेला २५ कोटी अनुदान हे सन २०१६-१७ या आर्थीक वर्षात मंजुर केलेला आहे. त्यानुसार सदरचा निधी खर्च करण्याकरीता शासनाने निर्णय क्रं. संकीर्ण ११९८/प्र.क्र.-३०/नवि-४ दि.२१ मे २०२१ चे नुसार दि.२८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ दि.२८/०२/२०२२ रोजी संपलेली असल्याने अवर सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडेस पत्र क्रं. जशमनपा/साबा/६५५ दि.०९/०६/२०२२ अन्वये सदर निधी खर्च करण्यासाठी दि.३१ ऑक्टोंबर २०२२ अखेर पावेतो मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. परंतु अदयाप पावेतो निधी खर्च करण्या संदर्भात मुदतवाढ शासनाकडुन मिळालेली नसल्याने जरी उक्त कामाच्या सर्वात कमी आलेल्या निविदेस महासभेने मान्यता दिलेली असली तरी कार्यादेश मक्तेदार यांना निर्गमीत करण्याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. तथापी मा.महापौर यांनी पत्र क्रं.जशमनपा/मका/१३८ दि.१२/०९/२०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार स्वच्छतागृह/ शौचालय बांधकामाचे काम अत्यावश्यक असल्याने या कामी शासना मार्फत अनुदान खर्च करण्यास मुदतवाढ मिळाल्यास शासन अनुदानातुन सदर काम करणे बाबत व अनुदान खर्च करण्यास मुदतवाढ न मिळाल्यास सदरचे काम हे मनपा निधीतुन मान्यता मिळणेकरीता प्रशासनामार्फत प्रस्ताव महासभेला ठेवण्यासंदर्भात सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने वर नमुद प्रमाणे शासनास अनुदान खर्च करण्यास मागीतलेली मुदतवाढ मिळाल्यास अनुदानातुन खर्च करणे शक्य होईल अन्यथा मनपा निधीतुन खर्च करावा लागणार आहे. त्याकरीता प्रथम महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने उक्त कामी होणारा खर्च रक्कम रु.५३,४९,३०७/- मात्र मनपा निधीतुन खर्च करण्यास व शासनाकडुन अनुदान खर्च करण्यास मुदतवाढ मिळाल्यास अनुदानातुन खर्च करण्यास

तसेच उक्त काम मक्तेदार श्री.गजानन इंन्टप्राईजेस यांचे कडुन मंजुर दरात काम करुन घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७**) प्रभाग क्र.०९ अंतर्गत पिंप्राळा बाजार रोड व परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे कामी येणारा रक्कम रु.३३,१७,७१३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये फक्त एक सुचना करायची आहे. त्या ठिकाणचे जे इंजिनिअर आहे. ते आलेले आहे का येथे. त्या प्रभागातील इंजिनिअर आलेले आहे का ?

**श्री.एम.जी.गिरगावकर, शहर अभियंता :-** नाही.

**मा.उपमहापौर :-** बरं ठिक आहे. गिरगावकर साहेब, हा प्रस्ताव जो आपण या ठिकाणी दिलेला आहे. याच्यामध्ये पिंप्राळा साईटला रोड, जो बाजार रोड आहे. तो मुख्य रस्ता आहे. त्या ठिकाणची गटार तयार करत असतांना रु.३३ लक्ष मध्ये पुर्ण होणार नाही. त्या ठिकाणचे आपण जे इस्टीमेट बनविलेले आहे ते रोडच्या दोघी साईडने बनविलेले आहे. परंतु त्या ठिकाणी पाण्याचा निचरा त्या ठिकाणची भुगोलिक परिस्थिती जर आपण बधितली. तर तो दोघी साईडने जी जागा ती पेट्रोल पंपापासुन पिंप्राळा चौकापर्यंतची करणार आहोत. भुगोलिक दृष्टीकोणातुन आपण जर जागेची पाहणी केली. तर योग्य पध्दतीने जागेचा निचरा होणार नाही. आपण दोघी साईटने रोड बाजुने गटार करत असतांना म्हणजे ज्या ज्या ठिकाणी उतार असेल, त्या त्या भागामध्ये ती उतार खाली येईल. म्हणजे तेथे कस्तुर सुपरशॉप असेल.त्याच्यापुढे ते शंकर आप्पा नगरच्या गल्ल्या असतील. खाली जाऊन त्या पिंप्राळा चौकातील मस्जीद असेल. अश्या ठिकाणी वरुन त्या ठिकाणी पाणीचा प्रॉपर निचरा होईल. अश्या पध्दतीने गटारी बांधल्या गेल्या पाहिजे. कारण आपण त्या ठिकाणचा जो रस्ता आहे जो बाजार रोडचा पिंप्राळा चौकापासुन ते गुजराल पेट्रोल पंपापर्यंत हा रस्ता आहे. आपण ४२ कोटी रुपया मध्ये परिशिष्ट क मध्ये टाकलेला आहे. आता मला वाटते की, ते देखील मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. पण आता तो रस्ता होण्याच्या पुर्वी आपल्याला या गटारी करुन घेणे गरजेचे आहे. कारण त्या ठिकाणी डांबरी रस्ता आपण कोणत्याही कोटचा केला तर तो पावसामुळे आणि पाण्यामुळे खराब होऊन जातो किंवा पाण्याचा योग्य निचरा जर झाला नाही. तर त्या रस्त्याला कोणताही उपयोग होणार नाही . त्याच्यामुळे आपण त्या ठिकाणी पाण्याचा योग्य पध्दतीने निचरा होईल. अश्या पध्दतीने त्या ठिकाणचे इस्टीमेट तयार करुन याच्यामध्ये जर आपल्याला काही अजुन वाढीव पैसे लागणार असतील तर त्या वाढीव पैसे आपण त्याच्यामध्ये प्लस करुन अधिक करुन आपण त्या ठिकाणची पाहणी करुन आपण त्या कामामध्ये वाढ करायची आहे आणि हे काम लवकरात लवकर कश्या पध्दतीने सुरु होईल. कारण आपण त्या रस्त्याचे काम आता हाती घेणार आहे भाऊ. आणि त्या ठिकाणी काही थोडे अतिक्रमण नाही त्या रस्त्यावर ते देखील आपल्याला काढायचे आहे. तुम्ही हा विषय प्रत्येक्ष जागेवर जाऊन त्या ठिकाणी आपल्याला गटारचे काम कसे योग्य पध्दतीने करता येईल त्याची पाहणी करुन घ्यावी.

**श्री.मयुर कापसे :-** पिंप्राळाचा बाजार जो भरला जातो तो बाजाराचा हा रोड आहे. पिंप्राळा छत्रपती शिवाजी महाराज चौकापासुन तर गुजराल पेट्रोल पंपापर्यंत. मॅडम तेथे अक्षरशा गटारी नाही. आपण ४२ कोटीच्या निधीतुन जर तो रस्ता बनवला आणि गटारी नाही बनवल्या. तर एक वर्ष सुध्दा भाऊ गटारी राहणार नाही. आणि त्या रस्त्यावर जवळ जवळ ते हायवे आणि पिंप्राळाकडे जाणारे रोडची कनेक्टीव्हीटी आहे. रोज हजारो नागरीक हजारो वाहने त्या ठिकाणी वापर करत असतात. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, प्रिपाळयात हा जो रस्ता जातो तिथला बाजार, फक्त बुधवारी सगळया शहरातील महिला बाजारासाठी तेथे जातात. आणि ते पुर्ण सांड पाणी रोडवर येत असते. त्यामुळे मॅडम इतका मनस्ताप सहन करावा लागतो की, अक्षरशा आई आणि ते बाजारात

जातात तर नागरीक काही पण बोलतात. तर माझी आपल्याला फक्त एकच विनंती आहे. मॅडम तुम्ही शेरा दिलेला आहे की, सदर काम शासकीय निधीतुन प्रस्तावीत करण्यात यावा. तर शासकीय निधी आपल्याला केव्हा उपलब्ध होईल. रस्ता बनल्यानंतर जर तो निधी उपलब्ध झाला तर त्याला महत्व नाही. आपण शासकीय निधीतुन न उपलब्ध करता ते काम मनपा फंडातुन लवकरात लवकर कसे मार्गस्त करता येईल हे मी तुम्हाला विनंती करतो. आणि माझी तर ईच्छा आहे की, ते काम मनपा फंडातुनच रस्ता चालु होण्या अगोदर गटारीचे काम चालु झाले पाहिजे. तरच त्या रस्त्याला महत्व आहे मॅडम, नाही तर तो रस्ता एक वर्ष सुध्दा राहणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे, योग्य आहे.

**मा.उपमहापौर :-** याची आपण ठरावामध्ये सुध्दा नोंद करुन घ्या की, हे ३३ लक्ष रुपयांमध्ये त्या गटारींचे काम पुर्ण होणार नसेल, तर त्या ठिकाणी वाढीव किमत लागत असेल, तर वाढीव दर त्या ठिकाणी, दर नाही म्हणता येणार त्याला, वाढीव रक्कम त्याच्यासाठी करावी लागेल.

**श्री.मयुर कापसे :-** मॅडम ठरावात असे नमुद करुन घ्या की, शासकीय निधी न वापरता मनपा फंडातुन जितक्या लवकर होईल तितक्या लवकर करा.

**मा.उपमहापौर :-** मनपा फंडातुनच करु आपण

**श्री.मयुर कापसे :-** नाही, मॅडमांनी तसा शेरा दिलेला आहे की, शासकीय निधीतुन काम करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** नाही, नाही, नाही, आपण प्रस्ताव मंजुर करत असतांना हे जे प्रस्ताव वाचुन दाखवला ना आपण त्यालाच मान्यता देणार आहे. त्याच्यामध्ये आयुक्तांनी काय शिफारस केलेली आहे. याच्यापेक्षा आपण याच्यावर चर्चा केली पाहिजे. जर ३३ लक्ष रुपयामध्ये मनपा फंडातुनच करणार आहे तर ३३ लक्ष रुपयांमध्ये नाही होणार.

**श्री.मयुर कापसे :-** ७ नंबरचे काम बघितले तर ५ कोटी ३७ लाखाचे काम मनपा फंडातुन जर त्याला मुदतवाढ नाही मिळाली तर मनपा फंडातुन करायचे म्हणत आहे, तर ३३ लाखाचे काम का नाही मनपा फंडातुन.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्याच्यातुन उत्पन्न किती मिळते ते सांगा,

**श्री.मुयर कापसे :-** महिन्याला १ लाखाचे उत्पन्न आहे हो. वर्षाला १२ लाख आणि ५ वर्षात ६० लाखाचे उत्पन्न आहे. आणि आपण तेथे ३३ लाख नाही देऊ शकत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** उत्पन्न देणारा रस्ता आहे तो आपला.

**श्री.मयुर कापसे :-** भाऊ शहरातील पुर्ण ग्रामीण भागातुन शेतकरी व्यापारी येत असतात.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे ठिक आहे.

**श्री.मयुर कापसे :-** ते मनपा फंडातुन लवकरात लवकर करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** गिरगावकर साहेब, गोराणे साहेब ही सुचना ठरावात घ्या. ३३ लक्ष रुपयात पुर्ण न झाल्यास वाढीव खर्चाला मान्यता देण्यात येत आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य आणि उपमहापौर यांनी दिलेल्या सुचनांचे प्रशासनाने पालन करुन ठरावामध्ये याची नोंद घ्यावी आणि विषय क्र.७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०९ अंतर्गत पिंप्राळा बाजार रोड व परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक राज्य दर सुची २०२०-२१ नुसार बनवलेले असुन या कामी रक्कम रु.३३,१७,७१३/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सदर रोड डांबरीकरणास मंजुरी प्राप्त झालेली असल्याने गटारी बनवणे आवश्यक आहे. या बाबत सन्मा.नगरसेवक व नागरिक विचारणा करीत असल्याने प्रभाग क्र.०९ अंतर्गत पिंप्राळा बाजार रोड व परिसरात आर.सी.सी.गटार बांधणे कामी येणारा रक्कम रु.३३,१७,७१३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर काम शासकीय अनुज्ञेय निधीतुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त ठिकाणी उक्त नमूद रक्कमेमध्ये दोन्ही साईडला गटार तयार करणे शक्य होणार नसल्याने प्रत्यक्ष जागेवर जावून दोन्ही साईडची गटार पूर्ण होईल

त्यादृष्टीने वाढीव अंदाजपत्रक तयार करुन वाढीव अंदाजपत्रकासह सदरचे काम म.न.पा. फंडातून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८**) प्रभाग क्र.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नगरसचिव साहेब, विषय क्र.८,९,१०,११ चारही एक सारखे आहे. एका विषयाचे वाचन करुन घ्या. आणि सभागृह चारही विषयांना मान्यता देईल. एक वाचुन घ्या फक्त.

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८**) प्रभाग समिती क्र.०१ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०१,६५,२८४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.८,९,१० आणि ११ चारही विषय प्रभाग समिती क्र.१,२,३,४ मध्ये रस्त्यातील खड्डे बुजवण्यासाठी आर्थिक तरतुदीला मान्यता देण्याचे संदर्भात आहे. चारही विषय मान्य करण्यात यावे.

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि ती सुरुवात केव्हा होणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुरुवात झालेली आहे टेन्डरही झालेले आहे. आप्पा मला काय वाटते,

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि किती रस्ते होणार आहे त्याच्यात.

**श्री.सुनिल महाजन :-** रस्त्यांचे नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खड्डे खड्डे खड्डे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ते बुजले जाणार आहे का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याला फक्त खड्डे बुजवण्याची जबाबदारी प्राप्त झालेली आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो पण एखादा बुजुन दिले आणि झाले असे नको व्हायला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही महापौरताई, पण खऱ्या अर्थाने बघितले, हे काम, हा पैसा खड्डयामध्ये टाकण्याचा प्रकार आहे. याला आपण म्हणतो ईच्छा नसतांना सुध्दा करावयाचे हे काम आहे. माहित आहे या कामावर केलेला खर्च पाण्यातच जाणार आहे. कारण पाऊस पडला की, त्याच्यावर खर्च केलेला पैसा हा पाण्यात जातो. परंतु मला हे कळत नाही. म्हणजे आता बघा मी माहिती घेतली, खड्डे बुजविण्यावर आपला भर असतो, परंतु रस्त्यांचे कामासाठी मिळालेला निधी, १०० कोटीचा शासन निर्णय आज जर बघितला, १०० कोटीच्या शासन निर्णयाला मान्यता मिळालेली होती. १६ ऑगस्ट २०१८ म्हणजे बरोबर आता ४ वर्षाचा कालावधी झालेला आहे. त्या १०० कोटीपैकी ४२ कोटीच्या कामांना मान्यता मिळाली १ ऑगस्ट २०१९ ला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. म्हणजे त्यालाही जवळपास ३ वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे. आजही ही परिस्थिती आहे की, त्या ४२ कोटी रुपयांपैकी रु.१ चे ही काम रेकॉर्ड झालेले नाही. आणि त्या ४२ कोटीच्या कामांवरती आपण संपुर्ण जळगांवकरांना विकासाचा गाजर दाखवतो आहे. कोट्यावधीचे काम आपण या सभागृहात पारित करतो आहे. परंतु खऱ्या अर्थाने आपण म्हणतो, आपण या जळगांव शहराच्या नागरीकांची पडताळना करतो आहे. किंवा आपण खऱ्या अर्थाने बघितले तर या प्रकारे आपण दिशाभुल करतो आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने या वेळेला घेऊन आलेली कॉन्सील खऱ्या अर्थाने दुरभाग्यपुर्ण आहे की, निधीचा विनियोग आपण करु शकत नाही. याच्यापेक्षा मोठी शोकांतीका मला वाटत नाही. आज मला सांगा या ४२ कोटीच्या कामाच्या संदर्भात किंवा १०० कोटीच्या निधीला गेली ४ वर्ष झालेली आहे. परंतु राज्य शासनाकडुन एक सिंगल नया पैसा सुध्दा या महानगरपालिकेच्या खोऱ्यात आलेला नाही. आपण मक्तेदाराला दोष देतो. मक्तेदाराला धारेवर धरतो.सार्वजनिक विभागाला धारेवर धरतो, परंतु मला सांगा, काहीही बैठक झाली महानगरपालिकेमध्ये, सन्मा.आमदार मामांनी बैठक घेतली. योग्य आहे, परंतु या संदर्भात, मक्तेदारालाही १००% दोष देऊन उपयोग नाही. कारण आपण फक्त मनपाच्या हिस्स्यातले ५ कोटी रुपये जे आहे. ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केलेले आहे. आणि ते ५ कोटी रुपये

आपण वर्ग केल्यामुळे काही अंशिक ४-५ रस्त्यांचे काम प्राथमिक स्वरूपात मक्तेदाराने सुरु केलेले आहे. ठिक आहे. काम प्रगतीपथावर आहे. काम ते ५ कोटी रूपयाचे पुर्ण ही होईल. परंतु ५ कोटीच्यानंतर पुन्हा मक्तेदार काम थांबवेल. आणि त्याच्या संदर्भात थोडे वेळेपुर्वी आपली चर्चा झाली. नितीनभाऊंनी, बंटीभाऊंनी विचारना केली की, ६१ कोटी मधला १३ कोटी रूपयाचा निधी आपण पुन्हा डी.पी.डी.सी.कडे वर्ग केला, मग त्या डी.पी.डी.सी.च्या निधीतुन जी प्रस्तावीत झालेली कामे आहे. आणि त्याच्यामध्ये अर्धवट झालेली कामे ज्या मक्तेदाराला दिले आहे. त्या मक्तेदाराने सुध्दा हाच समापन दिला आहे की, आमच्या केलेल्या कामांचा निधी कुठल्या याच्यातने मिळेल. तोच निधी या मक्तेदाराचा सुध्दा आहे. ४२ कोटीच्या कामांचे वर्कऑर्डर मिळालेली आहे. परंतु निधीची उपलब्धताच नाही. मग जर कधी निधी उपलब्ध नाही झाला, मक्तेदाराने समजा १०-२० कोटीचे कामे मार्गी लावुन दिली आणि निधी मिळविण्यामध्ये विलंब झाला. तर मक्तेदार कोणाचे तोंड बघणार.ही परिस्थिती निर्माण होईल. म्हणुन आज आपण जरी, प्रत्येक जण येथे रस्त्यांचे विषयावर भांडतो आहे.परंतु निधीच्या संदर्भातली भुमिका काय जो पर्यंत निधी मिळणार नाही. तो पर्यंत मला वाटते की, हे आश्वासनांवरती नागरीकांचा ही विश्वास उडुन गेलेला आहे, सदस्यांचाही विश्वास उडुन गेलेला आहे. मग अश्या परिस्थितीला पुढे नेणार कसे. आणि या निधीच्या १०० कोटी रूपयाची घोषणा होऊन ४ वर्ष झाले, आणि या ४ वर्षामध्ये आपण या संपुर्ण जनतेला त्या १०० कोटीच्या अनुषंगाने झालेले ठराव, कधी ४२ कोटीच्या अनुषंगाने झालेले ठराव, कधी ४२ कोटीच्या कार्यादेशाच्या अनुषंगाने असे पध्दतीचे चित्र आपण सामान्य माणसांपुढे ठेवत असतो.परंतु प्रत्येक्षातली परिस्थिती जी आहे ती आपण स्वत: अनुभवतो आहे की, रस्त्यांची परिस्थिती काय आहे. आणि मग अश्या पध्दतीने ४-४ कोटी रूपये आपण खड्डयांमध्ये भरत जातो. आणि तो पैसा पुर्ण पाण्यात जातो. तर कुठेतरी शासकीय निधीच्या बाबतीतला या संपुर्ण सभागृहाला चिंतन करण्याची आवश्यकता आहे. आपण ठिक आहे. राजकीय मतभेद असतील, वैचारीक भुमिका वेगवेगळी असेल, परंतु ज्या पध्दतीने शासकीय निधी आल्यानंतर तो कुठेतरी योग्य तो त्याचे नियोजन होऊन लवकरात लवकर कसा खर्ची पडेल, आणि पुन्हा खर्च झालेला निधी, राज्य शासनाकडे नव्याने कसा मागणी करता येईल. आज आपली परिस्थिती अशी आहे. १०० कोटीचा निधी आपण ४ वर्षात खर्च करु शकलो नाही. किंवा त्याचे प्रस्ताव सुध्दा तयार करु शकलो नाही. आपण वेगळया अर्थाने शासनाकडे कुठल्या निधीची मागणी कराल. मग पुन्हा शासन हाच प्रश्न उपस्थित करेल की, तुम्हाला दिलेला निधी तुम्ही युटिलाईज करु शकत नाही. आणि तुम्ही पुन्हा आमच्याकडे निधीची मागणी करतात. आहे तुमच्याकडचा निधी तो पहिले खर्च करा. परिस्थितीचे आपण काय उत्तर देणार. आज मला सांगा ताई. या संदर्भातला ज्या पध्दतीने हा विषय झाला, त्याच पध्दतीने घनकचरा प्रकल्पच्या बाबतीत परिस्थिती तीच आहे. घनकचरा प्रकल्पाचा निधी हा साधारणता १ मार्च २०१८ रोजी शासन निर्णय झाला, महानगरपालिकेचा हिस्सा, केंद्र शासनाचा हिस्सा आणि राज्य शासनाचा हिस्सा मिळुन ३० कोटी ७३ लाख रूपये आपल्याला प्राप्त झाला, आणि ३० कोटी ७३ लाख रूपयांपैकी, आज जवळपास ४ वर्ष झालेले आहे. आणि फक्त १२ कोटी ९८ लाख रूपये खर्ची पडलेले आहे. म्हणजे १८ कोटी रूपयाचा घनकचरा प्रकल्पाचा निधी सुध्दा आज ४ वर्षापासुन अखर्चीत आहे. एकीकडे आपण म्हणतो की, आपला रॅनकींग कमी मिळालेला स्वच्छ भारत अभियान मध्ये. दुसरीकडे त्या भागातील नागरीक म्हणतात. आम्हाला ही जिव घेण्याची समस्यापासुन आमची सुटका करा. तेथे त्या प्रकल्पामध्ये होणारी सगळी दुर्गंधी त्या परिसरातील नागरीकाचे आरोग्य धोक्यात येतात म्हणजे एकावेळेला आपल्याकडे निधी नसेल, आणि आपण काही कर्तव्य पार पाडु नाही शकलो, तर ती परिस्थिती समजु शकतो, किंवा निधीच नाही आमच्याकडे आणि त्या अनुषंगाने आम्ही ते कर्तव्य पार पाडण्यामध्ये असमर्थ आहोत. परंतु निधी आहे. परंतु निधी खर्च होत नाही. आणि पर्यायाने रॅनकींगमध्ये सुध्दा फरक पडतो. आणि नागरीकांना सुध्दा या शहरातील त्रास सहन करावा लागतो. या विषयाला आपण काय चर्चा करणार.म्हणजे कोट्यावधी रूपयांचे कामे कागदावरती दिसतात. प्रत्येक्षातली परिस्थिती बघाल तर शुन्य आहे. मग ती आरोग्याच्या बाबतीतली असेल, मग ती रस्त्यांच्या बाबतीतली असेल, घरकुलांची वसुली आपली कोट्यावधी रूपयांची आहे. मला सांगा, प्रशांत नाईक नेहमी आठवतात. मेहरूण परिसरातील आपली महादेव मंदिराजवळची घरकुले, काही भंगार व्यवसायीकांनी त्याचे कॉन्ट्रॅक्ट देऊन टाकले परस्पर बिल्डींग तोडायचे. व्हिडीओ आहे प्रशांतकडे, रितसर म्हणजे त्याच्यावर घन चालवुन चालवुन त्याच्यातल्या आसाऱ्या काढुन तोडली जाते बिल्डींग, कोट्यावधीच्या रूपयाची आपली प्रॉपर्टी

आहे. परंतु दुर्लक्ष आहे. अश्या कोट्यावधी रूपयांची मिळकती, कुठेतरी याच्या बाबतीतला की, याच्यातुन निधीची उभारणी कशी करता येईल. या शहराचे विकासाचे प्रश्न कसे मार्गी लागतील. आपल्याला खुप सोर्सेस आहे. पैसा निर्माण करण्याचेही खुप सोर्सेस आहे. परंतु असे आहे की, आपण सगळे करून सुध्दा आपली गत भिकाऱ्यासारखी झालेली आहे. प्रत्येक वेळेस असे वाटते की, आपण दरिद्री आहोत की काय ? आपण दरिद्री नाही आहोत. आपल्याकडे खुप मोठी संपदा आहे. परंतु योग्य नियोजन नाही. योग्य समन्वय नाही. प्रत्येक जण एक दुसऱ्याचा हेवे दावे करतो. या शहराच्या विकासाच्या बाबतीत कोणी गांर्भियाने पाहत नाही. आज मला सांगा, डी.-मार्टच्या रस्त्याच्या अनुषंगाने महापौरताईंनी इतकी खंत व्यक्त केली. मला सांगा, ईच्छादेवी ते डी-मार्टचा रस्ता ज्याला आपण म्हणतो. परंतु खऱ्या अर्थाने तो क्रमांक.५३ चा नॅशनल हायवे झाला आहे. आज मला सांगा संपुर्ण २९० कि.मी.चा रस्ता काँक्रीटींग झाला. आणि सगळयात महत्वाचा हिस्सा कोणता तर देवकर कॉलेज ते ईच्छादेवी पर्यंतचा. चार कि.मी.चा अत्यंत रहदारीचा महत्वाचा रस्ता त्या हायवेचा. तो मात्र त्याच्यातुन वंचित ठेवला गेला. म्हणजे या गोष्टीचे आहे. जे काम जवळपास ३०-४० कोटी रूपयांचे नॅशनल हायवेच्या माध्यमातुन होऊ शकतो. आपल्या लोकप्रतिनिधींनी आता, म्हणजे मागच्या सभेनंतर, लोकप्रतिनिधींनी बैठक घेतली. हायवेच्या अधिकारी त्यांचे असे म्हणणे होते की, जर कधी आपण हा रस्ता नाही केला ना, या अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासु, पण मला एक म्हणायचे आहे की, तोंडाला काळे फासणे पर्यंतची परिस्थिती का यायला पाहिजे. ज्या वेळेला त्या रस्त्याचे काम चाललेले आहे. त्याचा डी.पी.आर. तयार होत आहे. तर संबंधीत लोकप्रतिनिधींनी त्यांची जबाबदारी स्विकारली पाहिजे किंवा माझ्या मतदार संघातला रस्ता ऐवढा कसा काय सुटत आहे.परंतु आज तो रस्ता सुटल्यामुळे संपुर्ण आज महापौरांचा प्रभाग आहे. शहराचा मध्यवर्ती नॅशनल हायवे आहे तो. परंतु आज तिकडील परिस्थिती काय की तेथे गेल्यानंतर असे वाटेल की, आपण खेडयापेक्षा निपत्तर जागी पोहचलेलो आहे की काय ? ज्याला आपल्याला गणपती विसर्जनास दुसऱ्या विभागाची मदत घेऊन त्याला दुरूस्ती करावी लागते, असली परिस्थिती आहे. कुठेतरी काय होते, आपण सभागृहात एक दुसऱ्याचे नवे जुने काढुन घेतो. परंतु या शहराची जबाबदारी कोणीतरी स्विकारली पाहिजे. या शहरातील नागरीकांनी या संपुर्ण सभागृहातील सदस्यांना ती जबाबदारी सोपविलेली आहे. आपण जर आपल्या जबाबदारीचे पालन नाही करु शकलो. तर मला वाटते की, ही जनता आपल्यापैकी ७०-८० टक्के लोकांना घरी पाठवुन देईल. अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तर कुठे तरी या सगळया गोष्टींचा गांर्भियाने विचार करायला पाहजे. जे काही निधी अश्या कारणासाठी प्रलंबित पडलेले आहे. त्याचा कुठेतरी गांभिर्याने विचार करून उगाचच फक्त काय आहे. कोणाचा त्याच्यात व्यक्तीगत स्वार्थ त्याच्यात असेल, तोही त्यांनी बाजुला ठेवायला पाहिजे. मला वाटते ते प्राथमिकतेचा स्वार्थ ही असेल. परंतु योग्य पध्दतीने या निधीचा विनियोग होणे खुप गरजेचे आहे. नाही तर मी म्हणतो याच्यापेक्षा दुर्देव कुठलेच दिसत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एकदम खरोखर आहे की एकीकडे प्रशासन म्हणतय की महापालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाहीये आणि इकडे आपले लोकप्रतिनिधी आपल्या या शहरासाठी मग ते देवेंद्रभाऊ फडणवीस असतील त्यांनी मुख्यमंत्री असतांना १०० कोटी रूपये निधी आपल्याला ते मंजुर करतात. ५८ कोटी , ४२ कोटी , गुलाबभाऊंनी ६८ कोटी किंवा जो काही शासनाने आता मागे ११ कोटी आले. त्याच्यानंतर ५ कोटी सुनिलभाऊंनी आणले. त्याच्यात तर आता ही महापालिकेत जे सुरू आहे या शहराच्या विकासाच्या संदर्भात संपुर्ण शासकीय निधीवर आहे. एक म्हणायचे तर मनपा निधी नाहीच आहे. जर तस पाहायला गेले तर आजची परिस्थिती फार चांगली आहे पुर्वीपेक्षा , ज्यावेळी रामनाथ सोनवणे साहेब होते त्यावेळेसची परिस्थिती आणि त्यावेळेसची परिस्थिती खराब असतांना त्यांनी महापालिका व्यवस्थित चालवली आणि वेळेच्या वेळेस पगार दिले त्यांनी कर्मचाऱ्यांचे , अशी सर्व परिस्थिती या शहरात सुरू असतांना , त्यावेळी मी लहान होतो , त्यावेळेस मलाही माहिती मिळायची की शासकीय निधी जर कुठुन मिळत असेल तर आपला एक सेप्रेट अधिकारी ते काम पाहात होता त्यावेळेस की त्याच कामच ते आहे प्रस्ताव घ्यायचा मुंबईला जायचं आणि आपला एक अधिकारी किंवा कर्मचारी एक असा नाहीये की तो निधी आपल्या जळगांव शहराच्या पारड्यात पाडुन घेण्यासाठी आपण त्याच्यासाठी काय करतो. आज जिवाच रानं केलं पाहीजे आज या महापालिकेत लक्षात येईल की आता जसा अमृतचा विषय राहीलेला आहे महत्वाचा तिनशे-चारशे काटी रूपये निधी केंद्र शासनाने दिले. आपल्याला एक रूपया लागलेला नाहीये. पण त्याची उदासिनता इतकी मोठी आहे की मागच्या आठ ऑगस्टला आपण सभागृहात प्रस्ताव आणलेला होता प्रशासनाने आणि तो प्रस्ताव आपण उन्मेश दादांमुळे तो ठराव ही केला की निविदा काढा म्हणुन पण त्याच्यावर काही अंमलबजावणी झाली नाही. त्याला दोन महिने झाले आहे. ज्यावेळेला असा

अधिकारी राहीला असता की हातात ठराव पडला सात दिवसांत निविदा काढली असती , सात दिवसांत पुढची प्रक्रीया केली असती एकविसाव्या दिवशी महासभेपुढे आणुन दिले असते.याला म्हणतात कार्य तत्परता पण ते झालं नाही. ठराव झाल्यानंतर शुचितातार्ईना बोलावले माईकपुढे आयुक्त मॅडम आपण त्या आल्या तिथे आणि त्या आल्यानंतर आपण त्यांना सांगीतले की एक काम करा सर्व गटनेते असतील, नितीनभाऊ असतील , विरोधी पक्ष नेता असतील , महापौर असतील, सर्व पक्षीय गटनेत्यांना बोलवा आणि याच्याबद्दल एक बैठक घ्या. का बरं घेतली गेली नाही. म्हणजे ही उदासिनता आहे. आज २०० कोटी मधुन जळगांव करांना आरओ चे पाणी मिळणार आहे. शुध्द पाणी मिळणार आहे , फिल्टरच्या प्लँटचा विषय आहे. आज आपण तिन लोकं की जे आज रेग्युलर आहेत असही नाही की पुढच्या महासभेत पाहु महिन्याभरानंतर त्याबद्दल शासनाचा एक जिआर आलेला आहे. ३० तारखेपर्यंत जी डिपीआर सबमिट करायची मुदत आहे. आता त्याच्यामध्ये रायजिंग लाईनचा विषय आहे. आता आपण जे पाणी देतोय ते १० वर्षानंतर सुध्दा आरओचे पाणी पुरवठा देता येणार नाही. इतकी गंभीर परिस्थिती होईल. कारण लोकसंख्या वाढतेय दिवसेंदिवस घर वाढताहेत. पण या गोष्टींकडे आपण कुठेच लक्ष द्यायला तयार नाहीये. म्हणजे सगळा जो आपल्याला शासनाकडुन निधी मिळतो , एजन्सी कोणी असो काय असो. पण काम झालं पाहीजे. या शहराला निधी आला पाहीजे आणि या शहराचा विकास झाला पाहीजे. ही या संगळ्याची या सभागृहाची भावना आहे. मी आधीपण बोललो की एखादेवेळेस आम्ही राजकीय भांडण करून घेवु तरी विकासाला आम्ही इथे एकत्र बसतो. आम्ही एकमेकांशी चर्चा करतो आणि ठराव मंजुर करतो. तर माझी हात जोडून विनंती आहे की, कुठेतरी आपण प्रशासनाने खरच लक्ष दिलं पाहीजे.नुसत्या हे घेवुन हे होणार नाही. जबाबदाऱ्या दिल्या पाहीजे की हे काम आहे हे केलं पाहीजे. तर काय बोलायचं नितीनभाऊ हेच समजत नाहीये आज या सभागृहामध्ये , आपण महिन्यातुन एकदा उगवतो. सर्व चर्चा करतो नंतर विषय काहीच होत नाही. जैसे थे तसच होत. मला वाटत हजार कोटींचे ठराव आपले मनपा निधीचे मंजुर झालेले आहेत.

**श्री.अनंत जोशी :-** याच्याबाबतीत डांगे साहेब चांगले होते. त्यांनी निधी आणला होता का हो भाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** म्हणजे हा गंभीर विषय आहे. त्यांना असं वाटत की कारण नगरसेवकही असे होवुन गेले आहे की बोलुन बोलुन काय करणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे काय आहे की जिल्ह्याला दोन सक्षम मंत्री पद आहेत. आदरणिय गुलाबभाऊ आहेत. आदरणिय गिरीषभाऊ आहेत आणि त्यांना अस काही आकसतीतता नाहीये या शहराप्रती , जर कधी सर्वांनी मिळुन दोघांनाही विनंती केली आणि तसा आपण हा विचार केला पाहीजे की सरकार कुठल्याही पक्षाचे असो , यासभागृहातील सदस्यांनी कमीत कमी या शहराच्या दृष्टीकोनातुन राज्य शासनाचा जास्तीत जास्त निधी या शहराकरीता कसा आणता येईल आणि तो कशा पध्दतीने शहराच्या विकासाचा गाडा आपण शहराच्या हिशोबाने पुढे नेवु आणि आपण याचा समन्वय ठेवायला पाहीजे. आता विशालभाऊंनी सांगीतलेच की अमृतच्या बाबतीत आता खर बघायला गेले तर आठव्या महिन्यामध्येच आपण हा ठराव करून दिलेला आहे. आठव्या महिन्याचा ठराव करून दिलेला आहे की आपण निविदा काढुन तातडीने कन्सलटंटची नेमणुक करावी. या संदर्भात माहिती घेतली आता बघितलं की आपण कंन्सलटंटला काम देण्याच्या संदर्भातील भुमिका प्रशासनाने स्विकारली होती. निसर्ग कन्सल्टंट साठी काही नाही निसर्ग कन्सल्टंट ने काम केलेले आहे त्याबद्दल काही वाद नाहीये. परंतू अडचण काय आहे की अमृत च्या ज्या गाईडलाईन आहेत आणि अमृत योजनेच्या गाईडलाईनचा मी येथे अभ्यास केला आणि जो डिपीआर आता आपण डिपीडीसीच्या माध्यमातुन करण्याच्या संदर्भातील कार्यादेश दिलेले आहेत. त्याच्यामध्ये अमृतच्या कुठल्याही गाईडलाईन्सचा समावेश झाल्याचे दिसुन येत नाही. म्हणजे अमृत च्या बेसिक गाईडलाईन्स काय आहे की, संपुर्ण शहराच संपुर्ण जिआयएस मॅपिंग करणे गरजेचे आहे. जिआयएस मॅपिंग करून या शहराची पाण्याची डिमांड किती आहे. काय आहे की डिमांड किती आहे हे तुम्हाला आईडींटीफाय करावी लागेल. प्रत्येक याच्यामध्ये इतक्या गाईडलाईन्स ज्या आहेत की १०० टक्के कंन्झुमर मिटर मोफत मिळतात. रस्त्यांच्या दोन्ही बाजुंची पाईपलाईनची तरतूद ३ हजार नळ कनेक्शन ला एक मॉकेट प्लँट करणे. म्हणजे ३ हजार घरांचे एक मॉकेट करायचे आणि त्या मॉकेटमध्ये एक बल्क मिटर लावायचे की ३ हजार घरांचे पाणी वापर उदाहरणार्थ एक लाख लिटर असेल तर त्या मिटर मधुन आपले येणारे बल्क मिटर मध्ये होतेय का ? आणि आपल्याकडुन १ लाख लिटर पाणी उचलले जाते आहे का ? त्याचा ताळमेळ सुध्दा हा कुठेतरी जुळला गेला पाहीजे. जसं विजचोरीच्या बाबतीत होत. तसं त्या पाणीचोरीच्या नियंत्रण आणण्याच्या दृष्टीकोनातुन प्रत्येक एका उंच टाकीच्या फक्त एकच ऑपरेटींग झोन तयार झाला पाहीजे. म्हणजे शहराचे झोनही करायचे आणि या झोनींगच्या अनुषंगाने ती एक टाकी आणि त्या टाकीच्या अनुषंगाने त्या भागातील वितरण व्यवस्था

तेवढं ती निर्धारीत केली गेलेली पाहीजे. गरजेनुसार अतिरीक्त पाणी लागल्यास ३० मिटर पर्यंत उंची मान्य आहे. मग ३० मिटर पाण्याच्या टाकीची हाईट म्हंटलं तर ती बांधायची म्हंटल तर की आपल्या वाघुरच्या डॅमची हाईट २५ मिटरची असेल आणि आपण ३० मिटर हाईटची बांधली तर पाईपलाईनने तिथे पाणी चढणार नाही. मग तिथे पर्यायी व्यवस्था करावी लागेल आणि त्याच्यामधुन पर्यायी पाण्याची व्यवस्था झाल्यानंतर म्हणजे तेवढ्या दाबाने पाणी नागरीकांना ३ ऱ्या मजल्यावर सरळसरळ पोहोचले पाहीजे. त्याच्यानंतर त्यांची प्रायोरिटी २४X७ आपण ज्यावेळेला अमृत योजनेचे काम सुरू करण्याच्या संदर्भाची संकल्पना आली आपण पहिल्या दिवसापासुन हे सांगत आलो की, या योजनेमध्ये तुम्हाला २४X७ सातही दिवस चोविस तास पाणी मिळेल. परंतू जो पर्यंत आपण मिटरींग सिस्टिम लावणार नाही तोपर्यंत २४X७ दिले जावु शकत नाही. तर अशा अनेक गोष्टी त्याच्यामध्ये गाईडलाईन्स या केंद्र शासनाने निर्धारीत करून दिलेल्या आहेत. परंतू आता जो काही डिपीआर तयार झालेला आहे आणि जो डिपीआर आपण प्रशासनाच्या माध्यमातुन शासनाकडे सादर करण्यासंदर्भातील प्रयत्न आपला चाललेला आहे. मला एक कळत या डिपीआर च्याच बाबतीतला हा जो तुमचा घनकचरा व्यवस्थापनाचा १८ कोटी खर्च होत नाहीये तो निव्वळ चुकीच्या डिपीआर मुळे नाहीये. तो कॉम्प्लीकेटेड डिपीआर होता आणि त्या कॉम्प्लीकेटेड डिपीआर मुळे नंतर त्याच्यामध्ये वेळोवेळी त्याच्यामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याची वाटली. कारण प्रत्येकाची परिस्थिती वेगळीवेगळी असते. परंतू राज्य शासनाने त्यावेळेला एक एजन्सी फायनल केलेली होती आणि त्या एजन्सीच्या माध्यमातुन तो डिपीआर झालेला होता आणि ते डिपीआर सगळे कॉपी पेस्ट झालेले होते आणि तो निधी अजुन पर्यंत खर्च होवू शकला नाही आणि तीच परिस्थती याच्यामध्ये निर्माण होता कामा नये. जर कधी या कंन्सलटंटला काम दिले असेल त्याच्याबद्दल काही वाद नाहीये. परंतू केंद्र शासनाच्या अमृतच्या ज्या गाईडलाईन आहेत. त्या गाईडलाईनच तंतोतंत पालन करून राज्य शासनाच्या जल मिशन योजनेअंतर्गत साधारणत: त्यांची दर निश्चिती करून दिलेले आहे की कुठल्या याला किती खर्च करावा. साधारणत: की ७५ ते २०० कोटीपर्यंतचा जर कधी डिपीआर तयार करायचा असेल तर त्या कंन्संलटंन्सीला १ कोटी ७५ लाख रूपयांचा मेहनताना द्यावा असे राज्य शासनाने जल मिशनच्या अनुषंगाने निर्धारीत करून दिलेले आहे. तर जर कधी राज्य शासनाच्या या गाईडलाईन्सच्या अनुषंगुन सदरहु कंन्सलटंट जर काम करायला तयार असेल आणि अमृतच्या गाईडलाईन्सचे तंतोतंत पालन होत असेल तर तसा डिपीआर तयार करावा. तसा डिपीआर तयार झाल्यानंतर या सभागृहातील ज्या ज्या सदस्यांना त्याच्याबाबतीत पार्टीसिपीट करून माहिती समजुन घ्यायची असेल किंवा कुणाला याच्यामुळे त्रास नसेल आणि जी काही शहरातील अजुन कोणी जी तज्ञ मंडळी असेल की त्या गाईडलाईनचे तंतोतंत पालन झालेले आहे का या सगळ्या गोष्टींची खातरजमा करावी आणि नंतरच डिपीआर राज्य शासनाकडे पाठवावा. चुकीचा डिपीआर प्रोव्हाईड केल्यानंतर आणि उद्या जावुन कारण काय आहे की पुढे या शहराचं २५ ते ३० वर्षाचं पाण्याची ही संपुर्ण योजना आहे. या योजना आपल्या आज २००-२०० , २५०-२५० कोटींच्या योजना आहेत आपल्या आहेत आणि चुकीच्या पध्दतीचा डिपीआर तयार झाला. तर त्याचा घाव आपल्याला हा आयुष्यभर सोसावा लागतो आणि त्याच्यावर झालेला कोट्यावधी रूपये याच्या टिकेला आपल्यालाच सामोरे जावं लागतं. घाईगर्दीने केलेला डिपीआर फक्त योजना शासनाकडुन मंजुर करून दिलेले आहे म्हणुन थातुरमातुर करून काही तरी शासनाकडे पाठवुन दिला आणि तो तसाचा तसा मंजुर करून दिला. कारण काय झालेले आहे की अमृत-१ मध्ये ज्या-ज्या काही कमतरता राहीलेल्या असतील. त्या संपुर्ण कमतरता ज्या आहेत. त्या त्रुटी पुर्ण करण्याच्या अनुषंगाने आता अमृत-२ जे आहे म्हणजे ज्या-ज्या गोष्टी आपल्या त्याच्यातुन राहील्या असतील. त्या सगळ्या कव्हर करण्याची संधी आता आपल्याला याच्यामध्ये आलेली आहे. म्हणुन ज्या-ज्या या शहराच्या पुढच्या ३० वर्षाच्या दृष्टीकोनातुन ज्या-ज्या काही गरजा आहेत. त्या सगळ्यांचा समावेश त्याच्यामध्ये होणं गरजेच आहे आणि त्या सगळ्या गोष्टींचा समावेश करूनच या संदर्भातील एक परिपुर्ण डिपीआर या सभागृहातील संपुर्ण सदस्यांची खात्री पटल्यानंतर आपण राज्य शासनाला सादर करावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ

**मा.उपमहापौर :-** भाऊ मला याच्यामध्ये असं वाटत की आपण सर्वानुमते एक ठराव केलेला आहे की ही योजना प्रोव्हाईड जो निविदाधारक आहे तो त्याच्या गुणवत्तेनुसार तो करेल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण केव्हा.

**मा.उपमहापौर :-** आता हे

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण केव्हा ३० तारीख आहे ना लास्ट

**मा.उपमहापौर :-** आता हे जे आहे ना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण केव्हा ३० तारीख आहे ना लास्ट केव्हा करणार याचा खुलासा करावा प्रशासनाने , २०० कोटी रूपये आपले वाया जातील.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-**मा.आयुक्त महोदया, सन्मा.व्यासपिठ व सर्व सन्मा. सदस्य , या डिपीआरबाबत नितीनभाऊंनी आणि सन्मा.सदस्य. त्रिपाठी भाऊंनी अमृत योजनेचा डिपीआरचा विषय हा विस्तृतपणे मांडलेला आहे आणि त्याला पाहाता या योजनेची अंमलबजावणी करण्याचे पाहाता. हा जो डिपीआर आहे त्यासाठी वेळोवेळी त्या संदर्भात आता वेळ निश्चित केलेली आहे. त्याबाबत महापौरांशी , उपमहापौरांशीही चर्चा केलेली आहे की हा आता केंद्र शासनाचा, राज्य शासनाचा अत्यंत महत्वाचा प्रकल्प आहे. येणाऱ्या भविष्यामध्ये अशी संधी आपल्याला मिळणार नाहीये. ज्या गाईडलाईन्स ज्या आहेत त्यामध्ये व्यवस्थित सांगीतलेले आहे. शासनाने अमृत प्रकल्प हा ऑक्टोंबर २०२१ सुरूवात केली आणि त्याचा जो पहिला डिपीआर केला तो जानेवारी २०२२ मध्ये त्यापुर्वी मी येथे येण्यापुर्वी मी विरार महापालिकेत होतो त्यावेळेपासुन मी या विषयाशी निगडीत आहे. जानेवारी नंतर मार्चमध्ये या विषयाचे डिपीआर झालेले आहेत. त्यामध्ये काही ठारावीक अभिप्राय होते त्यामध्येही राष्ट्रीय स्तरावर कार्यशाळा आयोजित केलेली आहे. तर त्यामध्ये जानेवारीत ज्या गाईडलाईन्स प्रसिध्द झालेल्या आहेत आणि तेव्हापासुनच याची कार्यवाही चालु करणं अपेक्षित होते म्हणजे तेव्हापासुनच आपल्याला अंमलबजावणी करणे भविष्यामध्ये जी ही अमृत निधी भेटणार आहे आणि कुठल्याही क्षणी आणि कोणतीही वेळ न जावु देता तेव्हापासुन सांगण्यात आलेले होते. तर त्यावेळेपासुन मी त्या अनुषंगाने विरार महापालिकेत असतांना तेथील परिस्थिती काय आहे सांगतो की कुठल्याही महापालिकेमध्ये निधी बद्दल बातमी आली की शासनाकडुन ज्या योजना येतात आणि निधी मागावा लागतो आणि कस आहे. राज्य शासनकडे किंवा केंद्र शासनकडे त्यांनी योजना लवकर घ्यावी आणि ती पुर्ण करून आणि हे जे अंदाजपत्रक आहे हे जर वेळेत केलं तर हे होवु शकतं त्यांना कस आहे की वेळेत निविदा प्रक्रिया पुर्ण करुन दिले तर त्यांना फस्ट कम फस्ट सर्व बेसीसवर निधी उपलब्ध करुन देणे, मंजुरी देणे, त्या अनुषंगाने मी सांगतो, आपल्याकडे सुध्दा आपल्या महापालिकेमध्ये साधारण मला वाटत की २१/२२ मध्ये ३ वर्षासाठी त्यांनी जे कंन्सेप्ट दिलेले आहे ते रस्ते, पाणी पुरवठा, ड्रेनेज आणि मलनिस्सारण या कुठल्याही योजना ज्या आल्यात किंवा काही महापालिकेच्या निधीमधुन काही काम करायचे असेल तर अशा पध्दतीचे काही चांगले कांन्सेंप्ट ज्या आल्यात. तर त्या आपल्या महापालिकेमध्येही काही चांगल्या कॉन्सेंप्टस आहेत तर हे आपण करणार आहे ते होतं तर ते सुध्दा राज्य स्तरावर होत असतं तर मी जे केलं होत तर मी जे केल आहे कॉन्सेप्ट तिथे असतांना आम्ही जे कामं होत तर आम्ही लगेच शासनाला पत्र देवुन टाकले.

**श्री.अनंत जोशी :-** पण साहेब इतर खुप बाबतीत पण हे आहे.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** दोन मिनिंट भाऊ फक्त , तर त्या ठिकाणी असलेल्या कंन्सलटंटला आम्ही सांगीतले होते की तुम्ही दोन महिन्यात हे काम करा. तर त्यांनी त्या अनुषंगाने ५५० कोटी रूपयांचा हा जो प्रोजेक्ट होता. तर त्यावेळेला लिमीट पिरीयेड मध्ये डिपीआर तयार केला आणि शासनाकडे पाठवुन दिला. तर मी येथे ज्यावेळेला १५ जुनला आलो होतो. त्या वेळेला मी रूजू झाल्याच्या आधी सुरू झालेली होती. त्या वेळी मी डांगे साहेबांची यांची भेट घेतली त्यांनी सांगीतले की एक महिन्याच्या आंत तुम्हाला डिपीआर द्यायचा आहे. त्यावेळी जेव्हा मी १५ जुन ला जॉईन झालो तेव्हा मला कळाले की अमृतचे काम दोन टप्प्यात म्हणजे दोन डिपीआर तयार करायचे भविष्याच्या हिशोबाने आणि जेव्हा मी बघितले की काय परिस्थिती आहे. त्यावेळेला योगेश बोरोले असेल आपले प्रकल्प अभियंता व इतर इंजिनियर आहेत यांना भेटलो आणि विचारले की आता काय परिस्थिती आहे काय आहे. तर त्यांनी सांगीतले की अमृतचे आपले कंन्सलटंट आहेत. तर त्याच्यामध्ये जे आपले स्टेट गव्हर्नमेंट आणि नॅशनल लेव्हलचे आहे. त्याच्यामुळे हा डिपीआर बद्दल जाधव साहेबांनी आपल्याला सेप्रेटली सांगतीलेले होते की एक महिन्यात द्या व ते आपण मंजुर करून टाकु यात आणि अमृतचे काम हे पाणी पुरवठा व ड्रेनेजच्या कामामध्ये ॲक्शन मध्ये आहोत आणि त्यांचे काम पुर्ण महाराष्ट्रामध्ये चालु आहेत. त्यानंतर आपण डिपीआरबाबत त्यांना पत्र दिलेले आहे आणि ते पत्र जे दिलेले आहे आपण त्यांना ८ जुलै ला दिलेले आहे. त्याच्यानंतर पुन्हा १५/०७/२०२२ ला त्यांचा रिप्लाय आला की जुलैच्या अखेरपर्यंत सादर करा. त्याच्यानंतर डिपीआरसाठी त्यांनी प्राथमिक सर्व्हे केला आणि त्याच्यानंतर ती माहिती जमा केली आणि डीपीआर तयार करण्याची त्यांनी सुरुवात केली आणि नंतर दि.०८/०८/२०२२ ला जी महासभा झाली. त्या महासभेमध्ये या प्रस्तावाचे अमृत-२ च्या कार्याला मंजुरी देण्यात यावी अस मी त्यांना आधीच सांगीतलेलं होतं म्हणुन तुम्ही अस

करा आणि मग त्यावेळेस तसा ठराव झालेला आहे आणि ठरावामध्ये पण तसं मान्य झालेलं आहे. मा.महासभेच्या ठरावामध्ये ही नविन निविदा काढुन त्या नविन कंन्सल्टंट नेमावा. त्यावेळी असा प्रश्न पडला की आता कंन्सल्टंटच काय करायच. तरीपण मा.महासभेच्या आदेशाची अंमलबजावणी साठी आम्ही सुरूवात केली आणि ही सुरूवात करत असतांना आता काय झालं की आता गेल्या आपल्या मागच्या १६ तारखेला , १६ सप्टेंबरला शासनाचा जिआर आलेला आहे. मी सन्मा.नगरसेवकांना पण टाकलेला आहे तो जिआर आणि त्या जिआर मध्ये असे म्हंटलेले आहे की सर्व स्वराज्य नागरी संस्थानी १५/१२/२०२२ पर्यंत सर्व प्रकल्पांचे सविस्तर प्रकरणे तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे सादर करावे. तर महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाणे प्रकल्प संचिका ३१/१२/२०२२ पर्यंत इकडेस सादर करावे. आता ३१ मार्च पर्यंत काही हरकत नाही. आता म्हणजे १५/१२/२०२२ पर्यंत सादर करायचे आहे. आता असे झाले आहे की नविन टेंडर प्रक्रीया चालु करायची तर नविन वर्कऑर्डर द्यायची आणि पहिली जी दिली आहे त्याचे काय करायचे. ती दिलेलीच आहे नविन देणार ठिक आहे. नविन करायचे म्हणजे याच्याकरीता कमीत कमी दोन ते तिन महिने कालावधी जाईल. असा जवळपास सात महिने कालावधी लागेल. कारण हे काही सात दिवसांत , चार दिवसांत काही होत नाही कारण काय आहे की राज्य स्तरावर म्हणा किंवा इतर स्तरावर कालावधी जातो आणि याच्यामध्ये जे डॉक्युमेंट नमुद केलेले आहेत. ते डॉक्युमेंट घेतले पाहीजे आणि MJP ने जे डॉक्युमेंट रिक्वायर केलेले आहेत. तेच घेतले गेले पाहीजे आणि त्यांचाच सही शिक्का असला पाहीजे आणि त्याच पोजिशनचा माणुस तिथे असला पाहीजे. म्हणुन एवढे का सांगतो आहे की लवकर काय निर्णय आहे तो घ्यायचा आहे आणि यात तिन पर्याय दिलेले आहेत. १. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचा सल्ला घेवुन लवकर हे करावे. २ नंबर आहे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाचे १६ सल्लागार म्हणजे त्यांनी १६ सल्लागारांचे हे एक तयार केलेले आहे. त्या १६ सदस्यांकडुन कोणत्याही एका सदस्याकडुन त्याची मान्यता मिळवुन घ्यावी. आणि तिसरे असे की नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाकडुन विहीत केलेल्या मॉडेमच्या नुसार  निविदा प्रक्रीया करून मान्यता घेण्यास मुभा आहे. आता प्रश्न आपला असा आहे की, आता जे १६ पॅनलवर जे आहेत त्याचा प्रश्न आहे म्हणजे आपण ते घेवु शकतो आपण हे विहीत वेळेत करायच आहे काहीही करून आपण जर म्हणजे मला असं वाटत की याच्यात एक पर्याय योग्य वाटतो की या प्रकल्पाचा कंन्सल्टंट कसा असेल की या संपुर्ण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याची पुर्ण जबाबदारी ही महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाला द्यावी. कारण MJP जे आहे ते पुर्वी महाराष्ट्र शासनच होते परंतू आता  ते महाराष्ट्र शासनाच्या अंगिकृत आहे. शासनाचे जेवढेही हे आहेत ते शासनाने महाराष्ट्रातील ७० ते ८० टक्के महापालिका , नगरपालिकांचे काम दिलेले आहेत. आजही महाराष्ट्रात ६० ते ७० नगरपालिका , महानगरपालिकांचे काम कंन्सल्टंट म्हणुन MJP च काम पाहते आणि आता हे सगळं करून पिरियेड देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे त्याच्यामुळे आपले नंबर १ ऑप्शन जो आहे. आणि आता त्यांच्या कंन्सल्टिंगवर जर कोणाचे ऑब्जेक्शन असेल की ते बरोबर आहे किंवा नाही तर MJP  हे पाहते की, MJP ने जर CEA कडुन केले, तरी आपल्याला ही जागा सुध्दा अश्या पध्दतीच्या डिपीआरला सॅंक्शन देण्याचं सुध्दा युनिट आहे तर CEA म्हणुन त्या इंजिनियरला फक्त डिपीआर तपासणे आणि त्याला मान्यता देणे एवढच काम दिलेले असते आणि त्यांचे काम एवढेच आहे की डिपीआर बरोबर आहे की नाही डिपीआर मंजुर होईल की नाही. तर दोनच ऑप्शन आपल्याकडे आहेत आणि कारण जे स्थानिक पातळीवर जे आहे की हे काम MJP ने काम जर व्यवस्थित केले नाही तर त्यांचे जे का असेल राज्य स्तरावर जे प्रधान सचिव जे RS आहेत. तर त्यांच्या नंतर त्या स्तरावर खुप अडचण येणार आहे. जस आता माझ्या बाबतीमधे झाल आहे किंवा तस आता या अमृतकरीताचा पाणीपुरवठा चालु आहे का किंवा चालु होईल का ? ते कनेक्शन दिल्यामुळे रस्ते होत नव्हते. मा.पालकमंत्र्यांकडे गेलो.

**मा.उपमहापौर :-** साहेब मी काय म्हणतोय की आता तुम्ही हे जे सांगताहेत हे आणि सन्मा.सदस्य जे सभागृहात मांडताहेत त्यांच जे म्हणणं आहे. ३० तारखेपर्यंत आपल्याला जी काही आलेली मुदत आहे. जस तुम्ही सांगीतले.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझ तेच म्हणणं आहे की,

**मा.उपमहापौर :-** १ मिनिंट विशालभाऊ , याच्याकरीता आपल्याला निविदा प्रक्रीया राबवायची आहे किंवा आपल्या ज्या एजन्सीने काम केले असेल किंवा आपल्याला आपण ज्यांच्याकडुन काम केलेलं असेल त्याच्याकडुन काम करून घ्यायचे आहे याच्यावर आपण चर्चा न करता विस्तृत चर्चा न करता याच्यावर आपल्याला आता करायच काय आहे.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता:-**  आता आपल्याला ही निविदा प्रक्रीया करून

**मा.उपमहापौर :-** नाही नाही साहेब याच्यामध्ये ज्या MJP कडुन ज्या चुका झाल्या त्या न होता आपल्याला हे काम करायचं आहे. त्या करीता काय करायला पाहीजे. ज्या चुका झालेल्या आहेत त्या मागच्या काळात झालेल्या चुका सुधारून आपण नविन जो डी.पी.आर. करायचे आहे त्याच्या संदर्भात तुम्ही काय केले ते सांगा.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता:-** त्याच अनुषंगाने माझी विनंती हीच राहील, आता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण हे जळगांव येथे बी ॲण्ड सी कडुन ते काम करीत आहे आणि त्याच्या करीता भरपुर शहरांमध्ये कार्यक्षेत्रामध्ये काम सुध्दा केलेले आहे आणि त्यांच्याकडे यंत्रणा पण फार मोठी आहे आणि यांना आपण जे दिलेले आहेत आणि हे वेळेत करून देण्याची जबाबदारी त्यांची आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** साहेब मला एक प्रश्नाच उत्तर द्या.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता:-** मी काय म्हणतो साहेब

**श्री.विशाल त्रिपाठी :-** काही जास्त लांबवायचा विषय नाहीये आजचा की निसर्ग कन्सलटंन्सीला पत्र द्यायच्यापुर्वी महासभे पुढे आपण मंजुरी घेतली होती का किंवा MJP ला आपण द्यायचं म्हणताय तर त्यावेळेस आपण MJP ला पत्र दिले का आपल्याकडुन किंवा १६ एजन्सी पैकी कोणत्या आहेत. की याच्यापैकी कोणत्या आहेत किंवा आपण शोध लावु शकतो का किंवा आपण MJP कारण काय आहे की हा जो प्रश्न आलेला आहे ना हा असा गोलमाल विषय येतोय मग निसर्गला द्यायचं आहे आणि तुम्ही परस्पर देवुन टाकले आणि तुम्ही सभागृहापुढे विषय का आणला जर आणला आणि आता तुम्ही म्हणता आहे की आता वेळ नाहीये MJP कडुन करायचे आणि काही नाहीये आम्ही कुठुन करायच. मग तो का म्हणजे त्याच्यासाठी आपण शहराचे तिनशे सव्वातिनशे कोटी बुडवायचे का ?

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** मी काय म्हणतोय

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आम्ही येथे एक एक रूपयाचा हिशोब घेतो . भांडतो आम्ही ५ लाखांच्या मनपा निधीसाठी आणि मी सांगतो तुम्हाला भवानी मंदिराचे पुजारी आहेत. आज ते गटारीमध्ये सकाळी पडले. सांगुच शकत नाही आम्ही काय सांगणार आहे मी ते म्हणाले तुला समजत नाही का ? काय उत्तर देणार आहे मी , आज सकाळची घटना आहे मी महासभेत येण्यापुर्वीची ५ फुट गटारीत पडले ते ५ फुट गटार आहे ती मी लगेच अमृतकर साहेबांना फोन लावला मी चार महिन्यांपुर्वी मी त्यांना हा विषय सांगीतलेला होता. म्हणजे मला फार दुख: होत या गोष्टींच या सभागृहामध्ये.

**मा.उपमहापौर :-** मी काय म्हणतो की आपण याच्यावर सर्वांशी चर्चा करून मग नंतर तो निर्णय घेतला पाहीजे होता आणि आता ती वेळ निघुन गेलेली आहे आणि आता या सगळ्या गोष्टींवर चर्चा करून काही उपयोग नाहीये. आता आपण चर्चा करून वेळ वाया घालवण्यापेक्षा आता आपल्याला याच्याबाबतीत डिपीआर तयार करण्यासंदर्भात निर्णय घ्यायचा आहे. याच्यावर आपण काय नियोजन केलं पाहीजे याच्यावर चर्चा झाली पाहीजे असं मला वाटत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे की निर्णय जो आहे तो सभागृहाने घेतलेलाच आहे ऑलरेडी , सभागृहाने हा निर्णय घेतलेलाच आहे म्हणजे पुन्हा निर्णय घेण्याची आवश्यकता नाही.

**मा.महापौर :-** आता आपण निविदा प्रक्रीया राबविली तर

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौरताई, आता मागच्या महिन्यात आपली महासभा झाली होती त्याच्यानंतर आज या सभेसमोर चर्चा चालु आहे. आता हा विषय आला आणि परवा , तेरवा काही ईर्मजन्सी काही काम करावं लागलं तर मग , याच्यात या जिआर मध्ये लिहीलेलं आहे की डिपीआर जी मान्यता ३१ तारखेपुर्वी घ्यायची ती आणि या जिआरचा फॉलोअप घेतील की नाही घेतील ते ठरवा आपण जर या विषयाचा विरोध नाही केला आणि मग आपण ही जर निविदा प्रक्रीया केल्यानंतर काही आक्षेप निघाला आणि कालांतराने शासनाने काही

**श्री.नितीन लढ्ढा :-** वकील साहेब हा शासनाकडे असाही पोहोचणार नाही आणि पोहोचला तरी त्याचा उपयोग नाहीये.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा डिपीआर या योजनेमध्ये दिलेल्या गाईडलाईन्सला धरून नाहीये. या कन्सलटंटला जो कार्यादेश दिलेला आहे. त्यांचा सुध्दा हा शब्द आहे की अमृतच्या गाईडलाईन्स फॉलो करून त्यांनी डिपीआर तयार केला होता. जी जिपीआरएस मॅपिंग आणि आता मला सांगा की याला कार्यादेश ७ व्या महिन्यात हा कार्यादेश दिलेला आहे. आज आता हा १० वा महिना चालु आहे. १० वा महिना म्हणजे ३ महिने झाले पुर्ण , ३ महिन्यांमध्ये सुध्दा अजुनपर्यंत अमृत योजनेची एकही गाईडलाईन याच्यामध्ये फॉलो झालेली नाहीये. मग मला

सांगा की ज्या डिपीआरला हात नाही पाय नाही , डोक नाही तशा पध्दतीचा पाठवुन दिल्यानंतर कुठले राज्य शासन मान्य करणार आहे. गाईडलाईन बनवल्या कशा साठी जातात. गाईडलाईन बनविण्याचा उद्देश काय असतो की या कामाचा सुसुत्रीत पणा या पध्दतीने व्हावा आणि या मध्ये त्रुटी आहे ज्या मागच्या या याच्यामध्ये कव्हर होण्याच्या दृष्टीकोनातुन गाईडलाईन ज्या आहे त्या निश्चित केल्या जातात आणि त्या गाईडलाईन जर फॉलो होत नसतील तर त्या डिपीआर ला कसलाच अर्थ राहणार नाही. याचे दुरगामी परिणाम जे आहे हे शहरवासियांनाच भोगावे लागतात.

**मा.उपमहापौर :-** भाऊ पण शासनाकडे पण वेळ लागतो डिपीआर साठी

**श्री.नितीन लढ्ढा :-** वेळ लागतो ना त्या बद्दल वाद नाही.

**मा.उपमहापौर :-** या वेळेच लिमीटेशन नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण जर चुकीचा पाठवणार तर तो ३० तारखेपर्यंत म्हणतोय आपण पण तो ३० तारखेला मान्य होईल का ? हे आपण समजतो आहे का तो मान्य होणार नाही. ते त्याच दिवसामध्ये पाठवुन देतील की या अमृतच्या गाईडलाईन फॉलो करत नाहीयेत. या तुम्ही दुरूस्त करून पाठवा. उगाचच काहीतरी एक हट्ट धरायचा. कारण त्या एका चुकीच्या डिपीआरच्या मुळे १८ कोटी रूपये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे आजपर्यंत आपण खर्च करू शकलेलो नाहीये आणि पुन्हा त्याचीच पुनरावृत्ती आपण करायची का ?

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** भाऊ काय आहे याच्यामध्ये की आपण जर निविदा काढली तर हा पहिला कंन्सलटंट जो आहे कोर्टात जाईल. तर म्हणुन हा आणि जेव्हा आपण निविदा प्रक्रीया केली होती राज्य स्तरावर जेव्हा काढली आपण होती. तेव्हा त्याला थोडा कालावधी लागेल आणि त्याला ज्या लिगली कंडीशन्स वगैरे आहेत. त्या सुध्दा फॉलो कराव्या लागतील आणि कंन्सलटंट अपॉईंट करणे म्हणजे काय आहे याच्यामध्ये पुर्ण प्रक्रीया पुन्हा करावी लागेल. नविन केल्यानंतर जेव्हा ते ओपन होतात एखादेवेळी टेक्निकल फॉल्ट निर्माण होतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** भाऊ दोन मिनिंट

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी एकच प्रश्न उपस्थित करतो.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** हो बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याने जो डिपीआर आपला दाखल केलेला आहे. तयार करून दिलेला आहे असं काही म्हणता येणार नाही आज तो कंन्सलटंट अमृतच्या गाईडलाईन फॉलो करतोय का?

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** नाही भाऊ काय आहे आपला जो डिपीआर आहे ऐका ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही साहेब

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** नाही भाऊ मी

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही साहेब माझ्या फक्त एकच प्रश्नाचं उत्तर द्या आपण की आपण दिलेला कार्यादेश आणि आपण दिलेल्या कार्यादेशामध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आहे की अमृतच्या ज्या काही गाईडलाईन आहेत. त्याच्या अनुषंगाने आम्हाला डिपीआर अपेक्षित आहे. तर त्याने त्या पध्दतीचा डिपीआर सादर केलेला असेल. तर आम्हाला तो स्विकारायलाही अडचण नाही. परंतू जर त्या पध्दतीने दिलेला नसेल तर मी सभागृहात म्हणतो की मक्तेदाराला दोन लाईनचं पत्र काढावं की ३१ ऑक्टोंबर ही आमची डेडलाईन आहे आणि अमृतच्या ज्या गाईडलाईन आहेत त्याप्रमाणे आपल्याला दिलेल्या कार्यादेशाच्या अनुषंगाने आपण आपला डिपीआर तात्काळ सादर करण्यात यावा अन्यथा आपल्याशी करण्यात आलेला करार हा रद्द पात्र असेल असे समजण्यात यावे हे सोल्युशन आहे. काय आहे उद्या जावुन तो कोर्टातही गेला तरी त्याला स्टँड मिळु शकणार नाही आणि आपला जो अपेक्षित डिपीआर आहे तो डिपीआर तो द्यायला तयार असेल तर आपल्याला स्विकारण्यामध्येही कुठेही अडचण नाहीये.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** आपण त्याला कार्यादेश दिल्यानंतर त्याने जुलै महिन्यामध्ये त्याने आपल्याला दिला आणि ऑगस्ट महिन्यामध्ये जो ठराव झाला होता. कारण की आपल्याकडे माणसांची पुर्तता नाहीये . तसेच आपला परिपुर्ण डिपीआर तयार नाहीये पण आपल्याला एक मार्ग आहे आणि तो डिपीआर तयार करणार नाही आणि आपण पेमेंट करणार नाही तर आपण जे पेमेंट त्याला दिलं तर त्याने लगेच प्रुफ आहे डाटा आहे आणि ती गाईडलाईन्स MJP ने तयार केलेली आहेत. तर आपल्याला करता येणार नाही. लवकर जर शासनाचा निधी घ्यायचा असेल तर माझी विनंती एकच राहील की आपण हे काम MJP ला द्यावं.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर मी काय म्हणतो की,

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ मी काय म्हणतो MJP ही शासनाचीच एजन्सी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बरोबर आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तर हे त्यांच्या माध्यमातुन केले तर काय अडचण आहे आपल्याला

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ आपली राज्य शासनाची MJP जरी एजन्सी असली ती इनकम्पीटेट एजन्सी आहे फक्त तो विभाग सुरू राहावा या अनुषंगाने शासन पोसतय त्याला MJP च एक छोटसं उदाहरण आत्ताच्या याच्यातील सांगतो. आपल्या येथे फिल्टरेशन प्लँटला लागणारी वाळु त्याला सँड म्हणतो आपण ४० लाख रूपयाचा अँटम आहे. आपण अमृतच्या याच्यामध्ये MJP च्या अधिकाऱ्यांनी ठरवुन दिलेल्या स्टँडर्ड स्पेशिफीकेशन प्रमाणे सप्लाय केलेली आहे. MJP ने जे स्टँडर्ड स्पेशिफीकेशन ठरवुन दिलेले होते. त्या अनुषंगाने त्या फिल्टर प्लँटला लागणारी सँड लागते की कार्यादेश दिला. अमृतच्या उद्योग समुहाने ती ४० लाख रूपयाची सँड सप्लाय केलेली आहे आणि आज ती सँड आपल्या कुठल्याही कामात ये नाही आणि मनपाचा कुठलाही अधिकारी फिरूनही पाहात नाही. मक्तेदाराला त्याच्या बिलाची अदायगी होत नाही आणि MJP चे म्हणतात की आता आम्ही काय करणार मग आता त्या स्टॅन ची जबाबदारी कुणी स्विकारावी ही अशी MJP आहे. आज अमृत-१ मध्ये आपल्याला ज्या काही अडचणी येताहेत. त्या MJP मुळेच येताहेत.

**ॲड . शुचिता हाडा :-** नितीनभाऊ अमृतची जी योजना आहे त्याबद्दल आज जो निर्णय घेता आहात मात्र मशिनरी किंवा कर्मचारी वर्ग माठ्याप्रमाणात सेवानिवृत्त होत असुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**ॲड . शुचिता हाडा :-** इतर याची संख्या सातत्याने वाढत असल्याने सदर काम करतांना कर्मचारी व अधिकारी वर्गावर ताण पडत आहे. म्हणुनच त्यांनी १६ यांची लिस्ट दिलेली आहे. त्या लिस्टमध्ये सुध्दा वर्गवारी दिलेली आहे. त्या मध्ये ऑपलाकेश दिलेले आहेत की किती रकमेचे कामं हे कोणत्या एजन्सीला करता येवु शकतात. त्याचा एक चार्ट दिलेला आहे. मग त्यानुसार करा. आपल्या बदलानुसार करा आपण जळगांव शहरामध्येच आहेत ना , मग त्यानुसार काय काय कंन्सलंटंट दिसता आहेत. तर त्या त्या कंन्सलंटंट द्या आणि या विषयासाठी विशेष महासभा काढा आणि ३ दिवसांनी विशेष महासभा काढा त्यात जितके विषय आपण येथे घेवु शकतात. MJP स्वत: म्हणते आहे की आमच्यावर ताण पडतो आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** ताई आता जे काम चालु आहेत हे MJP च्या याच्यातुनच चालु आहेत ना अमृतचे, याचं मला उत्तर द्या की आतापर्यंत आपण जे काम आहेत ते MJP चे आहेत चुकीचे आहेत ना ते

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पोकळे साहेब जे करायचे आहे ते करा. जळगांव शहराला पाहीजे असलेले ५०० कोटी रूपये ३० तारखेपर्यंत सम्बीट करा.

**श्री.दिलीप पोकळे :-** मी काय म्हणतोय

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जे करायचे आहे ते करा. आम्ही काही म्हणणार नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ आम्ही सक्षम नाहीये. आता आम्ही

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जे करायचे आहे ते करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** काहीही करा परंतू ३० तारखेपर्यंत डिपीआर सादर करा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा निधी जो आहे तो वापस जावु देवु नका.

**श्री.दिलीप पोकळे :-** आपण म्हणतोय ना की दोन दोन लागतील.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तेच म्हणतोय की निर्णय घ्या.

**श्री.दिलीप पोकळे :-** अमृतच्या याच्यामध्ये निर्णय घ्यावा अशी मला या सभागृहाला विनंती आहे.

**मा.आयुक्त :-** नितिनभाऊंनी जो विषय मांडला, त्यांनी अत्यंत डिटेल सांगितले की अमृत २ च्या अनुषंगाने काय करायचं , गिरगांवकर साहेबही त्यांच्या जागी बरोबर आहेत. त्यांनी जे सांगीतले की वसई -विरार चा डिपीआर कसा केला कशी सुरूवात केली काय काय केले आणि हा का करणे गरजेचं आहे हे त्यांनी सांगीतले. विशालभाऊंची तक्रार आहे की हा डिपीआर ऑक्टोंबर पर्यंत सबमीट करायचा आहे. तर मी आता सगळे आपआपल्या जागी बरोबर आहेत. आता फक्त आपल्याला नियमांचा मेळ घालायचा आहे. या अनुषंगाने आपण जो डिपीआर केलेला आहे तो अमृत-२.० च्या अनुषंगाने तो परिपुर्ण नाही हे आपण नक्की मान्य करू, कारण की आपण त्याला जुलै मध्ये वर्कऑर्डर दिली आणि त्यावेळी आपलं पॅनल अस्तित्वात होतं जुलैपर्यंत आणि जुलै मध्ये जो अमृत १ चा वेळ कमी होता त्या अनुषंगाने आपण वर्कऑर्डर दिलेली होती. त्या अनुषंगाने त्यामुळे

त्यांनी शॉर्ट पिरियेडमध्ये तो डिपीआर तयार करून दिला होता. डिपीआर तयार करून दिल्याच्या नंतर तो परिपुर्ण असावा असं माझं मत होत. मग मी तो विविध यंत्रणांना तो तपासायला दिला आणि पण तो ई फॉर्मली कागदावर न घेता आणि मग तो डिपीआर बरोबर आहे की नाही हे आपल्याला तपासुन घेणं आवश्यक होतं म्हणुन मग मी तो वेगवेगळ्या यंत्रणेला तो तपासायला दिला. मग माझी महापौर मॅडम , हाडाताई , नितीनभाऊ यांच्याशी चर्चा झ ाली की याच्यात काही अडचणी आहेत की काय किंवा याचं काय करायचं याबाबत की आपल्याला काही यात ईम्प्रुव्ह करून घेता येईल. मी मागेच आता ऑगस्ट मध्येच झालं आपलं की टेंडर करायचं आणि ऑगस्ट मध्ये तो जिआर आला की ऑक्टोंबर पर्यंत डिपीआर सबमीट करा आणि ती गोष्ट अशी आहे की १६ एजन्सी मध्ये करायचा पण तो आपल्या नाशिक डिव्हिजन मध्ये ॲरोगेट नसेल. पण तो आपण आहे त्या माणसाला वर्कऑर्डर दिलेली आहे तो लिगल एजन्सी मध्ये आहे. आता आपला अमृत २.० च्या गाईडलाईन्स चा डिपीआर तयार झ ालेला आहे आपला तर जेव्हा मी मे ला चार्ज घेतला तेव्हा एक सेंट्रल गर्व्हमेंटची व्हि.सी झाली तेव्हा मी पण एकदम नविन होती आणि तेव्हा गिरगांवकर साहेबपण नव्हते आणि तेव्हा असे झाले की अडचण अशी होती की नेमाडे साहेब , सोनवणी साहेब नाही तर योगेश बोरोले तर मी योगेश बोरोलेंना सांगीतले की जो की आपला अमृत योजनेचा मॅप मध्ये आहे तो आपण पोर्टलवर बघुया म्हणजे आपण ऑनलाईन आहे आणि सेंट्रल गर्व्हमेंटने पोर्टल दिलं तर त्या पोर्टलवर आपण मॅप जस्टीफाय केला की आपण १ मध्ये जे जे कमी मिळालं ते आपण पोर्टलवर टाकलं आणि त्यानंतर आपल्याला सँक्शन मिळालं जवळपास ऑगस्टमध्ये, त्यानंतर आपल्या तीन व्हि.सी झाल्या नगरविकासच्या आणि त्यांनी आपल्याला सांगीतले की आपण तिन प्रोजेक्ट टाकले होते. अंबरझरा टाकले होते वॉटर प्युरीफिकेशन मध्ये, मेहरुण टाकले होतेवॉटर प्युरीफिकेशन मध्ये, अमृत वॉटर सप्लाय आणि अमृत ड्रेनेज , यापैकी त्यांनी वॉटर सप्लाय मंजुर केला आपला, आणि अंबरझराचा रिजर्वेशन मंजुर केला आपला, या दोन्हींचे आपल्याला डिपीआर पाठवायचे आहेत. मग ओव्हरऑल जेव्हा सुरिया शेट्टी मॅडमांनी जेव्हा चार्ज घेतलेला होता त्यांनी जेव्हा आढावा घेतला असेल तेव्हा त्यांच्या असं लक्षात आलं की याच्यामध्ये कंन्सलटंट चा ईश्यु येतोय आणि तुम्ही डिपीआर सादर केला आहे. कारण वरून डेडलाईन आहे. मा.पंतप्रधान महोदयांचा आणि आता BJP गर्व्हमेंट शासनामध्ये आल्यामुळे त्यांचा हा जो महत्वाकांक्षी प्रोजेक्ट आहे अमृत योजनेचा त्यामुळे त्यांनी आपल्याला सांगीतले आहे की पटकन डिपीआर सादर करावा आणि एकवाक्यता नव्हती की कंन्सल्टंट कोण असावा म्हणुन हा १६ सप्टेंबरचा जि.आर आलेला आहे. तर या सर्व फॅक्टस आहेत. आता डिपीआर आपण TS ला द्यायला पाहीजे का ? तर जेव्हा मी हा डिपीआर MJP ला तपासण्यासाठी दिला तेव्हा त्यांनी सांगीतले की आम्ही कागदावर देत नाही पण तुम्ही तपासुन आम्हाला सांगा तर त्यांनी मला मॅसेज करून सांगीतलेले आहे त्याच्यात छोट्या लाईन मी वाचुन दाखवते. अमृत योजनेचा प्रत्येक मिळकतीचा GIS सर्वे करून त्यांना पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने गाईडलाईन नुसार डिटेल डिपीआर करणे आवश्यक आहे. दुसरं प्रत्येक घरांना मिटर लावणे आवश्यक आहे. १२० कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे. हा खर्च मनपाला खर्च करणे अपेक्षित राहील आणि हा डिपीआर मध्ये सुध्दा आपल्याला बदल करणे असे नमुद केले आहे. काल मी गिरगांवकर साहेबांशी पण चर्चा केली आणि काल आमची डिपीडिसी काल बैठक झाली त्यावेळी ते असं म्हणाले की तुम्ही MJP ला द्या किंवा टेंडर काढा. त्यांच त्यांच्या ठिकाणी बरोबर आहे. कारण पटकन डिपीआर तयार होवुन जावा आणि सेंक्शन व्हावा. कारण काय आहे की पुन्हा चुकीचा डिपीआर सेंक्शन होवु नये आणि नितीनभाऊ त्यांच्या ठिकाणी बरोबर आहेत की डिपीआर जो आहे तो चुकीचा डिपीआर सेंक्शन होवु नये. ज्या काही बाबी आपल्याला सेंक्शन करून मिळाल्या नव्हत्या. त्या आपल्याला अमृत १.० जसं आता वकील साहेब बोलले की MJP चुकीचं काम करता का ? नक्कीचं त्यांच्याकडे मॅनपावर नसल्यामुळे आपल्याला जेव्हा डिझीजन लागतो. डिजाईन तयार करायची असते चेंन्ज करायची असते सेम आपल्याला नविन तयार करायची असते तेव्हा त्यांना जशी लागते तेव्हा आपल्या इंजिनियरला त्याच्यातला अनुभव नसल्यामुळे आपण कसं काय करू. ते आहे आणि मग मी MJP ला बोलले की जर आपण असं केल की हा डिपीआर होता त्यात जो काही गॅप होता तर तो पुनश्च येईल. पार्ट-२ ला तर हे वेगळं होईल. जेणेकरून हा पण आपला लॉग बजेट होईल आणि मग पुन्हा आपल्याला पैसे मिळतील म्हणजे आज अर्धवट डिपीआर जर जात असेल तर आपला जो काही बॅकलॉग असेल तर ते व्हेरीफाय करून ते सांगत आहेत. तर ते जर म्हणतात की असं होवु शकतय तर आपण पुनश्च एक विशेष सभा लावु आणि त्या डिपीआरमध्ये जे काही आपल्याला आवश्यक चेंजेस करायचे आहेत. ते आपण त्यांच्याकडुन करून घेवु आणि डिपीआर करून घेवु जर आपल्याला दोन याच्यात करता येत असेल तर आणि ते म्हंटले की मॅडम आपल्याला फायनल डिपीआर करावा. तर आपल्याला हे ठरवावं लागेल की १६ पैकी

कोणाला ऑर्डर द्यायची का आणि ती ऑर्डर देवुन जे बेस्ट सर्वे करून आपल्याला डिपीआर तयार करावा आणि अमृतची क्लोजिंग नाहीये. आता हे जे झालं हे पहिल्या सहा महिन्याच बजेट आहे. ते पुढे पुन्हा सहा महिन्यांनी मागणी केली जाईल. मग आपल्याला हे नक्कीच आहे की डिपीआर आता दिला तर सँक्शन होईल पण जर उशिर झाला तरी अमृत पुढे पुन्हा कंन्टिन्यु राहणार आहे. तर आपली हे होईल तरी मी आता प्रयत्न करतेय की आपल्या या डिपीआर ला सँक्शन होण्याची शक्यता आहे का हे तपासुन घेवु आणि जर त्यात काही बदल करायचे असतील तर आपण विशेष सभा घेवुन आणि मान्यता घेवु आणि जर समजा नाहीच होत असेल तर आपण १६ पैकी कोणाला तरी देवु आणि नविन ईस्टिमेट डिटेल्स तयार करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खऱ्या अर्थाने या ठरावाच्या अंमलबजावणीतुन डिपीआर ची निविदा प्रक्रीया ही राबवलीच गेली पाहीजे आणि त्यावेळेला याला डिस्कटीन्यु करण्याच्या संदर्भातील भुमिका घेतली गेली पाहीजे होती किंवा आज जरी म्हंटल की निसर्ग ला देतोय आजही आपल्या या अमृतच्या गाईडलाईन फॉलो करून मुदतीच्या आंत जरी डिपीआर देत असेल तरी कुठलीच अडचण नाहीये. परंतू कुठल्याच गाईडलाईन चा फॉलोअप होतांना दिसत नाहीये. मग अशा पध्दतीचा चुकाचा डिपीआर सबमीट केल्यानंतरही तो डिपीआर राज्य शासन मान्य करेल का ? नाही करणार कारण गाईडलाईन त्याच्या इतक्या स्ट्रीक्ट आहेत की त्या गाईडलाईन तुम्ही फॉलो करीत नसाल तर त्या डिपीआरला त्यास काहीच अर्थ नाहीये आणि या चर्चेमध्ये आपला वेळ वाया जातोय आणि पुन्हा आपला विलंब जो आहे. म्हणजे असं करता करता दुसरा टप्पा येईल आणि दुसरा टप्पाही येवुन जाईल आणि आपण या चर्चेतच राहु. म्हणुन जो काही निर्णय घ्यायचा आहे तो तातडीने निर्णय घ्यायचा आणि मार्गाला लागायच आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मला वाटत त्यांच्या अंडरच हे डिपार्टमेंट येत असेल. आता आपले गिरीषभाऊ आहेत त्यांना जर आपण विनंती केली तर आपल्याला डिपीआर सबमीट  करायला संधी मिळेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कैसा है गाईडलाईन का अर्थ क्या होता है विशालजी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो ना, हो ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** गाईडलाईन जर फॉलो होत नसेल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** गाईडलाईन फॉलो करायच्या नाही आणि चुकीचे डिपीआर द्यायचे आणि म्हणायच की संधी द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ मी ते नाही म्हणत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** गाईडलाईन ज्या आहेत ना याचा अर्थ तुम्ही बघा .

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी ते नाही म्हणत आहे. मी काय म्हणतोय आता ३१ तारीख येते आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ३१ तारीख त्यांची आहे ज्याची बॅग तयार असेल त्यांनी पहिले गाडीत बसावं.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्याची बॅग घरी राहीली असेल त्याने बॅग घेवुन यावे दुसरी गाडी तिथे उभी आहे तुम्ही त्या गाडीत बसा अस आहे ते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दुसरा टप्पा नाहीये हा पहिलाच टप्पा आहे.

**श्री.एम.जी.गिरगांवकर, शहर अभियंता :-** दुसरा टप्पा आहे हा

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दुसरा नाही हा पहिलाच टप्पा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** उनके हिसाबसे ये पहिला टप्पा ये ही है.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा , मग याची शाश्वती कोण देईल की पहिलाच टप्पा आहे

**श्री.राजेंद्र पाटील :-**  ते द्यायला तयार आहे आपण घ्यायला तयार नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** द्यायला तयार नाही , घ्यायला तयार नाही अशातील भाग नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याची शाश्वती कोण देईल

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** परिपुर्ण प्रस्ताव जाणार नाही तरी तो पर्यंत शासन घेणार नाही आणि याच्यामध्येच जर तुम्ही विलंब केला आणि वेळ वाया घालवणार आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** नितीनभाऊ विशेष महासभा घेण्यापेक्षा काहीतरी डिसीजन घ्या आणि करा अस काय करता आहे तुम्ही

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ना डिसीजन घेतलेलेच आहे ना निर्णय दिलेलाच आहे आपण

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते झाल्यानंतरच त्याच पेमेंट करावं.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याने जे काही केलेले आहे तरी डिपीआर देणार का आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही क्या है अब उसने क्या है सब के सब जिसका हो चुका है वो बोल नही रहा है अभी

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ दुसरी स्किम नही लायेंगे वो

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही काय आहे की आपण जे बोलतो आहे ना ते त्यांच्या लक्षात येत नाहीये.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त :-** आपण याच्यामध्ये चेंजेंस करून घेवु शकतो त्यांच्याकडुन किंवा रिटेंडर करू एक कंन्स्लटंन्सी साठी पण त्याला वेळ जाईल आणि मग आपल्याला काय आहे की सात दिवसांच्या आंत टेंडर करू शकतो का

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

(सभागृहामध्ये ,मा.महापौर, मा.उपमहापौर व मा.आयुक्त आपआपसांत तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** आता याच्यावर दुसरा पर्याय काय आहे.

(सभागृहामध्ये ,मा.महापौर, मा.उपमहापौर व मा.आयुक्त आपआपसांत तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** आता या विषयाबाबत सर्व गटनेते, सर्व पदाधिकारी यांची बैठक घेवुन आपण याच्यावर निर्णय घेवु. कारण बराच वेळ चर्चा झाली आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मॅडम हे ही ठरवुन घ्या. की ही मिटींग दोन दिवसांत घेणार की केव्हा घेणार.

**मा.महापौर :-** हो दोन दिवसांत घेवु . विषय क्रं. ८, ९ ,१० आणि ११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ मधील रस्ते दुरुस्तीचे येणाऱ्या वर्षभराच्या कालावधी करीता अंदाजपत्रक सादर करणे बाबत मा.महापौर सो. यांच्या दालनात झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार सदर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन या अंदाजपत्रकात विविध बाबी या अंदाजीत स्वरुपात घेण्यात आलेल्या आहेत. आवश्यकते नुसार व रस्त्याच्या परिस्थीती नुसार वेळोवेळी रस्ते दुरुस्तीचे काम करणे शक्य व्हावे व प्रत्येकवेळी रस्ते दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेणे, निविदा मागविणे व कार्यादेश देणे या कामी होणारा विलंब टाळण्यासाठी व रस्ते दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेणे शक्य व्हावे म्हणुन सदर कामाचे वार्षीक अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मनपा निधीतुन प्रस्तावित प्रभाग समिती क्र.०१ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०१,६५,२८४/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. ९ :-** प्रभाग समिती क्र.०२ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०३,८२,६४३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०२ मधील रस्ते दुरुस्तीचे येणाऱ्या वर्षभराच्या कालावधी करीता अंदाजपत्रक सादर करणे बाबत मा.महापौर सो. यांच्या दालनात झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार सदर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन या अंदाजपत्रकात विविध बाबी या अंदाजीत स्वरुपात घेण्यात आलेल्या आहेत. आवश्यकते नुसार व रस्त्याच्या परिस्थीती नुसार वेळोवेळी रस्ते दुरुस्तीचे काम करणे शक्य व्हावे व प्रत्येकवेळी रस्ते दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेणे, निविदा मागविणे व कार्यादेश देणे या कामी होणारा विलंब टाळण्यासाठी व रस्ते दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेणे शक्य व्हावे म्हणुन सदर कामाचे वार्षीक अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मनपा निधीतुन प्रस्तावित प्रभाग समिती क्र.०२ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०३,८२,६४३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १०:-** प्रभाग समिती क्र.०३ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०४,३३,८६३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०३ मधील रस्ते दुरुस्तीचे येणाऱ्या वर्षभराच्या कालावधी करीता अंदाजपत्रक सादर करणे बाबत मा.महापौर सो. यांच्या दालनात झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार सदर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन या अंदाजपत्रकात विविध बाबी या अंदाजीत स्वरुपात घेण्यात आलेल्या आहेत. आवश्यकते नुसार व रस्त्याच्या परिस्थीती नुसार वेळोवेळी रस्ते दुरुस्तीचे काम करणे शक्य व्हावे व प्रत्येकवेळी रस्ते दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेणे, निविदा मागविणे व कार्यादेश देणे या कामी होणारा विलंब टाळण्यासाठी व रस्ते दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेणे शक्य व्हावे म्हणुन सदर कामाचे वार्षीक अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मनपा निधीतुन प्रस्तावित प्रभाग समिती क्र.०३ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०४,३३,८६३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. ११ :-** प्रभाग समिती क्र.०४ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०४,७९,९४३/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०४ मधील रस्ते दुरुस्तीचे येणाऱ्या वर्षभराच्या कालावधी करीता अंदाजपत्रक सादर करणे बाबत मा.महापौर सो. यांच्या दालनात झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार सदर अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन या अंदाजपत्रकात विविध बाबी या अंदाजीत स्वरुपात घेण्यात आलेल्या आहेत. आवश्यकते नुसार व रस्त्याच्या परिस्थीती नुसार वेळोवेळी रस्ते दुरुस्तीचे काम करणे शक्य व्हावे व प्रत्येकवेळी रस्ते दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास मान्यता घेणे, निविदा मागविणे व कार्यादेश देणे या कामी होणारा विलंब टाळण्यासाठी व रस्ते दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेणे शक्य व्हावे म्हणुन सदर कामाचे वार्षीक अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मनपा निधीतुन प्रस्तावित प्रभाग समिती क्र.०४ च्या हद्दीतील रस्ते वर्षभराच्या कालावधीसाठी दुरुस्तीचे काम करुन घेणेसाठी येणारा अंदाजीत रक्कम रु.१,०४,७९,९४३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १२ :-** जळगांव मनपाच्या सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात पूतळे व्यवस्था व दुरुस्ती कामी १०.०० लक्ष ची तरतूद आहे. मात्र नविन पूतळे बसविण्या करीता अर्थ संकल्पात तरतूद नसल्याने पिंप्राळा शिवारातील पिंप्राळा चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज शिव स्मारकासाठी येणारा अंदाजीत खर्च रक्कम रु.१.६० कोटी मात्रची अर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. त्याच्यानंतर

**श्री. मयुर कापसे :-** एक मिनिंट महापौरताई

**श्री. अनंत जोशी :-** महापौरताई

**मा.उपमहापौर :-** भाऊ मला बोलुन घेवु द्या. एक मिनिंट भाऊ तुम्हाला बोलायचे आहे का ?

**श्री. मयुर कापसे :-** हो

**मा.उपमहापौर :-** बोला भाऊ

**श्री. मयुर कापसे :-** मेहरूण परिसरा मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा एक पुतळा आहे. तर त्याचीही हाईटही छोटी आहे आणि तर त्याच्याही सुशोभिकरण करावे एवढी एक विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** बरोबर आहे.

**श्री. मयुर कापसे :-** तो जो पुतळा आहे तो १५ फुटाच्यावर बसविलेला आहे. तर त्याचेही सुशोभिकरणाचे हे याच्यात ईनक्ल्युड करावे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगरचा एक पुतळा आहे. त्याचा अशासकीय प्रस्ताव मान्य झाला आहे.

**मा.महापौर :-** विषयाशी संबंधित बोला भाऊ .

**श्री.दिलीप पोकळे :-** हे सर्व जे विषय आहेत शिवाजी नगरचा पण ईनक्ल्युड करा हेच बोलतोय आम्ही

**मा.उपमहापौर :-** जळगांव शहरामध्ये ज्या महापुरूषांचे पुतळे असतील त्यांना उंच करून पुर्नवसित करून उंच करायचे असतील किंवा सुशोभिकरण करायचे असतील किंवा त्या ठिकाणी रंगरंगोटी करायची असेल, त्याठिकाणी काही ठिकाणचे चबुतरे जे खराब झालेले असतील तर त्या ठिकाणच्या दुरूस्त्या करायच्या असतील याच्यात सर्वच कामं असतील. म्हणजे जळगांव शहरामध्ये ज्या ज्या महापुरूषांचे पुतळे आहेत. त्या सर्व ठिकाणाच्या सुशोभिकरणाच्या किंवा दुरूस्तीच्या काही चबुतऱ्याच्या काही रंगरंगोटीच्या व इतर काही दुरूस्त्या करायच्या असतील तर मला अस वाटतय की याच्यासोबत महानगरपालिकेच्या आपल्या अर्थसंकल्पामध्ये फक्त पुतळे सुशोभिकरणासाठीची १० लक्ष रूपयाची आपण त्याठिकाणी तरतूद केलेली आहे तर ती तरतूद आपण याठिकाणी एक कोटी साठ लक्ष रूपये करीत असतांना मला अस वाटत की ती अडीच कोटी रूपयांची केली पाहीजे म्हणजे जळगांव शहरातील जे काही महापुरूषांचे पुतळे असतील. त्या सर्व महापुरूषांच्या पुतळ्यांचे सुशोभिकरण असेल किंवा त्याठिकाणचे जे काही दुरूस्तीचे विषय असतील तर ते आपल्या बजेट मध्ये तरतूद

नसल्याकारणाने जे आता घेता येत नाही ते आपण जर बजेट मध्ये तरतूद केली तर मला अस वाटत की ते सोईस्कर होईल आणि चांगले होईल. म्हणजे आपल्याला सुशोभिकरणाला अडचण येणार नाही. आता आपण जो छत्रपती शिवाजी महाराजांचा जो पुतळा पिंप्राळा येथे उभारतो आहे. तर त्याच्या सर्व चबुतऱ्यासाठी सर्व आपल्या महानगरपालिका प्रशासनाने तो महापालिका प्रशासनाने मनपा फंडातुन तो चबुतऱ्याचा विषय या ठिकाणी मार्गी लावायचा आहे.

**श्री. अनंत जोशी :-** शासनाच्या गाईडलाईन्स नुसार करण्यात हे सगळे करण्यात यावं. महापौरताई , त्यावेळेस मी प्रस्ताव दिलेला होता. आपल्या बेंडाळे चौकामध्ये झाशींच्या राणीचा पुतळा आहे. त्या संदर्भात आपण ठराव केलेला होता आणि सोनगिरे साहेबांनी मला शब्द दिलेला होता की दोन महिन्यामध्ये आपण पुर्ण करू. मला वाटत ताईंना , महापौरांना आता दिड वर्षांचा कालावधी लोटला आहे. आपण त्यावेळेसचा ठराव आहे सोनगिरे साहेब आपण शब्द दिलेला होता त्याचे काय झाले. त्यांना माहिती आहे त्यांनी दोन ते तिन वेळेस सांगीतलेही होते की त्यांच्याकडे निधी पण उपलब्ध होता त्यावेळेस

**श्री. सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** तो विषय मार्गी लावण्यासाठी बंटी भाऊ , मी आणि आर्कीटेक्ट शिरीष बर्वे यांचे असिस्टंट निलेशभाई यांना आपण साईटवर घेवुन जावुन झाशींच्या राणीच्या पुर्ण पुतळ्याचे मोजमाप केले होते. त्यावेळेला पर्यावरण विभाग माझ्याकडे होता. ते सुध्दा त्यांनी मला सांगतीले होते त्यावेळेस आपल्याला कार्यालयीन प्रस्ताव तिथे प्रस्तावित करायचा होता आणि त्या अनुषंगाने आपण एक प्रपोजल त्यांच्याकडुन प्रपोजल मागविले होते. तर आता जे मोजमाप घेतले , डिझाईन झाली त्या सगळ्यांचा आपण फॉलोअप घेतला तर त्या बजेटच्या अनुषंगाने जे ईस्टिमेट आहे त्या ठिकाणाचा तो कमी होता आणि तो बर्वे साहेबांकडुन आपल्याला मिळाला नाही म्हणुन तो विषय महासभेमध्ये येवु शकला नाही.

**श्री. अनंत जोशी :-** साहेब आता शिवाजी नगरचा विषय आहे याच्यामध्ये मेंशंन करतो याबाबत मिटींगमध्ये आपण हा  विषय होता त्यावेळेला स्पष्टपणे सांगीतले की त्यांचे म्हणजे बर्वेसाहेबांचे जुने काही पेमेंट बाकी आहे त्यामुळे त्यांनी सांगतीले की त्यामुळे मी ईन्टरेंस्टेड नाहीये हे तुम्ही मला सांगीतले होते. त्यानंतर आपले एक आर्कीटेक्ट आहे तुमच्याच ओळखीचे आहेत ते

**श्री. सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** गुजराथी सर

**श्री.अनंत जोशी :-** यांना मी येथे घेवुन आलो आणि तुमची भेट घालुन दिली होती की हे करायला तयार आहेत आणि यांच्याकडुन कश्या पध्दतीने तयार करायचे.

**श्री.सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** बरोबर आहे.

**श्री.अनंत जोशी :-** कारण बर्वे साहेबांचा विषय पुर्ण क्लिअर झालेला होता त्यांनी स्पष्ट सांगीतले होते की मी हे करणार नाही.

**श्री. सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** बरोबर आहे, भुतडाजींच्या बाबतीत मी असे सांगु ईच्छितो की, ते असे छोटे छोटे कामे करत नाही ते राज्य स्तरावर मोठेमोठे पी.एम.वाल्यांचे मोठमोठे प्रोजेक्ट तयार करतात. तरी सुध्दा त्यांनी या व्हि.ओ.सोनवणी साहेबांच्या सांगण्यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवाजी नगरचा जो प्रस्ताव आहे त्याचा त्यांनी ईस्टिमेट करून व त्याचा कच्चा एक रफ प्लॅन माझ्याकडे दिलेला आहे. तो आता तिन चार दिवसांपुर्वीच माझ्याकडे आलेला आहे.

**श्री. अनंत जोशी :-** साहेब ते कुणी केले हे विषय नाहीये आता मला त्यांचे नाव आठवत नाही ठिक आहे.पण माझे हे म्हणणे आहे की, या अनुषंगाने मी आठवण दिली फक्त की हा पुतळयाचा छत्रपती शिवाजी महाराजांचा विषय होता.

**श्री. सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** भाऊ आता या सभागृहात बजेट तरतूद होतेच आहे तर आता शिवाजी महाराजांच्या

**श्री. अनंत जोशी :-** ठिक आहे शिवाजी महाराज्यांच्या हा पुतळ्यांचा विषय निघाला म्हणुन मी तुम्हाला आठवण करून दिली त्या अनुषंगाने आणि आपण शब्द दिलेला होता की आपण खर्च झाला असेल की नाही याच तुम्ही करणार होते. कस आहे आपण ठराव करतो आणि ते मागे पडत जाता तर तो अवमानच झाला ना तो.

**श्री. सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** बरोबर आहे.

**श्री. अनंत जोशी :-** त्यामुळे थोडी काळजी घेवुन तो पण विषय मार्गी लावावा.

**श्री. सोनगिरे, उपअभियंता, बांधकाम विभाग :-** ठिक आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** महापौरताई तुम्ही नविन पुतळ्याचा घेतलेला आहे का जे आहे तेच

**मा.उपमहापौर :-** नाही नविन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नविन चा आहे ना.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** नाही मग हे चुकतो आहे आपण अर्थसंकल्पात व्यवस्था व दुरूस्ती या हेडखाली अर्थसंकल्पात तरतूद करायची आहे. मग त्याच्यात नविन कुठे आला म्हणजे प्रशासनाचाच प्रस्ताव आहे म्हणुन मी ते लक्षात आणुन देतोय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव जो आहे तो

**श्री. विशाल त्रिपाठी :-** नाही, नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** व्यवस्था जो है वो नया आया है, व्यवस्था व दुरूस्ती

**श्री. विशाल त्रिपाठी :-** नाही, नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भाऊ

**श्री. विशाल त्रिपाठी :-** आपल्या बजेटमध्ये नविन पुतळे बसविणे हा हेड आहे नितीनभाऊ , नविन पुतळयांचा हेड नाहीये माझ्या माहितीप्रमाणे

**श्री.सुनिल महाजन :-** नविन बसवायचा आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे प्रशासनाने नविन पुतळे ,व्यवस्था आणि दुरूस्ती आणि सुशोभिकरण या हे करीता नविन पुतळयांसाठी एक कोटी साठ लक्ष रूपयांची तरतूद करावी आणि नविन सुशोभिकरण आणि दुरूस्ती याच्यासाठी एक कोटी रूपयांची तरतूद करावी.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** अस क्लिअर करायला पाहीजे.

**मा.उपमहापौर :-** हे ठरावामध्ये घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्ही दुरुस्तीत टाकत आहे ना. तुम्ही दुरुस्तीत टाकत आहे ना.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.दिलीप पोकळे:-** काय फरक पडणार आहे . दुरूस्ती आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** जागाच नाहीये तिथे

**मा.उपमहापौर :-** नवनाथभाऊ पुढचा विषय आहे ना तुमचा त्याच्या बाबतीत चर्चा करु.

**श्री.दिलीप पोकळे:-** उपमहापौर साहेब आपण जो सुशोभिकरणाचा विषय आहे. त्या विषयामध्ये नवनाथभाऊंचे आणि आमचे म्हणणे आहे की, ही जी काही आपण तरतूद करता आहे ती तुम्ही चार कोटी पाच कोटी अशी भरीव तरतूद करा. जेणेकरून शहराच्या चारही भागामध्ये ज्याही महापुरूषांचे पुतळे असतील तिथे काही अडचण येणार नाही.

**मा.उपमहापौर :-** अडचण येणार नाही ना पोकळे

**श्री.दिलीप पोकळे:-** मी तेच म्हणतोय.

**मा.उपमहापौर :-** साहेब अर्थसंकल्पामध्ये तरतूद करायची आहे आपल्याला कोणतेही काम करायला अडचण येणार नाही अस आपल्याला करायच आहे. आपण काम करू शकणार नाही म्हणुन वाढीव तरतूद करायला आपल्याला हरकत नाहीये.

**श्री.सुनिल खडके :-** महापौरताई मला एक प्रश्न विचारायचा होता की मनपा प्रागंणामध्ये पुतळा बसवायचे आपण ठरविलेले होते आणि आपण तस ठरविलेले पण होते. दोन वेळा जागाही निश्चित केलेली आहे. दोन वेळा ठरावही झाला म्हणजे अर्धाकृतीचा आणि पुर्ण प्रतिकृतीचा ठराव झाला तर त्याच काय झाल आणि कुठपर्यंत आल आता त्याचा ठराव होवुन जवळजवळ तिन चार वर्ष झाले तर आता उत्तर द्या मला याच , तुम्ही म्हणजे चार वर्षापुर्वी ज्याचा ठराव झाला तो पुतळा अजुनही तुम्ही बसविलेला नाहीये. मला उत्तर द्या.

**मा.महापौर :-** पुतळा सगळा तयार आहे पण त्याचे जागेचे प्रॉब्लेम आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** शासनाची परवानगी बाकी आहे म्हणे.

**श्री. अनंत जोशी :-** भाऊ तुम्ही उपमहापौर होते.

**श्री.सुनिल खडके :-** तेव्हाच झाला आहे ना भाऊ , आम्ही उपमहापौर होतो तेव्हाच झालाय ना मग आता हे संपल्यावर पुढच्या याच्यात होईल का

**श्री.योगेश बोरोले :-** पुतळा पुर्ण तयार झालेला आहे. तो पुतळा आपण खाली पोर्च मध्ये बसविणार होतो

**श्री.सुनिल खडके :-** जागा पण आपली निश्चित झाली होती.

**श्री.योगेश बोरोले :-** हो आणि आता आपण वास्तुशात्रज्ञ यांच्याकडे टाकले होते परवानगी साठी परंतू त्याच्यामध्ये काही स्क्रुटिनी काढुन आलेल्या आहे. म्हणजे आता जी आपली जागा आहे खाली त्याठिकाणी तो तुम्हाला बसविता येणार नाही कारण जेवढी हाईट त्या पुतळयाची आहे तेवढीच हाईट त्या चबुतऱ्याची पाहीजे खाली त्यामुळे त्या हाईटनुसार तो पुतळा दुसरीकडे कुठे बसविता येईल त्यासाठी आर्कीटेक्ट कडुन त्याच डिझाईन तयार करायला सांगीतले आहे. तर ते डिझाईन आपण ते सबमीट करतोय आता

**श्री.सुनिल खडके :-** ते डिझाईन केव्हा सबमीट होईल आणि त्याच रिझल्ट केव्हा येईल.

**श्री.योगेश बोरोले :-** ते आपण आता इतर सर्व विभागांच्या परवानग्यांसाठी पत्र दाखल केलेले आहेत सर्व

**श्री.सुनिल खडके :-** कोणा कोणाकडे

**श्री.योगेश बोरोले :-** पोलिसांकडे , दोन महिने झाले त्याला आता

**श्री.सुनिल खडके :-** दोन महिने झाले मग

**श्री.योगेश बोरोले :-** हो

**श्री.सुनिल खडके :-** मग त्याचा फॉलोअप घेत जा ना.

**श्री.योगेश बोरोले :-** फॉलोअप घेतोय आपण आणि आता आर्कीटेक्ट यांच्याकडुन नविन डिझाईन आल्यानंतर वास्तु शास्त्रज्ञाकडे सबमीट कराव लागेल.

**श्री.सुनिल खडके :-** कोण आहे आपले वास्तु शास्त्रज्ञ

**श्री.योगेश बोरोले :-** नाही आपण शिरीष बर्वेकडुन करतोय. संस्था करतेय आपण जी संस्थानी हे केलेली आहे ती संस्था जी आहे ती संस्था शिरीष बर्वेकडुन करून घेतेय.

**श्री.सुनिल खडके :-** मला सांगा एवढा वेळ कसा काय लागतोय.

**मा.उपमहापौर :-** सुनिलभाऊ, आपण जळगांव शहरामध्ये किंवा कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या किंवा शासनाच्या कुठल्याही जागेंवर जर आपण महापुरूषांचे पुतळे उभारायचे असतील. तर त्याच्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव त्या ठिकाणी राहात असलेल्या लोकांचे ना-हरकत प्रमाणपत्र , संबंधित पोलिस स्टेशनचे NOC , रहदारीला अडचण होणार नाही याच्यासाठी महानगरपालिकेची NOC , त्यानंतर कला संचालनालयाची मान्यता या नंतर सगळ्या प्रोसेस , मान्यता झाल्यानंतर वास्तुशास्त्रज्ञ , महाराष्ट्र राज्य यांच्याकडे हा प्रस्ताव पाठवावा लागतो आणि तदनंतर मग मंजुरी दिल्यानंतर महापौरांच्या वतीने किंवा आयुक्तांच्या वतीने हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जातो आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन त्या पुतळयाच्या बांधणीसाठी किंवा पुर्व तयारी करण्यासाठी किंवा ती बसविण्यासाठी ही शेवटची परवानगी आपल्याला त्या ठिकाणी मिळत असते. तर बहुतेक आपला जो प्रस्ताव आहे. तो प्रस्ताव बर्वेनी तयार केलेला होता. त्याला कला संचालनालयाची मान्यता झ ाालेली असुन शासनाच्या वास्तुशास्त्रज्ञाकडे मान्यतेला आता आहे. असे मला वाटत आहे.

**श्री.योगेश बोरोले :-** आपण जो प्रस्ताव पाठविला होता त्याच्यामध्ये स्क्रुटीनी आली त्या स्कुटिनीनुसार आपण

**श्री.सुनिल खडके :-** अहो तिन वर्ष झाले , तिन चार वर्ष होवुन गेले आहे.

**श्री.योगेश बोरोले :-** भाऊ स्क्रुटिनी आता आलेली आहे. ती पण त्यांनी आता तातडीने स्क्रुटिनी करून पाठविलेली आहे.

**श्री.सुनिल खडके :-** आता हे करत करत घेत घेत पुढची पंचवार्षिक येईल ना

**श्री.योगेश बोरोले :-** भाऊ ज्या स्क्रुटिनी आहेत त्याच्यानुसार बदल करून द्यावे लागेलच ना भाऊ आपल्याला

**श्री.सुनिल खडके :-** आपण फॉलोअप घेतला पाहीजे ना.

**श्री.योगेश बोरोले :-** भाऊ आपण

**श्री.सुनिल खडके :-** आपण जागा पण निश्चित केली होती.

**श्री.योगेश बोरोले :-** भाऊ आपण सर्वांनी जागा पण निश्चित केलेली होती पण कस आहे. आपल्याला त्या पोर्च मध्ये उभारायचाच होता परंतू त्याठिकाणी तो पुतळा बसु शकत नाही ही अडचण आहे. वास्तुशास्त्रज्ञांनी जी स्क्रुटीनी केलेली आहे त्याच्याबद्दल बोलतोय की तिथे बसु शकत नाही आपल्याला जागा बदलवावी लागेल. तर ती कुठे बसवायची आपण आर्कीटेक्ट ला सोबत घेवुन त्यांच्याकडुन नॉर्मसनुसार आपण ड्रॉईंग बनवुन घेवु.

**श्री.सुनिल खडके :-** आपण जागा निश्चित केली होती स्थळ पाहुन पाहणी पण केली होती.

**श्री.योगेश बोरोले :-** बरोबर आहे ना जागा निश्चित केलेली होती भाऊ परंतू त्यांनी स्क्रुटिनी मध्ये असे सांगितले की, जेवढी पुतळयाची हाईट आहे तेवढाच त्याचा चबुतरा पाहीजे असा त्यांचा नियम आहे. त्या नियमानुसार तो चबुतरा जर तिथे बनवायला घेतला तर तो पुतळा तिथे बसणार नाही.

**श्री.सुनिल खडके :-** मग आता आपण वास्तुशास्त्रज्ञांना आणल होत का की कोणती जागा निश्चित करायची किंवा काय असे. त्यांना बोलविले का ?

**श्री.योगेश बोरोले :-** नाही , नाही भाऊ हो बोलावले ना आता आपण शिरीष बर्वेना अर्ज केलेत त्यांना आपण की आपण दुसरीकडे कुठे करता येईल का आणि त्याच्यानंतर कुठलीतरी एक जागा निश्चित करून द्या आणि मग आम्ही ती जागा निश्चित करून घेतो त्याच्यानंतर सगळी कडे त्यानुसार देतो.

**श्री.सुनिल खडके :-** मग ती जागा होती तर मग

**श्री.योगेश बोरोले :-** भाऊ

**श्री.सुनिल खडके :-** मग तुम्ही हे सभागृहाला सांगायला पाहीजे की ही जागा निश्चित केली आहे.

**श्री.योगेश बोरोले :-** भाऊ सांगणारच आहे जागा निश्चिती नंतर

**श्री.सुनिल खडके :-** त्याच्यानंतर आम्ही बघु की कोणती योग्य आहे की अयोग्य आहे ते

**श्री.योगेश बोरोले :-** हो हो बरोबर आहे भाऊ

**श्री.सुनिल खडके :-** महासभा ठरवेल ना की इकडे बसवायला पाहीजे की कुठे तर

**श्री.योगेश बोरोले :-** नाही नाही भाऊ त्या करीता आपण त्यांना दोन तिन जागा मागितलेल्या आहे. त्या दोन तीन जागा त्यांनी दिल्यानंतर आपण ते ठरवुनच आपण ते फायनल करणार .

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पण जागा महापालिकेमध्येच निश्चित करा.

**श्री.सुनिल खडके :-** आपण ज्या ठिकाणी केली होती म्हणजे महापालिकेची जी जागा आपण निश्चित केली होती त्या जागेवरच करा दुसरी जागा आम्हाला चालणार नाही.

**श्री.योगेश बोरोले :-** महापालिकेच्या प्रांगणामध्ये सगळ्या जागेचे आपण त्यांना लोकेशन दिलेले आहे आणि जागेंचे आपण मार्कींग केलेले आहे. त्यामुळे आपण दुसरी जागा देवु शकत नाहीये त्यांना.

**श्री.सुनिल खडके :-** मी काय म्हणतो की पण जर काही तोडायचे असेल तर तोडुन टाका काही असेल तर

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे याच्यामध्ये नविन पुतळे उभारणे साठी आणि सुशोभिकरण आणि पुर्नवसन करणे याच्यासाठी दोन कोटी रूपये अशी चार कोटी रूपयांची तरतूद करण्यात यावी आणि हा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**नगरसचिव:-** अनुमोदक कोण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुनिल खडके :-** तर तो पर्यंत पुढील निर्णय घ्या ठोस अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**मा.महापौर :-** याच्यासंदर्भात अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी आणि विषय क्रं. १२ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, छत्रपती शिवाजी महाराज शिव स्मारकासाठी सुधारित अर्थसंकल्पात तरतुद करणे बाबत सन्मा.उपमहापौर,श्री.कुलभुषण विरभान पाटील यांचे दि.१२/०९/२०२२ चे पत्र प्राप्त झाले असून मनपा क्षेत्रातील पिंप्राळा शिवारातील पिंप्राळा चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पूर्णाकृती पुतळा बसविण्यास महासभा ठराव क्र.७८८ दि.२४/०३/२०२२ (अशासकीय ठराव) अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन या कामी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ दि.०२ मे २०१७ मधिल पुतळा उभारणे संबंधितची मार्गदर्शक तत्वे नमुद केल्यानुसार आवश्यक बाबींची पुर्तता करण्यात आली आहे. व पारित झालेलया ठरावानुसार पुतळा उभारणे कामी येणारा खर्च व पुतळा तयार करण्यासाठी खर्च व पुतळा करीता चबुतरा तयार करण्याकामी येणारा खर्च मनपा मार्फत करण्याकामी अर्थ संकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे.

मनपा महासभा ठराव क्र.७८८ दि.२४/०३/२०२२ च्या मान्यतेस अनुसरुन व जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालया कडील पत्र क्र.दंडप्र/०२/कावि/३००७४/२०२२ दि.२३/०६/२०२२ नुसार पुतळयाच्या क्ले मॉडेला

कलासंचालयानालयाची मान्यता घेणे कामी छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पूर्णाकृती पुतळयाचे क्ले मॉडेल तयार करणे व अश्वारुढ १४ ते १५ फुट उंचीचा पूर्णाकृती पुतळा तयार करण्या करीता अनुभवी व शासनमान्यत शिल्पकार यांचे कडुन दर मागविण्या करीता आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली आहे. या कामी प्राप्त दरांचा तक्ता खालील प्रमाणे आहे.

त्या नुसार पुतळा तयार करणे कामी अंदाजे रक्कम रु.८२,५९,४००/- इतके लक्ष खर्च अपेक्षित आहे. तसेच पुतळयाचे दर खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.नं. | शिल्पकाराचे नांव | अंदाजीत रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | सेन्स सेड, मुंबई | १,१८,५०,०००/- |
| २ | गारनेट इंटरिअल प्रा.लि. | ६५,००,०००/- |
| ३ | थ्री स्कल्प जयसिंगपुर | ३६,५५,०००/- |
| ४ | गर्गे आर्ट स्टुडीओ, नाशिक | १,१७,९२,०००/- |
| ५ | चित्रकल्पक प्रोप्रा दिपक दिनकर थोपटे, धायरी, पूणे | ७५,००,०००/- |

या कामी शिल्पकार यांच्या मार्फत क्ले मॉडेल व पुतळा तयार करणे कामी प्राप्त विविध दराचा सरासरी दर रु.८२.५९ लक्ष इतका असुन प्राप्त दरापैकी ज्या शिल्पकाराचा दर मंजुर होईल त्या नुसार खर्च अपेक्षीत आहे. मात्र अर्थसंकल्पीय तरतुद करण्या कामी रक्कम रु.८५.०० लक्ष अपेक्षीत खर्च गृहीत धरुन चबुतरा बांधकाम व त्या अनुषंगाने सुशोभिकरण इ. बार्बीकरीता अंदाजीत खर्च ७५.०० लक्ष असा एकुण रु.१.६० कोटी खर्च अपेक्षीत आहे.

जळगांव मनपाच्या सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात पूतळे व्यवस्था व दुरुस्ती कामी १०.०० लक्ष ची तरतूद आहे. मात्र नविन पुतळे बसविण्या करीता अर्थ संकल्पात तरतुद नाही. त्यामुळे सदर पुतळयाचे काम करण्या करीता येणारा अंदाजीत खर्च रक्कम रु.१.६० कोटी मात्रची अर्थसंकल्पात तरतुद करणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ दि.०२ मे २०१७ मध्ये नमुद केलेल्या ठळक बाबी (१) शासन निर्णय पुतळे राष्ट्रपुरुष व थोरव्यक्ती यांचे पुतळे उभारावयाचे झाल्यास ते स्थानिक लोकांच्या पुढाकारातुन , लोक वर्गणीतून उभारली जावीत असे अपेक्षीत आहे. पुतळे उभारण्या बाबत परवानगी मागतील त्या संस्था नोंदणीकृत असणे आावश्यक आहे. पुतळे उभारण्यास मान्यता देण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यास तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.स्मारक-३१०२/८८४/(प्र.क्र.१२२)/२००२/२९ दिनांक ०२ फेब्रुवारी २००५ अधिक्रमित करुन नव्याने मार्गदर्शक तत्व विहित करण्यात शासन मान्यता देण्यात येत आहे पुतळे उभारण्यासंदर्भात परवानगी देण्याच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अध्यक्षतेखालील प्रमाणे एक पुतळा समिती स्थायी स्वरुपात गठीत करण्यात येत आहे.

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
२) आयुक्त, महानगरपालिका - सदस्य
३) पोलीस आयुक्त / जिल्हा पोलीस अधिक्षक - सदस्य
४) अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग - सदस्य
५) निवासी उप जिल्हाधिकारी - सदस्य सचिव

सदर पुतळा समितीला खालील विहीत मार्गदर्शक तत्वे व त्याअनुषंगाने प्रस्तावासोबत सादर केलेली कागदपत्रे तपासुन पुतळा उभारण्यासाठी मान्यता देण्याचे अधिकार राहतील. या संदर्भात खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात येत आहे.

<u>पुतळे उभारण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे</u>

१) कोणतीही व्यक्ती / संघटना / संस्था, शासकीय / निम शासकीय संस्थेच्या तसेच खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय पुतळा उभा करु शकणार नाही.

२) पुतळे उभारण्याच्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद नसावा. ती जागा अनधिकृत किंवा अधिग्रमित केलेली नसावी. जागेच्या मालकी हक्काबाबत संबंधित पुतळा बसविणाऱ्या व्यक्ती/ संस्था/ कार्यालयाने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यास पुतळा उभारणाऱ्या व्यक्ती/संस्था/कार्यालयास हक्क राहणार नाही.

३) पुतळयाची देखभाल, मांगल्य, पावित्र्य राखण्याची जबाबदारी स्विकारत असल्याचे करारपत्र पुतळा उभारणाऱ्या संस्थेकडुन घेण्यात यावे.

४) पुतळयासंबंधीचा खर्च पुतळा उभारणारी संस्था करील व शासनाकडे निधीची मागणी करणार नाही असे संस्थेचे वचनपत्र प्रस्तावासोबत घ्यावे.

परवानगी असे शासन निर्णयात नमुद आहे.

जळगांव मनपाच्या सन २०२२-२३ या आर्थीक वर्षात पूतळे व्यवस्था व दुरुस्ती कामी १०.०० लक्ष ची तरतूद आहे. मात्र नविन पूतळे बसविण्या करीता अर्थ संकल्पात तरतूद नसल्याने पिंप्राळा शिवारातील पिंप्राळा चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज शिव स्मारकासाठी येणारा अंदाजीत खर्च रक्कम रु.१.६० कोटी मात्रची अर्थसंकल्पात तरतूद करणेबाबत प्रशासनाने प्रस्तावात नमूद केलेले असून सदर तरतूद करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार पिंप्राळा शिवारातील पिंप्राळा चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराज शिव स्मारकासाठी रक्कम रुपये १.६० कोटीच्या तरतूदीस व सदरचे काम महापालिका फंडातून करणेस तसेच सदर कामी करण्यात येणाऱ्या रक्कम रुपये १.६० कोटीच्या तरतूदीसह अर्थसंकल्पात नविन पुतळे बसविणे या लेखाशिर्षात एकूण रक्कम रुपये २ कोटीची तरतूद करणेस तसेच जळगांव शहरातील महापुरुषांच्या पुतळयांसाठी पुतळे व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षात रक्कम रुपये २ कोटीची अर्थसंकल्पात तरतूद करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**नगरसचिव विषय क्रं. १३ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील विविध ०५ ठिकाणी विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे.

**नगरसचिव :-** सुचक व अनुमोदक कोण आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.मनपा २०२२/ प्र.क्र.१७३ (६) नवि-१६ दि.०७ जुलै २०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात नागरी सेवा व सुविधांची कामे या योजने अंतर्गत रक्कम रु.५.०० कोटी (लेखा शिर्ष - ३६०४१००९) (शुध्दीपत्रक) अन्वये खालील विवरण पत्रानुसार कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| ०१ | हरिष स्विट मार्ट ते आय एम आर कॉलेज पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. |
| ०२ | एस एच -१८६ ते हनुमान मंदिर अयोध्या नगर ते तृप्ती कॉर्नर पर्यंत डांबरी रस्ता तयार करणे. |
| ०३ | श्री.छबिलदास खडके यांच्या जुने घरापासुन ते जुना खेडी रोड पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |

| | |
|---|---|
| ०४ | नेरी नाका स्मशानभुमी मागील वखार पासुन ते जुनी काशिबाई उखाजी कोल्हे शाळे पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| ०५ | झाशीची राणी पुतळा ते कोल्हे शाळे पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |

सदरहु रस्ते मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, सा.बा. उपविभाग,जळगांव यांनी वरील कामांसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरीता मनपास पत्र क्रं./जा.क्रं./साबाउपविज/प्रशा/५५३/ सन २०२२ दि.२६/०८/२०२२ अन्वये पत्र दिले होते. त्यानुसार महापालिकेने संदर्भ क्रं.जशमनपा/सा.बा./९२३/ २०२२-२३ दि.१४/०९/२०२२ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

वरील नमुद पाचही रस्ते वापर वहिवाटीनुसार आजरोजी मनपाच्या ताब्यात असुन काम पुर्णत्वानंतर दोष निवारण कालावधी अंती रस्ता देखभाल दुरुस्ती करीता महापालिकेच्या ताब्यात घेण्यात येतील. कार्यान्ववीत यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तृत रस्त्यांची कामे सार्व.बांधकाम उपविभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यात येतील सदरहु बाब धोरणात्मक असुन व वरील नमुद पाचही रस्ते मनपाच्या ताब्यात असल्याने महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत वर नमूद शहरातील विविध ०५ ठिकाणी रस्त्यांची कामे शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ६२
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १४ :-** मनपाचे घरकुल धारकांना अमृत योजना नळ संयोजन देणेकामी धोरण निश्चितीसाठी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा विषय जो आहे.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये भाऊ तुम्ही बोला , बोला , आता याच्यामध्ये जवळपास आपल्या जळगांव शहरामध्ये जे काही आपले ५ हजार घरकुल आहेत. हा विषय हुडको असेल , सम्राट कॉलनी असेल , शिवाजी नगर असेल ज्या ज्या ठिकाणी आपल्याला हे त्याठिकाणी ज्यांना आता आपल्याला हे अमृतचे कनेक्शन द्यायचे आहेत. त्याठिकाणी पहिले जे डिमांडवरचे जे लोक आहेत. त्यांना म्हणजे घरकुल मंजुर केले आहे किंवा सेवाशुल्क आपण त्यांच्याकडुन आकारत होतो. त्यांच म्हणणे आहे की आम्हाला अधिकृत ज्यावेळी घरकुल दिले गेले होते त्यावेळेस आम्हाला हे नळ कनेक्शन दिले गेलेले होते आणि आमच्याकडेस त्यांनी पाणीपट्टी असेल किंवा घरपट्टी असेल अशी आकारणी केलेली होती. परंतू कालांतराने ते सेवाशुल्क हे आपले महानगरपालिकेचे कर्मचारी जात नसतील किंवा ते भरत नसतील अशा विविध कारणांनी ते रखडले आहे. परंतू आता आपल्याला अमृत योजनेचे काम करायचे असल्या कारणाने त्या भागामध्ये आता बरचशे घरकुलचे जे भाग आहेत हे अण्णाभाऊ साठे दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत येतात. तर आपण या लेखा शिर्षाखाली निधी मंजुर करून दिलेला आहे. परंतू आपल्याला त्याठिकाणचे रस्ते, गटारी किंवा ज्याकाही मंजुर सुखसोई सुविधा त्याठिकाणी पुरवायच्या आहेत त्याठिकाणी रस्ते बांधतांना किंवा विकास करतांना पहिले आपल्याला शासनाच्या निर्णयानुसार त्याठिकाणी नळसंयोजन करून घेणे आपल्याला ते बंधनकारक आहे. परंतू ते लोकं त्यांच म्हणण अस आहे की आम्ही याठिकाणी सर्व मजुर वर्ग आहे आणि आता आपण अमृत योजनेचे काहीतरी ३८०० रूपये की डिमांड नोटीस काहीतरी त्यांच्याकडुन नळधारकांसाठी जोडणी धारकांसाठी जी आपण आकारतो आहे तर ते त्यांची भरण्याची कॅपेसिटी नाहीये. असे त्याबाबत महापौरांकडे मिटींग झाली , आयुक्त मॅडमांकडे मिटींग झाली तर त्या पाणी पुरवठ्याच्या सर्व अधिकाऱ्यांसोबत मिटींग झाली. त्या लोकांना किंवा तिथल्या प्रतिनिधींना आपण बोलावले होते. याच्यामध्ये सदस्य सुरेश भाऊ सोनवणे म्हणजे ज्या ज्या प्रभागामध्ये असे लोकं असतील ते नगरसेवक उपस्थित होते. परंतू आता आपल्याला त्या ठिकाणी नळ कनेक्शन लागु करता येणार नाही जवळपास देता येणार नाहीये. तर त्याच्यासाठी याच्यावर आपल्याला धोरण निश्चित करणे गरजेचे आहे आणि धोरण निश्चित केल्यानंतर त्या लोकांना विकास कामांना निधी देता येणार नाही. तर आज या ठिकाणी प्रशासनाने जो प्रस्ताव आणलेला आहे. काहीतरी १८५०/- रूपये भरून त्यांना नळ

संयोजन करून देणेबाबतचा तो प्रस्ताव आहे. तर मला अस वाटत की याच्यावर विस्तृत असे आपण एकदा चर्चा करून जर याच्यावर जर धोरण ठरलं तर आपल्याला येणारा काळामधील त्याठिकाणचा निधी याचा अपव्यय होणार नाही आणि निधी आपल्याला मिळेल आणि निधी आपल्याला वेळेत वापरता येईल आणि त्याठिकाणी आपल्याला सुखसोई पुरविता येतील अस मला वाटत.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** ज्यावेळेला आपण घरकुल योजना राबवली. तर हे कितपत योग्य आहे. आपण जर त्यांना नळ कनेक्शन दिलेले आहे. तर त्या जुन्या पावत्यांवरच त्यांना नळ कनेक्शन द्या. नविन पावती घेण्याची आवश्यकता काय आहे. आतापर्यंत आपण पाणी पुरवठा करतोय.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता तुम्ही नळ घेतला असेल तर पहिले तुम्ही त्याची पाणीपट्टी भरली असेल , पाणीपट्टी क्लिअर करूनच दिले असेल , व्यवहार कसा होतो.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आप्पा दुसरीकडे कस होतय पाणीपट्टी भरूनच देतोय ना बरोबरा आहे की नाही. पावती भरून भुगतान करून घेतोय ना त्याच्याकडुन

**श्री.कैलास सोनवणे :-** काय

**श्री. ईब्राहीम पटेल :-** पाणीपट्टीची रक्कम ती भरून भुगतान करूनच करतोय की नाही आपल्या वॉर्डात जर पाणीची जुनी पावती असली त्यांच्याकडे नळजोडणी फुकटात करतोय काय आपल्या वॉर्डात

**श्री.कैलास सोनवणे** :- नाही त्याच्याकडुन पाणीपट्टीचे पैसे भरूनच करतोय ना.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** कस आहे ईबाभाई १० वर्ष झाले ते घर विकयल मग आता मला सांगा ते घर किंवा नळपट्टी कोणाच्या नावावर आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** प्रश्न तोच आहे ना

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** घर तेच आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** घर तर तेच आहे पण पाणीपट्टी तोच येतोय ना भरायला

**श्री.कैलास सोनवणे :-** यामध्ये विषय काय आहे की , ज्या घराचा जुना मालक वेगळा आहे. त्या घराचा मुळ मालक वेगळा आहे. त्यांनी व्यवहार केला आहे वरच्यावर , आज जे नळ कनेक्शन घेणार आहे ते त्याच नावावर राहील.त्यामुळे आपल्याला येथे धोरण ठरवावे लागेल की काहीतरी फी आकारणी करून ते याच्या नावावर उतरवावे लागेल.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** तरच होईल ते

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही आणि मग काही त्यांची जी थकबाकी असेल ती भरून मग त्यांना नळ कनेक्शन द्यावे लागेल आणि अस ठरवावं लागेल अस मला वाटत आणि बाकीच्यांचे काय मत आहे ते ठरवा आणि

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** बरोबर आहे आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे ना तुम्हाला त्यांना मुळ मालक बदलवण्याची परवानगी द्यावी लागेल महासभेला आज पैसे घेवुन व्यवहार करतील. तसे एक दोन प्रकरण आपण केलेले आहे. या महापालिकेत झालेले आहेत.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आप्पासाहेब आता अजुन एक अडचण येईल आता ते घरपट्टी थकबाकीदार आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** भरावी लागेल.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आता कोणा- कोणावर ५०/५० , ६०/६० हजार रूपये थकबाकीदार आहेत बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आता मग भरून जर ते ६० हजार पण भरावे लागतील पुन्हा ते १८००/- पण भरावे लागतील आणि मग नंतर दुसऱ्याच्या नावावर होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही ही शिफारस करू नका ईबाभाई हे महापालिकेचं घेण आहे ते त्यांना द्यावं लागेल. हा कायदा आहे. त्या घरांची किंमत त्याच्यापेक्षाही जास्त आहे. हा कायदा आहे . तुम्हाला आता ईतके नगरसेवक ओरडले रस्त्यांच्या हिशोबाने याच्या हिशोबाने आता सगळयांचाच रोष होता. मग आता हे आता महापालिकेला उत्पन्नाचा सोर्स नको पाहीजे का ?

**श्री. ईब्राहीम पटेल :-** पाहीजे ना आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** पण मग आपण शिफारस करायलाच नाही पाहीजे.

**श्री. नवनाथ दारकुंडे :-** थकबाकी आपण तिन टप्प्यात भरून घ्या त्यांच्याकडुन

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांच जे काही असेल ते प्रशासन ठरवेल ते

**श्री. ईब्राहीम पटेल :-** समजा आपण १८००/- रूपये ठरवले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासन ठरवेल ते आणि याच्याबरोबर मी आणखी एक गोष्ट सांगतोय की पुर्ण जळगांव शहरामध्ये जे भाडेकरू आहेत ना याबाबत मॅडम तुमच्या समोर पण चर्चा झाली आणि कुलकर्णी साहेब असतांना पण बैठकी झालेल्या आहेत या अमृतच्या कनेक्शनच्या बाबतीमध्ये , जळगांव शहरामध्ये भाडेकरूंचा पण फार मोठा विषय आहे. त्यांना घरमालक परवानगी देत नाहीये. त्याच्यावर पण आपण रितसर घ्यायला पाहीजे. तर आपण याच्या अनुषंगाने तर आपल्याला करावं लागेल भाडेकरूंचे सुध्दा तुमच्याकडेही मतदार येत असतील याच्यासाठी आणि दुसरं अस सांगतो की सगळ्यात जास्त नुकसान माझ होणार आहे कारण सगळ्यात जास्त भाडेकरू माझे आहेत जळगांव शहरामध्ये , प्रत्येकाला पाणी भेटायला पाहीजे . माणुसकी या हिशोबाने सगळ्यांना पाणी भेटायला पाहीजे. त्याच्यासाठी धोरणात्मक निर्णय घ्या सगळेजण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मागे नगरपालिका असतांना आता शासनाचा एक जि.आर आहे की स्लम एरिया जिथे असेल तिथे ५० टक्के पाणीपट्टी घ्यावी व ५० टक्के नळ कनेक्शनची फी आकारणी करण्यात यावी. की जो स्लम एरिया असेल त्या स्लम एरियाला ५० टक्के जे त्यांच नळ संयोजन आहे. कनेक्शन देण्यासंदर्भातील ते तर ती ५० टक्केच रक्कम त्यांच्याकडुन घेण्यात यावी आणि त्यांची पाणीपट्टी पण ५० टक्के घेण्यात यावी. असा मी या सभागृहात ठराव मांडतो. १८५०/- जे आपण नळ कनेक्शनचे घेतोय नविन कनेक्शनचे घेतोय

**मा.उपमहापौर :-** भाऊ नळ संयोजन फी किती आहे आणि हे किती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ ५० टक्के बरोबर आहे स्लम एरियात

**मा.उपमहापौर :-** आणि ही वार्षिक फी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** स्लम एरियाला घ्या.

**मा.उपमहापौर :-** भाऊ

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ नविन कनेक्शनला म्हणतोय मी फक्त स्लम एरियामध्ये.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय क्रायटएरीया ठरवता आहे आता.

**मा.आयुक्त :-** त्यांचे पण चार्जेस ५० टक्के कमी करायचे का ?

**मा.महापौर :-** करू शकतो का आपण

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** गोराणेसाहेब , महापौरताई

**श्री.कैलास सोनवणे :-** आपण ज्या त्यांना अटी टाकलेल्या आहेत. त्याच्या हिशोबाने होणार नाही अस मला वाटतं.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** ८० टक्के ते घेताहेत आपल्याला २० टक्के राहीले फक्त

**मा.उपमहापौर :-** घेवुन घ्यावी आणि उर्वरित थकबाकी जी आहे ती प्रशासनाने काम करून त्यांच्याकडुन आपली यंत्रणा राबवुन ती थकबाकी कशी वसुल करता येईल त्याचे नियोजन प्रशासनाने करावे आणि आता आपल्याला नळ द्यायचे असल्याने नळ संयोजन देण्याकरीता १८५०/- रूपये भरून त्यांना नळ संयोजन करून दिले पाहीजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** याच्यात काही दुमत नाहीये. पण तुम्ही जे बोलले ना ते होणारच नाही.

**मा.उपमहापौर :-** नाही ठिक आहे ना

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याच्याकडे जे पैसे आहेत ना ते आपण मागत नाही आणि ते देत नाहीत. भाडेकरींचे ठरवा ना काय आहे तर ते भाडेकऱ्यांच ठरवा नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** भाडेकरींचे ठरवा ना काय आहे तर ते जळगांव शहरात भरपुर आहेत. काय आहे मालक आणि भाडेकरूत वाद आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तुम्ही मागे पण हा विषय केला होता आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही तो वेगळा विषय होता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कैलास आप्पांनी जो विषय आता मांडला आहे की बऱ्याचश्या भाडेकऱ्यांचा परंतू बऱ्याचश्या मिळर्तीमध्ये घरमालक आणि भाडेकरू असा वाद असतो आणि आपले अधिकारी नविन कनेक्शन देतांना भाडेकरूंना कनेक्शन देतांना घरमालकाची संमती मागतात आणि कुठलाही भाडेकरू आणि मालक यांचे संबंध हे वेगळे असतात आणि घरमालक संमती देण्यामध्ये असमर्थतता दर्शवितो आणि आपले अधिकारी त्या

भाडेकरूंना कनेक्शन देत नाहीत.तर मला वाटत की पाणी ही जिवनावश्यक बाब असल्याकारणाने आपण आपल्या अधिकाऱ्यांना तशा पध्दतीचे निर्देश द्यावे की जेणेकरून जो मागेल त्याला नळ देण्यासंदर्भातील जो नियमानुसार भाडेकरू असेल त्याला आणि तो नविन कनेक्शन घेण्यासंदर्भातील पैसे भरत असेल तर त्याला नळ कनेक्शन देण्यात यावं.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त :-** जे भाडेकरू असतात तर आपण त्यांना जास्तीची लावतो घरपट्टी असे काही केले तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ना मॅडम की भाडेकरूंचे काय आहे की घरमालक संमती देत नाहीत.

**मा.आयुक्त :-** हो पण घरमालक आपल्याकडे लोकशाही दिनात तक्रारी घेवुन येतात की का कनेक्शन देतात

**श्री.कैलास सोनवणे :-** हो मॅडम आपल्याला धोरण ठरवायचे आहे . आता मी एक उदाहरण सांगतो की पोजिशन अशी आहे की आपण त्या मालकाच्या नावावरच कनेक्शन द्यायला पाहीजे असे काही नाहीये किंवा त्याची परवानगी लागते आपल्याला एक बिल्डिंग आहे आपल्या बळीराम पेठेतील विषय आहे. माझी प्रापर्टी होती तिथे तर तिथे त्या बिल्डिंगवरचे पैसे मी भरले होते. आपण जर पाहीले ना तर दोन्ही मिळुन तुम्हाला आपल्याला काहीतरी मार्ग काढावा लागेल.

**मा.आयुक्त :-** अहो आप्पासाहेब ते

**श्री.कैलास सोनवणे :-** हो मॅडम काय आहे की याच्यामध्ये अनेक अडचणी येतात कारण काय आहे नगरसवेक म्हणुन ज्याला उभे राहायचे आहे ना अडचणी येतात. कारण काय आहे की पैसे भरलेले नाही अशी परिस्थिती येते परंतू ते मला भरावे लागेलेले आहेत.

**मा.उपमहापौर :-** भाऊ , आप्पासाहेब आपल्या जेवढ्या प्रापर्ट्या आहे ना तेवढ्या दाखवत नाही ना आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** हो दाखवल्या आहेत ना मी , ईन्कम टॅक्स मुळे सगळे घेतात. आमच्याकडे तर थोडच आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला काही बोलायचे होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** याची चौकशी एकाही नगरसेवकाची चालु नसेल माझी चालु आहे.

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ आपण काय करू शकतो.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मला बालायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे की भाडेकरू ला नळ संयोजन दिले पाहीजे पण कसं आहे की मालकाला पण

**मा.आयुक्त :-** पावतीवर मालकाचे नांव नको आणि भाडेकरूचे नांव राहू देवु जेणेकरून महानगरपालिकेच्या करात वाढ होणार नाही म्हणुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो बरोबर

**श्री.कैलास सोनवणे :-** आदेश काढा तसा मॅडम

**मा.आयुक्त :-** हो हो

**श्री.प्रशांत नाईक :-** मॅडम एक धार्मिक स्थळांचे ही एक धोरण घेवुन घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** धार्मिक स्थळांचा काय विषय आला तो तर कायदा आहेच ना. ज्याप्रमाणे आपण आकारणी करतो त्याप्रमाणे ते करून भाडेकरुंना नळ कनेक्शन द्यायचे आहे आणि त्या हिशोबाने हा ठराव करायचा आहे. ते काय आहे की तुम्ही म्हणणार नितीनभाऊ काय बोलले आणि मी काय बोललो तर आताच सांगुन द्या काय बोलले आहे ते तर

**नगरसचिव :-** आप्पासाहेब नाही नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे ना

**नगरसचिव :-** आप्पासाहेब धोरण ठरवतो आहे पण प्रस्ताव घरकुल संदर्भात आहे.

**मा.उपमहापौर :-** बोला

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौरताई , आयुक्त मॅडम महापालिकेकडुन काही झोपडपट्टीचे अतिक्रमण काढण्यात आलेले होते. त्यावेळेस महानगरपालिका , नगरपालिका होती. त्यावेळेस झोपडपट्टी वासियांना घरकुल मोफत दिलेले होते. तर त्यांना त्या घरांमध्ये मोफत लाईट असेल , काही असेल , येण्याजाण्याचा खर्च हा सगळा मोफत दिलेला होता. आपले नगरपालिकेचे कर्मचारी त्यांच्यापर्यंत पोहोचले नाही की तुम्हाला काय भरावे लागेल किंवा काय करावे लागेल या विषयावर चर्चाच झाली नाही. यांना घरकुल धारकांना हे मोफत घर दिलेले होते. तर त्यावेळेस मोफत घर देतांना आपण कॉन्ट्रक्ट ज्याला देतो तर त्याने नळ कनेक्शन डिमांडवर होते. तर माझ्या मते

त्यांना १८५०/- हे पण भरायची गरज नाही. एक धोरण ठरवुन घ्या की एका वर्षाचं जे भाड असेल ते भाड भरण्यास तयार आहेत. तर त्यांना ते नळ कनेक्शन देण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुरेशभाऊ घरकुल हा विषय वेगळा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही सुरेशभाऊ घरकुलचा जो विषय आहे ना तो वेगळा आहे.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही सुरेशभाऊ , आप्पासाहेब ती योजना तशी नाहीये त्याच्यात काय आहे की फक्त घरकुल मोफत आहे आणि

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** याबद्दल नेमकं धोरण काय ठरावायचे आहे आता.

**श्री.सुरेश सोनवणे :-** गरीबांना घर देण्यासाठी दिलेले आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** गरीबो के लिए जेल मे जाऐंगे हम. करीमभाई राहिलेले, आम्ही सांगायचे का हो व्यवस्थीत पहा ना. गरीबो के लिए जेल मे भी जाऐंगे. स्विकृत होते कुठे गेले. स्विकृत होते ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता प्रशासनाचा प्रस्ताव अॅजेटीज जर मंजुर केला, तर मग त्याची अंमलबजावणी करु शकणार नाही. ही वस्तुस्थिती आहे की, पुन्हा त्यांच्याकडुन संपुर्ण थकबाकी भरुन घेणे, आणि त्याच्यानंतर नविन नळ कनेक्शन देणे, मला वाटते, खुप डिप करार होईल. त्याच्यामध्ये सोल्युशन अस पाहिजे की, जेणे करुन त्या नागरीकांना नळ कनेक्शन घेणे सोईस्कर पडेल आणि महानगरपालिकेला सुध्दा त्या नळ कनेक्शनच्या अभावी विकास कामे किंवा त्यांना जिवनावश्यक पाणी  देण्याची हि सुध्दा जबाबदारी पार पाडली जाईल. असे काहीतरी व्हाव त्याच्यातुन काढावा लागेल. आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** घ्या ना भाऊ काय निर्णय

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर नेमकी त्यांच्याबाबतीतील भुमिका कुठेतरी फ्लेक्झिबल ठेवावी लागेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण जेणेकरून त्यांना सवलतीच्या दरामध्ये कनेक्शनही दिले जाईल आणि

**श्री.कैलास सोनवणे :-** घरकुल वाल्यांना ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो घरकुल वाल्यांना

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे.

**मा.उपमहापौर :-** सुरेशभाऊ तुमच मत काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर मला वाटत की साधारणत: काय रक्कम असेल ती

**सौ.पार्वताबाई भिल :-** याच्यामध्ये ज्या नागरीकांची बाकी असेल , गणपती मंदिर असेल तर त्यांनी नळ कनेक्शन नाही तर पाणी मिळणार नाही तर त्यांनी पाणी कुठुन घ्यायचे आता म्हणजे ते आता सार्वजनिक आहे तर त्यांना नळ द्यावाच लागेल ना, मग द्या ना जिथे मोठे मंदिरे असतील तिथे काही कार्यक्रम होत असतात काही वेगळे हे होत असते.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ.पार्वताबाई भिल :-** जे संस्थावाले असतील ते पावती फाडतील आणि संस्था नाही राहीली तर मग

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** यावर माझे म्हणणे असे आहे की, एक वर्ष जसे आता कुलभुषणभाऊ म्हणताहेत की एक वर्षाचे सेवाशुल्क त्यांच्याकडुन भरून आपण त्यांना कनेक्शन द्यावं आणि मुळ जो करारनामा आहे आपला जो आपले सेवाशुल्क वसुल करण्याचा त्या पध्दतीने पुढे ती वसुली करत जावी म्हणुन आता आपण नविन वर्षाचं सेवाशुल्क म्हणुन वसुल करून जो पावती दाखवेल त्याला ते नळ कनेक्शन देण्यात यावं.

**मा.उपमहापौर :-** हो भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ मागची जी थकबाकी आहे त्याचे टप्पे जर केले तर ते लोकं थकबाकी भरतील. एकदम एवढी वसुल करता येणार नाही कर्मचाऱ्यांना

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ काहीही करा तुम्ही वसुलीच होणार नाही. मी तुम्हाला कन्फर्म सांगतो की आपले ते घेणे आहे ना, जे व्याज असेल ना ते सोडुन द्या. व्याज सोडुन वसुल करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** व्याज सोडुन दिले तरी आपण दोन एजन्सीला ठेका दिला होता त्याचा आणि ठेका देवुन देवु त्याचा

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ ठेका देवुन टाका त्याचा तेव्हाच ते वसुल होईल. कोणालाही लागेल तर तिकडच्याच लोकांना द्या. तुम्हाला पॉलीसी तर ठरवावीच लागेल.

**मा.आयुक्त:-** सर वसुली बाबत घरकुल विभाग आता प्रशांत पाटील सर आहेत तर त्यांनी हस्तांतरणाच्या बाबतीत त्यांनी

**श्री.नितीन लढ्ढा :-** हस्तांतरणाच्या बाबतीत जर काही पॉलीसी क्लिअर झाली ना

**मा.आयुक्त:-** हो बरोबर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर आपल्याला काहीतरी वसुल मिळु शकेल.

**मा.आयुक्त:-** हो बरोबर आहे तर आपल्याला ते करावे लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर तो वसुल होईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे वसुल होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता प्रस्ताव अशा पध्दतीने करून घ्या की सेवाशुल्काची एका वर्षाची थकबाकी संबंधित घरकुल धारकाकडुन भरून घेण्यात यावी आणि ती पावती दाखवल्यानंतर त्याला नळ कनेक्शन देण्यात यावं आणि त्यांच ५/- रूपये रोजचे जे सेवाशुल्क आहे ते नेहमी प्रमाणे सुरू ठेवावं.

**मा.आयुक्त :-** त्यांचे जे चार्जेस आहेत ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**मा.आयुक्त :-** कनेक्शन चार्जेस जे आहेत ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही कनेक्शन चार्जेसच झाले ते आता

**मा.उपमहापौर :-** मॅडम तेच आहेत ना सेवाशुल्क म्हणजे

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्याकडुन आपण एक वर्षाचे सेवाशुल्क भरून घेतोय

**मा.उपमहापौर :-** मॅडम आपण त्याच्याकडुन ते भरून घेतोय , सेवाशुल्क जर म्हंटल आपण तर त्याला कायद्यानुसार करता येणार नाही. मग सेवा वाढुन जाईल.

**मा.आयुक्त :-** सर हा विषय नळ कनेक्शन चार्जेसचा आहे म्हणुन

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** सेवाशुल्क भरणे हे पण आपण त्याच्यात नमुद केले आहे. म्हणजे आपण त्यांना अलावुट करतोय का

**मा.उपमहापौर :-** माईक जवळ घ्या साहेब.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** १०००/- रूपये हस्तांतरण शुल्क घेणे असं त्यात नमुद आहे. पण आपण हस्तांतरण अलावु करणार आहोत का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही हस्तांतरण नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त :-** आता जे रहिवासी आहे काही ते अनधिकृत वास्तव्यास आहेत त्या घरकुलामध्ये त्यांनी कुठलीही परवानगी घेतलेली नाही. मग त्यांच रेग्युरलाईज करणार आहोत का याच्यात आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही आपण जर समजा नितीन लढ्ढाला जर अलॉटमेंट झाले असेल ते घर आणि आता सुनिल महाजनांकडुन हस्तांतरण केलं असेल तर ती पावती आपण नितीन लढ्ढांच्यांच नावाने फाडुन त्यांना तो पैसे भरेल .

**मा.आयुक्त :-** सर ते अधिकृत होणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अधिकृत होणार नाही ना कारण कसं आहे. म्हणजे तो ट्रान्सफरच अनधिकृत झालेला आहे पुर्वी त्याला आपण काही ऑथराईज करत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** मुळ मालकाच्या नावाने आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याची आपण जी पाण्याची जी निकड आहे ती पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातुन आपण

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ आता कस आहे ते घरकुल बांधतांना जे वंचित लोकं होते. त्यांना ते दिलेले आहे ना , आपल्याकडे असं काही आहे की हे यांच्या नावावर आहे आणि त्यांच्या नावावर

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही हस्तांतरणाचा विषय नाहीये ईथे

**श्री.कैलास सोनवणे :-** नाहीये ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** तसा विषयच नाहीये आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** नाहीये ना मग तशी त्याची परवानगी तुम्ही शासनाकडुन आणुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ते धोरण आपण ठरवु शकतो ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** धोरण ठरवु ना पण शासनाला पाठवुन मान्यता घ्या त्यांची

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते धोरण आपणच ठरवु शकतो ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग ताब्यात घ्या आपल्या

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ आपल्या नगरपालिकेच्या सभेत झाले आहे ना ते

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो

**श्री.कैलास सोनवणे :-** मग महाराष्ट्र शासनाच्या अंडरमध्ये येतो तर ते आपण करून घ्या. जर आपण त्यांच्याकडुन जो आज असेल ना त्याच्या नावावर असेल ना तर तो पैसे पण भरेल आणि आपली वसुली पण होईल. आपले आपण जर एक वर्षाचे भरून द्याल ना तर तुमचा वसुल येणार नाही.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब मी काय म्हणतोय की आपण या विषयावर दोन दिवसांत सर्व पक्षीय मिटींग बोलावु आणि सर्व गटनेते, सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि या विषयावर चर्चा करून पुढच्या महासभेमध्ये धोरण निश्चितीसाठी आपण हा पुढील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचा नव्याने आपण घेवु त्यावेळेचा एक महासभा ठराव क्रं. १४३ दि.२८/२००९ चा आहे. त्याचेपण काय आहे ते ही पाहुन घ्यावे लागेल आपल्याला एकदा आणि मग ते धोरण ठरवावं लागेल आणि मग आपल्याला तो एक सर्व पक्षीय चर्चा करून त्याच्यावर आपण ठरवुन जर पुढच्या महासभेत घेतलं तर थोडसं बर होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** किती दिवसांत घेणार.

**मा.उपमहापौर :-** नाही ना महापौर ताईंनी सांगीतले ना की दोन दिवसांत

**श्री.कैलास सोनवणे :-** तात्काळ बैठक घ्या ही. ती बैठक तात्काळ होऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कस आहे आप्पा, प्रशांत पाटील साहेब तुम्ही याच्यामध्ये तुम्ही एक धोरण टाकुन घ्या की मागचं जे धोरण ठरविलेले आहे महानगरपालिकेने कि जे अहस्तांतरण जे घरकुलं आहेत. मग आता तुम्ही हस्तांतरण करण्याच्या दृष्टीकोनातुन सुध्दा म्हणजे एखादं घरकुल समजा मला अलॉट झालेले असेल आणि जर का आज सुनिलभाऊ राहात असेल. लिगल ट्रान्सफर केलेले असेल. परंतू जर का कधी ते तुम्हाला रेग्युरलाईज करून घ्यायचे असेल. तर जी थकबाकी असेल मागची

**मा.उपमहापौर :-** ती भरावी लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती भरण्याची आणि हस्तांतरण फी भरावी असे आपल्याला याच्यातील

**श्री.कैलास सोनवणे :-** बरोबर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्या महानगरपालिकेची थकबाकी सुध्दा वसुल होईल आणि

**श्री.कैलास सोनवणे :-** रेग्युलर होवुन जाईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा रेग्युरल होवुन जाईल आणि हा नियमित झाला तर रेग्युलर सेवाशुल्क भरण्याच्या संदर्भातील आपली हि सिस्टिम सुरू होवुन जाईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** कनेक्शन वाढतील आणि सगळं रेग्युलर होवुन जाईल.

**मा.उपमहापौर :-** सगळं रेग्युलर होईल

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणुन एकुणच आपण धोरण काय करा आणि हे सुध्दा आपण त्याच्यामध्ये हे सुध्दा समावेश करून घ्या.

**मा.उपमहापौर :-** भाऊ हा विषय तहकुब करायचा .

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही तहकुब करण्यापेक्षा याला असं करा की असा निर्णय घेवुन टाका की प्रशासनाने या संदर्भात एक परिपुर्ण प्रस्ताव तयार करण्यात यावा. ज्याच्यामध्ये घरकुल हस्तांतरण करण्याच्या संदर्भात, नविन नळ कनेक्शन देण्याच्या संदर्भात एकत्रितरित्या एक धोरण तयार करून त्याचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेसमोर ठेवावा.

**मा.उपमहापौर :-** म्हणजे आता तहकुब होवुन पुढच्या महासभेमध्ये घेवु असं.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब करण्याचा प्रश्नच नाही याच्यावर हाच निर्णय घेतला याच्या संदर्भात आपण की ज्याच्यामध्ये हस्तांतरण करण्याचा सुध्दा आणि नविन नळ संयोजन सुध्दा असा एकत्रित प्रस्ताव तयार करून प्रशासनाने पाठवावा.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रस्ताव तयार करून मंजुरी घेण्यात याची त्याची

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** प्रशासनाने नविन नळ कनेक्शन आणि हस्तांतरण करण्याचा असा विस्तृत प्रस्ताव तयार करून पुढील महासभेला सादर करावा.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** विषय क्रं. १४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. १९ पर्यंत मंजुर आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई या प्रस्तावा संदर्भात सर्व पक्षीय गटनेत्यांना व अधिकाऱ्यांना बोलावुन बैठक घेवुन त्यांच्याशी चर्चा करून घ्यावी म्हणजे येणाऱ्या सभेमध्ये चर्चेसाठी वेळ वाया जाणार नाही. सगळ्यांशी चर्चा होईल आणि ज्याकाही दुरूस्त्या असतील तर त्या संदर्भात प्रस्ताव पुढील सभेसमोर येईल.

**मा.महापौर :-** परिपुर्ण प्रस्ताव पुढील महासभेला सादर करण्यात यावा. विषय क्रं. १५ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रशासनाने १) मनपाचे घरकुल धारकांना व भोगवटदारांना अमृत योजने अंतर्गत नळ संयोजन देणे व त्यासाठी शुल्क आकारणीबाबत व मनपाचे घरकुलधारकांकडुन हस्तांतरण शुल्क आकारणीबाबत तसेच २) खाजगी मिळकतींमध्ये भाडेकरु रहिवास करीत असल्यास त्यांना अमृत योजने अंतर्गत नविन नळ संयोजन देणेबाबत धोरण ठरविणे संदर्भात प्रशासनाने याप्रमाणे दोन वेगवेगळे प्रस्ताव तयार करुन ते महानगरपालिका सर्व पक्षीय गटनेते, पदाधिकारी यांची बैठक घेवून त्यांच्या निदर्शनास आणून देवून त्यांच्या सूचना ऐकून घेवून त्याप्रमाणे सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १५ :-** शामराव नगर ते वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर रेल्वे पुल पर्यंतच्या रस्त्याला क्रांतीवीर/क्रांतीकारक भगवान बिरसा मुंडा यांचे नाव देण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विषय क्रं. १५ मान्य आहे , विषय क्रं. १६ वर बोला तुम्ही शुचिताताई

**नगरसचिव :-** विषय क्रं. १५ सुचक कोण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. १५ मान्य करण्यात यावा.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई विषय क्रं. १५ मध्ये माझ्या काही सुचना होत्या. त्या प्रस्तावामध्ये म्हंटलेल आहे की वर्तमान पत्रात प्रसिध्दी दिल्यानंतर आणि काही सुचना किंवा हरकती आल्या नाही तर पुन्हा महासभेसमोर येणार. तर पुन्हा महासभेसमोर आणण्याची काही गरज नाही. जर सुचना हरकती आल्या नाही तर त्या रस्त्याला व चौकाला भगवान बिरसा मुंडा असे नांव देण्यास काही हरकत नाही. हा आमचा आज सगळ्यांचा आज धोरणात्मक निर्णय झालेला आहे. त्यासाठी सुचना , हरकती आल्या तर ऑबिसली ते करणार आहे. त्याशिवाय हा विषय मार्गी लागणार नाही.

**नगरसचिव :-** विषय क्रं. १५ , १६ , १७ आणि १९

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. २० पण मंजुर आहे.

**श्री. सुनिल महाजन:-** विषय क्रं. १५ ते १९ महापौर म्हणत आहेत की १५ ते १९ मंजुर करा.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १५ ते १९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं.२०

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. २० पण मंजुर आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २० चे काहीतरी आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.सदस्या,ॲड सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दि.०३/१२/२०२१ चे पत्रान्वये पिंप्राळा शिवारातील गट नं.१५९,१६०,१६१ शामराव नगर या परिसरात आदिवासी समाजातील भिल बहुल वस्ती असल्याने शामराव नगर ते वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर रेल्वे पुला पर्यंतच्या रस्त्याला क्रांतिविर/क्रांतिकारक भगवान बिरसा यांचे नांव देण्यास तसेच या रस्त्यावरील चौकास भगवान बिरसा मुंडा चौक असे नामकरण करण्यास परवानगी मिळणे कामी प्रस्ताव मा.महासभेपूढे सादर करण्यास व त्यास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

याकामी स्थळ निरीक्षण केले असता या रस्त्यास व चौकास यापूर्वी कोणतेही नाव दिले असल्याचे दिसुन किंवा आढळुन येत नाही तसेच या बाबत विभागाच्या अभिलेखात देखील त्यांची नोंद आढळुन येत नसल्याने वरील प्रमाणे कार्यवाही करणेसाठी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन हरकती मागविणे आवश्यक असल्याने त्यानुसार जाहिर सुचना प्रसिध्द करण्यास व येणाऱ्या पर्यायी खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदर रस्त्यास व चौकास उक्त नांव देणे संदर्भात जाहिर सुचना प्रसिध्द केल्यानंतर कोणत्याही प्रकारची सूचना / हरकती प्राप्त न झाल्यास पिंप्राळा शिवारातील गट नं.१५९,१६०,१६१ शामराव नगर या परिसरात आदिवासी समाजातील भिल बहुल वस्ती असलेल्या शामराव नगर ते वाघ नगर स्टॉप ते खंडेराव नगर रेल्वे पुला पर्यंतच्या रस्त्याला क्रांतिविर/क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचे नांव देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १६ :-** प्रभाग क्र.०४ मधील रथ चौकातील दक्षिणमुखी हनुमानमंदिर चौकास स्व.राजाबापु शिंदे चौक असे नामकरण करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.नगरसेविका सौ.चेतना किशोर चौधरी यांनी प्र.क्र.०४ मधील रथ चौकातील परिसरात स्व.राजाबापु शिंदे हे सुमारे सन १९४०-५० पासुन विविध समाजपयोगी उपक्रम सेवा उत्सव सणांचे नियोजन, नियंत्रण तसेच परिसरातील भांडण, तंटे सोडविणे अशा सेवा करीत असतांना सामाजिक बांधीलकी जोपासली आहे. सदर परिसरात त्यांची आठवण नांव आदरपूर्ण आजही घेण्यात येते. तसेच आजही सदर परिसर त्यांचे नावाने ओळखण्यात येत आहे. उपरोक्त कारणास्तव परिसरातील नागरिकांच्या मागणीस अनुसरुन प्र.क्र.०४ मधील रथ चौकातील दक्षिणमुखी हनुमान मंदिर चौकास स्व.राजाबापु शिंदे चौक असे नामकरण करणे कामी प्रस्ताव मंजुरीसाठी येत्या महासभेच्या पटलावर घेणे बाबत अर्ज केलेला आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर जावुन चौकशी केली असता सदरच्या चौकास पूर्वी कोणतेही नांव दिलेले नाही. असे तेथील स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले तसेच दि.१६/०९/२०२२ च्या स्थानिक दिव्य मराठी या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन त्यावर नागरिकांच्या व स्थानिक रहिवाशांच्या हरकती व सुचना मागविण्यात आल्या व त्यास पाच दिवसांची मुदत देण्यात आलेली होती. परंतु या बाबत कोणत्याही सुचना व हरकती सार्व.बांधकाम विभाग,जळगांव शहर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नसल्याने प्रभाग क्र.०४ मधील रथ चौकातील दक्षिणमुखी हनुमानमंदिर चौकास "स्व.राजाबापु शिंदे चौक" असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १७ :-** प्रभाग क्र.०४ मधील पांझरापोळ चौक ते रथचौक मार्गास श्री.हिंगलाज देवी माता मार्ग असे नामकरण करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.नगरसेविका सौ.चेतना किशोर चौधरी यांनी प्र.क्र.०४ मधील पांझरापोळ चौक ते रथ चौक या मार्गावर श्री.हिंगलाज देवी मातेची प्राचीन मंदिर असुन तेथे याच काळापासुन भावसार पंच भवन देखील आहे. श्री.हिंगलाजदेवी माता या अनेक जाती जमातीच्या नागरिकांचे कुलदैवत व श्रध्दास्थान असुन तेथे वेळोवेळी जिल्ह्यातील व जिल्हाबाहेरील श्रध्दाळु दर्शनास येत असतात तसेच भावसार क्षत्रिय समाजाच्या व श्रध्दाळुंच्या मागणीस अनुसरुन प्र.क्र.०४ मधील पांझरापोळ चौक ते रथचौक मार्गास श्री.हिंगलाजमाता मार्ग असे नामकरण करणे कामी प्रस्ताव मंजुरीसाठी येत्या महासभेच्या पटलावर घेणे बाबत अर्ज केलेला आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर जावुन चौकशी केली असता सदरच्या रस्त्यास पूर्वी कोणतेही नांव दिलेले नाही. असे तेथील स्थानिक रहिवाशी यांनी सांगितले तसेच दि.१६/०९/२०२२ च्या स्थानिक दिव्य मराठी या वृत्तपत्रात जाहिर सुचना प्रसिध्द करुन त्यावर नागरिकांच्या व स्थानिक रहिवाशांच्या हरकती व सुचना मागविण्यात आल्या व त्यास ०५ दिवसांची मुदत देण्यात आली होती परंतु या बाबत कोणत्याही सुचना व हरकती सार्व.बांधकाम विभाग,जळगांव शहर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या नसल्याने प्रभाग क्र.०४ मधील पांझरापोळ चौक ते रथचौक मार्गास “श्री.हिंगलाज देवी माता मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १८ :-** महानगरपालिका आरोग्य विभागाकरिता मनपा निधी अंतर्गत Chassis 05 Ton GVW Vehicle Mounted Open Nallah वर चेचीससह बांधणी कामी ०२ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी करणे कामी येणारे अंदाजीत खर्च रक्कम रु.६३,७०,०५४/- मात्रला मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नविन ०२ नग नाला एक्सेव्हेटरची आवश्यकता असलेबाबत आरोग्य विभागाची मागणी आहे. सदर वाहन खरेदी कामी येणारा अंदाजीत खर्चाबाबत तपशिल देणे शक्य नाही. कारण खरेदी कामी वाहनाचा प्रकार व त्यातील तांत्रिक बाबी नुसार दर आहेत. तसेच वाहनाचे चेसिस खरेदी केल्यावर त्यावरील बॉडी बांधणीचे काम स्वतंत्रपणे करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी प्रती वाहन (नाला एक्सेव्हेटर) साठी अंदाजे ३१.० ते ३२.० लक्ष खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे प्रती वाहन (नाला एक्सेव्हेटर)

साठी येणाऱ्या एकुण खर्चाचा तपशिल नमुद करणे शक्य नाही. महासभेची मान्यता प्राप्त झाल्यानंतर वाहन खरेदी कामी मार्केट मधील वाहनाचा प्रकार व दराबाबत माहिती संकलीत करुन कार्यवाही करता येईल. वाहन खरेदी कामी शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका-२०१६ नुसार त्यातील प्रकरण क्रमांक ३) खरेदी प्रक्रीया, प्रकरण ४) निविदा / दरपत्रक प्रक्रीयेसाठी मार्गदर्शक सुचना नुसार कार्यवाही करण्यात येईल.

मा.महासभा (अशासकीय) ठराव क्रं.६०८ दि.१२/०८/२०२१ अन्वये महानगरपालिका आरोग्य विभागाच्या विशेष निधीतुन जळगांव शहरासाठी ०४ नग नविन नाला एस्केव्हेटर खरेदी करण्याबाबत सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहरासाठी पुर्वीचे नाले एस्केव्हेटरची अत्यंत दुरावस्था झालेली असल्याने वेळोवेळी त्यांचेवर दुरुस्तीसाठी पुष्कळ खर्च येत असल्याने जळगांव शहराच्या हितासाठी महानगरपालिका आरोग्याच्या विशेष निधीतुन ०४ नग नविन नाले एक्सेव्हेटर खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशाप्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असा ठराव मा.महासभेने पारीत केला आहे.

प्रस्तृत प्रकरणी सहा.आयुक्त यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सदर अशासकीय ठरावामध्ये नमूद आरोग्याच्या विशेष निधीमधुन असा उल्लेख असलेला (लेखाशिर्ष) मनपाच्या अर्थसंकल्पात नसल्यामुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बघता आयुक्त यांचे दालनात झालेल्या बैठकीत दिलेल्या मौखिक आदेशान्वये सदर खरेदी विहीत शासन निर्णयान्वये यथोचित खरेदी प्रक्रीया राबविणे योग्य राहील. त्याअनुषंगाने ०२ नग नाला एक्सेव्हेटर मनपा स्वनिधीमधुन नियमोचित विहीत खरेदी प्रक्रीयेव्दारे करणेकामी सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवण्याच्या निर्णयास्तव मान्यतेसाठी सादर सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने व पारीत ठराव या मध्ये नाला एक्सेव्हेटर खरेदी करण्यास आरोग्याचा विशेष निधी उपलब्ध नाही या कारणाने सदर ठराव संदर्भात नगरसचिव यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार उपरोक्त प्रमाणे ठरावात फेरबदल अथवा ठराव रद्द करावाचा झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ महानगरपालिका स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजामधील नियम १(र) (१)(र) नुसार परिपुर्ण प्रस्ताव (डॉकेट) तयार करुन पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय - १) अंदाजीत खर्च, खरेदी प्रक्रीया सुस्पष्ट नमुद करणे योग्य राहील. २) अंदाजीत खर्च नमुद करुन महासभेची मान्यता घेवुन नियमोचित खरेदी प्रक्रीया राबविणे उचित राहील.

आयुक्त यांचा अभिप्राय - दोन्ही एस्केव्हेटरला अंदाजित खर्च किती येऊ शकतो? सादर करणे.

खालील प्रमाणे ०२ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी करणे कामी अंदाजीत खर्च Annaxure 'B' मध्ये नमुद केल्याप्रमाणे अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| Annaxure 'B' | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr.No | Description | Price | Qty | Total Amount |
| 1 | Kamscoop 5C :Special Purpose Vehicle Mounted Open Nall Desilting Machine, Mounted on A Chassis (BS-VD With Bucket As per our Technical Offer<br><br>Kamscoop SC :Special Purpose Vehicle Mounted Open Nall Desilting Machine on A Chassis (BS-VD With Bucket As per our | 12,85,560/- | 01 | 12,85,560/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Technical HSN Code 8705 | | | |
| 2 | Chassis, 05 Ton GVW<br>Chassis, 05 Ton GVW.99KAEE05TOHSN<br>Code : 8705 | 14,13,616/- | 01 | 14,13,616/- |
| Sub Total | | | | 26,99,176/- |
| CGST @ 9% | | | | 2,42,925.84/- |
| SGST @ 9% | | | | 2,42,925.84/- |
| Grand Total | | | | 31,85,027.68/- |

Chassis, 05 Ton GVW Vehicle Mounted Open Nallah वर चेचीससह बांधणी करणे कामी ०२ नग करिता अंदाजीत खर्च रक्कम रु.६३,७०,०५४/- मात्र अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासन उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियम पुस्तिका २०१६ शासन निर्णय, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग-४ दि.०१/१२/२०१६ नुसार नियमोचित विहीत खरेदी प्रक्रीयेव्दारे महानगरपालिका आरोग्य विभागाकरिता मनपा निधी अंतर्गत Chassis 05 Ton GVW Vehicle Mounted Open Nallah वर चेचीससह बांधणी कामी ०२ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी करणे कामी येणारे अंदाजीत खर्च रक्कम रु.६३,७०,०५४/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच यापुर्वी ०४ नग नाला एक्सेव्हेटर खरेदी कामी महासभा ठराव क्र.६०८ दि.१२/०८/२०२१ अन्वये आरोग्याचा विशेष निधीतुन खरेदी करणेस मान्यता प्राप्त आहे मात्र आरोग्याच्या विशेष निधीतून असा (लेखाशिर्ष) मनपाच्या अर्थ संकल्पात नसल्याने सदर ठराव रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १९ :-** महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग / आरोग्य विभागा करिता मनपा निधी अंतर्गत TATA HITACHI (Hydraulic Exacavator) EX 210 LC Super Plus with Piping Kit ०१ नग खरेदी करणे कामी येणारे अंदाजीत खर्च रक्कम रु.९९,७८,९५५/- मात्रला मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्र.८१४ दि.३०/०५/२०२२ अन्वये महानगरपालिकेच्या विविध कामकाजासाठी TATA HITACHI-Z-AXIS140H पोकलँड मशिन मनपा फंडा अंतर्गत खरेदी करणे कामी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच महासभा ठराव क्र.८७५ दि.०८/०८/२०२२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेच्या विविध प्रभागातील रस्ते दुरुस्ती कामी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करणे बाबत मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत आलेल्या प्रस्तावानूसार खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

असा ठराव करण्यात येतो की, सदयस्थितीत जळगांव शहरात अमृत पाणी पुरवठा व मलनिस्सारण योजने अंतर्गत जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या टाकणेची कामे कार्यपथावर आहेत. सदर कामांदरम्यान शहर प्रमुख रस्त्यासह बहुतांश रस्त्यावर चाऱ्या खोदण्यात आलेल्या आहे. तसेच पावसाळा सुरु झाल्याने शहरातील रस्त्याची अवस्था खराब झालेली असून शहरवासियांकडून रस्ते दुरुस्ती बाबत वारंवार मागणी

होत असून नागरीकांकडून वृत्तपत्रकांमार्फत दैनंदिन नकारात्मक व मनपा विरोधी बातम्या प्रसिध्द होत असल्याने जळगांव शहरातील विविध प्रभागातील सर्व खराब, खड्डेमय रस्ते दुरुस्ती कामी खालील नमुद अत्याधुनीक व आवश्यक यंत्रसामग्री मनपा फंडातुन खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशिल/मॉडेल | नग |
|---|---|---|
| **१** | **जेसीबी** | **०४** |
| **२** | **रोड रोलर** | **०२** |
| **३** | **२१० पोकलॅन्ड** | **०१** |

महासभेने उपरोक्त नमूद ०२ ठराव पारीत केल्याप्रमाणे सदर ठराव अंमलबजावणी करण्याकामी वाहन विभागात प्राप्त झाले आहेत. नविन वाहन फायर / आरोग्य वाहन खरेदी या लेखाशिर्षाअंतर्गत तरतूद रक्कम रु.०४.०० कोटी मात्रची तरतूद आर्थिक वर्ष-२०२२-२३ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. नमूद दोन्ही ठरावाप्रमाणे यंत्रसामुग्री खरेदी करण्यास अंदाजे ०७.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर यंत्रसामुग्रीचे दर मागविण्यास मान्यता असावी. सदर मशिनरी खरेदी करण्यापुर्वी आवश्यक निधीची तरतूद अर्थसंकल्पात करणे आवश्यक आहे. सदर मशिनरी खरेदी करण्यापुर्वी महानगरपालिकेकडे सदया कार्यान्वित असलेली यंत्र सामुग्री/ मशिनरी शासन निर्देशाप्रमाणे कालबाहय ठरवून निर्लेखित करुन लिलाव प्रक्रीयेव्दारे विक्री करणे बाबत निर्णय आवश्यक आहे.

महासभा ठराव क्र.७२ दि.१८/०२/२०१४ अन्वये महासभेने सदर मशिनरी १० वर्षानंतर कालबाहय नियम लावून निर्लेखित न करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. तद्नंतर प्रशासनातर्फे ६३ वाहने व मशिनरी कालबाहय ठरवून निर्लेखन करण्याबाबत महासभेपुढे प्रस्ताव सादर केला असता महासभा ठराव क्र.१८२ दि.२९/०१/२०१५ रोजी जळगांव शहर महानगरपालिका मालकीची ७० कालबाहय वाहने / मशिनरी निर्लेखित करण्याबाबत प्रशासनाकडून प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. त्यानुसार महासभेने प्रशासनामार्फत आलेल्या प्रस्तावामधील ७० कालबाहय वाहनांवर होत असलेला इंधन व दुरुस्ती खर्चाचा विचार करता सदरची वाहने निर्लेखित करणे आवश्यक व योग्य आहे. तथापी सदयास्थितीत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता शहरातील रस्त्याच्या कामासाठी नविन रोडरोलर, बुलडोझर खरेदी करणे शक्य होणार नसल्याने प्रशासनाकडून आलेल्या यादीमधील रोडरोलर व बुलडोझर वगळून उर्वरित सर्व वाहने निर्लेखित करण्यास संदर्भीय ठरावान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे सदर कालबाहय वाहनांच्या लिलावाव्दारे मिळणारी रक्कम फक्त नविन वाहने खरेदी करण्यासाठीच वापरण्यात यावी याची प्रशासनाने दखल घेण्याबाबत संदर्भीय ठरावान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

महापौर यांचे दालनात आयुक्त यांच्या उपस्थितीत पोकलॅन्ड २१० नविन खरेदी कामी यापुर्वीच अशासकीय ठराव क्रं.८७५ दि.०८/०८/२०२२ पारीत झालेला असुन त्याअनुषंगाने नविन पोकलॅन्ड २१० खरेदीसाठी येणारे अंदाजित खर्चास महासभेची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव दाखल करण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

उपरोक्त विषयांकामी GeM Portal वरुन पोकलॅन्ड EX 210 LC With Super Long Front ची किंमत तपासुन पाहिली असता रु.८६,९८,५६५/- नमुद असुन सदर प्राईज ही ऑफर प्राईज म्हणुन नमूद आहे व MRP/Unit ९९,७८,९५५/- नमूद आहे.

तरी मनपास पोकलॅन्ड EX 210 LC ची आवश्यकता असल्याने मनपा निधीतुन खरेदी करणे कामी रक्कम अंदाजे ०१ (एक कोटी) रुपयांची तरतुद करणेस व त्यानंतर विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन व त्यासाठी नियमानुसार प्रस्ताव तयार करुन आवश्यक त्या मान्यतेनंतर खरेदी प्रक्रीया पुर्ण करुन पोकलॅन्ड घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. २० :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करुन मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ९७ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेबाबत मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** श्री.छत्रपती शिवाजी महाराज उड्डाणपुलाच्या रेल्वेच्या भिंतीपासुन ते साईबाबा मंदिर खडकेचाळ साईबाबा मंदिर पर्यंत एक साईडची RCC गटार बांधणे हे एक काम आहे. दुसरे दुध फेडरेशन पासनु ते MSEB ऑफीस ते सिटी कॉलनी पर्यंत दोन्ही बाजुंच्या गटार बांधणे आणि बौध्द मंदिर ते नविन कानळदा रोडापर्यंत पर्यंत दोन्ही बाजुला गटार बांधणे हे काम समाविष्ट करण्यात यावे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २० मधील १ ते १०० कामं सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओर हे किसीके.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील सर्व सन्मा.नगरसेवकांनी मा.महापौर,मनपा जळगांव यांचेकडेस विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असून ते विविध शासकीय योजनांतुन घेणेबाबत विंनती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलित वस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नाविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभूत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्टयपुर्ण योजनेतुन व शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधीतील कामे सुचविलेली असून त्यास मा.महासभेची मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले असल्याने मा.महापौर,मनपा,जळगांव यांनी सादर केलेल्या यासोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते ९७ तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांनी सुचविलेली ०३ विकास कामे अशी एकूण १०० विकास कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. नवनाथ दारकुंडे | 2 | प्रभाग क्रं. 2 मधील अहिल्याबाई होळकर उद्यानाला लागुन असलेले चारही बाजुचे रोड डांबरीकरण करणे. | 60,00,000 |
| 2 | 3,40,00,000 | | प्रभाग क्रं. 2 मधील धनाजी काळे विहीरी पासुन ते हनुमान सॉ मिल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 70,00,000 |
| 3 | | | प्रभाग क्रं. 2 मधील शिवाजी नगर हुडको मधील मेन 12 मीटचे रस्ते डांबरी करण करणे. | 60,00,000 |
| 4 | | | प्रभाग क्रं. 2 मधील उस्मानिया पार्क मधील मेन रोड डांबरी करण करणे | 1,10,00,000 |
| 5 | | | प्रभाग क्रं. 2 मधील हमालवाडा येथील मेन रोड डांबरी करण | 40,00,000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | करणे. | |
त्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा सन २०२२-२३ चे चालुदर २२.३६% जास्त आहेत त्यामुळे मक्तेदार यांनी प्रस्तावीत केलेले अंदाजपत्रकीय दरावर १५% जास्तीचे दर हे चालु दरापेक्षा ७.३६% कमी आहेत. तरी मक्तेदार एल एम आर कंन्ट्रोटेक प्रा.लि. यांना निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दर निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा रक्कमेपेक्षा १५% जास्तीचे दरा नुसार अपेक्षीत खर्च रक्कम | ८०७११०६/- |
| २ | जि.एस.टी.१२% | ९६८५३३/- |
| ३ | कामगार विमा ०.५०% | ४०३५६/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | १७९५५७/- |
| ५ | रॉयल्टी | ३४०५०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.- | ९२९३६०२/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षित खर्च रक्कम रु.९२९३६०२/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.३६२६८९६/- मात्र राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमा योजने अंतर्गत व रक्कम रु.५६६६७०६/- मात्र मनपा नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२२-२३ मधुन खर्च करण्यास व मक्तेदार यांनी वाटाघाटी अंति निविदा

रक्कमेवर १५% जास्तीचे दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं.३२ :-** मनपा मालकीच्या (जुनी नगरपालिका) सि.स.नं.१९८३ व (जुनी सानेगुरुजी रुग्णालय) सि.स.नं.१९३७-ब या पे ॲण्ड पार्क जागा गणेशोत्सवाच्या कालावधीत विनामुल्य उपलब्ध करुन देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.३१/०८/२०२२ पासुन गणेशोत्सवास सुरुवात होत आहे. मागील दोन वर्ष कोविड-१९ च्या सावटामुळे कमी प्रमाणात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. परंतु या वर्षाचा गणेशोत्सव मोठया उत्साहाने व आनंदाने साजरा करण्यात येणार आहे. या काळात शहराच्या मध्यवर्ती भागासह गणेश मंडळाच्या परिसरांत मोठया प्रमाणावर गर्दी होत असते. याबाबत महापौर,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचेकडील दि.३०/०८/२०२२ चे पत्रात गणेशोत्सवाच्या कालावधीत शहरांत लगतच्या खेडेगावातील तसेच शहरांतील विविध परिसरातील नागरीक वाहनांनी मध्यवर्ती भागांत येत असतात, सदरचे नागरीक अस्ताव्यस्त वाहने पार्कींग करतात त्यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठया प्रमाणात गर्दी व वर्दळ वाढून पायी चालणाऱ्या गणेश भक्तांना अडचण होते. सदर बाबतीत देखील सहाय्यक पोलिस अधिक्षक, जळगांव उपविभाग जळगांव यांचे कडील पत्र अ.शा.पत्र क्र.०२/गणेशोत्सव/ २०२२ दि.३०/०८/२०२२ सुध्दा इकडेस प्राप्त झाले आहे. सदर बाबतीत जिल्हाधिकारी,जळगांव यांनी सुध्दा गणेशोत्सवाच्या कालावधीत महानगरपालिकेच्या पार्कींगच्या जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत आयुक्त यांना मौखीक सुचना केल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने आयुक्त यांचे मौखीक आदेशानुसार महानगरपालिकेच्या (जुनी नगरपालिका) सि.स.नं.१९८३ या जागेवर, (जुने सानेगुरुजी रुग्णालयाची जागा) सि.स.नं.१९३७ व महानगरपालिकेच्या इतर जागा पार्किंगसाठी गणेशोत्सवाच्या कालावधीत म्हणजेच दि.३१/०८/२०२२ ते दि.०९/०९/२०२२ पर्यंत विनामुल्य उपलब्ध करुन देणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर जागांपैकी (जुनी नगरपालिका) सि.स.नं.१९८३ या जागेवरील पार्कींग कामी श्री.किरण शंकर भालोदकर यांना इकडील कार्यादेश संदर्भ क्र./ज.म.न.पा./जा.क्र.१०२५/मि.व्यवस्थापक/२०२२-२३, दि.१९/०७/२०२२ अन्वये दि.२०/०७/२०२२ पासुन पुढील दोन वर्षासाठी वाहन तळ चालविणे कामी नियुक्त करण्यात आले आहे. तसेच (जुने सानेगुरुजी रुग्णालयाची जागा) सि.स.नं.१९३७ येथील जागेवरील वाहनतळ फी ही महानगरपालिका किरकोळ वसुली विभागामार्फत वसुली करण्यात येते. उक्त पैकी जुन्या नगरपालिकेची जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर कालावधीची भरपाई संबंधीत मक्तेदार श्री.किरण शंकर भालोदकर यांना पुढील कालावधी वाढवुन देणेसही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं.३३ :-** मनपा सि.स.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालयाची जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. कैलास सोनवणे** :- मंजुर आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.सुनिल महाजन** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- महापौरताई आता ही आपली सानेगुरूजी रूग्णालयाची जागा आहे त्याच्याबाबतीत जो प्रस्ताव आलेला आहे तो मान्य करण्यात यावा. परंतू या जागेवर आपले रूग्णालयाचं आरक्षण आहे. बागुल साहेब जर कधी या रूग्णालयच आणि काही पार्ट हा कमर्शियल आहे आणि उर्वरित रूग्णालय आहे आणि आपण आपले रूग्णालय दुसरीकडे स्थलांतरीत केलं होत. ते आपण स्वत:ही चालवु शकलो नाही म्हणुन आपण दुसऱ्या संस्थेला दिलेले आहे.

**श्री.बागुल , सहा.संचालक:-** बरोबर आहे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- याचा ३७ चा एक फेरफार चा एक प्रस्ताव तयार करा. या मोक्याच्या जागा आहेत आपल्या आणि फक्त पे ॲन्ड पार्क साठी वापरून या जागेतुन महानगरपालिकेला अपेक्षित असलेले उत्पन्न मिळत नाही.

**श्री.बागुल , सहा.संचालक:-** आपण आता एक शासनाची सुचना आलेली आहे की महापालिकेला जर आरक्षण दुरूस्त करायचं आहे तर ते करू शकतात.

**श्री. नितीन लढ्ढा** :- नाही महापालिकेला आहे पण त्याची व्हॅल्यु वगैरे काय आहे.

**श्री.बागुल , सहा.संचालक:-** अस व्हॅल्यु काढायची

**श्री. नितीन लढ्ढा** :- त्याच्यातुन आपल्याला महानगरपालिकेच्या हिताची त्या जागेवर कमर्शियल स्कोप असेल तर तो तसा विचार करावा.

**मा.आयुक्त** :- हॉस्पीटल आणि कमर्शियल असे पार्टली असे दोघं आहेत.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- मग हि निविदा १ वर्षाचीच काढा .

**श्री. नितीन लढ्ढा** :- बागुलसाहेब हा प्लॅन जो आहे तो एक एक वर्षाच्या आंतमध्ये काढा आणि मी सांगीतल्याप्रमाणे तो ही विचार करा.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सानेगुरुजी रुग्णालयाची खुली जागा सि.स.नं.१९३७ या जागेवर खाजगी सहभाग तत्वावर वाहनतळ चालविणेस देणे कामी महासभा ठराव क्रमांक ७४६ दि.१४/०२/२०२२ अन्वये एक वर्षा करीता रु.५,७५,०००/- एवढी देकार रक्कम निश्चित केलेली आहे व त्यानुसार सदर जागेकरीता वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी अभिकर्ताकडून ई-निविदा सुचना मागविण्यात आलेली होती.

सदर जागे करीता ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेली होती तीन वेळा प्रसिध्द करुनही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. सदर जागे करीता कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने वाहन तळाची फी ही मनपा कर्मचारी मार्फत वसुल करण्यात येत आहे. दि.०१/०८/२०२२ ते दि.३१/०८/२०२२ या कालावधीत सदर जागेवरील वाहन तळाचे एकुण रुपये १८,१७०/- मात्र वसुल करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सरासरी एक वर्ष कालावधीत अंदाजीत रु.२,२०,०००/- मात्रचा अपेक्षीत रक्कम वसुल होवू शकतो. पुढील काळातील नैसर्गिक वाढ, सणासुदीचा कालावधी, इतर उत्पन्न विचारात घेतल्यास वर्षभराच्या कालावधीत साधारण रु.४,००,०००/- मात्र एवढा भरणा होऊ शकतो. त्यातुन अभिकर्त्याचा मेटेंनन्स व इतर खर्च वगळता एका वर्षाकरीता रु.२,५०,०००/- मात्र एवढा देकार रक्कम निश्चित करता येईल. सदर वसुली कामी मनपा कडून तिन कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. एका कर्मचाऱ्याचा सरासरी रु.२०,०००/- मात्र अंदाजीत पगार गृहीत धरल्यास तीन कर्मचारी यांची रु.६०,०००/- अंदाजीत मासिक

वेतनापोटीची रक्कम अदा केली जाईल तसेच वसुली कामी नियुक्त कर्मचारी यांचा होणारा वेतन खर्च व वसुली उत्पन्न पाहता मनपा कर्मचाऱ्याकडुन वसुलीची बाब आर्थिकदृटया म.न.पा.हिताची नसल्याने वाहन तळ बाबत सुधारीत अंदाजीत देकार निश्चित करुन निविदा प्रक्रिया राबविणे योग्य होईल.

वरील पार्श्वभुमी विचारात घेता मनपा सि.स.नं.१९३७ (जुनी सानेगुरुजी रुग्णालयाची जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर राबवून दोन वर्षाच्या कालावधीसाठी देणेबाबत प्रशासनाने प्रस्ताव सादर केलेला होता परंतू सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदरचे वाहनतळ एक (०१) वर्षासाठी सुधारीत देकार रक्कम निश्चित करुन ई-निविदा मागविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं.३४ :-** जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जल शुध्दी व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (ॲलम) ची निविदा संपुष्टात आलेली असून निविन निविदा मंजूर होईपावेतो विक्रम केमिकल्स, नाशिक यांचे मागील मंजूर दरात रक्कम रु.१५३६०/- प्रति मे.टन प्रमाणे ८० मे.टन पिवळी तुरटी (ॲलम) खरेदी करणेसाठी येणारा खर्च रक्कम रु.१२,२८,८००/- मात्रचे खर्चास व कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा** :- प्रस्ताव मंजुर आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दी व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणेकामी मागील पुरवठादार विक्रम केमिकल्स,नाशिक यांची मुदत संपुष्टात आलेली असून त्याबाबतची ई-निविदा प्रक्रिया प्रगती पथावर आहे. तरी, पाणी शुध्दी व निर्जंतुकीकरण करणे आवश्यक असल्याने नविन दर मंजुर होई पावेतो विक्रम केमिकल्स, नाशिक यांचे मागील मंजूर दरात रक्कम रु.१५३६०/- प्रति मे.टन प्रमाणे ८० मे.टन पिवळी तुरटी (ॲलम) खरेदी करणेसाठी येणारा एकूण खर्च रक्कम रु.१२,२८,८००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३५ :-** सन २०२२-२३ या वर्षासाठी उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारी पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणेस्तव विक्रम केमिकल्स्, नाशिक यांच्या आलेल्या ई-निविदेबाबत निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** प्रस्ताव मान्य करावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन २०२२-२३ या वर्षासाठी उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारी पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणेकामी

आयुक्त यांच्या मान्यतेने ई-निविदा सुचना क्रं.३२/२०२२-२३ http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असुन ई-निविदा सुचना दै.लोकमत (राज्यस्तरीय वर्तमान पत्रात दि.०५/०३/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संकेतस्थळाव्दारे निविदा भरणे करीता दिलेल्या मुदतीत ०३ ई-निविदा प्राप्त झाले असुन प्राप्त झालेले ०३ निविदाधारकांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| निविदाधारकाचे नांव | Swanand Traders. Pvt. Ltd. Loni Khurd | VikramChemicals, Nashik | Thakkar Inorganics Pvt. Ltd. Mumbai |
|---|---|---|---|
| निविदा रक्कम प्रति मे.टन | १९,८८८/- | १७,९९९/- | २०,५००/- |

पात्र ०३ निविदाधारक पैकी पुरवठादार विक्रम केमिकल्स,नाशिक (L1) यांचे दर सर्वात कमीचे रक्कम रु.१७,९९९/- प्रति मे.टन नुसार आले असता सदरील दरांमध्ये पुरवठादार विक्रम केमिकल्स,नाशिक यांच्याशी पत्र देवून वाटाघाटी केली असता विक्रम केमिकल्स,नाशिक यांचे दि.२८/०९/२०२२ चे पत्रानुसार सदरील आलेल्या दरांमध्ये प्रति मे.टन रु.४९९/- मात्रने कमी करुन दिले आहे तरी सुध्दा त्यानुसार निविदा समिती यांना सदरचे दर हे जास्तीचे वाटत असल्याने विक्रम केमिकल्स,नाशिक यांच्याशी पुनश्च वाटाघाटी केली असता विक्रम केमिकल्स,नाशिक यांनी रक्कम रु.१७,१००/- प्रति मे.टन नुसार दि.२९/०९/२०२२ च्या पत्रान्वये पुरवठा करणेस तयार असल्याचे कळविले असल्याने सन २०२२-२३ या वर्षासाठी उमाळा पाणी शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जतुकीकरण करणेसाठी लागणारी पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणेस्तव विक्रम केमिकल्स्, नाशिक यांचे वाटाघाटी अंती आलेले दर रक्कम रु.१७,१००/- प्रति मे.टन स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**

**सूचक** **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** **:- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं.३६ :-** शिवाजी नगर रेल्वे उड्डाण पुलावर तसेच पुलालगतच्या दोन्ही बाजुच्या रस्त्यावर ९ मिटर उंचीचे (octagonal) पोल उभारुन पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.३१,२२,१३९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिवाजी नगर रेल्वे उड्डाण पुलावर तसेच पुलालगतच्या दोन्ही बाजुच्या रस्त्यावर ९ मिटर उंचीचे (octagonal) पोल उभारुन पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी सन २०२१-२२ चे जिल्हा दर सुची नुसार रक्कम रु.३२,२२,५५४/- मात्रचे अंदाजपत्रकास मा.महासभा ठराव क्रं.७६१ दि.२४/०३/२०२२ अन्वये मान्यता मिळालेली आहे. प्रस्तुत काम महानगरपालिका फंडातुन हाती घेण्यात येत असून आयुक्त यांचे मान्यतेने https://mahatenders.gov.in या मनपा संकेत स्थळावर ई-निविदा सुचना क्र.१४६ दि.२६/०६/२०२२ रोजीचे दै.नवराष्ट्र या वृत्तपत्रात प्रसिध्द करुन ई-निविदेव्दारे दर मागविण्यात आले असता विहीत मुदतीत संगणकावरील पोर्टलवर दोन ई-निविदा प्राप्त झाल्या. पात्र मक्तेदाराचे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नाव | निविदा रक्कम २८,७७,१०२ | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव | निविदा रक्कमेपेक्षा ३.११०% कमीचे (८९,४७७.८७) | २७,८७,६२४/- |
| २ | मिलींद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव | निविदा रक्कमेपेक्षा १.९९०% कमीचे (५७,२५४.३२) | २८,१९,८४७.६७/- |

वर नमुद तुलनात्मक तक्ता पाहता लघुत्तम ई-निविदा धारक/मक्तेदार इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ३.११०% कमीचे आलेले असुन निविदा अटी व शर्तीनुसार १ ते १०% कमीचे दरापर्यंत १% व त्यावरील प्रत्येक टक्क्यास १% याप्रमाणे परफॉर्मस सेक्युरीटीचा भरणा डी.डी.व्दारे करणे आवश्यक असल्याने  लघुत्तम ई-निविदा धारक/मक्तेदार इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांना मनपा पत्र क्रं.१५४ दि.०३/०८/२०२२ अन्वये परफॉर्मस सेक्युरीटी रक्कम रु.३१,२२१/- मात्रचा भरणा करणे बाबत कळविण्यात आलेले होते त्यानुसार मक्तेदार यांनी मनपा पावती क्र.१५४४९ दि.०३/०८/२०२२ अन्वये रक्कम रुपये ३१,२२१/- मात्रचा भरणा मनपा खजिन्यात केलेला आहे. त्यानुसार सदर कामी एकुण रक्कम रु.३१,२२,१३९/- मात्रचा खर्च ई-निविदा रक्कमेपेक्षा ३.११०% कमीचा आहे. ई-निविदेत आलेल्या दरानुसार GST ची रक्कम खालीलप्रमाणे समाविष्ठ करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| ई.निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च ३.११०% कमी | रु.२७,८७,६२४/- |
| १२% GST | रु.३,३४,५१४/- |
| एकुण अपेक्षीत खर्च रक्कम | रु.३१,२२,१३९/- |

वर नमुदप्रमाणे ई-निविदेत आलेले दरानुसार व १२%GST चा समावेश करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३१,२२,१३९/- मात्र नवीन पोल उभारणे वीज वाहिनी स्थलांतरीत करणे या लेखाशिर्षका अंतर्गत करणेस तसेच लघुत्तम ई-निविदा धारक/मक्तेदार इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ३.११०% कमीचे आलेले दर स्विकृत करणेस तसेच येणारा एकुण रक्कम रु.३१,२२,१३९/- मात्रच्या खर्चास व मक्तेदाराशी संविधा करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** ६२

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३७ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणारा रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.०२/०९/२०२२ रोजी चे अखेर डिझेल साठा शिल्लक १२१२ लिटर असुन सदर साठा २ दिवसांसाठी पुरेल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.०२/०९/२०२२ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.११६.२४/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.१३,९४,९८८.९५/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.२,६५,६६८.९५/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना २.५ लक्षापेक्षा अधिक खर्च १२००० लिटर खरेदी करतांना होणार आहे. वाढीव खर्च टाळण्यासाठी एस.टी. महामंडळाने त्यांची वाहने खाजगी अधिकृत विक्रेत्या पंपावरुन डिझेल खरेदी करणे सुरु केलेले आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.२,६५,६६८.९५/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या वेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

त्यानुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यासाठी सदयास्थितीत मनपाकडे शिल्लक साठा हा रिझर्व्ह ठेवून विहीत मुदतीत अधिकृत विक्रेता यांना कार्यादेश देवून किरकोळ डिझेल खरेदी करता येईल. महानगरपालिकेचे आर्थिक हीत जोपासता येईल. किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जो पर्यंत तफावत राहील तो पर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव | मे.अमल ऑटो आय.ओ.सी.डिलर जळगांव | मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो, जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- | प्रति लिटर दर रु.९४.११/- | प्रति लिटर दर रु.९४.१५/- |
| | | | ११,२९,३२०/- | ११,२९,३२०/- | ११,२९,८००/- |
| एकूण रक्कम रुपये | | | ११,२९,३२०/- | ११,२९,३२०/- | ११,२९,८००/- |

उपरोक्त आलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता पाहता मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव व मे.अमल ऑटो आय.ओ.सी.डिलर जळगांव यांचे दर समान आहेत. तसेच मे.अब्दुल पेट्रोलियम सर्वो,जळगांव यांचे दर जास्तीचे आलेले आहे. परंतु वर नमूद तीन पुरवठादारांपैकी एक पुरवठादार निश्चित करणे क्रमप्राप्त आहे. मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

मनपा मार्फत डिझेल पुरवठा करणे कामी जाहिर निविदा प्रसिध्द करुन बंद पाकीटात दर मागविण्यात आले आहेत. दर प्राप्ती होऊन निविदा समितीची मान्यता प्राप्त करुन कार्यादेश निर्गमित करण्यास १० ते १५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

परंतु शुक्रवार दिनांक ०२/०९/२०२२ रोजी १२१२ लिटर डिझेल शिल्लक असुन सोमवार पर्यंत सदर डिझेल पुरण्याची शक्यता आहे. त्यापुढील कालावधीसाठी डिझेलची आवश्यकता असल्याने इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.११ दि.०२/०९/२०२२ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३८ :-** मनपा अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९१५७ (टाटा झेनॉन) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.६१,२४८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९१५७ (टाटा झेनॉन) वाहन हे अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे खालील प्रमाणे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टस् सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम एच १९ एम ९१५७ (टाटा झेनॉन) (उत्पादीत वर्ष डिसेंबर-२००९) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Assy. G/S/ Lever (Upper+Low) 207 DI - 1 nos | 22 | Head Lamp RH RHD Auto Lev - 1 Nos |
| 2 | Assy. G.S. Lever Knob Black 3 -Gate Shiftin - 1 nos | 23 | Head Lamp LH RHD Auto Lec - 1 nos |
| 3 | TMGO Gear oil 80W90 Long Life -22 ML | 24 | Assy. Blinker Lamp with Bulb LH BSI -4-1nos |
| 4 | Brake Fluid (Dot 4) -500ML | 25 | Assy. Blinker Lamp with Bulb RH BSI-4 1-nos |
| 5 | Bellow (G.S.L Top) 207 DI -1 nos | 26 | Assy. Horn (100DIA) 12V Low Tone -1 nos |
| 6 | Rubber Bellow -2 nos | 27 | Wiring Harness Main BS-II -1 nos |
| 7 | Base Plate-G.S.L.Bellow -1 nos | 28 | Wiring Harness Engine BS-II -1 nos |
| 8 | Bush Ball Seat G S Lever -1 nos | 29 | Assy. Wiper ARM & Blade DR-Co-DR-RHD -1 nos |
| 9 | Linkage Bush Kit -2 nos | 30 | Assy. Wiper ARM & Blade DR-RHD DOM -1 nos |
| 10 | TMGO Diese Engine oil C14 Plus 15W40 -6500 ML | 31 | 5-Funct E Cert T/L W/E MK.Bulb RH BSI-4 -1 nos |
| 11 | Assy. Oil Filter (Spin on) -1 nos | 32 | 5-Funct E Cert T/L W/E MK.Bulb LH BSI-4 -1 nos |
| 12 | Paper Element Star Type BS2/3- 2 nos | 33 | TMGO RA oil 80W140 Long Life -2000 ML |
| 13 | Assy. Filter Element Winger BS1/2/3/4 - 1 nos | 34 | Bearing - 1 nos |
| 14 | Grease Pack 2 KG | 35 | Kit-Universal Joint BS1/2/3/4 - 1 nos |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | Oil Seal - 2 nos | 36 | Kit-CL/PR Plate TATA ACE W/BRG -1 nos |
| 16 | Brake Pad Safari Antisqueal -1 nos | 37 | Assy. Clutch Cable BS2/3/4 -1 nos |
| 17 | Kit-Lined Shoe BS1/2/3/4 -1 nos | 38 | Brake Fluid (Dot 4) -500 ML |
| 18 | Assy. Parking Brake Cable Rear - 1 nos | 39 | Sub Assy. Gear Shift Lever-Upper Part -1 nos |
| 19 | Tata Genuine Coolant 3 Ltr | 40 | Assy. Clutch Release Yoke BS2/3/4/6 -1 nos |
| 20 | Assy. Steering Column | 41 | TMGO Gear oil 80W90 Long Life 1500 ML |
| 21 | Brake Fluid (Dot4) -500 ML | 42 | All Labour Charges |

तरी वर नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस् / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह, प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.१४/०६/२०२२ अन्वये रक्कम रु.४६,०७२.५०/- + लेबर इस्टिमेट दि.१४/०६/२०२२ अन्वये रक्कम रु.१५,१७५/- या प्रमाणे एकूण खर्च रक्कम रु.६१,२४८/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह, प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.६१,२४८/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३९ :-** मनपा आरोग्य विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) या वाहनाची दुरुस्तीची कामे स्पेअर पार्टस् सह रिअर नविन टायर कीट -०२ नग खरेदी करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.१,४६,६१४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९२९ पारित करण्यात आला.**

मनपा आरोग्य विभागाकडील मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) या वाहनाची दुरुस्तीची कामे स्पेअर पार्टस् सह रिअर नविन टायर कीट -०२ नग खरेदी करणे कामी येणारा एकुण रक्कम रु.१,४६,६१४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

असा ठराव करण्यात येतो की, मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) वाहन हे मशिन आरोग्य विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर मशिनचे खालील प्रमाणे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टस् सह रिअर नविन टायर कीट -०२ नग खरेदी करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा मशिन क्रं.एम एच १९ एम ०३२८ (जे.सी.बी.) (उत्पादीत वर्ष जुन-२००७) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Rubber Mounting - 4 nos | 17 | Transmission filrer (pc) - 1 nos |
| 2 | Annulus Ring - 1nos | 18 | Filter Element - 1 nos |
| 3 | Annulus Carrier - 1 nos | 19 | Rear Tyre Kit - 14X25 HD |
| 4 | Circlip - Internal - 1 nos | 20 | Element -2 nos |
| 5 | Ring Dowel -8 nos | 21 | Element -1 nos |
| 6 | Sun Gear (Shot Peene) -1 nos | 22 | Brake Master Cylinder -1 nos |
| 7 | Locknut M16 -4 nos | 23 | External Circlip -1 nos |
| 8 | JCB Rear Axle Oil -20 ltr | 24 | O-Ring Seal -1 nos |
| 9 | JCB Engine Oil Max -15 ltr | 25 | Verbus Ripp Bolt -MI -8 nos |
| 10 | JCB Rear Axle Oil - 5 ltr | 26 | Brakeseal -2 nos |
| 11 | Link Pipe -2 nos | 27 | Brake Seal -2 nos |
| 12 | Bolt MI2X90 # 5.5 -2 nos | 28 | L.O.P. Filter (06) -1 nos |
| 13 | MI2 Lock Nut -2 nos | 29 | Rear Axle Work -1 nos |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | Bolt MI2X80 -2 nos | 30 | Engine & Transmission Mounting Change |
| 15 | MI2 Lock Nut -2 nos | 31 | Brake Cylinder and Seal Replace |
| 16 | Bolt -M10X75 -4 nos | 32 | Engine Oil & Filter and Axle Oil Change |

तरी वर नमुद वाहनाचे वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस् सह, रिअर नविन टायर कीट -०२ नग खरेदी करणे कामी अधिकृत विक्रेते मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर,प्रा.लि.जळगांव यांच्याकडील सेल कोटेशन नं.२१०४०५७१ दि.१३/०८/२०२२, इस्टिमेट नं.३९० दि.१६/०८/२०२२ अन्वये एकूण खर्च रक्कम रु.१,४६,६१४/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर,प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.१,४६,६१४/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल -** **६२**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४० :-** जळगांव शहरातील स्मशानभूमी (१. नेरी नाका स्मशानभुमी २. मेहरुण स्मशानभुमी ३.पिंप्राळा स्मशानभुमी ४.शिवाजी नगर स्मशानभुमी) येथे मृत देहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी मृतांचे नातेवाईकांना कमी खर्चामध्ये अंत्यसंस्कार करता यावे याकरिता लागणारे ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास विक्री परवाना देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- महापौरताई मला एक सुचना मांडायची याच्यामध्ये

**श्री. नवनाथ दारकुंडे** :- भाऊ एक विषय मांडायचा आहे की हा जो प्रस्ताव आलेला आहे. याच्यामध्ये या मक्तेदाराने चांगले काम केलेले आहे. तर याच मक्तेदाराला देण्यास काय हरकत आहे. आपल्याला पेपरचा खर्च लागतो. इतर खर्च लागतो. तर मग याच मक्तेदाराला देण्यात यावं एवढच म्हणणं आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- याच्यामध्ये फक्त एक सुचना आहे की, या मक्तेदाराने दराचा डिजीटल बोर्ड लावावा. कारण पहिल्याच्या मक्तेदाराने ते हे केलेलं आहे की दर कमीचे होते आणि लोकांकडुन जास्तीचे घेतलेले आहे. तर त्या तक्रारी खुप येतात. तर त्या ठिकाणी डिजीटल बोर्ड लावा किंवा चांगल्या पध्दतीने भिर्तीवर पेंटींग केलेले बोर्ड लावण्यात यावे आणि त्याच्यावर त्याचा मोबाईल नंबर सुध्दा असावा त्या ठेकेदाराचा आणि लोकांना दिसेल अशा ठिकाणी त्याची जागा महापालिकेने निश्चित करून द्यावी की बोर्ड कुठे लावायचा.

**श्री. नवनाथ दारकुंडे** :- भाऊ मी काय बोललो ते पण सांगा.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- हो हे सगळं घ्यावं त्याच्यामध्ये तेवढी सुचना ही या ठरावात घेण्यात यावी.

**(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)**

**नगरसचिव** :- सुचक कोण आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने घ्यावी आणि विषय क्रं. ४० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील स्मशानभूमी (१.. नेरी नाका स्मशानभुमी २. मेहरुण स्मशानभुमी ३.पिंप्राळा स्मशानभुमी ४.शिवाजी नगर स्मशानभुमी) येथे मृत देहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी मृतांचे नातेवाईकांना कमी खर्चामध्ये अंत्यसंस्कार करता यावे याकरिता लागणारे ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास विक्री परवाना देणे बाबत महासभा

ठराव क्रं.४७० दि.१२/०५/२०२१ नुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. त्यानुसार आयुक्त यांचे दि.१२/०९/२०२२ रोजीचे मान्यते नुसार दैनिक लोकमत या वृत्तपत्रात जाहिर सुचना जा.क्र.४३४ दि.१३/०९/२०२२ नुसार प्रसिध्द केली असता मुदतीत ४ दरपत्रक (कोटेशन) फॉर्मची विक्री झालेली आहे.

त्या अनुषंगाने दि.२०/०९/२०२२ पर्यंत ३ फॉर्म प्राप्त झालेले असून त्यांची नावे खालील प्रमाणे आहे.

१. प्रल्हाद शंकर कोळी, माऊली नगर,जळगांव
२. राहूल सुहास कोळी, धनगरवाडा,हरिविठ्ठल नगर,जळगांव
३. विशालराव सुभाषरावजी नवघाणे, शिवाणी नगर, लाकुडपेठ,जळगांव
४. मुजाहिद मजिद जहागिरदार, मेहरुण, पिरजादे वाडा,जळगांव

वरील प्रमाणे प्राप्त चारही दरपत्रक धारक यांना सहा.आयुक्त (आरोग्य) समक्ष बोलवून त्यांचे समोर दराचा लिफाफा दि.२२/०९/२०२२ रोजी उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| विवरण | स्मशानभुमीचे नांव | प्रल्हाद शंकर कोळी, माऊली नगर,जळगांव | राहूल सुहास कोळी, धनगरवाडा,हरिविठ्ठल नगर,जळगांव | विशालराव सुभाषरावजी नवघाणे, शिवाणी नगर, लाकुडपेठ,जळगांव | मुजाहिद मजिद जहागिरदार, मेहरुण, पिरजादे वाडा,जळगांव |
|---|---|---|---|---|---|
| जळगांव शहरातील स्मशानभूमी येथे मृत देहांवर अंत्यसंस्कार करणेसाठी मृतांचे नातेवाईकांना कमी खर्चामध्ये अंत्यसंस्कार करता यावे याकरिता लागणारे ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास विक्री परवाना देणे बाबत | १.नेरी नाका<br>२.मेहरुण<br>३.पिंप्राळा<br>४.शिवाजी नगर | ९००/- | १३००/- | ११००/- | १३५०/- |
| | | L१ | L२ | L३ | L४ |

वरील तक्ता पाहता निविदाकारक मे.प्रल्हाद शंकर कोळी, माऊली नगर,जळगांव यांचे शहरातील ४ स्मशानभुमीसाठी ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या प्रती मृतदेहावर रु.९००/- सर्वात कमीचे दर प्राप्त झालेले असल्याने मे.प्रल्हाद शंकर कोळी, माऊली नगर,जळगांव यांना शहरातील ४ स्मशानभुमी येथे प्रती मृतदेहावर ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणेसाठी व विक्री करणेस निविदा मधील खालील नियम अटीस अधिन राहून परवाना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सर्वात कमी दरात लाकूड व गोवऱ्या पुरवठा करणाऱ्या मक्तेदारास मनपाकडून विक्री परवाना देण्यात येईल.
२. मनपा मार्फत सदर मक्तेदाराला सर्व स्मशानभूमींमध्ये १५ X ३० स्के.फुट मोफत जागा देण्यात येईल. तसेच तेथे शेड उभारण्याची परवानगी देण्यात येईल.

३. कमीत कमी दरात लाकूड व गोवऱ्या विक्री करणाऱ्या पुरवठादाराची नेमणुक नागरिकांची सोय म्हणून करण्यात येत आहे. सदर पुरवठादाराकडूनच सदरचे साहित्य खरेदी करण्याची नागरिकांना सक्ती असणार नाही. नागरिक आपल्या सोयीप्रमाणे इतर ठिकाणांहूनही साहित्य आणु शकतात.

४. सदर परवाना १ वर्ष कालावधीसाठी मर्यादित राहील.

५. १ वर्षानंतर मक्तेदारास मनपाने दिलेली जागा खाली करुन मनपाच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील.

६. मक्तेदारास सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे मालकी हक्क सांगता येणार नाही.

७. साहित्य पुरवठाचे देयक संबंधीत मृत व्यक्तींचे नातेवाईक यांचेकडून अदा करण्यात येईल. त्याची जबाबदारी महापालिकेची असणार नाही.

८. मंजूर दराचे व एक वर्ष कालावधीचे मोठे बॅनर तयार करुन दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.

९. परवाना देणेपुर्वी रक्कक रु.५०,०००/- सुरक्षा अनामत भरणे आवश्यक आहे.

प्रस्तावीत केलेनुसार मे.प्रल्हाद शंकर कोळी, माऊली नगर,जळगांव यांना मनपा मार्फत नेरी नाका, मेहरुण, पिंप्राळा, शिवाजी नगर या स्मशानभूमींमध्ये १५ X ३० स्क्वे.फुट मोफत जागा देणे व रु.९००/- प्रती मृतदेहावर ८ मण लाकुड (वड,पिंपळ सोडून) व २ पोते (अंदाजे ५० नग) गोवऱ्या पुरवठा करणेसाठी व विक्री परवाना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावात नमूद केलेल्या स्मशानभुमी येथे नागरीकांना माहिती व्हावी म्हणुन देण्यात येणाऱ्या साहित्याचे दर, किती साहित्य देण्यात येईल त्याचे नग, मक्तेदाराचे नांव, मोबाईल नंबर इत्यादी अटी-शर्ती प्रमाणे सर्व माहिती त्याठिकाणी लावणे आवश्यक आहे. तरी सदर माहिती डिजीटल बोर्डवर न लावता भिंतीवर कलर पेंटीगने सर्वांना स्पष्ट दिसेल अशा पध्दतीने बोर्ड तयार करुन लावावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४१ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२५/०७/२०२२ ते दि.२९/०७/२०२२, दि.०१/०८/२०२२ ते दि.०५/०८/२०२२, दि.०८/०८/२०२२ ते दि.१२/०८/२०२२, दि.१५/०८/२०२२ ते दि.१९/०८/२०२२, दि.२२/०८/२०२२ ते दि.२६/०८/२०२२ व दि.२९/०८/२०२२ ते दि.०२/०९/२०२२ (एकूण - ०६ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- अहवालाची माहिती घेण्यात आली.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री. विशाल त्रिपाठी** :- आता विषय संपलेले आहेत.

**नगरसचिव** :- भाऊ विषय क्रं. ४२ अजुन बाकी आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.२५/०७/२०२२ ते दि.२९/०७/२०२२, दि.०१/०८/२०२२ ते दि.०५/०८/२०२२, दि.०८/०८/२०२२ ते दि.१२/०८/२०२२, दि.१५/०८/२०२२ ते दि.१९/०८/२०२२, दि.२२/०८/२०२२ ते दि.२६/०८/२०२२ व दि.२९/०८/२०२२ ते दि.०२/०९/२०२२ (एकूण - ०६ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४२ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा**:- प्रशासनाने केलेल्या संविदा १ ते २१ पर्यंत माहिती घेतली.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ९३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४० दि.०१/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्र.०९ गट नं.३७/०३ मुक्ताईनगर येथील मनपा ओपनस्पेस मधील शिवगणेश मंदिर जवळ पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.सुनिल भगिरथ पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,२७,४९०/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४५ दि.१५/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ गट नं.९५/१+२ अ तळेले कॉलनी येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७,३८,३९५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४६ दि.१५/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ स.नं.५१/२ काशिनाथ नगर येथील खुल्या जागेस चेनलिंक फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७,८७,६२५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४७ दि.१५/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ गट नं.९५/३ तळेले कॉलनी येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,२८,९६०/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४८ दि.१५/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९ गट नं.११ व १२ मधील श्री.अजबसिंग पाटील यांच्या घरापासुन ते प्राजक्ता प्रोव्हिजन श्री.इंगळे साहेब यांच्या घरापासुन ते श्री.उत्तम चौधरी यांच्या घराजवळ पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,९०६/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./४९ दि.१५/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९ गट नं.११ व १२ मधील श्री.दिलीप पाटील, अशोक पाटील, सुभाष पाटील, डॉ.साळुंखे व श्री.निकम यांच्या घराजवळ पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,७३०/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./५१ दि.२९/०७/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९ गट नं.०९/१ प्लॉट नं.२० ओम शांती नगर ते प्लॉट नं.२३ पर्यंत व

गट नं.९/२/१३अ प्लॉट नं.२३ ते प्लॉट नं.२६ ओम शांती नगर पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,४५३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.५३ दि.०५/०८/२०२२ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामाच्या मंजुर दरात उमाळा जल शुध्दीकरण केंद्रावर सुरक्षा रक्षक पुरविणे कामी पुरवठादार/मक्तेदार रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव यांचे मंजुर दरानुसार तिन पाळीत ०६ सुरक्षा रक्षक दि.३०/०६/२०२२ म्हणजेच १२ महिन्याकरीता होणारा अतिरीक्त खर्च रक्कम रु.१२,५३,१६०/- मात्र वाढीव खर्चाची संविदा.

९. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०८ दि.१९/०८/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव शहर प्रभाग क्र.०९ प्लॉट नं.२०, स.नं.७७, शंकरराव नगर, सुनिल नगर, डी.एन.सी.कॉलेज जवळ १ व इतर ७ विविध ठिकाणी हायमास्ट बसविणे कामी मक्तेदार/निविदाधारक इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,५४,२८१/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१०. प्रशासकीय आदेश क्र.५५ दि.२३/०८/२०२२ अन्वये मेहरुण परिसरात जळगांव शहर महानगरपालिका अमृत योजने अंतर्गत प्रकल्प विभागामार्फत पाण्याची व्यवस्थेकरीता टाकण्यात येणाऱ्या जलवाहीनीस अडथळा ठरणारे विदयुत पोल ट्रान्सफार्मर, स्ट्रक्चर रस्त्याच्या कडेला सुरक्षीत अंतरावर मेहरुण ११ केव्हीए बहिणाबाई उच्चदाब विज वाहीनी पोल स्ट्रक्चरसह स्थलांतरीत करणे कामी मक्तेदार मे.महेश इलेक्ट्रीक वर्क्स,यावल जि.जळगांव यांचे वाटाघाटी अंती अंदाजित रक्कमेवर ४.९९% जास्तचे दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१७,८२,३४५/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०९ दि.२४/०८/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत जळगांव शहर प्रभाग क्र.०३ गट नं.५१/१/१, श्रावण नगर, ज्ञानदेव नगरच्या पुढे १ व इतर ८ विविध ठिकाणी हायमास्ट बसविणे कामी मक्तेदार/निविदाधारक इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६,२०,८३२/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१२. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/११ दि.२४/०८/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत जळगांव शहर प्रभाग क्र.१० गट नं.३१३,३१५/२ राधाकृष्ण मंदीर, संत मिराबाई नगर येथे १ व इतर ६ विविध ठिकाणी हायमास्ट बसविणे कामी मक्तेदार/निविदाधारक इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,४४,५४४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१३. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/१२ दि.२४/०८/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत जळगांव शहर प्रभाग क्र.०९ गट नं.३४८, इंद्रनील सोसायटी येथील चौकात १ व इतर ७ विविध ठिकाणी हायमास्ट बसविणे कामी मक्तेदार/निविदाधारक इंगळे इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,४५,०९५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१४. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/१९ दि.०२/०९/२०२२ अन्वये वार्ड क्रं.१० मधील मयुर कॉलनी, प्रशांत क्लासेस तसेच झे.पी. कॉलनी येथील रस्त्यात अळथळा ठरत असल्याने सदर पोल व रोहित्र स्थलांतरीकरणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपर व्हिजन स्किम अंतर्गत) कामी मक्तेदार महेश इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे वाटाघाटी अंतीचे निविदा रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,३०,९१०/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./५५ दि.२३/०८/२०२२ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणेसाठी व खरेदी केलेले इमल्शन डांबर वाहतुक खर्च करणे कामी एकूण रक्कम रु.१८,३०,१२५/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./६१ दि.०१/०९/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१३ अंतर्गत मेहरुण शिवार सर्वे नं.४११ प्लॉट नं.१९ ते २२ व प्लॉट नं.१५ ते ३० प्लॉट नं.३० ते ०५ पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रासट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९३,२५९/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१७. प्रशासकीय आदेश क्र./सा.बां./६६ दि.१२/०९/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील जळगांव शहरातील कोर्ट चौक ते गणेश कॉलनी चौक रोडवरील ठिकठिकाणी रोड क्रॉसिंगला नवीन स्लॅब कल्व्हर्ट तयार करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१५,४५,१०४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.६९ दि.१३/०९/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१४ मधील मेहरुण स.नं.४३६/१ मधील प्लॉट नं.२०३ ते प्लॉट नं.२०६ पर्यंतचा कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९७,५६३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.चंदुभाई पटेल)

१९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७० दि.१३/०९/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१४ मधील मेहरुण स.नं.४३६/१ मधील प्लॉट नं.२१५ ते प्लॉट नं.२२२ पर्यंतचा कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.गजानन एन्टरप्राईजेस यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९७,५६३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.चंदुभाई पटेल)

२०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७१ दि.१३/०९/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०९ मधील गट नं.२५ नं.१६/०१ मनीषा प्रदीप चौधरी यांच्या घरापासुन ते प्रकाश चौधरी यांच्या घरापर्यंत (स्वामी समर्थ केंद्राच्या मागील बाजू पर्यंत) आणि श्री.दिलीप नारखेडे यांच्या घरापासुन ते श्री.देऊळकर घरापर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,४८,४८३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

२१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां.७८ दि.१९/०९/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१४ मधील मेहरुण स.नं.४३६-१ मधील प्लॉट नं.२०९ ते प्लॉट नं.२१२ पर्यंतचा कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार श्री.सिध्दार्थ विनोदकुमार दधिच यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९७,५६३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.चंदुभाई पटेल)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ६२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री. विशाल त्रिपाठी** :- तरी शेवटचं सांगतो की सभागृहाचं नुतनीकरण झालं पाहीजे , हे पुर्ण बेंच हलत आहेत. येथे गरम होत. विस वर्ष झाले आहे या सभागृहाला किंवा जास्त २३ वर्ष व्हायला आलेले आहेत.

(सभागृहामध्ये अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सौ. दिपमाला काळे** :- विशालभाऊ, महापौरताई मला फक्त एकच विषय अतिक्रमणचा मांडायचा आहे. गणेश कॉलनी या ठिकाणी दोनच कर्मचारी आहेत. तर ते दोघं कर्मचारी असतात फक्त त्याठिकाणी त्यांच काय आहे.

आयुक्त साहेबांना विचारते , आयुक्त मॅडम तुम्ही माझ्यासोबत या संध्याकाळी आणि तुम्ही बघा तिथे की काय चाललेलं असतं

**मा.महापौर** :- तुम्ही बोला ना

**सौ. दिपमाला काळे** :- याबाबतीत मी किती वेळा बोलायचं

(सभागृहामध्ये मा.आयुक्त , मा.महापौर , मा.उपमहापौर , नगरसचिव तसेच अनेक सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. विशाल त्रिपाठी** :- आयुक्त मॅडम प्रस्ताव तयार करायला लावा तुम्ही

**मा.आयुक्त** :- कोणता प्रस्ताव

**श्री. विशाल त्रिपाठी** :- सभागृहाचा चांगल्या आर्कीटेक्ट कडुन तयार करा.

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतासाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**